# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**बी. ए. भाग–३ राज्यशास्त्र**

सत्र ५ : पेपर–७ (DSE- E76)

# राजकीय सिद्धांत

**(Political Theory)**

सत्र ६ : पेपर–१२ (DSE- E201)

# आधुनिक राजकीय संकल्पना

**(Modern Political Concepts)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. (राज्यशास्त्र) भाग-३ पेपर ७ व १२ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ४००

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-19-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिति

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र**

अध्यक्ष – **प्रा. डॉ. श्रीमती भारती पाटील**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **प्रा. डॉ. रविंद्र भणगे**
  राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. राजेंद्र कुरळपकर**
  के.आर.पी. कन्या महाविद्यालय, उरुण-इस्लामपूर,
  जि. सांगली
- **डॉ. एस. जी. कुंभार**
  राजा श्रीपतराव भगवंतराव कॉलेज, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. आर. आर. कांबळे**
  कर्मवीर हिरे आर्टस, सायन्स, कॉमर्स अॅण्ड
  एज्युकेशन कॉलेज, गारगोटी, जि. कोल्हापूर
- **डॉ. अमिता संजिव कणेगांवकर**
  डी.डी. शिंदे सरकार कॉलेज, महालक्ष्मी मंदीर जवळ,
  कोल्हापूर
- **डॉ. शिवाजी सुबराव पाटील**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **प्राचार्य डॉ. शिरिषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, जि. सातारा
- **प्रा. डॉ. श्रीमती उत्तरा सहस्त्रबुद्धे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. मृदुल निळे**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  मुंबई विद्यापीठ, मुंबई
- **प्रा. डॉ. ए. एस. चौसाळकर**
  आर. के. नगर हौसिंग सोसायटी,
  एमएसईबी ऑफीस समोर, कोल्हापूर
- **श्री. वैभव नायकवडी**
  हुतात्मा किसन अहिर शुगर मिल, वाळवा,
  जि. सांगली
- **श्री. दशरथ विठोबा पारेकर**
  फ्लॅट नं. ५०८, एव्हरग्रीन होम्स, फेज-४,
  टॉवर डी, प्रभू हॉस्पिटल रोड, नागाळा पार्क, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या राज्यशास्त्र विषयाच्या पेपर क्रमांक ७ सत्र पाच साठी 'राजकीय सिद्धांत' आणि पेपर क्रमांक १२ सत्र सहा साठी 'आधुनिक राजकीय संकल्पना' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक ७ राजकीय सिद्धांत यामध्ये राजकीय सिद्धांत, राजकीय सिद्धांताचे दृष्टीकोन, वर्तनवाद व उत्तर-वर्तनवाद, राजकीय सिद्धांतातील संकल्पना तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १२ आधुनिक राजकीय संकल्पना यामध्ये स्त्रीवाद, बहुसंस्कृतीवाद, पर्यावरणवाद, नागरी समाज या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष प्रा. डॉ. भारती पाटील यांचे बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक डॉ. रविंद्र भणगे, जेष्ठ अभ्यासक डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, प्राचार्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे आम्ही आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, दूरशिक्षण केंद्रातील सर्व सहकारी, विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा.

**डॉ. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**सत्र–५ : पेपर–७ : राजकीय सिद्धांत**
**सत्र–६ : पेपर–१२ : आधुनिक राजकीय संकल्पना**

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. सुर्यकांत गायकवाड**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ | – |
| **प्रा. डॉ. शिवाजी सुबराव पाटील**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा | २ | – |
| **डॉ. रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. डॉ. आण्णासाहेब हारदारे**<br>शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज | ४ | – |
| **डॉ. अनिल डी. पाटील**<br>ओंकार कॉलेज, गडहिंग्लज | – | १ |
| **डॉ. सचिन भोसले**<br>दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | २ |
| **प्रा. व्ही. एम. भोसले**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **प्रा. डॉ. अरुण चव्हाण**<br>भोगावती महाविद्यालय, कुरुकली | – | ४ |

**■ संपादक ■**

**प्राचार्य डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण,
ता. पाटण, जि. सातारा.

**डॉ. शिवाजी पाटील**
छत्रपती शिवाजी कॉलेज,
सातारा, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–७**<br>**राजकीय सिद्धांत** | |
| १. | राजकीय सिद्धांत | १ |
| २. | राजकीय सिद्धांताचे दृष्टीकोण | १९ |
| ३. | वर्तनवाद व उत्तर–वर्तनवाद | ३१ |
| ४. | राजकीय सिद्धांतातील संकल्पना | ५३ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१२**<br>**आधुनिक राजकीय संकल्पना** | |
| १. | स्त्रीवाद | ७८ |
| २. | बहुसंस्कृतीवाद | ९७ |
| ३. | पर्यावरणवाद | ११३ |
| ४. | नागरी समाज | १३७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

**घटक १**

# राजकीय सिद्धांत

**१.० उद्दिष्ट्ये**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ राजकीय सिद्धान्ताचे स्वरूप व व्याप्ती**

**१.२.२ राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धान्त**

**१.२.३ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास, पुनरूज्जीवन व महत्त्व**

**१.३ सारांश**

**१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

**१.५ सरावासाठी स्वाध्याय**

**१.६ अधिक वाचनासाठी पुस्तके**

## १.० उद्दिष्ट्ये :

**या प्रस्तुत घटकामध्ये खालील उद्दिष्ट्ये स्पष्ट होतील.**

- राजकीय सिद्धांताचे स्वरूप व व्याप्ती समजावून घेणे.
- राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धान्त याच्यातील संबंधाची चर्चा करणे.
- राजकीय सिद्धान्ताचा ऱ्हास व पुनरुज्जीवन याचा आढावा घेणे.
- राजकीय सिद्धान्ताचे महत्त्व स्पष्ट करणे.

## २.१ प्रास्ताविक :

राज्यशास्त्र हे जगामध्ये प्राचनी काळापासून सामाजिक शास्त्र म्हणून मानण्यात आले आहे. मनुष्यप्राणी एकत्रित समाजजीवन जगत असल्यापासून या शास्त्राचा उगम झाला. काळाच्या ओघामध्ये त्यात अनेक बदल होत गेले व एक सर्वव्यापी राज्यशास्त्र म्हणून उदयास आले. त्यामध्ये राजकीय सिद्धान्त ही एक उपशाखा आहे. एखाद्या विद्याशाखाचा अभ्यास करताना अनेक तत्त्ववेत्यांनी सिद्धान्ताची मांडणी करीत असतात. राज्यशास्त्रामध्ये सिद्धान्त हे वेगवेगळ्या अर्थाने वापरण्यात आले आहे. राजकीय सिद्धान्तामध्ये राज्यसंस्थेविषयीचा समावेश केला जातो. राज्यसंस्थेची ध्येये, मूल्य आणि कार्यपद्धती त्याच्यावरून राज्यसंस्थेविषीचे स्वरूप काय असावे, याविषयी जे वेगवेगळे विचारप्रवाह निर्माण झाले त्यांना राकीय सिधान्त म्हणून ओळखले जाते. जेव्हा ॲरिस्टॉटलने आपल्या ग्रंथाला पॉलीटिक्स हे नाव दिले त्यावरून राज्यकारभाराचे शास्त्र असे ओळखले जाऊ लागले. राज्यशास्त्र म्हणजे राज्याचे शास्त्र असे आर. जी. गेटेल यांनी राज्यशास्त्राची व्याख्या केली आहे. तर राजकीय सिद्धान्त म्हणजे राज्यकारभारसंबंधीचे चिंतन आणि राजकीय प्रश्नाची शिस्तबद्ध शोध घेणे होय. त्यामुळे राजकीय सिद्धान्ताचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## १.२ विषय-विवेचन :

राजकीय सिद्धान्ताचा विचार करण्यापूर्वी सिद्धान्त म्हणजे काय हे पाहणे आवश्यक आहे. थिअरी हा शब्द ग्रीक शब्द थिआ (ढहशर) या शब्दापासून निर्माण झालेला आहे. ढहशर म्हणजे दृष्टी किंवा दृश्य पाहणे होय. म्हणजेच जाणून घेण्याची दृष्टी असा अर्थ होतो. सिद्धान्त म्हणजे घटनाचा परस्परसंबंध आणि वास्तवता जाणून घेणारा दृष्टिकोन होय सुसंघटित ज्ञानाच्या आधारे संशोधन करून निष्कर्ष काढले जातात. माहितीचे संकलन आणि विश्लेशण जेवढे अचूक असेल तेवढ्या प्रमाणात निष्कर्षाचा पडताळा येऊन तो सिद्धान्त वास्तववादी व प्रमाणभूत ठरतो.

### १.२.१ राजकीय सिद्धान्ताचे स्वरूप व व्याप्ती

मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न म्हणजे राजकीय सिद्धान्त होय. राजकीय सिद्धान्तामध्ये तत्त्वज्ञान, विचारप्राणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते. काळानुसार आणि परिस्थितीनुसार राजकीय सिद्धान्तावर त्या काळातील संस्कृतीचा प्रभाव पडलेला असतो. राजकीय सिद्धान्ताच्या अनेक विचारवंतांनी व्याख्या केल्या आहेत, त्या पुढीलप्रमाणे आहेत.

**सेबाईन** यांच्या मते, ''राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्या प्रश्नाची शिस्तबद्ध मांडणी करणे म्हणजे राजकीय सिद्धांत होय.''

**ॲड्र्यू हॅकर** यांच्या मते, ''ज्या तत्त्वज्ञानात्मक आणि शास्त्रीय ज्ञानाच्या संकल्पनामुळे, मग ते केव्हाही

आणि कुठेही केलेले असो, आम्ही राहत असलेल्या वर्तमानकालीन आणि भविष्यकालीन जगाविषयीची आमची समजूत वाढते त्यास राजकीय सिद्धांत असे म्हणता येईल.''

**डान्टे जर्मिनोच्या** मते, ''मानवाच्या सामाजिक अस्तित्वासाठी आवश्यक असणाऱ्या योग्य अशा व्यवस्थेच्या तत्त्वाचा चिकित्सात्मक अभ्यास म्हणजे राजकीय सिद्धांत होय.''

**एफ. डब्ल्यू. कोकरच्या** मते, ''मानवाच्या कायमस्वरूपी गरजा, अपेक्षा आणि मते या दृष्टिकोणातून राजकीय शासनसंस्था व त्याच्या विभागाचे कार्य याचे मूल्यांकन केले जाते तेव्हा त्या अभ्यासास राजकीय सिद्धांताचे स्वरूप प्राप्त होते.''

वरील सर्व व्याख्यावरून असे दिसून येते की, राजकीय सिद्धान्त मुख्यत: मानवी जीवनातील समस्या सोडवते, मानव हिताच्या दृष्टिकोणातून राज्यसंस्थेचा अभ्यास करणे, त्याचबरोबर राजकीय व्यवस्थेतील प्रश्नाची व्यवस्थित मांडणी करणे म्हणजेच राजकीय सिद्धांत होय.

### ❑ राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये :

राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. राजकीय सिद्धांत हे मूलत: व्यक्तीच्या बौद्धिक व राजकीय कार्यावर आधारलेले आहेत. कारण एखाद्या व्यक्तीने चिंतन करून जे राजकीय वास्तव स्पष्ट केले आहे किंवा काही संकल्पना स्पष्ट केल्या आहेत, यातूनच राजकीय सिद्धांताची निर्मिती होते. त्यामध्ये प्रामुख्याने प्लेटोच्या रिपब्लिक, ॲरिस्टॉटलच्या पॉलिटिक्स किंवा जॉन रॉल्स याची 'ए थेअरी ऑफ जस्टिस' इत्यादी ग्रंथातून राजकीय सिद्धांताची निर्मिती झाल्याचे दिसून येते.

२. राजकीय सिद्धांतामध्ये व्यक्ती, समाज आणि इतिहासाचा समावेश होतो, कारण एखादा समाज कसे संघटित होऊन काम करतो, त्याचे प्रमुख तत्त्व कोणते आहे. समाजातील प्रश्न कसे सोडवता येतील या सर्व गोष्टींचा विचार राजकीय सिद्धांत करीत असतो.

३. राजकीय सिद्धांत हे एका विशेष विषयावर आधारित आहे. कारण विचारवंतांचा उद्देश केवळ राज्याच्या स्वरूपासंबंधी विचार करीत असतो. परंतु ती व्यक्ती, तत्त्वज्ञ, इतिहासकार, अर्थतज्ज्ञ, धर्मशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ असे कोणीही असू शकते.

४. राजकीय सिद्धांताचा उद्देश केवळ राजकीय वास्तवता समजून घेणे एवढेच नाही तर समाज परिवर्तन करण्यासाठी साधने एकत्रित करणे आणि ऐतिहासिक प्रक्रिया संवर्धित करणे हा आहे.

५. राजकीय सिद्धांतामध्ये विचारधाराही समाविष्ट असते. ही विचारधारा विश्वास, मूल्ये आणि विचाराच्या आधारावर निर्माण झालेली असते. राजकीय विचारधारांच्या माध्यमातून राजकीय मूल्ये, संस्था व व्यवहाराची माहिती कळते.

६. राजकीय सिद्धांतातील निष्कर्ष हे तत्त्व आणि व्यवहार यात समन्वय साधून काढलेले असतील तर ते सामाजिक व राजकीय परिस्थितीशी अधिक जुळणारे व सुसंगत ठरतात.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांताची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

**राजकीय सिद्धांताचे स्वरूप :**

अॅड्र्यू हॅकरच्या मते, राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय विचारप्रणाली यांना राजकीय सिद्धांतात महत्त्वाचे स्थान आहे. व्यापक अर्थाने विचार केला तर असे म्हणता येईल की, राजकीय विषयावरील सर्वाधारणात्मक तत्त्वज्ञान, चिंतन आणि ज्यात तत्त्वज्ञान आहे असे, तसेच विचारप्रणाली व विज्ञान यांच्या मूलतत्त्वाच्या आधारे बौद्धिक मांडणी केलेली असते, असे प्रतिपादन यांचा अंतर्भाव राजकीय सिद्धांतात करता येईल. त्याद्वारे मानवी समाजजीवनाचे व्यावहारिक प्रश्न समजावून घेणे आणि सोडवणे सहज शक्य होते. हॅकरच्या मते, राजकीय संकल्पना आणि राजकीय सिद्धांत यामध्ये फरक असतो. राज्य, सार्वभौम सत्ता, अधिसत्ता, स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी राजकीय संकल्पनांचे स्पष्टीकरण करण्याचे कार्य राजकीय सिद्धांत करीत असतात. संकल्पनांना प्रत्यक्षात आणण्यासाठी राजकीय सिद्धांताचे मार्गदर्शन उपयुक्त ठरते.

सेबाईन यांनी ऐतिहासिक दृष्टिकोणातून राजकीय सिद्धांताचे स्पष्टीकरण केले आहे. सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे माणसाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. याचा अर्थ असा की, राजकीय सिद्धांत ही एक बौद्धिक परंपरा आहे आणि तिच्या इतिहासात माणसाने काळाच्या ओघात राजकीय प्रश्नावर जे विचार मांडले त्यांची उत्क्रांती सामावलेली आहे, त्या-त्या काळातील संस्कृतीची छाप तेव्हाच्या राजकीय सिद्धांतावर स्पष्ट उमटलेली असते. पिढ्यान्‌पिढ्या हस्तांतरित होत जाणाऱ्या संस्कृतीचा राजकीय सिद्धांत हा एक अविभाज्य भाग असो. सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांत म्हणजे राजकारणाविषयीचे किंवा राजकारणाशी प्रस्तुत असलेले सगळेच चिंतन होय.

सेबाईन हे ऐतिहासिक दृष्टिकोनाला महत्त्व देतात. कोणताही राजकीय सिद्धांत हा इतिहासातील विशिष्ट टप्प्यावरच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भात मांडलेला असतो. त्यामुळे तो सिद्धांत समजावून घ्यायचा तर त्या विशिष्ट स्थळ काळ परिस्थितीचे संदर्भ मनात उभे करूनच ते केले जाऊ शकते. मात्र हे सिद्धांत भूतकाळातील विशिष्ट घटनेतून निर्माण झाले म्हणून ते भविष्यकाळाच्या दृष्टीने अप्रस्तुत आहे असे म्हणता येणार नाही. राजकीय सिद्धांताची निर्मिती एखाद्या विशिष्ट प्रसंगात किंवा परिस्थितीतून झाली असली तरी त्याचे महत्त्व मात्र त्रिकालाबाधीत असते. ते नेहमीच उपयुक्त व मार्गदर्शक ठरते. त्यामुळे सेबाईनच्या मते, राजकीय सिद्धांताचे हे सार्वत्रिक व त्रिकालबाधित स्वरूपच त्याला आदरपात्र ठरवते. ऐतिहासिक विकासाच्या प्रवाहात विशिष्ट घटितांना ध्यानात ठेवले म्हणजे भविष्यकालीन परिवर्तनाच्या शक्यता अजमावणेही शक्य आहे. त्यामुळे सेबाईनने कोणत्याही राजकीय सिद्धांतात खालील तीन गोष्टही ठळकपणे आढळतात, असे सांगितले आहे.

१. ज्या घडामोडींनी तो सिद्धांत जन्मास घातला त्याची वस्तुनिष्ठ मांडणी

२. स्थूलमानाने ज्यास कार्यकारण संबंध म्हणता येईल त्याचे विवरण.

३. अमूक एक गोष्ट घडावी किंवा घडणे योग्य होईल व इष्ट होईल असे मूल्यात्मक प्रतिपादन.

अशा प्रकारे कोणताही राजकीय सिद्धांत असो, त्यामध्ये वस्तुनिष्ठता, कार्यकारणसंबंध आणि मूल्यमापनात्मक प्रतिपादन या गोष्टींचा समावेश असतो, असे सेबाईन यांचे मत आहे.

राजकीय सिद्धांताचे स्वरूप सुरवातीच्या काळात तत्त्वज्ञानात्मक होते. पूर्वीच्याकाळी तथ्ये आणि मूल्ये यामध्ये फरक मानला जात नव्हता. ॲरिस्टॉटलने राजकीय सिद्धांत व राजकीय कृती यामध्ये फरक केला आहे, परंतु प्लेटोपासून मार्क्सपर्यंत अनेक राज्यशास्त्रज्ञांनी आपल्या लिखाणात तात्त्विक गोष्टींनाच महत्त्व देऊन राजकीय सिद्धांताची मांडणी आपल्या कल्पकबुद्धीने केली. यामुळे विशिष्ट परिणामाकडे जाण्याची त्याची पद्धत शास्त्रीय नव्हती. याउलट ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा वास्तववादी अभ्यास करून काही निष्कर्ष काढले. ॲरिस्टॉटलने सांगितलेले तत्कालीन समाजातील वास्तववादी विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. हॉब्ज आणि मॅकेव्हेलीने आपले राजकीय सिद्धांत तत्कालीन परिस्थितीच्या अभ्यासावरून मांडले होते ते त्या काळातील घटनाचे कार्यकारण संबंध दर्शविणे त्यादृष्टीने त्यांनी मांडलेले राजकीय सिद्धांत आजही महत्त्वपूर्ण ठरतात. आधुनिक काळात राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय घटना व त्यांचा परस्परसंबंध निश्चित करून शास्त्रीय निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे विसाव्या शतकातील राजकीय सिद्धांताला मूल्यनिरपेक्षतेच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाले. मूल्यनिरपेक्ष दृष्टीनेच आधुनिक राज्यशास्त्रज्ञांनी राजकीय सिद्धांताची मांडणी केली. अवलोकन, निरीक्षण, मुलाखती, सर्वेक्षण, मापन या पद्धतीचा अवलंब करून आधुनिक काळात राजकीय सिद्धांत मांडण्यात आले.

वरील सर्व विवेचनाच्या अनुषंगाने राजकीय सिद्धांताचे स्वरूप खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिद्धांत हे अनुभवावर आधारलेले असतात, कारण अनुभवाद्वारे प्राप्त होणारे ज्ञान हेच खरे ज्ञान होय.

२. राजकीय सिद्धांत मानवी जीवनापुढे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्याचे कार्य करतात. समाजाच्या राजकीय जीवनाचे तात्कालिक व संभाव्य प्रश्न इतरांपेक्षा चटकन पाहणे आणि इतरांपेक्षा त्याचे अधिक सखोल विश्लेषण करणे, हे राजकीय सिद्धांताचे कार्य आहे.

३. राजकीय सिद्धांत हे राजकीय विचारप्रणालींना जन्म देतात. उदा. मार्क्सने मांडलेल्या सिद्धांतातून माक्सवादी विचारप्रणाली अस्तित्वात आल्याचे दिसून येते.

४. राजकीय सिद्धांत हे सुव्यवस्थित परस्परसंबंध व तर्कशुद्धरित्या मांडलेले असतात.

५. राजकीय सिद्धांत हे सद्यपरिस्थितीचा अभ्यास करतात आणि भविष्यातील समाजाच्या विकासाचा विचार करतात.

६. राजकीय सिद्धांत एखाद्या प्रश्नाचे निराकरण करीत असताना अनुभवलेली गोष्ट व्यवस्थितरित्या मांडणे, त्याचे विश्लेषण करणे व त्याचे मूल्यमापन करणे ही कार्ये करतात.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांताच्या स्वरूपासंबंधी मुद्दे मांडता येईल. कारण आधुनिक काळातील राजकीय सिद्धांताला राजकीय विश्लेषण असेही म्हटले जाते. राजकीय सिद्धांत हे आदर्शवादी तत्त्वज्ञानात्मक आणि मूल्याधिष्ठीत होते ते स्वरूप विसाव्या शतकात बदलले आणि राजकीय सिद्धांताला अनुभववादी, मूल्यनिरपेक्षता याची जोड लाभली, त्यामुळे जुन्या राजकीय सिद्धांताचे पुनरुज्जीवन झालेआहे, असे डान्ट म्हणतो.

**राजकीय सिद्धांताची व्याप्ती :**

हेन्री मेयो यांनी राजकीय सिद्धांताची व्याप्ती पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केली आहे.

**१) विचारप्रणालीचे अध्ययन :**

प्रत्येक राजकीय विचारप्रणाली ही विशिष्ट राजकीय सिद्धांत आणि तत्त्वज्ञान सांगते. त्याचबरोबर प्रत्येक राजकीय व्यवस्था ही कोणत्यातरी राजकीय विचारप्रणालीने प्रभावित झालेली असते. यांचा अभ्यास राजकीय सिद्धांताद्वारे केला जातो. उदा. हुकूमशाही, लोकशाही, सामंतशाही, साम्यवाद, उदारमतवाद, राष्ट्रवाद इत्यादी भारतातील राजकीय व्यवस्था लोकशाही, समाजवादी, धर्मनिरपेक्ष या विचारप्रणालीवर आधारित आहे. अमेरिकेच्या अध्यक्षीय लोकशाहीत भांडवलशाही विचारप्रणालीचा प्रभाव पडलेला आहे. या सर्व गोष्टीचा अभ्यास राजकीय सिद्धांतात केला जातो.

**२) अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन :**

विविध राजकीय विचारवंतांनी आत्तापर्यंत केलेले अभिजात राजकीय वाङ्मयाचे अध्ययन करणे आवश्यक आहे. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था म्हणजे गतकालीन इतिहासाचा आणि घडलेल्या घडामोडींचा इतिहास आहे. त्यामुळे भूतकाळातील घटना वर्तमानकाळातील परिस्थितीचा अभ्यास करून ह्या सिद्धांताच्या आधारे भविष्य कथन करता येते. उदा. प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली हॉब्ज, लॉक, रूसो, मार्क्स इत्यादी विचारवंतांनी जे काही ग्रंथ लिहिले आहेत, त्या ग्रंथांचा अभ्यास केला आहे तो अभ्यास योग्य किंवा अयोग्य आहे, याचा विचार तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात करून वर्तमानकालीन परिस्थितीशी तुलना करून अशा राजकीय वाङ्मयाचा बोध घेण्यास आपणास राजकीय सिद्धांत मदतनीस ठरतो.

**३) राजकीय व्यवस्थांचे अध्ययन :**

राजकीय सिद्धांत एखाद्या विशिष्ट राजकीय व्यवस्थेचे स्पष्टीकरण व समर्थन करीत असतो. राजकीय व्यवस्थांचा अभ्यास केला असता विविध राजकीय सिद्धांताचे ज्ञान होऊ शकते. उदा. साम्यवाद हा सोव्हिएट रशिया आणि साम्यवादी चीनच्या राजकीय व्यवस्थेचे समर्थन आणि स्पष्टीकरण करतो. राजकीय व्यवस्थांच्या अभ्यासामुळे राजकीय सिद्धांत आणि त्या राष्ट्रातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती याचे आकलन करतो. थोडक्यात, एखादा राजकीय सिद्धांत आणि त्याची त्या देशातील ऐतिहासिक पार्श्वभूमी समजावून घेण्यासाठी राजकीय व्यवस्थाचा अभ्यास उपयुक्त व मार्गदर्शक ठरतो.

### ४) अनुभवप्रामाण्य संशोधन :

तथ्यसंकलन व विश्लेषण करून संकल्पनाचे संकलन करणे आणि राजकीय सिद्धांत मांडणे हे कार्य राजकीय सिद्धांत करतो. संशोधन पद्धतीचा वापर करून राजकीय संकल्पनांचे जेव्हा विश्लेषण केले जाते तेव्हा त्या संशोधनातून काही राजकीय निष्कर्ष व सिद्धांत मांडले जातात. कल्पनांवर आधारलेले आणि वास्तववादावर आधारलेले सिद्धांत कोणते यांचे मूल्यमापन संशोधन पद्धतीद्वारे होत असते. तरीही संशोधन पद्धतीमध्ये मूल्यव्यवस्थेला अधिक महत्त्व देवून चालणार नाही तर मूल्याची चिकित्सा करून त्याचे व्यवहारातील महत्त्व विचारात घ्यावे लागते. डेव्हिड ईस्टन, हेन्री मेयो, चार्लस मेरियम यांच्या मते, संशोधनामध्ये सामाजिक वास्तवतेला अधिक महत्त्व दिले पाहिजे. थोडक्यात, संशोधन करताना निष्कर्षाच्या आधारावर पडताळून पाहणे आणि त्याद्वारे अनुभवप्रामाण्य ज्ञान प्राप्त करणे हा राजकीय सिद्धांताचा एक भाग आहे.

अशा प्रकारे वरील मुद्यांच्या आधारे राजकीय सिद्धांताची व्याप्ती स्पष्ट करण्यात आली आहे.

### ❑ राजकीय सिद्धांताचा विकास :

राजकीय सिद्धांताची वाटचाल पाहताना आपणास असे सांगता येते की, सिद्धांताचा इतिहास प्राचीन ग्रीक वाङ्मयातून निर्माण झाला आहे. प्लेटो आणि ॲरिस्टॉटल यांनी न्यायव्यवस्था स्थापन करण्यासाठी आणि व्यक्तींना उत्तम जीवन देण्यासाठी राज्याची कार्ये आहेत, अशी भूमिका मांडली आहे. त्याचबरोबर ॲरिस्टॉटलने १५८ नगरराज्याचा राज्यघटनांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करून आदर्श राज्याची कल्पना किंवा सिद्धांत मांडला आहे. त्यामुळेच त्यांना राज्यशास्त्राचे जनक असे म्हटले आहे. त्यानंतर म्हणजे जवळपास पंधराव्या शतकापर्यंत असे राजकीय सिद्धांत व्यवस्थितरित्या मांडण्यात आले नाहीत. सोळाव्या शतकात युरोपमध्ये ज्ञानाच्या पुनरुज्जीवनाचा कालखंड सुरू झाला आणि विवेकनिष्ठेचे युग सुरू झाले. त्यामुळे राज्याच्या विकासाला चालना मिळाली. या काळात हॉब्ज, लॉक, रुसोनी सामाजिक करार सिद्धांत मांडला. त्यामध्ये प्रामुख्याने वैज्ञानिक पद्धतीचा, गणितीय पद्धती, काहीनी तार्किक पद्धतीचा स्विकार करून राजकीय सिद्धांत मांडले. परंतु त्यांनी काढलेले निष्कर्ष वस्तुस्थितीशी विसंगत, काल्पनिक असे ठरले. त्यामुळे सोळाव्या आणि सतराव्या शतकात मांडलेले सिद्धांत शास्त्रशुद्ध नव्हते.

एकोणिसाव्या शतकात राजकीय सिद्धांताच्या विकासाला विशेष चालना मिळाली, कारण त्या काळात औद्योगिक क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती इत्यादी घटना घडल्या होत्या. त्यातूनच नवनवीन राजकीय संकल्पना आणि सिद्धांत उदयाला आले. त्यामध्ये प्रामुख्याने राज्य, शासनाचे स्वरूप, शासनाची उद्दिष्टे, कार्य व आदर्श याचा समावेश होतो. यामध्ये गृहीते, प्रमेये, इतिहासाचा अर्थ लावून निष्कर्ष मांडण्याची पद्धती आणि शास्त्रशुद्धतेचा स्वयंसिद्ध आधार यावर भर देण्यात आला. विसाव्या शतकात राजकीय सिद्धांत मांडण्याच्या पद्धतीमुळे आमूलाग्र बदल झाला, कारण पहिल्या महायुद्धामुळे निर्माण झालेली भीषणता हे आहे. या सिद्धांतानी पाश्चात्याच्या राजकीय जीवनाला अभिप्रेत असलेली मूल्ये नाकारली. सैद्धांतिक विश्लेषणाऐवजी राजकीय जीवनाला अभिप्रेत असलेली मूल्ये नाकारली. सैद्धांतिक विश्लेषणाऐवजी राजकीय जीवनातील विविध

माहितीचे संकलन करणे, मूल्याची चर्चा न करता वस्तुस्थितीचे परिक्षण करणे त्या आधारावर संशोधन करणे संशोधनाच्या नवीन पद्धती आणि तंत्रे स्विकारून सिद्धांत मांडण्यावर भर दिला. थोडक्यात, विसाव्या शतकातील विचारवंतांनी राजकीय जीवनातील प्रक्रियाचे निरीक्षण, संशोधन, निष्कर्ष या मार्गांनी कार्य सुरू केले. त्यामुळे नव्या राजकीय सिद्धांताची निर्मिती होऊ शकली नाही. १९६० च्या नंतर रचना आणि व्यवहारनिष्ठ उपयोग त्याच्या संतुलनावर भर देऊन राजकीय सिद्धांत मांडण्यात आले. ही वाटचाल संथगतीची आणि उपयुक्त ठरली. या सिद्धांताच्यामध्ये कल्पनारम्य चित्र रंगविण्याचे नाकारले. डेव्हीड ईस्टन यांनी नव्या सिद्धांत रचनेला अधिक महत्त्व दिले पाहिजे, अशी आग्रही भूमिका मांडली. वस्तुनिष्ठ माहितीचे संकलन करणे, वैयक्तिक मताचा त्याग करणे, तटस्थ वृत्तीने निष्कर्ष काढणे, निष्कर्षाचा पडताळा घेणे, राजकीय जीवनातील विविध प्रक्रियांचा शोध घेणे, राजकीय प्रभाव आणि त्याचा सत्ताकेंद्रावर होणारा परिणाम पाहणे या मानवी राजकीय पैलूवर भर दिला आणि राजकीय सिद्धांत रचनेला व्यापक आधार मिळवून दिला. हे भविष्य काळातील सिद्धांत रचनेला आधारभूत व मार्गदर्शक ठरू शकेल असे वाटते.

### १.२.२ राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धान्त :

राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धांत या दोन्ही संकल्पना बऱ्याच वेळा एकाच अर्थाने वापरल्या जातात. परंतु त्या संकल्पना वेगळ्या असून ते एकमेकास पूरक आहेत. राजकीय तत्त्वज्ञान म्हणजे राजकीय बाबीचे स्वरूप आणि योग्य व उत्तम राजकीय व्यवस्थेबद्दलचे ज्ञान होय. तर राजकीय सिद्धांत हे मानवाने आपल्या समूह जीवनाचे व संघटनेचे प्रश्न जाणीवपूर्वक समजावून घेण्याचा व सोडवण्याचा केलेला प्रयत्न होय. या दोन्ही संकल्पना एकमेकांपासून वेगळ्या करता येत नाहीत. कारण राजकीय सिद्धांतामध्ये राजकीय तत्त्वज्ञानाचा अंतर्भाव होतो आणि चांगला राजकीय सिद्धांत केवळ शास्त्रशुद्ध असून चालणार नाही तर त्यामध्ये तत्त्वज्ञानाची बैठक हवी असते. उपलब्ध ज्ञानाच्या चौकटीत कोणत्याही प्रश्नाची चिकित्सा करून तत्त्वज्ञान कधीच थांबत नाही. तर त्याच्या पलीकडे जाऊन त्या प्रश्नांची उत्तरे शोधीत असते. राजकीय व्यवहार कसा चालावा, त्याचे कोणते ध्येय असावे, समाजाचे राजकीय आदर्श कोणते असावे, याचा विचार करणे व राजकीय संकल्पनांचे तार्किक विश्लेषण करणे हा राजकीय तत्त्वज्ञानाचा उद्देश असतो. तत्त्वज्ञान हे चिंतनात्मक असल्यामुळे व्यक्तीपरत्वे व स्थलकालपरत्वे त्याचे स्वरूप वेगळे असू शकते त्याचा उपयोग त्या त्या काळातील मानवी जीवन समजावून घेण्यासाठी होतो. परंतु कालांतराने ते तत्त्वज्ञान कालबाह्य ठरू शकते. राजकीय तत्त्वज्ञानाचा वास्तव जीवनापेक्षा आदर्श विचारावरच जास्त भर असतो. असे असले तरीही त्याची मौलिकता मात्र कमी होत नाही. राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर राजकीय सिद्धांताची निर्मिती होऊ शकते.

राजकीय सिद्धांत म्हणजे केवळ तत्त्वज्ञान नव्हे कारण राजकीय सिद्धांताचा वापर हा शास्त्रीय अर्थाने केला जातो. स्पष्टीकरण करण्याच्या उद्देशाने सिद्धांताची रचना केली जाते. राजकीय सिद्धांत हे राजकीय वास्तवावर आधारलेले असतात. राजकीय स्थितीचा अभ्यास करून माहिती संकलीत केली जाते. त्याच्या आधारे विविध घटकामधील परस्परसंबंध स्पष्ट केला जातो आणि सार्वजनिक स्पष्टीकरणातून नियम तयार होतात. ते नियम

म्हणजेच राजकीय सिद्धांत होय. राजकीय सिद्धांतामध्ये सार्वत्रिक निष्कर्ष काढले जातात. राजकीय सिद्धांताची मांडणी करताना तत्त्वज्ञानाचा, विचारप्रणालीचा आणि विज्ञानाचा अधार घेतला जातो. त्यामुळे राजकीय सिद्धांत हे भविष्यकालीन प्रश्न सोडवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे राजकीय सिद्धांत हे कधीच कालबाह्य होत नाहीत त्यामुळे राजकीय सिद्धांताचा विचार करताना प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून मार्क्स, मिल आणि लास्कीपर्यंतच्या राजकीय विचारवंतांचे ग्रंथ अभ्यासणे आवश्यक ठरते. प्लेटोनी अनेक राजकीय विचार मांडले आहेत. त्यात प्रामुख्याने प्लेटोनी आदर्श राज्य, तत्त्वज्ञ राजा, स्त्रियांचा व संपत्तीचा साम्यवाद इ. तत्त्वज्ञानाची मांडणी केली आहे. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनाचा वास्तववादी अभ्यास केला. त्यांनी मांडलेले तत्कालीन समाजातील वास्तववादी विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात. ॲरिस्टॉटलने शासनाचे चांगले व विकृत प्रकार सांगितले आहेत. क्रांतीविषयीची कल्पना स्पष्ट केली आहे. हॉब्ज, लॉकपासून लास्कीपर्यंत सर्वांनी वेगवेगळे राजकीय तत्त्वज्ञान मांडले आहे. त्यावर अनेक सिद्धांतही निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर राजकीय संकल्पना या राजकीय तत्त्वज्ञानातून निर्माण झाल्या आहेत. राज्य, राष्ट्र सार्वभौमत्त्व या संकल्पनांना वास्तववादी रूप प्राप्त झाले की, त्यांनी सैद्धांतिक स्वरूप प्राप्त होते. आदर्शवाद, साम्यवाद, फॅसिस्टवाद, लोकशाही, समाजवाद, उदारमतवाद असे कोणतेही राजकीय सिद्धांत विचारात घेतले तर ते कोणत्या ना कोणत्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यासाठी तयार झालेले आहेत. म्हणून राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत हे एकमेकास पूरक व पोषक आहेत.

आधुनिक काळात मात्र राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत यात फरक करण्याचा प्रयत्न झाला. कारण राजकीय तत्त्वज्ञानी फक्त तत्त्वांना व मूल्यांना महत्त्व देत राहिले. प्रत्यक्ष वस्तुस्थितीचा विचार केला जात नव्हता. सोव्हिएत रशियामध्ये साम्यवादी राजवट ७० वर्षानंतर विस्कळीत झाली. त्याचे कारण कोणते याचा विचार करताना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाबरोबर रशियातील प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार करणे आवश्यक आहे. तर लोकशाही व्यवस्था अंमलात आणताना स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या समान मूल्याची तात्त्वीक बाजू महत्त्वाची आहेत म्हणून चालणार नाही तर ती मूल्ये कोणत्या देशात स्विकारणार आहेत त्या देशातील वस्तुस्थिती समजून घेणे आवश्यक आहे. त्यामुळे राजकीय सिद्धांताला राजकीय तत्त्वज्ञानाची बैठक असावी लागते. राजकीय तत्त्वज्ञान हे राजकीय सिद्धांताची पार्श्वभूमी तयार करीत असते आणि त्यावरच राजकीय सिद्धांत निर्माण होतात. थोडक्यात, राजकीय तत्त्वज्ञान आणि राजकीय सिद्धांत हे परस्परांना पूरक व पोषक असतील तरच ते सिद्धांत कालबाह्य न होता टिकून राहतात आणि राजकीय व्यवस्था कार्यरत राहते.

### १.२.३ राजकीय सिद्धांताचा ऱ्हास, पुनरुज्जीवन व महत्त्व :

विसाव्या शतकाच्या सुरवातीस साम्राज्यवाद आणि वसाहतवाद प्रभावी होता. त्यातून पहिल्या महायुद्धाचा उदय झाला. यामध्ये जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान यांनी इंग्लंड आणि फ्रान्सच्या सत्तेला आव्हान दिले. त्यात जर्मनीचा पराभव झाला. याच काळात रशियामध्ये १९१७ साली बोल्शेविक क्रांती झाली आणि लेनिनच्या नेतृत्त्वाखाली नव्या समाजवादी सोव्हिएत राज्याचा उदय झाला. त्यानंतर समाजवाद कशा रीतीने स्थापन करावा

याबाबत विचारमंथन सुरू झाले. त्यामध्ये प्रामुख्याने लेनिन, स्टॅलिन, ट्रॉटस्की यांचा समावेश होतो. दुसरीकडे १९२३ साली फ्रँकफर्ट येथे 'फ्रँकफर्ट स्कूल ऑफ क्रिटीकल थेअरी'ची स्थापना झाली. १९३९-४५ या काळात दुसरे महायुद्ध झाले. त्यामध्ये जर्मनी, इटली व जपान यांचा पूर्ण पराभव झाला आणि इंग्लंड व अमेरिका यांनी हे युद्ध जिंकले. या युद्धानंतर महासत्ता म्हणून इंग्लंडची जागा अमेरिकेने घेतली. राज्यशास्त्रात ही अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांनी पुढाकार घेतला आणि विकासाच्या राजकारणाचे निकष वापरून तौलनिक राजकारण ही अभ्यासाची नवी शाखा जन्मास घातली. कारण अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांत्या झाल्या, त्या काळात राजकीय सिद्धांताची भूमिका व हेत पूर्णपणे बदलले होते. राजकीय विचारवंतांनी समाजात बदल करण्याचे व विकासाचे मार्ग सांगावेत ही भावना जनतेमध्ये दृढ झाली होती. एकूणच दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेमध्ये सर्व सामाजिक शास्त्रांपेक्षा राज्यशास्त्र हे वैज्ञानिक पद्धती स्वीकारण्यात मागे आहे, तेथे अजून इतिहास, तत्त्वज्ञान व नीतीशास्त्र यावर जास्त भर दिला जातो, त्यामुळे प्रत्यक्ष राजकारणाचा, राजकीय प्रक्रियेचा योग्य अभ्यास होत नाही असे आक्षेप घेण्यात आले. डेव्हीड ईस्टनने वर्तनवादी क्रांतीचा उद्‌घोष केला आणि आल्मंड आणि पावेल यांनी रचनात्मक कार्यवादाचा वापर करून राजकीय व्यवस्थेचे विकासवादी प्रतिमान मांडले. या सर्व कारणामुळे आदर्शवादी विचार हे सद्य:स्थितीत उपयोगी नाहीत, असा विचार अनेक विचारवंतांनी मांडला. राजकीय सिद्धांताचे आता प्रयोजन उरलेले नाही, म्हणून अनेक विचारवंतांनी राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे, अशी घोषणा केली.

पीटर लास्लेट यांनी 'फिलॉसॉफी, पॉलिटिक्स अँड सोसायटी' या संपादित ग्रंथाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत राजकीय सिद्धांत आता मृत झाले आहे, राजकीय सिद्धांत चिरायू होवो अशी घोषणा करून टाकली. कारण प्लेटोपासून राजकीय सिद्धांताची मांडणी करण्यास सुरुवात झाली व ते मार्क्स, मिलनंतर संपले त्याचा शेवटचा प्रतिनिधी म्हणून हेरॉल्ड लास्की यांना मानले जाते. लास्कीच्या 'ग्रामर ऑफ पॉलिटिक्स' नंतर राज्यशास्त्राचे कोणतेच पुस्तक प्रकाशित झाले नव्हते. डेव्हीड ईस्टन आणि आलमंड कॉबन यांनी राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे, असे म्हटले तर लास्लेट व रॉबर्ट डहाल यांनी राजकीय सिद्धांत मृत पावल्याची घोषणा केली. परंतु राजकीय सिद्धांत १९७०-७१ च्या दशकात पुनरुज्जीवन झाले, त्यामुळे लास्लेट यांनी आपल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत त्याचे राजकीय सिद्धांत मृत पावल्याचे म्हणणे मागे घ्यावे लागले.

### ❑ राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे :

डेव्हिड ईस्टनच्या मते, राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) इतिहासवाद :

डेव्हीड ईस्टनच्या मते, डनिंग, सेबाईन, मॅक्सिवेन, लिंडसे आणि ऐलन या राजकीय विचारवंतांनी भूतकाळातील राजकीय विचारांचा अभ्यास करण्यातच अधिक वेळ खर्ची घातला. त्यांनी नवे सिद्धांत मांडून त्याचे विश्लेषण करण्याऐवजी समकालीन आणि भूतकालीन मूल्याचा अर्थ, अंतर्गत सुसंगती व ऐतिहासिक विकासक्रम याबद्दलची माहिती गोळा करण्यातच धन्यता मानली. काही अभ्यासकांनी संस्था आणि राजकीय

विचाराचा ऐतिहासिक आढावा घेतला तर काहींनी त्याची वाटचाल कशा रितीने झाली, याचा अभ्यास केला. एकूणच सर्व अभ्यासकांनी ऐतिहासिक दृष्टीकोणानेच विचार केला. त्यात बार्कर आणि लास्की यांचे अपवाद सोडले तर सर्व राजकीय विचारवंत केवळ इतिहासकार झाले आहेत, असे म्हटले जाऊ लागले. त्यामुळे इतिहासवाद हे राजकीय सिद्धांताचे ऱ्हास होण्यास कारणीभूत घडले.

**२) नैतिक सापेक्षतावाद :**

ह्युम, वेबर, मार्क्स इ. विचारवंतांनी तथ्ये व मूल्ये यांना एकमेकांपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला. मॅक्स वेबरने अनुभववादी संशोधनामध्ये मूल्यांना स्थान दिले नाही. त्यामुळे अनेक विचारवंतांनी मूल्यनिरपेक्षतेचा आग्रह धरला. परंतु व्यक्तीच्या व समूहाच्या जीवनानुभवातून त्यांचे अग्रक्रम तयार होतात आणि त्या अग्रक्रमाचा आविष्कार म्हणजे त्यांची मूल्ये असतात. एका कालखंडातील मूल्ये दुसऱ्या कालखंडात लागू करता येत नाही, त्यामुळे तसे करणे व्यर्थ आहे. त्यामळे विसाव्या शतकात नैतिक सापेक्षतावादी विचारवंतांनी या जुन्या मूल्यांचा चिकित्सकरित्या अभ्यास करून नव्याने पुनर्बांधणी करण्याचा प्रयत्न केला नाही, त्यामुळे नैतिक सापेक्षतावाद राजकीय सिद्धांताचा ऱ्हास होण्यास कारणीभत ठरला.

**३) विज्ञान व सिद्धांत यातील विसंगतपणा :**

२० व्या शतकाच्या सुरुवातीपासून राज्यशास्त्रज्ञ हे विज्ञानाला सिद्धांत समजू लागले. सिद्धांत हा विज्ञानाच्या पलीकडे जाणारा असतो याचे त्यांना विस्मरण झाले, त्यामुळे पारंपारिक राजकीय सिद्धांत मागे पडले, कारण तथ्याचे संकलन करणे आणि त्या आधारावर राजकीय संस्था व प्रक्रिया सुधारण्याचे उपाय सुचवणे हे त्यांनी आपले कार्य मानले. हे कार्य शास्त्रीय असले तरी त्यातून आपोआप सिद्धांत हाती घेणे शक्यच नव्हते. संस्थांपेक्षा हेतू आणि प्रेरणा तपासणे महत्त्वाचे असले तरी सिद्धांत निर्मितीसाठी मात्र ते पुरेसे नाही, त्यामुळे विज्ञान आणि सिद्धांत याचे आकलन चुकीचे होते.

**४) अतितथ्यता :**

सिद्धांताला अनुभववादाची जोड देण्याच्या हव्यासापोटी तथ्यसंकलनाला प्राधान्य देण्यात आले व सिद्धांताचे स्थान दुय्यम झाले आणि कालांतराने सिद्धांत मागे पडले. तथ्य संकलनाची कार्यक्षम तंत्रे शोधण्यात राज्यशास्त्राने बरीच प्रगती केली. परंतु प्रत्यक्ष राजकारणाचा समग्र वेध घेण्याची साधने मात्र ते हरवून बसले. अशा प्रकारे सिद्धांताअभावी तथ्यसंकलन निरर्थक ठरले.

**५) वास्तववादी मूल्ये आणि संकल्पनाचा अभाव :**

आल्फ्रेड कॉबन यांच्या मते, आधुनिक जगामध्ये राज्याच्या कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे सर्वच क्षेत्रात नोकरशाहीचे वर्चस्व निर्माण झाले. त्याचबरोबर जगात सामर्थ्यशाली लष्करी यंत्रणा उभ्या राहिल्या. ही परिस्थिती राजकीय चिंतनाला मारक ठरली. कारण पूर्वी होऊन गेलेल्या राजकीय विचारवंतांनी वास्तवाची जाणीव ठेवून प्रत्यक्ष राजकीय संस्थाचा पुरस्कार किंवा निषेध केला होता. परंतु आधुनिक राजकीय विचारवंतांनी वास्तववादी परिस्थितीशी जुळणाऱ्या राजकीय मूल्याची किंवा संकल्पनांची निर्मिती केली नाही.

नैतिक तटस्थता आणि शास्त्रीय पद्धतीचे अनुकरण स्विकारल्यामुळे राजकीय सिद्धांताचे मूल्यांकन व परीक्षण करता आले नाही. कारण आधुनिक विचारवंत नैसर्गिक शास्त्राच्या अभ्यास पद्धती जशास तशा आपल्या विषयाला लागू करण्यातच धन्यता मानू लागले होते. त्यामुळे राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासास वास्तववादी मूल्ये व संकल्पनेचा अभाव हे एक कारण ठरले.

**६) विचारप्रणाली :**

दान्ते जर्मिनोसारखा अभ्यासक राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाला विचारप्रणाली जबाबदार मानतो. विचारनिर्मिती ही भौतिकवादी प्रक्रिया असून, सामाजिक व राजकीय सुधारणा घडवून आणणे हे विचारप्रणालीचे प्रमुख काम व ध्येय आहे. विचाराचे स्रोत विचारप्रणालीपुरते मर्यादित करण्याच्या प्रक्रियेमुळे विचारप्रणालीचा ऱ्हास घडून आला आणि त्यामुळे सिद्धांत निर्मितीची प्रक्रिया थांबली. त्याला जर्मिनो 'आयडिऑलॉजिकल रिडक्शनिझम' असे नाव देतो.

वरील कारणांमुळे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर जर्मिनो ट्रेनीच्या मते, विचारप्रणालीची निर्मिती ही राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासास कारणीभूत ठरलेली आहे. ऑगस्ट कॉम्तचा प्रत्यक्षार्थवाद हे राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाचे कारण ठरले. ब्रेस्ट आणि डेव्हिड ईस्टन यांच्या मते, वेबरने तथ्य आणि मूल्यांच्यामध्ये केलेल्या तफावतीमुळे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला, तर लिपसेट आणि पॅट्रिजच्या मते जगातील सर्व प्रश्नांची उत्तरे औद्योगिक क्रांतीने देऊन टाकली आहेत. त्यामुळे त्या प्रश्नाच्या भोवतीच उभे राहिलेले सर्व पारंपारिक राजकीय सिद्धांत आधुनिक काळात गैरलागू झाले, अशी अनेक विचारवंतांनी राजकीय सिद्धांताच्या ऱ्हासाची कारणे सांगितली आहेत. परंतु राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाला आहे का? याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल, कारण राजकीय सिद्धांत कधीच कालबाह्य होत नाहीत तर मानवी समाजाचे अस्तित्व असेपर्यंत त्याची गरज भासणार आहे, म्हणून राजकीय सिद्धांत हे मृत झाले नसून १९७० नंतरच्या काळात पुनरुज्जीवीत झाल्याचे दिसून येते.

**❑ राजकीय सिद्धांताचे पुनरुज्जीवन :**

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासाबद्दल काही प्रमाणात लोकांची रुची कमी झाली असली तरी त्याचा अभ्यास चालू होता. नव्या परिस्थितीच्या, नव्या आव्हानाच्या संदर्भात त्याची मांडणी अभ्यासक करीत होते. त्यामुळे काही विचारवंतांच्या मते, राजकीय सिद्धांतातील काही गोष्टी कालबाह्य झालेल्या आहेत परंतु त्याचा ऱ्हास झाला नाही. तर त्याच्या मते राजकीय सिद्धांत जीवित असून त्यामध्ये बदल झाला आहे आणि विकास झाला आहे. इसाय बर्लिनच्या मते, कोणताही काळ राजकीय सिद्धांताशिवाय गेला नाही किंवा जाऊ शकत नाही. त्यामुळेच पारंपारिक राजकीय विचारवंतांच्या मते, राजकीय सिद्धांत मृत पावलेलाच नव्हता, असे स्पष्टीकरण देण्यात आले. या काळातच राजकीय सिद्धांतामध्ये न्याय, स्वातंत्र्य, लोकशाही, अधिकार इत्यादी संकल्पनांच्या संदर्भात पुनर्मांडणी करण्यात आली. एकूणच १९७० नंतरच्या काळात राजकीय सिद्धांत नव्या स्वरूपात मांडण्यात आले. त्याचबरोबर जागतिक पातळीर अनेक घटना घडल्या. जी वर्तनवादाची लाट होती

ती ओसरली होती, यामुळे पिटर लासलेट यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या तिसऱ्या आवृत्तीत राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे, असे घोषित करण्यात आले.

### ❑ राजकीय सिद्धांताच्या पुनरूज्जीवनाची कारणे :

राजकीय सिद्धांतात जे बदल होत होते, त्याचबरोबर जागतिक पातळीवर युद्ध, चळवळी झाल्या. काही नवे विचार विकसित झाले, त्यातून राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले, त्याची कारणे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

**१) नव्या राजकीय ग्रंथाची निर्मिती :**

१९७० च्या काळात न्याय, स्वातंत्र्य, अधिकार, लोकशाही इ. संकल्पनांवर अनेक मूलगामी विचार मांडणारे ग्रंथ लिहिले गेले. त्यामध्ये जॉन रॉल्स यांचा 'थिअरी ऑफ जस्टिस' (Theory of Justice), इसाया बर्लिन यांचा 'टू कन्सेप्टस ऑफ लिबर्टी' (Two concepts of Liberty), रोनाल्ड डार्विन यांचा 'टेकिंग राईटस् सिरियसली (Taking Right Seriously), ब्रॉयन बॅरी यांचा 'पॉलिटिकल आरग्युमेंट' (Political Argument) आणि सी. व्ही. मॅक्फर्सन यांचा 'थिअरी ऑफ डेमॉक्रसी' हे महत्त्वाचे ग्रंथ होते. याच काळात ॲना आरेंट, निको स्ट्रॉस, नॉझिक, कार्ल पॉपर इत्यादी विचारवंत राजकीय सिद्धांतावर लिखाण करीतच होते. या सर्व बदलांची दखल घेऊन लासलेटने घोषित केले की, राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे.

**२) नवमार्क्सवादाचा उदय :**

कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान हे नव्या युगातील एक महत्त्वाचे तत्त्वज्ञान आहे. १९१७ ला रशियन क्रांती व १९४९ ला चीनमध्ये क्रांती झाली, त्यामुळे लेनिन, स्टॅलिन व माओ-त्से तुंग यांनी मांडलेल्या विचारांभोवतीच जगभराच्या परिवर्तनवादी व क्रांतीकारी शक्ती उभ्या राहिल्या. या शक्ती भांडवलशाही आणि साम्राज्यशाही विरोधात उभ्या राहिल्या. या सर्व गोष्टींचा विचार करून युरोपातील कम्युनिस्ट पक्षाला जवळ असणाऱ्या काही बुद्धिवंतांनी व विचारवंतांनी मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास सुरू केला. मुख्य चळवळीशी विसंगत अशा प्रवृत्तीचे काही लोक होते. तेही त्यांना सामील झाले. या लोकांनी नवमार्क्सवादाचे बीजारोपण केले. नवमार्क्सवाद्यांनी राजकीय सिद्धांतामध्ये मोठी भर घातली. त्यामध्ये प्रामुख्याने फ्रँकफर्ट स्कूलच्या ॲडोर्लो, हार्कहायेर, एरिक फ्रॉम, बेझांमिन हेबरमास इ. विचारवंतांचा समावेश होतो. त्याचबरोबर हर्बर्ट मार्क्यूस, लुकाच, कार्ल कोर्स गोल्डमन यांचे योगदानही महत्त्वाचे होते.

**३) व्हिएतनामचे युद्ध :**

शीतयुद्धाच्या काळात उत्तर व्हिएतनाम विरुद्ध दक्षिण व्हिएतनाम (अमेरिका व इतर देशांचे समर्थन) मध्ये जे युद्ध झाले त्यात व्हिएतनामचे युद्ध असे मानले जाते. हे युद्ध साम्यवादी विचारांच्या देशाच्या गटातील उत्तर व्हिएतनाम व त्याच्या विरोधात दक्षिण व्हिएतनाम हा साम्यवादाला विरोध करणारा गट होता. या युद्धात अमेरिकेचा सहभाग वाढत होता. त्यामुळे सैन्य संख्या कमी पडत होती म्हणून अनेक विद्यार्थ्यांना आपला अभ्यास सोडून, कॉलेज सोडून सैन्यात सामील व्हावे लागले. त्यावेळी युद्धभूमीवर लढत असताना विद्यार्थ्यांना

याची जाणीव झाली की, अमेरिका गरीब व्हिएतनामवर अन्याय करीत आहे. त्यामुळे हे विद्यार्थी कॉलेजापर्यंत आल्यानंतर व्हिएतनामच्या युद्धाबद्दल प्रश्न विचारू लागले आणि त्याच्यामध्ये अमेरिकेच्या धोरणाविरोधात बंडखोरीची भावना निर्माण झाली. यातून बऱ्याच लोकांना अमेरिकेबाबत तसेच भांडवलशाहीबाबत भ्रमनिरास झाला.

**४) न्यू लेफ्ट मुव्हमेंट :**

१९६० च्या उत्तरार्धात युरोपमध्ये आक्रमक अशा विद्यार्थी चळवळी झाल्या, याची सुरवात इंग्लंडमध्ये झाली. इंग्लंडमध्ये 'न्यू रीझनर' आणि 'युनिव्हर्सिटी आणि लेफ्ट रिव्ह्यू' या दोन मालिकांच्या संयोगातून 'न्यू लेफ्ट रिव्ह्यू'चा जन्म झाला. ही चळवळ वाढत गेली आणि १९६८ साली अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स आणि प. जर्मनी येथे या विद्यार्थ्यांनी क्रांती करण्याचा प्रयत्न केला. 'न्य लेफ्ट रिव्हू'मध्ये अनेक तात्त्विक प्रश्नांची सखोल चर्चा करण्यात आली. मार्क्सवादाची फेरमांडणी करण्याचा त्याचा प्रयत्न होता. पेरी अँडरसन, रेजिसदेब्र, तारिक अली, थॉम्सन अशा पुढाऱ्यानी मूलगामी विचार मांडले. या चळवळीस मार्क्सच्या विचारांचा आधार होता. अशा न्यू लेफ्ट मुव्हमेंट विचारवंतानी सोव्हिएत शासन व्यवस्थेवर टीका करण्यास सुरवात केली, त्यांचा स्टॅलिनवादाला विरोध होता, त्यामुळे त्यानी लोकशाही, सत्तेचे विकेंद्रीकरण, केंद्रीकृत शासन यंत्रणा विसर्जन इत्यादी बाबींचा पुरस्कार केला.

**५) तिसऱ्या जगातील नवा विचारप्रवाह :**

माओत्से तुंगच्या मते, तीन जग आहेत. पहिले जग अमेरिका व सोव्हिएत संघ या महासत्ताचे, दुसरे पूर्व व पश्चिम युरोपमधील देशांचे आणि आफ्रिका, आशिया आणि लॅटिन अमेरिकेतील देशांचे तिसरे जग. जगामधील खरा संघर्ष हा पहिल्या आणि तिसऱ्या जगामध्ये आहे. युरोप खंडातील देशांनी विज्ञान तंत्रज्ञानात प्रगती केली आणि सर्व जगावर ताबा मिळविला. त्यामुळे आशिया, आफ्रिका खंडातील देश हे मागे पडले आणि परावलंबी बनले, त्यामुळे विकसित आणि अविकसित देशातील अंतर वाढत गेले. जे तत्त्वज्ञान अथवा सिद्धांत मांडले जात होते ते सिद्धांत आणि अविकसित देशातील अंतर वाढत गेले. जे तत्त्वज्ञान अथवा सिद्धांत मांडले जात होते ते सिद्धांत विकसित देशातूनच मांडले जात होते. परंतु १९७० नंतर तिसऱ्या जगातील विचारवंतांनी अर्थविकासाचे व परावलंबित्त्वाचे सिद्धांत मांडले. त्यात प्रामुख्याने सांतोस, कोर्डोसा, फुर्ताडो आणि आंद्रे गुदर फ्रॅक या लॅटिन अमेरिकेतील विचारवंतांचा समावेश होतो. त्याशिवाय इमॅन्युंल वॉलेस्टिन यांनी विश्वव्यवस्था सिद्धांत मांडले, तर समीर यांनी अर्थ विकासाचा परावलंबित्वाचा सिद्धांत मांडला. आंद्रे गुंदर, फ्रँक यांनी अर्थ व न्यून विकासाचे व परावलंबीत्वाचे सिद्धांत मांडले. तिसऱ्या जगातील विचारवंतांचे विचार लोकांसमोर आला, त्यामुळे राजकीय सिद्धांतात भर पडली व राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले.

**६) उत्तर वर्तनवाद :**

डेव्हीड ईस्टन यांनी वर्तनवादाचा पाया घातला. त्याद्वारे राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झाल्याची घोषणा केली. ७० च्या दशकानंतर डेव्हिड ईस्टनने या वर्तनवादी दृष्टिकोनाच्या फुलश्रुतीची परखड चिकित्सा केली.

प्रचंड पैसा, वेळ व शक्ती खर्च करूनसुद्धा फारसे काही हाती लागले नाही. तो असे म्हणतो की, या काळात जगापुढील सामाजिक, राजकीय व आर्थिक आव्हाने तीव्र होती, त्याचे भान वर्तनवादी अभ्यासकांना नव्हते. त्यामुळे वर्तनवादी दृष्टिकोनाच्या जमेच्या बाजू मान्य करून पुढे राज्यशास्त्राचे संशोधन अधिक प्रस्तुत व उपयुक्त कसे करता येईल, असा भविष्यकाळाच्या दृष्टीने वर्तनवादाचा विचार करणे गरजेचे होते. १९६९ साली अमेरिकन राज्यशास्त्र परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात ईस्टनने उत्तर वर्तनवादाच्या काही सूत्रामध्ये आपणास बदल करावा लागेल. राज्यशास्त्राच्या संशोधनात मूल्य व प्रस्तूतता यांना महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे आणि राज्यशास्त्रांनी लोकांचे प्रश्न आणि चळवळी यांचा प्रत्यक्ष जागी जाऊन अभ्यास केला पाहिजे, असे म्हटले.

अशा प्रकारे वरील सर्व कारणांमुळे राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाले आहे. म्हणून असे म्हणता येईल की, २० व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांत मुख्यत: परंपरावादी राजकीय सिद्धांत व आधुनिक व्यवहारवादी राजकीय सिद्धांत या दोन विचारधारांमध्ये विकसित झाला आहे. कारण उत्तर वर्तनवादाच्या उदयामुळे या दोन्हींमधील दुही कमी झाली. अशा प्रकारे १९७०-७१ पासून राजकीय सिद्धांताच्या पुनरूज्जीवनास सुरूवात झाली आहे.

### ❑ राजकीय सिद्धांताचे महत्त्व :

राजकीय सिद्धांताचे महत्त्व हे त्याच्या कार्यावर आणि त्याच्या उद्देशाच्या आधारावर समजून घेता येते. काही राजकीय विचारवंतांच्या मते मात्र राजकीय सिद्धांताचा ऱ्हास झालेला नाही तर राजकीय सिद्धांताचे स्वरूप फक्त बदलले. पूर्वी राजकीय सिद्धांताचा भर केवळ शासन संस्थेची निर्मिती कशी झाली, शासनाचे कामकाज कसे चालते, राज्यसंस्थेची साध्ये आणि उद्दिष्ट्ये इत्यादी गोष्टीवर होते. नंतरच्या काळामध्ये राजकीय सिद्धांतामध्ये मूल्यनिरपेक्षता, अनुभववाद इत्यादी शास्त्रीय पद्धतीचा स्विकार करण्यात आला एकूणच राजकीय सिद्धांत हे मानवी समाजजीवन विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञान हे एकमेकांशी पूरक आहेत. त्यामुळे मानवी जीवनात राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञानही महत्त्वाचे आहे. राज्य आणि समाजाची परिस्थिती, सरकारचे सर्वश्रेष्ठ स्वरूप, व्यक्ती आणि राज्य यांच्यातील संबंध त्याद्वारे स्वातंत्र्य, समता, न्याय इत्यादी संकल्पनाचा विकास करण्यासाठी काही दृष्टिकोन व पद्धतीच्या निर्मितीसाठी राजकीय सिद्धांत महत्त्वाचे आहेत. राजकीय संशोधन राजकीय सिद्धांताच्या आणि विचारप्रणालीच्या अभ्यासातून मानवी समाजाच्या समस्यांचे निराकरण करू शकतो. भूतकालीन राजकीय सिद्धांताच्या अभ्यासामुळे वर्तमानकालीन समस्या सोडविण्याचे आणि भविष्यकालीन समस्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य अधिक सुलभ होऊ शकते. राजकीय सिद्धांत विशिष्ट राजकीय विचारप्रणालीचा पुरस्कार करताना दिसतात. एकूणच राजकीय सिद्धांत हे व्यक्ती, समाज, सरकार, विचारप्रणाली, तत्त्वज्ञान या सर्व गोष्टींच्या आधारे समाजजीवन विकसित करीत असतात. राजकीय सिद्धांताचे महत्त्व खालीलप्रमाणे सांगता येईल.

१. राजकीय सिद्धांत हे राज्य आणि सरकार यांच्या स्वरूपाची आणि उद्देशाची आणि माहिती उपलब्ध करून देते.

२. समाजामधील वर्तमान काळातील निर्माण झालेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राजकीय सिद्धांत मार्गदर्शक व उपयुक्त ठरतात.

३. राजकीय सिद्धांत हे सामाजिक आणि राजकीय परिस्थिती आणि तेथील समाजाचे आदर्श आणि उद्देशाचा समन्वय साधणे आणि त्याचे परस्परसंबंध निर्माण करण्यास मदत करतात.

४. राजकीय सिद्धांत हे मानवाला किंवा व्यक्तीला अधिकार, कर्तव्य, स्वातंत्र्य, समता, संमती, न्याय इत्यादी गोष्टी सामाजिक जीवनात वापरण्यासाठी प्रेरणा देतात आणि मानवी समाजाला मार्गदर्शक, प्रेरक व उपयुक्त ठरतात.

५. राजकीय सिद्धांत हे सामाजिक, आर्थिक व्यवस्था समजून घेण्यासाठी दृष्टिकोन निर्माण करतात आणि समाजातील गरीबी, हिंसा, भ्रष्टाचार, जातीवाद इत्यादी संदर्भात सिद्धांत करून पर्यायी व्यवस्था प्रदान करतात.

६. राजकीय सिद्धांताचे कार्य हे केवळ संकल्पना निर्मिती करणारे नसून सामाजिक सुधारणा आणि क्रांतिकारी विचाराने समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी महत्त्वाचे असतात. त्याचबरोबर समाज परिवर्तनात झालेल्या चुका व अपयशाची कारणे ही समजून येतात.

७. राजकीय सिद्धांताद्वारे समाजातील वास्तविक परिस्थितीचा अभ्यास करता येतो आणि भविष्यात कोणत्या अडचणी येतील हे समजावून घेता येते.

अशा प्रकारे राजकीय सिद्धांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, राज्याच्या शासन व्यवस्थेच्या आणि समाजाच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वाचे आहेत.

### १.३ सारांश :

राजकीय सिद्धांत हे मानवी जीवनाच्या विकासासाठी, त्याचबरोबर समाजातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आवश्यक आणि महत्त्वाचे आहेत. त्यामुळे राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. राजकीय सिद्धांत हे मानवी जीवन आणि समाजाची वास्तवस्थिती जाणून घेण्याचे कार्य करतात. तसेच भविष्यकालीन प्रश्नाच्या सोडवणूकीसाठी मार्गदर्शक ठरतात. त्यामुळे त्याचे महत्त्व आजही कायम आहे. तसेच राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत हे वेगळे असले तरी ते एकमेकास पूरक व पोषक आहेत. राजकीय तत्त्वज्ञानाच्या आधारावर राजकीय सिद्धांत निर्माण होतात परंतु सगळेच राजकीय तत्त्वज्ञान हे राजकीय सिद्धात होत नाहीत. वर्तनवादी, प्रत्यक्षार्थवादी विचारवंतांनी राजकीय सिद्धांत मृत पावल्याची घोषणा केली. परंतु १९७० नंतर राजकीय सिद्धांतामध्ये नव्या ग्रंथाची निर्मिती झाली. नवमार्क्सवादाचा उदय, उत्तर वर्तनवादाची मांडणी, व्हिएतनामचे युद्ध इत्यादी कारणामुळे राजकीय सिद्धांताचे पुनरूज्जीवन झाल्याची घोषणा करण्यात आली. एकूणच राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती, महत्त्व, राजकीय तत्त्वज्ञान व राजकीय सिद्धांत यांच्यातील संबंध राजकीय सिद्धांताचा ऱ्हास व पुनरूज्जीवनाची कारणे इत्यादीची चर्चा प्रस्तुत प्रकरणात केली आहे.

## १.४ पारिभाषिक शब्द :

१) सिद्धांत : ज्ञानाची सुसंगत रचना म्हणजे सिद्धांत होय.

२) राजकीय तत्त्वज्ञान : राजकीय व्यवस्थेबदलचे ज्ञान

३) ऱ्हास : उपयोगाची नसणे

४) पुनरूज्जीवन : नव्याने मांडणी करणे

## १.५ सरावासाठी प्रश्न :

१) सेबाईन यांनी कोणत्या दृष्टीकोनातून राजकीय सिद्धांताचे स्पष्टीकरण केला आहे?

उत्तर : ऐतिहासिक

२) ॲरिस्टॉटल यांनी किती राज्यघटनांचा अभ्यास केला?

उत्तर : १५८

३) फिलॉसॉफी, पॉलिटिक्स ॲड सोसायटी या ग्रंथांचे संपादक कोण आहेत?

उत्तर : पीटर लास्लेट

४) थिअरी ऑफ जस्टीस हे पुस्तक कोणी लिहिले?

उत्तर : जॉन रॉल्स

५) वर्तनवादाचा पाया कोणी घातला?

उत्तर : डेव्हीड ईस्टन

**टिपा लिहा.**

१) राजकीय सिद्धांताचे स्वरूप

२) राजकीय सिद्धांताची व्याप्ती

३) राजकीय सिद्धांताचे महत्त्व

४) राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञान

**दिर्घोत्तरी प्रश्न.**

१) राजकीय सिद्धांताचे स्वरूप, व्याप्ती स्पष्ट करा.

२) राजकीय सिद्धांत व राजकीय तत्त्वज्ञानाचे संबंध स्पष्ट करा.

३) राजकीय सिद्धांताचे ऱ्हास व पुनरूज्जीवनाच्या कारणाची चर्चा करा.

४) राजकीय सिद्धांताचे अर्थ व महत्त्व स्पष्ट करा.

## १.६ संदर्भ :


१) Gouba O. P. : 'An Introduction to Political Theory', Macmillan Publisher, New Delhi (2011).

२) Ramaswary Sushila : 'Political Theory Ideas and Concepts', PHI learning Private ltd. Delhi (2015).

३) पाठक नवराज : 'पाश्चिमात्य राजनीतिक विचार-भाग १', आवृत्ती दुसरी, विश्वभारती पब्लिकेशन, नवी दिल्ली (२००६).

४) चौसाळकर अशोक : 'आधुनिक राजकीय सिद्धांत', युनिक ॲकॅडमी, पुणे (२०१७).


## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) Varma, S. P. : 'Modern Political Theory', Vikas Publishing House. (1975)

२) भोळे, भा. ल. : राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण, पिंपळापुरे, नागपूर. (१९८८).


❍❍❍

घटक २

# राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन

---

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ दृष्टिकोन म्हणजे काय?

२.२.२ आदर्शवादी किंवा मूल्याधिष्ठित दृष्टीकोन

२.२.३ आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

२.२.४ आदर्शवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन किंवा परिक्षण किंवा उणीवा

२.२.५ अनुभवजन्य किंवा अनुभववादी दृष्टिकोन

२.२.६ अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

२.२.७ अनुभववादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन किंवा उणीवा किंवा मर्यादा

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ वस्तुनिष्ठ प्रश्न

२.६ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

२.८ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील बाबी समजतील.

- राज्यशास्त्राच्या आदर्शवादी दृष्टिकोनाचा विकास कसा झाला.
- आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये व उणीवा समजतील.
- अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये व उणीवा समजतील.

## २.१ प्रास्ताविक :

राजकीय सिद्धांताचा अभ्यास हा राज्यशास्त्राचा एक महत्त्वाचा भाग आहे. घटक क्र. १ मध्ये आपण राजकीय सिद्धांताचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती व महत्त्व पाहिले. त्याचबरोबर राजकीय सिद्धांताचा ऱ्हास आणि त्याचे पुनरूज्जीवन याचाही अभ्यास केला. राजकीय सिद्धांताचा अभ्यास करताना राजकीय सिद्धांताचे दृष्टिकोन समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. राजकीय सिद्धांताचा आशय व दिशा या दृष्टिकोनावरून समजून घेता येते. स्थूल स्वरूपाने राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे दोन कालखंड मानले जातात. साधारणपणे दुसऱ्या महायुद्धापर्यंत पारंपारिक राज्यशास्त्र तर दुसऱ्या महायुद्धानंतर राज्यशास्त्राचा आधुनिक कालखंड मानला जातो. यानुसार राजकीय सिद्धांताचे पारंपारिक सिद्धांत आणि आधुनिक सिद्धांतामध्ये ढोबळमानाने वर्गीकरण केले जाते. सदरच्या घटकामध्ये आपण पारंपारिक दृष्टिकोनामधील आदर्शवादी दृष्टिकोन तर आधुनिक सिद्धांतामधील अनुभववादी दृष्टिकोनाचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय-विवेचन :

### २.२.१ दृष्टिकोन म्हणजे काय?

एखाद्या विषयाकडे, विचाराकडे संशोधक किंवा अभ्यासक कोणत्या भूमिकेमधून, विश्लेषणामधून बघतो याला साधारणपणे दृष्टिकोन असे म्हणतात. डॉ. विजय देव यांच्या आधुनिक राजकीय विश्लेषण कोशानुसार, 'दृष्टिकोन' ही एक विश्लेषण पद्धती असून ती राजकीय तत्त्वे समजण्यासाठी, तसेच राजकीय तत्त्वे आणि संकल्पनांचा अभ्यास करण्यासाठी एक बौद्धिक साधन म्हणून उपयुक्त ठरते. राज्यशास्त्रात या पद्धतीचा उपयोग माहिती मिळविणे, माहितीची जुळणी करणे, माहितीतून अर्थ काढणे, माहितीतील घटकांचा परस्परसंबंध प्रस्थापित करणे, माहितीचे मूल्यमापन करणे इत्यादीसाठी होतो. कोणताही दृष्टिकोन हाच एक महत्त्वपूर्ण सिद्धांत असतो. दृष्टिकोनाचा मुख्य हेतू म्हणजे विविध राजकीय तत्त्वांची एक व्यवस्था निर्माण करून ती काही संकल्पनामध्ये बसविली जाते.' (देव, विजय, २०१३ : ५९)

थोडक्यात, दृष्टिकोन हे नेहमी राज्यशास्त्रात आपण कोणता व कशाचा अभ्यास करावा, याचे उत्तर देतात व त्याला अनुसरून जे निकष व शेवटी जे निष्कर्ष ठरविले जातात त्याला दृष्टिकोन असे म्हणतात.

राजकीय सिद्धांताच्या अभ्यासासाठी आपण खालील दोन दृष्टिकोनाचा सविस्तर विचार करणार आहोत. ते म्हणजे एक, आदर्शवादी दृष्टिकोन आणि दोन, अनुभववादी दृष्टिकोन होय.

### २.२.२ अ) आदर्शवादी किंवा मूल्याधिष्ठित दृष्टिकोन (छीरींर्ळीश अीिरिलह) :

पारंपारिक राज्यशास्त्रामध्ये आदर्शवादी दृष्टिकोनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. या दृष्टीकोनाला मूल्याधिष्ठित दृष्टीकोन असेही म्हणतात. पारंपारिक राजकीय विचारवंतांनी राज्यशास्त्राचा अभ्यास आदर्शात्मक दृष्टीने केला आहे. या दृष्टीकोनामध्ये काही मूल्ये व आदर्श प्रमाण मानून त्यावरून चांगल्या समाजव्यवस्थेचा व राजकीय व्यवस्थेचा शोध व अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला असतो. म्हणून केनेथ थॉम्पसन या दृष्टिकोनास नैतिक मापदंडानुसार राज्यशास्त्राचे केलेले अध्ययन असे म्हणतो. व्यक्ती व समाज यांच्या दृष्टीने चांगले काम, वाईट काम किंवा योग्य-अयोग्य याबाबतचा निर्णय घेण्याचे काम हा दृष्टीकोन करतो. प्लेटो पासून कार्ल मार्क्सपर्यंत व पुन्हा अलीकडच्या काळात लास्की, रॉल्स यांनी मूल्यांना, काही आदर्शांना राज्यशास्त्रात महत्त्व देऊन आपले विचार मांडले आहेत. हा दृष्टीकोन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाचा असून याची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

### २.२.३ आदर्शवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये :

**१) मूल्यावर अधिक भर किंवा मूल्यप्राधान्यता :**

आदर्शवाद दृष्टीकोन हा मूल्यांवर जास्त प्रमाणावर भर देतो. हा सिद्धांत मूल्यांना बांधील असून मूल्यांना आदर्श मानतो. राज्याचा उद्देश चांगल्या जीवनाची प्राप्ती करून देणे हा आहे त्यामुळे हा दृष्टीकोन राज्याच्या स्वरूपाचे चांगले, वाईट, आदर्श, नैतिक, अनैतिक अशा दृष्टीने विवेचन करतो. यामधील राजकीय विचारवंतानी काही चांगली मूल्ये, आदर्श शोधून त्यावर आधारीत आपले विचार किंवा सिद्धांत मांडले. सॉक्रेटिसने ज्ञान हाच सद्‌गुण मानला, प्लेटोने आदर्श राज्यासाठी तत्त्वज्ञानी व्यक्तीला प्राधान्य दिले. हेगेलने विचारांना महत्त्व देऊन द्वंद्ववादी सिद्धांत मांडला. या सिद्धांतामध्ये नीतीशास्त्राला प्राधान्य दिले आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता इ. मूल्यांना हा सिद्धांत महत्त्व देतो. थोडक्यात, हा सिद्धांत सातत्याने समाजहितासाठी आदर्श मूल्यांचा शोध घेण्यावर भर देतो.

**२) तत्त्वज्ञानाला महत्त्व किंवा तात्विक बैठक :**

या सिद्धांताचा मूळ आधार तत्त्वज्ञान हा आहे. पारंपारिक राज्यशास्त्र हे नीतीशास्त्रावर आधारीत आहे तर नीतीशास्त्राचा आधार हा तत्त्वज्ञान आहे. या आदर्शवादी विचारवंतांच्या मते, तत्त्वज्ञानाचा आधार घेऊनच सत्यापर्यंत पोहोचता येते केवळ तथ्याचा आधार उपयोगी ठरत नाही. राजकीय संस्था उपयुक्त व टिकाऊ स्वरूपाच्या बनण्यासाठी तात्त्विक बैठक आवश्यक असते. दैनंदिन राजकारणाला सुद्धा तत्त्वज्ञानाचा आधार असला पाहिजे, असे या विचारवंतांचे मत आहे. प्लेटोने आदर्श राज्य, तत्त्वज्ञानी राजा, हेगेलने आदर्श राज्य,

विरोधविकासवाद इ. प्रकारच्या तत्त्वज्ञानाच्या बैठकीवर आपले सिद्धांत मांडले आहेत. सेंट ऑगस्टीन, सॉक्रेटिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, हॉब्ज, लॉक, रुसो, मिल इ. विचारवंताना त्यांनी मांडलेल्या तात्त्विक बैठकीमुळेच आजही महत्त्व आहे.

**३) आदर्श व काल्पनिक राजकीय चिंतन :**

या दृष्टिकोनामध्ये कल्पनेवर, स्वप्नरंजन विचारांना महत्त्व दिले गेले. वास्तवात न येणाऱ्या अनेक कल्पनांना अवास्तव महत्त्व दिले गेले. उदा. प्लेटोचा तत्त्वज्ञ राज्यकर्ता हा अत्यंतिक कल्पनावादी व आदर्शवादी तत्त्वावर मांडला गेला. प्लेटोने पुढे उपआदर्श राज्यामध्ये यामध्ये थोड्या प्रमाणात बदल करून राज्याचे प्रारूप मांडले. प्लेटोचा स्त्रीयाविषयक साम्यवाद हा फारच आदर्श स्वरूपात मांडला आहे. थोडक्यात, आदर्शवादी दृष्टीकोन हा एक प्रकारचा युरोपिया आहे, अशी अनेकांनी टीका केली आहे.

**४) तार्किक अनुगामी अभ्यास पद्धतीचा वापर :**

हा दृष्टिकोन अनुगामी पद्धतीने राजकीय सिद्धांताची मांडणी करतो. निगमनात्मक पद्धतीचा वापर करून 'सामान्याकडून विशेषाकडे' जाण्याचा प्रयत्न केला जातो. एखादे सामान्य स्वरूपाचे गृहीततत्त्व स्वीकारून त्यावरून विशेष स्वरूपाचे निष्कर्ष काढण्यात येतात. उदा. हॉब्ज, लॉक, रूसो यांनी राज्याच्या उदयाचा सामाजिक करार सिद्धांत मांडताना निसर्ग अवस्था, मानवी स्वभाव गृहीत धरून त्याच्या आधारे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला. प्लेटोने निगमनात्मक पद्धतीने अभ्यास केला तर पुढे ॲरिस्टॉटलने विगमनात्मक पद्धतीने विश्लेषण करून सिद्धांत मांडले.

**५) ऐतिहासिकवादाला महत्त्व :**

हा दृष्टिकोन इतिहासाच्या आधारावरील अभ्यासाला महत्त्व देतो. भूतकाळामधील राजकीय विचारांचा अभ्यास करण्यामध्ये विचारवंतानी अधिक वेळ घालविला. समकालीन राजकीय व सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी नवीन सिद्धांत किंवा उत्तरे शोधण्याऐवजी राजकीय विचारवंत एक प्रकारे विचारवंत बनले. थोडक्यात, हा दृष्टिकोन इतिहासाला आपला आधार मानतो. राजकीय मानवाचा ऐतिहासिक वर्तनाचा मागोवा घेऊन निष्कर्ष काढले जातात. माँटेस्क्यू, कार्ल मार्क्स यांनी ऐतिहासिक बाबींचा विचार करून सिद्धांत मांडले.

**६) संस्थात्मक व कायद्यावर भर :**

हा दृष्टिकोन शासनसंस्थांची चौकट, शासनसंस्थांची विविध अंगे व त्यांची कार्ये यांच्या अभ्यासावर भर देतो. राजकीय संस्थांचे वर्णन, त्यांची ध्येये आणि कार्यपद्धती यांचा अभ्यास केला जातो. या संस्थांची कायद्यावर आधारित कार्यपद्धती याचाही अभ्यास केला जातो. निर्णय घेत असताना औपचारिक कायदेविषयक चौकटीला महत्त्व दिले जाते. उदा. संसदीय शासनपद्धतीमध्ये कायदेमंडळाला जबाबदार राहून त्या चौकटीमध्ये

मंत्रीमंडळ निर्णय घेते. सामान्य कायदे, नियम, प्रथा, परंपरा, न्यायालयीन निर्णय इ. चा आधार घेऊन त्या ठिकाणच्या राजकीय जीवनाचा व राजकीय व्यवहाराचा अभ्यास केला जातो.

**७) राज्याशी संबंधित संकल्पनांना महत्त्व :**

हा दृष्टिकोन राज्याची रचना, कार्ये याच्या अभ्यासाला महत्त्व देतोच त्याचबरोबर राज्याशी संबंधित संकल्पनांनाही महत्त्व देतो. यामध्ये राज्याच्या निर्मितीबरोबर आदर्श राज्याची संकल्पना, राज्य व व्यक्तीमधील संबंध, राज्याराज्यामधील संबंध इ. चाही अभ्यास केला जातो.

**८) तुलनात्मक अभ्यासाचाही विचार :**

आदर्शवादी दृष्टीकोन अमूर्त बाबींचा विचार करून अभ्यास करीत असला तरी काही विचारवंतानी तत्कालीन परिस्थितीचा वास्तववादी अभ्यास केलेला आहे. त्याचप्रमाणे तुलनात्मक अभ्यास पद्धतीचाही अवलंब केला आहे. उदा. ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटनांचा अभ्यास केला तर के. सी. व्हिअर यांनी संघराज्याचा अभ्यास, लास्की यांचे राजकीय संस्थांचे विवेचन हे तुलनात्मक अभ्यासपद्धतीचे उत्तम उदाहरण आहे.

**९) व्यक्तीनिष्ठ स्वरूप :**

अनेकवेळा आदर्शवादी दृष्टीकोन हा व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचा वाटतो. एखादा राजकीय सिद्धांत मांडताना त्या विचारवंतावर पडलेल्या प्रभावांना, विचारांना, आदर्शांना जास्त महत्त्व दिले जाते. अभ्यासक किंवा विचारवंत जी गृहितत्त्वे प्रमाण मानून त्या आधारे सिद्धांताची मांडणी करतो त्या गृहिततत्त्वांची सत्यासत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केला जात नाही. एखाद्या विचारवंताला एखादा विचार आदर्श वाटला म्हणून तो त्या आधारे आपल्या सिद्धांताची मांडणी करतो. या ठिकाणी वस्तुस्थितीपेक्षा त्या विचारंतांची मते प्रमाण किंवा महत्त्वाची मानली जातात. त्यामुळे हा दृष्टिकोन वस्तुनिष्ठतेऐवजी व्यक्तीनिष्ठ स्वरूपाचा बनतो.

**१०) नैतिकतेला जास्त महत्त्व :**

आदर्शवादी दृष्टिकोन हा नीतीशास्त्राला महत्त्व देतो. आदर्शवादी विचारवंत राज्याच्या स्वरूपाचे चांगले, वाईट, नैतिक अशा दृष्टींनी विवेचन करतात. व्यक्ती आणि समाजाच्या दृष्टीने चांगले - वाईट, योग्य-अयोग्य यासंबंधीचे विवेचन करून नैतिक मूल्यांची प्रस्थापना करण्यावर हा दृष्टिकोन भर देतो. राज्यशास्त्राला मूल्यांचे अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे कार्य या दृष्टिकोनाने केले आहे. डेव्हिड आप्टर आणि ए. चार्लस् यांच्या मते, आदर्शवादी दृष्टिकोन हा मूल्यांचे आणि आदर्शांचे अत्यंत व्यवस्थित विश्लेषण करतो की ज्यामुळे व्यक्तीला चांगली शासनसंस्था तसेच चांगले धोरण निवडण्यामध्ये मदत होते.

## २.२.४ आदर्शवादी दृष्टीकोनाचे मूल्यमापन किंवा परीक्षण किंवा उणीवा :

राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी आदर्शवादी दृष्टिकोन हा अत्यंत मूलभूत व महत्त्वाचा असला तरी यामध्ये

खालीलप्रमाणे उणीवा किंवा मर्यादा आहेत.

**१) मर्यादित अभ्यासावर भर :**

हा दृष्टिकोन राज्य, राज्याची कार्ये, शासनसंस्थांची रचना इ. चा अभ्यास करतो. त्याअंगाने हा दृष्टिकोन मर्यादीत स्वरूपाचा आहे, अशी टीका केली आहे.

**२) मूल्यांना, तत्त्वांना अतिरेकी महत्त्व :**

हा दृष्टिकोन आदर्श मूल्ये, तत्त्वे यांना वस्तुस्थितीपेक्षा जास्त महत्त्व देतो त्यामुळे अनेक राजकीय समस्या सोडविण्यामध्ये हा दृष्टिकोन कमी पडतो. नीतीशास्त्र प्रमाण मानून मूल्यांना महत्त्व दिल्यामुळे वास्तव राजकारणामध्ये विश्लेषण हा दृष्टिकोन करू शकत नाही.

**३) आंतरविद्याशाखीय अभ्यासाला कमी महत्त्व :**

आदर्शवादी दृष्टिकोनामध्ये तत्त्वज्ञान, इतिहास, नीतीशास्त्र याच्या आधारावर जास्त अभ्यास केला गेला. परंतु मानवाच्या कृती या सामाजिक, आर्थिक, मानसशास्त्रीय स्वरूपाच्या असतात. त्यामुळे समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र इ. सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास करून मानवाचे राजकीय जीवन व वर्तन याविषयी निष्कर्ष काढणे जास्त योग्य ठरते. परंतु आदर्शवादी दृष्टिकोनामध्ये आंतरविद्याशाखीय अभ्यासाचा अभाव असलेला दिसून येतो.

**४) शास्त्रीय दर्जा कमी :**

आदर्शवादी दृष्टिकोनाला फारसा शास्त्रीय दर्जा नाही. केवळ मूल्ये व आदर्श यावर भर दिल्यामुळे शास्त्रीयता अभ्यासली गेली नाही. राजकीय विवेचन किंवा विश्लेषण करताना वस्तुनिष्ठता आवश्यक असते. त्यासाठी संख्याशास्त्र, मानसशास्त्र, गणित यांचा वापर आधुनिक काळात राज्यशास्त्रामध्ये होऊ लागला आहे. त्यादृष्टीने आदर्शवादी दृष्टिकोनाला शास्त्रीय दर्जा देता येत नाही.

**५) मूल्याची सापेक्षता :**

मूल्ये ही सापेक्ष असतात म्हणजे ही मूल्ये देश, राज्य, समाज इ. परत्वे बदलत असतात. एखाद्या समाजात आदर्श असणारी मूल्ये जशीच्या तशी दुसऱ्या समाजात आदर्श असतीलच असे नाही. त्यामुळे आदर्शवादी दृष्टिकोनाने मूल्यावर किंवा आदर्शावर निर्माण केलेले सिद्धांत वैश्विक स्वरूपाचे ठरत नाहीत. ही महत्त्वाची मर्यादा या दृष्टिकोनाची आहे.

वरीलप्रमाणे आदर्शवादी दृष्टिकोनावर टीका केली जाते. त्यामधील दोष किंवा उणीवा सांगितल्या जातात तरीसुद्धा या सिद्धांताचे महत्त्व कमी होत नाही. कारण समाजासाठी, मानवी वर्तन चांगले राहण्यासाठी आदर्शांची, मूल्यांची नितांत आवश्यकता असते. या दृष्टिकोनामधून निर्माण झालेली स्वातंत्र्य, समता, बंधुत्व,

विकेंद्रीकरण, राजकारणामधील नैतिकता इ. आदर्श किंवा मूल्ये आधुनिक राज्यशास्त्रानेसुद्धा मान्य केली आहेत. त्यामुळे हा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी एक मार्गदर्शक व मूलभूत स्वरूळपाचा असून त्याचे कायमस्वरूपी महत्त्व राहणार आहे.

### २.२.५ अनुभवजन्य किंवा अनुभववादी दृष्टिकोन (Empirical Approach) :

विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून राज्याच्या तसेच राज्य व नागरिक यांच्या संबंधामध्ये मोठ्या प्रमाणावर विस्तार होऊ लागला. राज्याची कार्ये केवळ शासनसंस्थेपुरती मर्यादित न राहता ती सर्वव्यापी होऊ लागली. यामधूनच आधुनिक राज्यशास्त्राचा उदय झाला. या आधुनिक राज्यशास्त्राचा पाया हा अनुभववादी दृष्टिकोन आहे, असे मानले जाते. या दृष्टिकोनाला 'मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन' असेही म्हणतात.

ॲरिस्टॉटलने १५८ राज्यघटकांचा तुलनात्मक अभ्यास करून त्या अनुभवावर आधारित निष्कर्ष काढले होते. त्या अर्थाने ॲरिस्टॉटल हा या दृष्टिकोनाचा पुरस्कर्ता आहे. हॉब्ज, लॉक, रुसो, बेंथम, मिल यांनीसुद्धा मानवी अनुभवाच्या आधारे आपले सामाजिक कराराचे, राज्याच्या कार्याचे तसेच उपयोगितावादाचे सिद्धांतन केले आहे.

सिडने वेब आणि बिट्रीस वेब यांनी अर्थशास्त्रामध्ये पहिल्यांदा अनुभवजन्य दृष्टिकोन मांडला व पुढे मॅक्स वेबर, रिकेट, हर्बट सायमन, डेव्हिड ईस्टन, आल्मंड, बेंटले इ. नी हा सिद्धांत विस्ताराने मांडला आहे. ह्यूम, मुरे, वुड्रो विल्सन, आर्थर बेंटले, लॉर्ड ब्राईस, ग्रॅहम वालास यांनीही अनुभववादी दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. वॉल्टर बेजहॉट यांनी 'ब्रिटीश कॉन्स्टिट्यूशन' या ग्रंथात तर ग्रॅहम वालास यांनी 'ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स' (१९०८) या ग्रंथामध्ये अनुभवजन्य दृष्टिकोनातून विचार मांडले आहेत. शिकागो विद्यापीठामधील चार्लस् मेरियम यांनी १९०८ मध्ये 'प्रायमरी इलेक्शन' हा ग्रंथ अनुभववादी दृष्टिकोनाचा स्वीकार करून लिहिला आहे. 'न्यू अस्पेक्टस् ऑफ पॉलिटिक्स' (१९२५) या मेरियम यांच्या ग्रंथात त्यांनी वैज्ञानिक पद्धतीचा, राजकीय प्रक्रियेचा विकास होण्याच्या दृष्टिने लेखन केले आहे. थोडक्यात, अमेरिकन विचारवंतांनी या दृष्टिकोनाचा जोरदार पुरस्कार केला आहे.

### २.२.६ अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

या दृष्टिकोनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतात.

**१) मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन :**

अनुभववादी दृष्टिकोन हा 'मूल्यनिरपेक्ष दृष्टिकोन' म्हणून ओळखला जातो. अनुभववादी विचारवंत मूल्ये, आदर्श यांना विशेष स्थान देत नाहीत. त्यांच्या मते, मूल्ये किंवा आदर्श या बाबी व्यक्तिनिष्ठ स्वरूपाच्या असतात. वास्तवतेच्या कसोटीवर या मूल्यांची पडताळणी केली जाऊ शकत नाही. संशोधकाने पूर्वग्रहीत अशी मूल्ये धरता कामा नये. त्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून मिळणाऱ्या म्हणजेच निरीक्षण, प्रयोग, माहितीचे संकलन इ.

द्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीवरून आपले निष्कर्ष काढले पाहिजेत. अनुभववादावर विकसित झालेला वर्तनवाद हा पूर्णपणे मूल्यनिरपेक्षतेवर भर देतो. अनुभव, निरीक्षण इ. द्वारे मिळालेले ज्ञान हेच खरे ज्ञान असते, असे हा दृष्टिकोन मानतो.

२) अनुभवनिष्ठ ज्ञानावर भर :

हा दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी राजकीय व्यवहारातील प्रत्यक्ष अनुभवाला विशेष महत्त्व देतो. अनुभवाद्वारे मिळणारे प्रत्यक्ष ज्ञान हाच ज्ञानसंपादनाचा खरा मार्ग होय, असे या दृष्टिकोनाचे पुरस्कर्ते मानतात. त्यांच्या मते, अशा प्रकारचे ज्ञान अभ्यासाविषयाची परिपूर्ण माहिती होण्यास उपयुक्त ठरते कारण ते वस्तुस्थितीवर आधारित असते.

**३) विश्लेषणावर भर :**

पारंपारिक राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनामधील वर्णनात्मक पद्धतीऐवजी हा दृष्टिकोन विश्लेषणावर भर देतो. नवीन तंत्रे आणि नवीन पद्धतीच्या शोधामुळे राजकीय प्रश्नांचे विवेचन व विश्लेषण करणे अधिक सोयीचे झाले.

पूर्वीच्या अभ्यासपद्धतीमध्ये ढोबळ मानाने संकल्पना मांडण्यात येत असल्यामुळे त्यामध्ये मोठी अस्पष्टता होती. परंतु नवीन पद्धतीमुळे अनेक बाबीमध्ये स्पष्टता येऊ लागली. वर्तनवाद, व्यवस्थावाद इ. सिद्धांत या अनुभववादी दृष्टिकोनामधून उदयास आलेले आहेत, असे म्हटले जाते.

**४) आधुनिक शास्त्रीय पद्धतीचा अवलंब :**

अनुभववादी विचारवंत संशोधनासाठी आधुनिक शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करतात. हा दृष्टिकोन वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करतो. शास्त्रीय पद्धतीमधील निरिक्षण, सर्वेक्षण, मुलाखती, परिमाणीकरण, गणिती पद्धती इ. चा. अवलंब करून निष्कर्ष काढतात. उदा. डेव्हिड ईस्टन यांनी मांडलेल्या वर्तनवादी सिद्धांतामध्ये शास्त्रशुद्धतेवर भर देऊन आधुनिक शास्त्रीय पद्धतींच्या आधारे मानवी वर्तनाचा अभ्यास केला आहे.

**५) आंतरविद्याशाखीय स्वरूप :**

अनुभववादी दृष्टिकोन राज्यशास्त्राचे अध्ययन करीत असताना सर्व सामाजिक शास्त्राच्या संबंधावर व अभ्यासावर भर देतो. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र, सांख्यिकीशास्त्र, जीवशास्त्र इ. शाखेतील सिद्धांताचा वापर या दृष्टिकोनामध्ये केला जातो. यामुळे या दृष्टिकोनाला आंतरविद्याशाखीय स्वरूप प्राप्त झाले आहे. वर्तनवाद, व्यवस्थावाद, कार्ल ड्वाइशचा राजकीय संसूचनवाद, राजकीय आधुनिकीकरण, राजकीय परिवर्तन इ. सिद्धांताचा आधार अनुभववादी दृष्टिकोन हा आहे.

**६) परिवर्तनशीतेला मान्यता :**

हा दृष्टिकोन स्थितीशील न राहता परिवर्तनशीलतेला मान्यता देतो. अनुभववादी विचारवंतांच्या मते, विशिष्ट परिस्थितीत मांडलेले किंवा प्रस्थापित केलेले सिद्धांत फक्त याच परिस्थितीमध्ये लागू होतात. मात्र

परिस्थितीमध्ये बदल झाल्यावर ते सिद्धांत लागू होत नाहीत. अशावेळी बदललेल्या परिस्थितीचा अभ्यास करून, निरीक्षण करून त्या सिद्धांताची पुनर्मांडणी, पुनर्तपासणी केली पाहिजे.

**७) अमेरिकन विचारवंतांचा प्रभाव :**

अनुभववादी दृष्टिकोनावर अमेरिकन विचारवंतांचा मोठा प्रभाव आहे. यापूर्वी युरोपियन विचारवंतांचा प्रभाव पारंपारिक किंवा आदर्शवादी सिद्धांतावर होता. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेचा महासत्ता म्हणून उदय झाला. अमेरिकेमध्ये राज्यशास्त्राच्या अभ्यासासाठी फ्रँकफर्ट स्कूल, शिकागो स्कूल, रॉकफेलर फाऊंडेशन, फोर्ड फाऊंडेशन इ. द्वारा मोठ्या प्रमाणात चालना दिली गेली. डेव्हिड ईस्टन, टालकॉट पार्सन, आल्मंड आणि पॉवेल, रॉबर्ट मर्टन, चार्लस मेरियम, आर्थर बेंटले, बियर्ड, लॉवेल, ब्राईस, रॉबर्ट ढाल्ह इ. विचारवंतांनी अनुभववादी दृष्टिकोनाचा आधार घेऊन आधुनिक राज्यशास्त्राचा पाया रचला. यामध्ये अमेरिकन राज्यशास्त्रांनी १९०३ मध्ये स्थापन केलेल्या 'अमेरिकन पोलिटिकल असोसिएशनची' महत्त्वाची भूमिका आहे.

**८) राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे व्यापक क्षेत्र :**

अनुभववादी दृष्टिकोनाच्या अध्ययनामुळे राज्यशास्त्राचे अभ्यासक्षेत्र केवळ शासनसंस्था, राज्याचा अभ्यास एवढ्यापुरते मर्यादित राहिले नाही तर या अभ्यासक्षेत्राचा मोठा विस्तार झाला राज्यशास्त्रामध्ये केवळ राजकारणाचा अभ्यास करण्याऐवजी राजकीय प्रक्रियांच्या अभ्यासावर भर देण्यात येऊ लागला. राज्यशास्त्र हे केवळ युरोपकेंद्रीत न राहता ते तिसऱ्या जगामधील राजकीय व्यवस्था, राजकीय परिवर्तन यांचा अभ्यास करू लागले. अनुभववादी दृष्टिकोनामुळेच नवीन बदललेल्या राजकीय समस्यांचे आकलन करून सिद्धांतन करण्यात येऊ लागले.

## २.२.७ अनुभववादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन किंवा उणीवा किंवा मर्यादा :

अनुभववादी दृष्टिकोन हा राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी महत्त्वाचा आहे. तरीही यामध्ये खालील प्रकारच्या काही उणीवा किंवा मर्यादा सांगता येतात.

**१) मूल्यांना कमी महत्त्व :**

अनुभववादी मूल्यांना महत्त्व न देता मूल्यनिरपेक्षतेवर भर देतात. परंतु मानवी वर्तनाचा विचार करता मूल्यांना महत्त्व देणे आवश्यक आहे. जर मूल्ये पूर्णपणे हद्दपार केली तर योग्य-अयोग्य, चांगले-वाईट यामधील फरक करणे कठीण होईल. तसेच चांगल्या मूल्यामुळे मानवजातीचे कल्याणच झाले आहे. आज स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय इ. जी मूल्ये आवश्यक असून त्याला महत्त्व दिले जाते ती पारंपारिक किंवा आदर्शवादी दृष्टिकोनाची देणगी आहे. वर्तनवाद मांडून डेव्हिड ईस्टनने मूल्यांना हद्दपार करण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच डेव्हिड ईस्टनने उत्तर वर्तनवादी सिद्धांत मानून मूल्यांना पुनर्स्थापित केले. एकूणच मानवी जीवनात मूल्यांचे महत्त्व कायमच राहणार आहे.

**२) अतितांत्रिकता व शास्त्रशुद्धत उपयोगी नाही :**

अनुभववादी अतितांत्रिकता व अतिशास्त्रशुद्धतेवर भर देतात. संख्याशास्त्र, गणिती सिद्धांत इ. चा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. परंतु तरीही अनेक ठिकाणी अनुभववादी सिद्धांत कमी पडताना दिसतात. कारण राज्यशास्त्र हे जीवशास्त्र किंवा भौतिकशास्त्राप्रमाणे शुद्धशास्त्र नाही तर ते सामाजिकशास्त्र आहे. त्यामुळे अतितांत्रिकता किंवा अतिशास्त्रशुद्धत उपयोगी नाही. उदा. निवडणूक अंदाज शास्त्रामध्ये सर्व शास्त्रीय आधार घेऊन निष्कर्ष काढले जातात. तरीही अनेक वेळा निवडणूक अंदाजशास्त्राचे अंदाज चुकीचे ठरल्याचे दिसून येते.

वरीलप्रमाणे या दृष्टिकोनावर टीका होत असली तरी अनुभववादी दृष्टिकोनामुळे राज्यशास्त्राचे अध्ययन समृद्ध होण्यास मदत झाली आहे. समकालीन समस्यांचा वेध घेऊन त्याची सोडवणूक करण्याची राज्यशास्त्राची क्षमता या दृष्टिकोनामुळे वाढली आहे. त्यामुळे या दृष्टिकोनाला राज्यशास्त्रामध्ये महत्त्वाचे स्थान आहे.

## २.३ सारांश :

राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी आदर्शवादी तसेच अनुभववादी हे दोन्हीही दृष्टिकोन महत्त्वाचे आहेत. या दोन्ही दृष्टिकोनाचे समर्थन करणारे दोन गट निर्माण झाले आहेत. परंतु वस्तुस्थिती पाहता दोन्हीमध्ये विरोध असण्याचे कारण नाही. दोन्ही दृष्टिकोन एकमेकांना सहाय्यकारी तसेच पूरक आहेत. आदर्शवादी दृष्टिकोन मूल्यांना जास्त महत्त्व देतात, ते काल्पनिक आहेत, व्यक्तिनिष्ठ आहेत अशी टीका अनुभववाद्याकडून होत असली तरी अनुभववादी दृष्टिकोनसुद्धा परिपूर्ण नाही. अतितांत्रिकता, अतिशास्त्रशुद्धता, मूल्यनिरपेक्षकता या बाबी राज्यशास्त्राच्या अध्ययनामध्ये पूर्णपणे शक्य नाहीत ही अनुभववाद्यांची मर्यादा आहे. उदा. मानवी वर्तन हे परिस्थिती आणि वातावरण यानुसार बदलत असते. त्यामुळे मानवाच्या वर्तनाचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केला जाऊ शकेल असे नाही. मूल्ये, आदर्श यांच्याशिवाय मानवी जीवनाचे अध्ययन सामाजिक शास्त्रे करू शकणार नाहीत याला राज्यशास्त्रसुद्धा अपवाद नाही. आदर्शवादी दृष्टिकोनावर टीका करून अनुभववादाचा पुरस्कार करून डेव्हिड ईस्टनने वर्तनवादी सिद्धांत मांडला. वर्तनवादामध्ये मूल्ये, आदर्श यांना हद्दपार केले तर शास्त्रशुद्धता, मूल्यनिरपेक्षता यांना महत्त्व दिले. परंतु मूल्ये व आदर्शांना पूर्णपणे नाकारून मानवी वर्तन तसेच राज्यशास्त्राचा अभ्यास करणे शक्य नाही, हे डेव्हिड ईस्टनच्या लक्षात आल्यामुळे मूल्यांचा पुरस्कार करीत पुन्हा उत्तरवर्तनवादी सिद्धांत मांडला. याचाच अर्थ असा आहे की, आदर्शवादी आणि अनुभववादी हे दोन्हीही दृष्टिकोन राज्यशास्त्राच्या अध्ययनासाठी उपयुक्त आहेत. म्हणून आदर्शवादी आणि अनुभववादी या दोन्ही दृष्टिकोनामध्ये समन्वय साधून राज्यशास्त्राचे विश्लेषण करणे आवश्यक आहे, असे रॉबर्ट ढाल म्हणतो. थोडक्यात, आदर्शवादी आणि अनुभववादी दृष्टिकोनांच्या समन्वयी अभ्यासामुळे राज्यशास्त्र जास्तीत जास्त समृद्ध होणार आहे. त्यामुळे या दोन्हीही दृष्टिकोनांचे महत्त्व राज्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये कायम राहणार आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द :

**१) दृष्टिकोन :** राजकीय तत्त्वे समजण्यासाठी असलेली विश्लेषण पद्धती.

**२) मूल्ये :** योग्य आणि अयोग्य, चांगली आणि वाईट यामध्ये फरक करणारी संकल्पना.

**३) मूल्यनिरपेक्षता :** मूल्यांना नाकारणारी, महत्त्व न देणारी व्यवस्था.

**४) आदर्शवाद :** मूल्ये आणि आदर्श यांना प्रमाण मानणारी व्यवथा.

**५) अनुभववाद :** अवलोकन आणि प्रयोग यातून मिळविलेली माहिती म्हणजे अनुभववाद किंवा वस्तुनिष्ठता.

**६) आंतरविद्याशास्त्रीय :** विविध विषयांचा उपयोग करून त्यामधील संकल्पनांचा वापर करणे म्हणजे आंतरविद्याशास्त्रीय अभ्यास होय.

**७) परिवर्तनशीलता :** बदललेल्या परिस्थितीनुसार नवीन बदल स्वीकारणे.

## २.५ सरावासाठी प्रश्न :

१) ............. हा दृष्टिकोन मूल्ये, आदर्श, तत्त्वे यांना महत्त्व देतो.

२) पारंपारिक राज्यशास्त्राचा अभ्यास ............. दृष्टिकोनामधून केला जातो.

३) मूल्यनिरपेक्षता हे ............. दृष्टिकोनाचे वैशिष्ट्य आहे.

४) ............. यांनी वर्तनवादी दृष्टिकोन मांडला.

५) अनुभववादी दृष्टिकोनावर ............. विचारवंतांचा प्रभाव आहे.

## २.६ वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे :

१) आदर्शवादी, २) आदर्शवादी, ३) अनुभववादी, ४) डेव्हिड ईस्टन, ५) अमेरिकन

## २.७ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न.

**अ) टीपा लिहा.**

१) आदर्शवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

२) अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) आदर्शवादी दृष्टिकोनाचा विकास सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) आदर्शवादी दृष्टिकानाची वैशिष्ट्ये व दोष स्पष्ट करा.

३) अनुभववादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये सांगून दोष सांगा.

## २.८ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके :

१) देव विजय : 'आधुनिक राजकीय विश्लेषण कोश', डायमंड, पुणे (२०१३).

२) देव विजय व इतर : 'राजकीय संकल्पना आणि सिद्धांत', डायमंड पुणे (२०१५).

३) मुठाळ राम : 'राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण,' अंशुल, नागपूर (१९९७).

४) ठाकरे एस. बी. : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', विद्या, नागपूर (१९९३).

५) पाटील बी. बी. : 'राजकीय सिद्धांत', फडके, कोल्हापूर. (२०१२).

६) बोराळकर कृ. दि. : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', पिंपळापुरे, नागपूर. (१९९२).

७) तिजारे, घांग्रेकर : 'आधुनिक राजकीय विश्लेषण', मंगेश, नागपूर. (१९९४)

८) भोळे भा. ल. : 'राजकीय सिद्धांत आणि विश्लेषण', पिंपळापुळे, नागपूर. (२०१९)

९) Varma S. P. : 'Modern Political Theory', Vikas, Delhi. (1975).

१०) Ashirvadam K. Misra : 'Political Theory', Chand, Delhi. (2004).

११) चौसाळकर अशोक : 'आधुनिक राजकीय सिद्धांत', युनिक, पुणे. (२०१५).

१२) खेडेकर दि. आ. : 'राजकीय सिद्धांतातील मूलभूत संकल्पना', चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद. (२००९).

ooo

घटक ३

# वर्तनवाद व उत्तर–वर्तनवाद

## (Behaviouralism & Post-Behaviouralism)

---


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ वर्तनवादी दृष्टिकोन
  - ३.२.१.१ वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ
  - ३.२.१.२ वर्तनवादी दृष्टिकोनाचा वैशिष्टे
  - ३.२.१.३ वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन
- ३.२.२ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोन
  - ३.२.२.१ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ
  - ३.२.२.२ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये
  - ३.२.२.३ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ वस्तुनिष्ठ प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास,

- वर्तनवादी दृष्टीकोनाची पार्श्वभूमी समजून घेता येईल.
- वर्तनवादी दृष्टीकोन विकसित होण्यामध्ये जबाबदार घटकांना समजून घेता येईल.
- उत्तर-वर्तनवादी क्रांती घडून येण्यामागील कारकांचे आकलन करून घेता येईल.
- वर्तनवाद व उत्तर-वर्तनवादी दृष्टिकोनाचे चिकित्सेद्वारे तुलनात्मक आकलन करून घेता येईल.
- वर्तनवाद व उत्तर वर्तनवादी दृष्टिकोनाचे राज्यशास्त्रातील महत्त्व समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक :

राज्यशास्त्र हे सर्वोत्तम शास्त्र आहे या ॲरिस्टॉटलच्या म्हणण्याप्रमाणे अगदी प्राचीन काळापासून राज्यशास्त्र हा विषय मानवी सभ्यतेच्या उत्क्रांत अवस्थेनुसार विकसित होत आलेला आहे. राज्यशास्त्रात मूलतः व्यक्ती व समाजाच्या संघटित व्यवस्थेच्या राजकीय व्यवहाराचा अभ्यास केला जातो. मानवी समाजाची ही संघटित व्यवस्था म्हणजे राज्य होय. राज्यांतर्गत व्यक्ती व समाजाच्या जीवनमानाचे नियंत्रण व नियमन हा मुख्यत: राज्यसंस्थेच्या अखत्यारीतील विषय त्यामुळे एकूणच राज्य संस्थेच्या ध्येय व कार्यपद्धतीचे स्वरूप काय असावे? व त्याच बरोबर व्यक्ती, समाज व राज्य संस्था यांच्यातील परस्पर संबंध कसे असावेत? या संबंधीच्या भिन्न स्वरूपाच्या विचार प्रवाहांची निर्मिती झाली त्यांनाच राजकीय सिद्धांत, राजकीय दृष्टीकोन म्हणून ओळखले जावू लागले.

राजकीय दृष्टीकोनाच्या उत्तरोत्तर विकसित होत असलेल्या ऐतिहासिक क्रमामध्ये वर्तनवादी व उत्तर वर्तनवादी दृष्टिकोनाने राज्यशास्त्राला अधिक शास्त्रीय व उपयोगी शास्त्र बनविण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. साधारणत: दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरुवात झाली. या क्रांतीलाच वर्तनवाद या नावाने ओळखले जावू लागले. वर्तनवाद्यानी पारंपारिक राजकीय सिद्धांताच्या अभ्यास पद्धतीऐवजी मूल्यनिरपेक्षपणे राजकीय वर्तनावर आपले लक्ष केंद्रित करून अनुभवात्मक संशोधनाला प्राथमिकता दिली. परंतु लवकरच वर्तनवादांच्या मर्यादा स्पष्ट करून वर्तनवादी क्रांतीने आम्ही आमच्या विश्लेषणाला न्याय देऊ शकलो नाही, म्हणून आम्हाला उत्तर-वर्तनवादी बनले पाहिजे असे डेव्हिड ईस्टनने स्पष्ट केले. उत्तर-वर्तनवादी राजकीय विश्लेषणात मूल्यांना समाविष्ट करून राजकीय विश्लेषणाला अधिक परिपूर्ण व प्रासंगिक बनविण्यासाठी प्रयत्नशील होते. ज्यामध्ये तथ्य व मूल्य या दोन्हींचा एकत्रित वापर करून परिस्थितीनुरूप वापराला महत्व प्राप्त करून दिले गेले. अशाप्रकारे प्रस्तुत वर्तनवाद व उत्तर-वर्तनवाद या प्रकरणामध्ये वर्तनवादी क्रांती होण्यासाठी जबाबदार घटक, वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ, वैशिष्ट्ये व त्याचे राज्यशास्त्रातील योगदानाचे मूल्यमापन तसेच उत्तर-वर्तनवादीक्रांतीला जबाबदार कारणे, उत्तर-वर्तनवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये व त्याचे राज्यशास्त्रातील योगदानाचे मूल्यमापन आणि प्रस्तुत दोन्ही दृष्टीकोनांचे महत्त्व इत्यादी घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

### ३.२ विषय–विवेचन :

### ३.२.१ वर्तनवादी दृष्टिकोन (Behavioural Approach) :

दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरूवात झाली. सामाजिक शास्त्राचे सर्व विषय या क्रांतीने प्रभावित झाले. या क्रांतीला वर्तनवादी नावाने ओळखले जाते.

राज्यशास्त्रात वर्तनवाद म्हणजे आधुनिक प्रयत्न व दृष्टिकोनाची देण आहे. पारंपारिक राजकीय सिद्धांतात अंतर्भूत मूल्य, तत्त्वज्ञान, कायदा, इतिहासवाद, वर्णनात्मकअभ्यासपद्धती तसेच संस्थात्मक प्राथमिकतेची अपर्याप्तता यामुळे असंतुष्ट होऊन वर्तनवादी समर्थकांनी एका पर्यायाच्या रूपाने प्रस्तुत केले, ज्यात 'वर्तन'च्या अभ्यासाचे महत्त्व राज्यशास्त्रज्ञांनी स्वीकारले. वर्तनवादाने मुख्यत: आपले लक्ष राजकीय वर्तना वर केंद्रित केले आहे. वर्तनवादाने अनुभवात्मक संशोधनाला प्राथमिकता देऊन निरंतर संशोधनाला चालना दिली. पारंपरिक सिद्धांताप्रमाणे व्यक्तिनिष्ठ मूल्य, मानवीय विश्लेषण तसेच कल्पना यांना स्थान देत नाही. या दृष्टीने वर्तनवाद पारंपरिक राज्यशास्त्रापेक्षा पूर्णत: भिन्न आहे. राज्यशास्त्राला कायदा, तत्त्वज्ञान, मूल्य, नैतिकता याच्या चौकटीत बांधून ठेवण्यास तयार नाही.

### ३.२.१.१ वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ :

१९ व्या शतकाच्या अंतिम दशकात राज्य, समाज व मानव याचे व्यवस्थित अध्ययन विद्यापीठीय स्तरावर सुरू झाले होते. या प्रकारच्या अभ्यासक्रमाला 'सामाजिक शास्त्रे'या नावाने ओळखले जाते. संयुक्त राज्य अमेरिकेत काँग्रेस या अमेरिकन कायदेमंडळाकडून ची एक समिती 'राष्ट्रीय विज्ञान निधी'वर विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आली होती. विज्ञानातील उच्चस्तरीय संशोधनासाठी आर्थिक संसाधनाची तरतूद करण्यासाठी ही समिती निर्माण केली होती. सामाजिक शास्त्रांतर्गत येणाऱ्या विभिन्न विषयाच्या प्रतिनिधींनी आर्थिक सहाय्यता मिळविण्यासाठी सामाजिक शास्त्राला समाज विज्ञान असे घोषित केले; परंतु याला समाज विज्ञानाऐवजी 'वर्तनवादी शास्त्रे' असा शब्दप्रयोग करण्यात आला. सुरुवातीला वर्तनवादी विज्ञान याअंतर्गत मानसशास्त्र, मानववंशशास्त्र व समाजशास्त्र या विषयाचाच समावेश होता; परंतु नंतर राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, कायदा याही विषयाचा अंतर्भाव यात करण्यात आला.

वर्तनवाद हा सिद्धांत नसून ती एक क्रांती आहे. पारंपरिक राजकीय सिद्धांताच्या आधारावर ज्या व्यवस्थांचा ऱ्हास होत चालला होता. त्यांना स्थिरता प्राप्त करण्यासाठी वर्तनवादाचा विकास करण्यात आला. वर्तनवाद म्हणजे मानवी वर्तनाचा राजकीय व्यवस्थेवर पडणाऱ्या प्रभावाचा अभ्यास होय. प्लेटो, पासून ते आधुनिक विचारवंतापर्यंत अनेकांच्या विचारात वर्तनवाद दिसून येतो.

अमेरिकन राज्यशास्त्र संघटनेचे (American Political Association) प्रथम अध्यक्ष लॉर्ड व्हॉईस यांनी राजकीय सिद्धांतात शास्त्रीयतेचे समर्थन केले. १९०८ साली आर्थर बेंटले यांनी 'Process of Government : A Study of Social Procedure' हा ग्रंथ लिहून वर्तनवादाची स्पष्ट उत्पत्ती केली. बेंटलेच्या मते, राज्यशास्त्र निर्जीव आहे कारण राजकीय सिद्धांतात का ? पेक्षा कसा ? याचा विचार व्हायला पाहिजे. चार्ल्स मेरीयम

म्हणतात की, ‘‘राज्यशास्त्रात शास्त्रीय पद्धती आणि तंत्र जास्त विकसित करण्याची गरज नाही. काही काळानंतर राज्यशास्त्रात अन्य शास्त्राप्रमाणे औपचारिक अभ्यासापेक्षा नवीन आयामांच्या अभ्यासाला महत्व प्राप्त होईल.’’ त्यामुळे वर्तनवाद्यांनी सार्वजनिक वितरण प्रणाली, व्यक्तिगत दृष्टिकोन, विश्वास, सार्वजनिक शिक्षण, आधुनिक विचारांवर लक्ष केंद्रीत केले. १९०८ मध्ये ग्राहम वालास यांनी 'Human Nature of Politics' हा ग्रंथ लिहून राजकीय सिद्धांताच्या मांडणीत बदल घडवून आणले व हळूहळू नंतरच्या काळात वर्तनवादाचा विकास होत गेला.

**राजकीय वर्तन :**

राजकीय वर्तन हा शब्दप्रयोग अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाद्वारे सर्वप्रथम दुसऱ्या महायुद्धानंतर करण्यात येऊ लागला. पत्रकार फ्रँककेंट यांनी १९२८ मध्ये ‘‘पॉलिटिकल बिहेवियर- दि हियर्ट फॉर अनरिटन लॉज, कस्टम्स अँड प्रिसेप्टस ऑफ पॉलिटिकल एज प्रॅक्टिस्ड इन द युनायटेड स्टेटस’ हे पुस्तक प्रकाशित केले व यामध्ये राजकीय वर्तन हा शब्दप्रयोग केलेला होता. या शब्दाला सन्मानास्पद स्थान मिळवून देण्याचे श्रेय स्वीडनचे एक विद्वान हर्बर्ट टिंग्स्टनद्रार लिखित ‘पॉलिटिकल बिहेवियर - स्टडिज इन इलेक्शन स्टॅटिस्टिक्स’ (१९३७) या पुस्तकाला दिले जाते.

डेव्हीड ट्र्यूमन यांच्या मते वर्तनवादी राज्यशास्त्रात दोन गोष्टी येतात.

(१) संशोधन व्यवस्थित व्हायला पाहिजे.

(२) त्याचा संग्रह अनुभवावर व प्रयोगावर आधारित असावा.

राजकीय सिद्धांतवाद्यांचे लक्ष्य राजकीय प्रक्रियांचा एक विज्ञान म्हणून विकास करणे हा आहे. यावरून असे लक्षात येते की, वर्तनवाद हे पारंपरिक राजकीय सिद्धांतामधील चुकांविरुद्ध व त्यामुळे निर्माण झालेल्या अकार्यक्षमतेविरुद्ध उभारलेले आंदोलन आहे. वर्तनवाद म्हणजे नवीन शास्त्र नाही. तर राज्यशास्त्रातील राजकीय सिद्धांतात अनुभवी व वैज्ञानिक पद्धती निर्माण करणारी एक क्रांती आहे. आधुनिक काळाच्या समस्या सोडविण्यात पारंपरिक राजकीय सिद्धांत अयशस्वी ठरल्यानंतर त्या समस्या सोडविण्यासाठी राज्यशास्त्रात वैज्ञानिकता आणण्याचा प्रयत्न केला व त्याद्वारे राजकीय सिद्धांतात आमुलाग्र परिवर्तन झाले हे परिवर्तन घडवून आणण्याचे श्रेय वर्तनवादाला देता येईल.

वर्तनवादाचा अर्थ स्पष्ट करताना रॉबर्ट डाल लिहितो,

१. वर्तनवादी हे राज्यशास्त्रांतर्गत एक असे विरोधी आंदोलन आहे, ज्यात अनेक राज्यशास्त्रज्ञ विशेषत: अमेरिकन राज्यशास्त्रज्ञ आहेत जे पारंपरिक राजकीय सिद्धांताविषयी असंतुष्ट आहेत, हे आंदोलन पारंपारिक राज्यशास्त्रातील विभिन्न घटक जसे इतिहास, तत्त्वज्ञान, कायदा, संस्था इत्यादी यांच्या विरोधातील एक प्रतिक्रिया आहे.

२. वर्तनवादी समर्थक असे मानतात की, अभ्यासाची नवीन पद्धत विकसित करावी, ज्याच्या साह्याने राज्यशास्त्रात परिवर्तन घडवून आणण्यास मदत होईल.

३. हे एक असे आंदोलन आहे, ज्याचा उद्देश राज्यशास्त्राच्या अध्ययनाला अधिक वस्तुनिष्ठ बनवावे तसेच मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्रातील विकसित संकल्पनेच्या साह्याने अचूक संशोधनाच्या जवळ जाता येईल.

४. हा एक असा प्रयत्न आहे जो राज्यशास्त्रातील अनुभवात्मक तत्त्वांना अधिक शास्त्रशुद्धता प्रदान करेल.

५. ज्याचा उद्देश प्रशासनासंबंधी सर्व घटकांना मनुष्याच्या दैनंदिन कामकाजात उपयोगी पडू शकतील की ज्याचे परीक्षण, पुनर्निरीक्षण करता येईल.

६. वर्तनवादी विषयाच्या अनुभविक तत्त्वांना अधिक वैज्ञानिक व शास्त्रीय बनविण्याचा प्रयत्न आहे. हा एक असा दृष्टिकोन आहे, ज्याचा उद्देश राजकीय जीवनाला अधिक अनुभविक बनविणे तथा संशोधन पद्धती सिद्धांत यात काटेकोरपणा आणणे.

**डेव्हिड इस्टन :**

वर्तनवादाचा भर वस्तुनिष्ठ संशोधनावर आहे व याच्या अध्ययनाचा उद्देश मानवाचे वर्तन ज्याचे प्रत्येक व्यक्तीद्वारे पर्यवेक्षण, मापन आणि सत्य पडताळणी करता येऊ शकते याच्याशी संबंधित आहे. राज्यशास्त्राची शास्त्रीय व्याख्या विकसित करण्याबरोबरच वर्तनवाद, मनोवैज्ञानिक आदर्शवाद यांच्याविरुद्ध वास्तववाद, निवडणूक वर्तन यासंदर्भात अभ्यास करण्याची नवीन पद्धत आहे.

वर्तनवाद एक असा दृष्टिकोन आहे, ज्याचा उद्देश विश्लेषणाची एक नवी पद्धत, नवी संकल्पना, नवे अध्ययन तंत्र, तथ्य संकल्पनाचे मार्ग आणि शास्त्रीय सिद्धांताचा विकास या संदर्भातला एक मार्ग आहे. वर्तनवादाने नैसर्गिक शास्त्र आणि सामाजिक शास्त्रांमध्ये गुणात्मकता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

वर्तनवाद हा राजकारणाच्या अभ्यासाचा एक नवा दृष्टिकोन आहे. या दृष्टिकोनाच्या आगमनानंतर राज्यशास्त्रात इतके परिवर्तन घडून आले की, त्याला वर्तनवादी क्रांती असे संबोधले जाते. ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे की, व्यवस्था विश्लेषण आणि संरचनात्मक – कार्यात्मक दृष्टिकोन यासारखे सिद्धांत स्वयं राजकारणाचे स्पष्टीकरण करू पाहतात, परंतु वर्तनवाद राजकारणाचे कोणतेही स्पष्टीकरण देत नाही. तो केवळ राजकारणाच्या अध्ययनाची एक चौकट पुरवतो, ज्याचा वापर करून राज्यशास्त्रज्ञ आपापले निष्कर्ष काढू शकतात.

**वर्तनवाद दृष्टिकोन विकास :**

ग्राहम वालासचे पुस्तक 'ह्युमन नेचर इन पॉलिटिक्स' तसेच आर्थर बेंटले 'द प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट' प्रकाशित झाले. त्या काळी या दोन पुस्तकांचे प्रकाशन राज्यशास्त्राच्या अध्ययन प्रणालीतील परिवर्तनाचे प्रतीक होते. राजकारणातील अनौपचारिक घटकावर अधिक भर व राज्याच्या राजकीय संस्थावर कमी भर देण्यात येऊ लागला. राज्यशास्त्राच्या अध्ययनात समाजशास्त्र, मानसशास्त्र यासारख्या सामाजिक शास्त्राच्या शाखांचा मोकळेपणाने आधार घेण्यात येऊ लागला.

वर्तनवादी दृष्टिकोन दुसऱ्या महायुद्धातील गुंतागुंतीच्या परिस्थितीची उपज आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी अनेक युरोपियन तज्ञांना भीतीपोटी अमेरिकेत आश्रय घ्यावा लागला. युद्धकालीन परिस्थितीने त्यांना अनुभववादी तसेच मूल्यनिरपेक्ष बनावे लागले. यातूनच वर्तनवादी क्रांतीचा जन्म झाला.

वर्तनवादाचा आधार अनुभववाद आहे. राज्यशास्त्रात अनुभववादाचा इतिहास फार जुना आहे. याचा आधुनिक जनक जॉन लॉकला मानले जाते. समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञांच्या प्रभावामुळे राज्यशास्त्रज्ञही वर्तनवादाकडे झुकलेले दिसतात. अमेरिकेत चार्ल्स मेरियमने (१८७४-१९५३) सर्वप्रथम वर्तनवादाचे समर्थन केले. मेरियमचे पुस्तक 'न्यू अस्पेक्टस ऑफ पॉलिटिक्स' (१९२५) या ग्रंथाने वर्तनवादी दृष्टिकोनाचा प्रथम संकेत दिला. मेरियमच्या नेतृत्वाखाली राजकीय तज्ज्ञांच्या समूहाने राज्यशास्त्राला समाजशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, सांख्यिकी, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र या विषयांच्या जवळ आणण्याचा प्रयत्न केला. राजकीय प्रक्रियेच्या अध्ययनात १९२५ पासून महत्त्वपूर्ण विकास झाला. यापैकी काहींचा उल्लेख येथे करता येऊ शकतो. या अध्ययनात गॉस्नेल, राइस, कॅथलिन, अलबर्ट गीज, बॉटुट, थर्स्टन तसेच फ्लॉरस यांचे लेखन उल्लेखनीय आहे. यांच्या लेखनामुळेच वर्तनवादी विचाराला चालना मिळाली. लासवेल (१९०२-१९७८) लिखित 'साइको पॅथोलॉजी अँण्ड पॉलिटिक्स' या पुस्तकातील मनोविश्लेषणाच्या दृष्टिकोनातून राजकीय व्यक्तिमत्वाचा अभ्यास एक निर्भीड तथा मौलिक आणि आपल्या पद्धतीने साहसपूर्ण कार्य आहे. लासवेलनेच १९३६ मध्ये 'कोणाला, काय आणि कसे प्राप्त होते असा अभ्यासविषय सांगितला म्हणून राजकारणाच्या विश्लेषणात निवडणुका आणि राजकीय पक्षांच्या अभ्यासावर भर दिला जाऊ लागला.

शिकागो विद्यापीठातील त्रिमूर्ती - टी. व्ही. स्मिथ, चार्ल्स मेरियम, हेराल्ड लासवेल यांना अभिनव राज्यशास्त्राचे संस्थापक म्हटले जाते. चार्ल्स मेरियम 'स्पेशल साइन्स रिसर्च काउन्सिल'चे पहिले चेअरमन होते, ज्यांनी न्यू आस्पेक्टस ऑफ पॉलिटिक्स' या पुस्तकातून राज्यशास्त्राला विज्ञानाधिष्ठीत बनविण्याची घोषणा केली. मेरियमच्या प्रेरणेने शिकागोतील अभ्यासक संप्रदाय वर्तनवादाचा बालेकिल्ला बनला. मेरियमच्या प्रेरणेनेच वर्णन आणि विश्लेषणाची सांख्यिकीय प्रयोगपद्धती वापण्यास सुरुवात केली. व्यक्ती व व्यक्तिसमूहाच्या राजकीय आचरणाचाही अभ्यास करण्यास सुरुवात झाली. मेरियमच्याच शब्दांत राजकीय व्यक्तिमत्त्वाच्या अध्ययनासंबंधी तथा. सामाजिक आणि राजकीय वर्तनावर निर्णयाची प्रक्रिया तसेच इतर घटकांच्या प्रभावाने राजकीय प्रक्रियेवर कसा प्रभाव पडतो, या संदर्भात ज्ञान मिळविण्यासाठी ही पद्धत उपयोगी पडते. मेरियमनंतर लासवेल, डेव्हिड इस्टन, आल्मंड, कोलमन, कार्ल डवाइश, एडवर्ड शिल्स इत्यादींनी वर्तनवादी अभ्यासाच्या विकासात मोलाची भर टाकली आहे. रॉबर्ट ए डाल आणि सिमूर एम. लिपसेट यांनी संशोधनासाठी 'सिद्धांत निर्मितीवर भर दिला.

राजकीय सिद्धांताची असमर्थता, आधुनिक जगासमोरील समस्यांच्या निराकरणाची अयशस्विता आणि बदलेल्या संदर्भांनी शास्त्रांसमोर निर्माण केलेली शास्त्रियतेची अट मुख्यत्वे करून वर्तनवादाच्या उगमाला कारणीभूत ठरली आहेत. सिद्धांतात घडून येणारे बदल ही एक अव्याहत प्रक्रिया आहे. निरंतर चालणाऱ्या संशोधनामुळे राजकीय सिद्धांतात बदल घडून येणे सहज शक्य आहे. कालौघात तसे बदलही घडून आले

आहेत. परंतु २० व्या शतकात राज्यशास्त्राचा नव्या अंगाने अभ्यास करण्यास सुरुवात झाली. त्यामुळे राजकीय सिद्धांतांना आधुनिक काळातील समस्यांशी एकरूप करण्याच्या प्रयत्नातून राजकीय सिद्धांतात जे बदल घडून आले. त्यालाच वर्तनवादी क्रांती किंवा वर्तनवादी सिद्धांत म्हटले गेले. याच काळात आधुनिक व्यवस्थेच्या अनुषंगाने नविन राजकीय सिद्धांताची मांडणी करण्याची स्पर्धा सुरू झाली. ही राजकीय सिद्धांतातील परिवर्तनाची क्रांती म्हणजे वर्तनवाद होय.

**वर्तनवादी दृष्टीकोनाच्या उदयाची कारणे :**

राजकीय विचाराच्या इतिहासात वर्तनवादाची सूत्रे काही प्रमाणात अस्ताव्यस्तपणे प्लेटो-ॲरिस्टॉटल, मॅकियाव्हेली, जॉन लॉक, मॉन्टेस्क्यू यांच्या विचारात मिळते; परंतु एक सिद्धांतरूपाने वर्तनवाद वर्तमान शतकाचीच देण आहे. मागील काही दशकांपासून विशेषत: दुसऱ्या महायुद्धानंतर शासन आणि राजकारणाच्या अध्ययनात वर्तनवादी अध्ययन पद्धतीला अधिक महत्त्व दिलेले आहे. ही अभ्यासपद्धती २० व्या शतकाची एक महत्त्वपूर्ण देण आहे. याला विकसित करण्याचे श्रेय अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांना (शिकागो आंदोलन) आहे. वर्तनवादाचा उदय आणि विकासाची अनेक कारणे आहेत. ती खालीलप्रमाणे आहेत.

**अ) परंपरागत अध्ययन पद्धतीच्या मर्यादा :**

२० व्या शतकाच्या प्रारंभी अनेक राज्यशास्त्राच्या अभ्यासकांची परंपरागत राज्यशास्त्राच्या अध्ययन पद्धतीने निराशा केली. परंपरागत राज्यशास्त्राच्या अध्ययन पद्धतीविषयी राज्यशास्त्रामध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. त्यांचे असे मत होते की, पारंपरिक राज्यशास्त्राच्या अभ्यासाने राजकीय जीवनाची वास्तविकता आपल्यासमोर येऊ शकत नाही.

१. राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी असा अनुभव घेतला की, शासनाच्या धोरण निर्मितीमध्ये राजकीय प्रतिनिधी, राजकीय नेते यांना सन्मानजनक स्थान दिले जात होते; परंतु राज्यशास्त्राचे तज्ञ, अभ्यासकाचे ज्ञान, कौशल्य व त्यांच्या अनुभवाची उपेक्षा करण्यात आली. ज्यामुळे यांच्यात निराशा उत्पन्न झाली.

२. राज्यशास्त्रज्ञांना या गोष्टीची पक्की खात्री झाली की, अध्ययनात ज्या सैद्धांतिक घटकावर भर दिला जात होता तो पुरेसा व विश्वसनीय नव्हता. सिद्धांत व वास्तव राजकारण यांच्यात अंतर मोठे होते. राजकीय समस्यांचे विश्लेषण करण्याची ताकद पारंपरिक राज्यशास्त्रात नव्हती.

३. दोन महायुद्धांच्या मधल्या काळात फॅसिझम, नाझिझम, सर्वकषवाद व समाजवादी शासनपद्धतीचा उदय, विकास व लोकप्रियतेच्या कारणांचा शोध घेण्याची ताकद पारंपारिक राज्यशास्त्राकडे नव्हती. या घटकाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे वास्तविकतेकडे पाठ फिरवण्यासारखे होते.

४. पारंपारिक राज्यशास्त्राची अभ्यासपद्धती वर्णनात्मक होती तसेच तत्त्वज्ञान, संस्था, औपचारिक घटक, कलह व ऐतिहासिक पद्धत या घटकाच्या बाहेर जाणारी नव्हती. राजकीय प्रक्रियेवर प्रभाव टाकणाऱ्या अनौपचारिक घटकांना यात स्थान नव्हते.

५. अन्य विषयांनी जसे समाजशास्त्र, मानसशास्त्र इत्यादींनी नवीन पद्धतीचा अवलंब केल्याने नवनवीन ज्ञानशाखा त्यांना उपलब्ध झाल्या, त्या प्रमाणात राज्यशास्त्र मागे राहिले.

६. दुसऱ्या महायुद्धापर्यंत फक्त युरोप, अमेरिका यांच्यापुरतेच राज्यशास्त्राच्या अभ्यासाचे स्वरूप होते; परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या नवस्वतंत्र राष्ट्रांचा राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी पारंपारिक राज्यशास्त्राकडे व्यवस्था नव्हती. येथील समस्यांचा अभ्यास करण्यासाठी यंत्रणा अपुरी होती. म्हणूनच राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा वाढविण्याची गरज होती, ती वर्तनवादी क्रांतीने शक्य झाली होती.

७. पारंपारिक राजकीय सिद्धांत राज्य आणि शासनसंस्था यापलिकडे जाऊन अभ्यास करायला तयार नाही. आधुनिक काळात मात्र राज्य व शासनसंस्थेच्या क्रिया प्रतिक्रियांवर इतर समाज घटकांचा प्रभाव दिसून येऊ लागला. त्यामुळे राजकारणाचे संदर्भ आणि प्रक्रिया बदलण्यास सुरुवात झाली. वर्तनवाद्यांनी याच आधारावर राजकारणावर प्रभाव पाडणाऱ्या अंतर्गत व बाह्य घटकांच्या अभ्यासाचा आग्रह धरल्याचे आपणास दिसून येते.

**ब) इतर सामाजिक शास्त्रांची प्रेरणा :** इतर सामाजिक शास्त्रांनी अभ्यासाच्या नवीन मार्गांचा अवलंब केला. समाजशास्त्रज्ञ अगस्त कॉम्त यांनी प्रत्यक्षार्थवाद मांडला, तेव्हा राज्यशास्त्रही यापासून कसे मागे राहू शकेल? म्हणून रॉबर्ट डाल म्हणतो, वर्तनवाद एक असे आंदोलन आहे ज्याचा उद्देश राजकीय अभ्यासाला अधिक प्रगत बनविण्यासाठी मानसशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्रातील विकसित सिद्धांत, पद्धती, संशोधन आणि दृष्टिकोन यांच्या संपर्कात आणणे हा उद्देश आहे.

**क) दुसऱ्या महायुद्धाचा परिणाम :** दुसऱ्या महायुद्धाने वर्तनवादाला गती प्राप्त झाली. युद्धकालीन घटनांनी राज्यशास्त्रज्ञांच्या मनाची जी खात्री झाली की राजकीय जीवनाची गुंतागुंत समजून घेण्यासाठी संस्था आणि तिची संरचना या अभ्यासक्रमाबाहेर येऊन संस्था आणि त्याअंतर्गत काम करणाऱ्या व्यक्तीच्या वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे.

**अभ्यास पद्धतीने नवनवीन प्रयोग :** दुसऱ्या महायुद्धानंतरच्या दशकात राज्यशास्त्रांतर्गत नवीन अभ्यास पद्धतीच्यानिर्मितीवर जोर देण्यात आला. परीक्षण, प्रयोगपद्धती, संशोधन साहित्य, सर्वेक्षण पद्धती, सांखिकीय विश्लेषण, गणितीय प्रारूप, सर्वेक्षण यासारख्या माध्यमांचा अवलंब करून राजकीय वर्तनाच्या अध्ययनाला वस्तुनिष्ठ बनविले पाहिजे. अशा पद्धतीने नवीन अभ्यास पद्धतीचे समर्थन करण्यात आले.

### ३.२.१.२ वर्तनवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

डेव्हिड इस्टनने त्याच्या "The Political System : An Enquiry into the state of Political Science" या ग्रंथात वर्तनवादाची काही वेशिष्ट्ये सांगितली आहेत. त्यांनी त्याला बौद्धिक आधारशीला असे नाव दिले. या आधारावरच समस्त वर्तनवादाची इमारत उभी करता येऊ शकते. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१. नियमितता किंवा सात्यतता :**

वर्तनवादी मानतात की वर्तनवादाच्या सहाय्याने सामान्य सिद्धांताचा शोध घेता येऊ शकतो. राजकीय प्रक्रियेत काही अशा प्रवृत्ती असतात त्या त्या वारंवार घडतात. या आधारावर काही निष्कर्ष काढता येऊ शकतात. या संदर्भात काही भविष्यवाणी करता येणे. या कोणत्याही शास्त्राच्या मुख्य कसोट्या असतात. मतदार-वर्तनाच्या अभ्यासावरून असे आढळते की, मतदारांचा सामाजिक, आर्थिक, दर्जा, व्यावसायिक-जातीय प्रतिष्ठा वगेरे गोष्टींच्या आधारे एक आकृतीबंध तयार होतो. त्या आधारे अभ्यासक मतदारवर्तनाचे स्पष्टीकरण व भाकीत कथन करू शकतो.

**२. पडताळा :**

वर्तनवादी असे समजतात की, मानवीय वर्तनाच्या संदर्भातील उपलब्ध ज्ञान अनुभववादी घटकाच्या आधारावर त्याची पडताळणी करता येते. मुळात पडताळा हा वैज्ञानिकतेचा आधार आहे. संशोधनाच्या संदर्भात करावयाच्या सर्व विधानांना अनुभवसिद्ध पुराव्यांचे आधार असलेच पाहिजेत. ज्ञान, नियम, सिद्धांत याची वैधता निरीक्षणक्षम प्रयोगानी सिद्ध झाली पाहिजे.

**३. तंत्रे :**

वर्तनवादी संशोधन सामग्रीचा संग्रह करते आणि त्याची व्याख्या करण्यासाठी अध्ययन तंत्राचा वापर अधिक फायदेशीर ठरतो. नैसर्गिक शास्त्रांमध्ये प्रचलित असलेल्या अध्ययनतंत्रांचा अवलंब करून राज्यशास्त्रीय तथ्यांचे संकलन व विश्लेषण केले पाहिजे. काटेकोर अशा गणितीय पद्धतीने प्रस्थापित केलेली मांडणी निश्चितच वादातीत व अधिक विश्वसनीय असते. त्याचप्रमाणे तौलनिक अध्ययनाच्या दृष्टीने ती अधिक उपयुक्त ठरू शकेल. यादृष्टीने सर्वेक्षण पद्धती, आशय विश्लेषण, नमुना पद्धत अशी तंत्रे वर्तनवादी अभ्यासकांनी हाताळली आहेत.

**४. परिमाणीकरण :**

वर्तनवाद्यांच्या मते, उपलब्ध साधनसामग्री व तथ्यामध्ये स्पष्टता व निश्चितता आणण्यासाठी परिमापन व परिमाणीकरण केले पाहिजे. म्हणजेच मोजमाप करण्याचा काटेकोर मार्ग म्हणून संख्याशास्त्रीय परिमापनाचा अवलंब वर्तनवादी अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणावर केला. संख्यांच्या स्वरूपात शास्त्रीय घटिते मांडल्यामुळे त्यांच्या प्रतिपादनात नेमकेपणा येतो.

**५. मूल्य निरपेक्षता :**

वर्तनवादी अभ्यासकांनी नैतिक मूल्यांकन व तथ्यात्मक व्याख्या यात अंतर केलेले आहे. मूल्य व तथ्य यांना वेगळे ठेवले पाहिजे. लोकशाही, स्वातंत्र्य, समता यांसारखी मूल्ये कितीही उत्तम असली तरी त्यांचा खरे-खोटेपणा वा बरे-वाईटपणा शास्त्रीय कसोट्यांवर सिद्ध होणारा नसल्यामुळे त्यांच्याविषयी वस्तुनिष्ठ संशोधन केलेच जाऊ शकत नाही. संशोधनकार्य करीत असताना संशोधकाने स्वत:ची मूल्यांकन बांधिलकी व अग्रक्रम दूर ठेवावेत.

### ६. क्रमबद्धतीकरण :

वर्तनवादी अभ्यासक असे म्हणतात की संशोधन क्रमबद्ध असले पाहिजे. तथ्य संकलन – विश्लेषण – स्पष्टीकरण – भाकीत कथन अशा पायऱ्या-पायऱ्यांनी पद्धतशीरपणे संशोधन केले जावे. संशोधनाला सिद्धांताची जोड मिळायलाच हवी. त्याखेरीज संशोधन अर्थपूर्ण होणार नाही. मात्र वर्तनवादी दृष्टिकोनातील या सिद्धांताचे स्वरूप अभिजात परंपरेतील चिंतनपर सिद्धांतापेक्षा मूलत: निराळे असते. या सिद्धांताचे स्वरूप कार्यकारणात्मक स्वरूपाचे असते. 'नीट मांडलेल्या व तर्काने परस्परांशी जोडल्या गेलेल्या अशा संकल्पनांच्या आधारे उभी केलेली प्रमेये' असे त्यांचे स्वरूप असते. पुन्हा पुन्हा चाचण्या करून अंतिम सिद्धांत मांडता येतात. सर्वसाधारण – सार्वत्रिक सिद्धांत निर्माण करता यावेत हा वर्तनवादी दृष्टिकोनाचा हेतू असला पाहिजे.

### ७. शुद्ध शास्त्र :

वर्तनवादी शुद्ध शास्त्र या दृष्टीने विचार करतात. ते या गोष्टीशी सहमत आहेत की सिद्धांताच्या साह्याने वास्तविक जीवनाच्या समस्यांना समजून घेता येते. इस्टन यांनी विशुद्ध शास्त्र या दृष्टिकोनातूनच संशोधनाची मांडणी केली आहे. या संशोधनाचा उपयोग सामाजिक-राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी झालाच पाहिजे, असा आग्रह त्यांनी धरलेला होता.

### ८. आंतरविद्याशाखीय अभ्यास :

राजकीय संशोधन ठोस व परिपक्व व्हायचे असेल तर अन्य सामाजिक शास्त्रांचा जास्तीत जास्त उपयोग राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी करून घ्यावा. माणूस हा एकाच वेळी सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक घटकांनी प्रभावित असतो. तेव्हा स्वतंत्रपणे अभ्यास करून निष्कर्ष काढण्यापेक्षा यांचा एकत्रित अभ्यास करून निष्कर्ष काढले तर ते अधिक वस्तुनिष्ठ स्वरूपाचे असू शकतात. थोडक्यात, मानवी वर्तनाचा अभ्यास विभागून करता येत नाही. तेव्हा आंतरविद्याशाखीय अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

## ३.२.१.३ वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन :

पारंपरिक दृष्टिकोन केवळ पुस्तकी व चिंतनावर आधारित होता. केवळ मोठ्या प्रश्नांचा व नैतिक मूल्यांचाच त्यात विचार होई. समाजाच्या दैनंदिन राजकीय जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या लहान गोष्टींकडे त्यात दुर्लक्ष केले जाई. यावर टीका करून अभ्यास विषयाला शास्त्रीय स्वरूप देण्याचा खटाटोप त्यांनी केला; पण प्रत्यक्षात पद्धती शास्त्राची गुंतागुंत, अवास्तव तथ्याला महत्त्व यामुळे वर्तनवादी दृष्टीकोन टीकेचा विषय ठरला.

२० व्या शतकामध्ये राजकीय सिद्धांतात वर्तनवादाने एक आमुलाग्र बदल घडवून आणला व राजकीय सिद्धांतात एका नव्या क्रांतीचा जन्म झाला. पारंपारिक राजकीय सिद्धांत हे पारंपारिक शासन व्यवस्थेचा अभ्यास करणारे शास्त्र होते. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांसमोरील प्रश्न व समस्या सोडविण्यामध्ये पारंपारिक राजकीय सिद्धांत अयशस्वी ठरले. त्यामुळे अशा स्वतंत्र राष्ट्राच्या पुनर्बांधणीसाठी राजकीय सिद्धांतात संशोधन होऊ लागले. त्यामुळे पारंपारिक राजकीय सिद्धांतात निर्माण झालेल्या काही त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न वर्तनवादात केला गेला. राजकीय सिद्धांतातील संशोधन पद्धती, त्यातील आशय-विश्लेषण अशा प्रकारची

विविध नवीन तंत्रे वर्तनवादात नव्याने उपयोगात आणली गेली व त्यानुसार आधुनिक काळातील परिस्थिती लक्षात घेऊन राजकीय सिद्धांताची मांडणी करण्यात आली आहे. हे जरी सत्य असले तरी वर्तनवादी क्रांतीवर काही शास्त्रज्ञांनी टीका केल्याचे दिसून येते. या टीका शास्त्रज्ञांनी खालील मुद्यांच्या आधारे वर्तनवादावर केल्या आहेत.

**१. भाषिक क्लिष्टता :**

टीकाकारांच्या मते, वर्तनवादी लेखन साहित्यिक दृष्टीने अयोग्य आहे. क्लिष्ट लिखाण, अपरिचित शब्दरचना व नवीन पद्धतीचे स्तोम यामुळे वर्तनवाद्यांचे लेखन भरकटलेले दिसते.

**२. शास्त्रीयीकरणाचा अभाव :**

पद्धतीशास्त्र कितीही विकसित केले तरी राज्यशास्त्राचे मूळ स्वरूपच असे आहे की, नैसर्गिक शास्त्राच्या अर्थाने शास्त्रीय प्रतिष्ठा त्याला लाभूच शकत नाही. मानवी वर्तन हा विषय उंदीर वा वनस्पती यांच्याप्रमाणे तटस्थपणे अभ्यासलाच जाऊ शकत नाही. नियंत्रित परिस्थितीत प्रयोग करणे सामाजिक शास्त्रांना अशक्य असते. राज्यव्यवस्था व राजकीय प्रक्रिया यांचे स्वरूप सतत बदलत असते. व्यक्तीच्या राजकीय वर्तनाला असंख्य घटक प्रभावित करतात, त्याचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास अशक्यच असतो.

**३. राजकीय वर्तनाची कल्पना अपुरी :**

वर्तनवादी म्हणतात की, राज्यशास्त्रात संस्थात्मक अभ्यासाऐवजी राजकीय वर्तनाचा अभ्यास केला पाहिजे; परंतु वर्तनवादी मानवी वर्तनाचे विज्ञान प्रस्तुत करण्यात असमर्थ ठरले आहेत; कारण वर्तनवादी नियमिततेवर अत्यधिक भर देतात. नैसर्गिक शास्त्राप्रमाणे मानवी वर्तनाचे काटेकोर निष्कर्ष अशक्य असतात.

**४. दुय्यम प्रश्नांना प्राधान्य :**

पारंपारिक राजकीय सिद्धांतामध्ये ज्या प्रमाणे शासन संस्थाचा अभ्यास करून त्या व्यवस्थेसमोर निर्माण होणाऱ्या समस्येच्या निराकरणासाठी राजकीय सिद्धांताची निर्मिती केली जात असे. अर्थातच पारंपारिक राजकीय सिद्धांतात राजकीय व्यवस्था परिवर्तनावर भर देण्यात येत होता. तसेच पारंपारिक राजकीय सिद्धांतात मुख्य समस्येवर अधिक लक्ष देण्यात येत असे व त्या समस्येला केंद्रबिंदू मानून त्या समस्येच्या निराकरणासाठी राजकीय सिद्धांताची निर्मिती केली जात असे. वर्तनवादात अशा समस्येला प्रभावीत करणाऱ्या घटकांचा विचार करण्यात आला. त्यामुळे मुख्य समस्येकडून दुर्लक्ष होऊन वर्तनवाद आपल्या कार्यात अयशस्वी ठरला.

**५. पद्धती शास्त्राचाअतिरेक :**

राज्यशास्त्र हा सामाजिक शास्त्राचा घटक आहे, नैसर्गिक शास्त्राचा नाही. वर्तनवाद्यांनी राज्यशास्त्राला विशुद्ध शास्त्र बनविण्याचा प्रयत्न केला. यात राज्यशास्त्राचे स्वरूपच वर्तनवादी विसरले. प्रयोगशाळेत राज्यशास्त्राचे संशोधन करता येत नाही. काटेकोर व प्रयोगपद्धतीला इथे मर्यादा येतात.राजकीय सिद्धांतात अधिक शास्त्रीयता प्राप्त करण्यासाठी अनेक पद्धती शास्त्राचा वापर वर्तनवादात केला गेला. परंतु त्याचा उपयोग राजकीय सिद्धांतामध्ये पाहिजे, त्या प्रमाणात होऊ शकला नाही. कारण नैसर्गिक शास्त्रातील तंत्र व पद्धती राजकीय

सिद्धांतात उपयोगात आणणे कधीही शक्य होत नाही. पण तरीही राजकीय सिद्धांतातील निष्कर्ष हे काटेकोर असावे. त्या निष्कर्षाची पडताळणी करता यावी. यासाठी संख्याशास्त्राचा आशय विश्लेणाचा उपयोग करण्यात आला. परंतु राजकीय सिद्धांतात अशा तंत्र व पद्धतीचा वापर होऊ शकत नाही. त्यामुळे वर्तनवादात राजकीय सिद्धांत आशयाचा बळी ठरला अशी टीका केली जाते.

**६. मूल्यनिरपेक्षतेचा अभाव :**

वर्तनवादी मूल्यनिरपेक्ष संशोधनावर जास्त भर देतात; परंतु हे अशक्य आहे. संशोधनकर्त्याचे व्यक्तिगत मूल्य संशोधन निष्कर्षाला प्रभावित करत असतात. राज्यशास्त्र मूल्यनिरपेक्ष राहूच शकत नाही.

**७. लोकशाही मूल्य व्यवस्थेचा विरोध :**

लोकशाही व्यवस्थेचा मुख्य आधार सामान्य जनतेच्या विवेकशीलतेचा विश्वास आहे. ज्यामुळे व्यक्तीला राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याचा समान अधिकार प्राप्त होतो. वर्तनवाद्यांच्या अभ्यासानुसार विवेकशीलता, संघटन, क्षमता इत्यादी राजकीय घटकांचेवितरण समान न झाल्यामुळे अल्पसंख्य वर्गाचे शासन अनिवार्य बनते. लोकशाहीचा आधार मूल्य आहे; परंतु वर्तनवादी मूल्यव्यवस्थाच नाकारतात.

**८. खर्चिक पद्धत :**

वर्तनवादाची संशोधन पद्धत अतिशय खर्चिक आहे. अमेरिकेत वर्तनवादी अध्ययनाच्या नावावर करोडो डॉलर खर्च केला गेला.परंतु पाहिजे तसे निष्कर्ष निघत नाहीत. विशेष म्हणजे विकसनशील देशांत वर्तनवादी पद्धतींचा अवलंब करून संशोधन करणे हे अतिशय खर्चिक असल्यामुळे राज्यशास्त्रातील संशोधन विकासाला मर्यादा येतात. त्याच बरोबर विकसित देशांत वर्तनवादी पद्धती नुसार संशोधन करूनही पाहिजे तसे निष्कर्ष प्राप्त करता येत नाहीत.

**९. इतर अभ्यास पद्धतीचे महत्त्व नाकारणे :**

वर्तनवाद्यांनी अन्य अभ्यास पद्धतींचे महत्त्व नाकारलेले आहे; परंतु वर्तनवादी अभ्यासपद्धतही एकमेव नाही.अभ्यास पद्धत अनेक राज्यशास्त्रीय अभ्यास पद्धतींचा उपयोग करून राज्यशास्त्र संशोधकांनासमस्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करून निष्कर्ष काढणे आवश्यक असते. अनेक मार्गाने अभ्यास करावा लागतो.

**१०. उत्तरदायित्वाचा अभाव :**

संशोधन प्रत्यक्ष व्यवहारात उपयुक्त असलेच पाहिजे असा आग्रह न धरल्यामुळे अभ्यासकांना सामाजिक उत्तरदायित्व उरलेच नाही.

यापैकी बहुतेक आक्षेप वर्तनवादी अभ्यासक मान्य करतात. त्यांचे म्हणणे एवढेच असते की संशोधनतंत्रे अपुरी व अविकसित असल्यामुळे वरील दोष उद्‌भवतात. तंत्रे अधिक कार्यक्षम करून ते टाळता येतील; पण वर्तनवाद प्राथमिक अवस्थेत किंवा बाल्यावस्थेत असण्यातून या उणीवा निर्माण झाल्या हे मान्य करता येत नाही. वर्तनवादाचे ते अंगभूत दोष आहेत, हेच अधिक पटते.

**सारांश :**

पारंपारिक व वर्तनवाद यातून राज्यशास्त्र अधिक विकसित होते.वर्तनवादी क्रांतीमुळेच आज राज्यशास्त्राला 'आधुनिक राज्यशास्त्र' नावाने ओळखले जाते. मागील चार दशकांपासून राज्यशास्त्राची व्याप्ती व स्वरूप यात अभूतपूर्व वृद्धी झालेली आहे. वर्तनवादाच्या निर्मितीमुळेच संस्थांच्या औपचारिक अध्ययनाला आव्हान दिले गेले. राज्यशास्त्रातील बहुतांश अभ्यासकांनी तथ्यांचे महत्त्व स्वीकारले आहे. निवडणूक अभ्यास क्षेत्र विशेषकरून मतदाता व्यक्तीचे वर्तन या संदर्भातील अभ्यासाचे नवीन क्षेत्र उपलब्ध करून दिले. वर्तनवादाने अभ्यासाच्या नवीन पद्धती विकसित केल्या. उदाहरणार्थ तथ्य संकलन, क्रमबद्धता, विश्लेषण पद्धती, प्रश्नावली, तक्ते, गणितीय पद्धत आणि सांख्यिकीय सारणी, संगणकाचा वापर करून वर्तनवादाने राजकीय संशोधनाचे नवीन क्षेत्र निर्माण केले आहे. या अभ्यासाच्या प्रभावामुळेच पारंपारिक राज्यशास्त्राचे क्षेत्र विस्तारले. थोडक्यात, सूक्ष्म अभ्यासाची सुरुवात झाली. वर्तनवादाच्या तथ्यपूर्ण निष्कर्षांनी राज्यशास्त्राला सामाजिक अभियांत्रिकीचे एक माध्यम बनवले.

डेव्हिड इस्टनच्या मते, ''वर्तनवादी दृष्टिकोन संपूर्ण सामाजिक शास्त्रामध्ये विश्लेषणात्मक व व्याख्यात्मक सिद्धांताचे सूचक आहे.''

थोडक्यात राज्यशास्त्रातील वर्तनवादाचे योगदान खालीलप्रमाणे स्पष्ट करता येते –

१. वर्तनवादी क्रांतीने राज्यशास्त्राचे लक्ष्य, स्वरूप, विषयाची व्याप्ती, अभ्यास पद्धती यात महत्त्वपूर्ण बदल घडवून आणले.

२. वर्तनवादाने राज्यशास्त्राला शास्त्रीय आधार मिळवून दिला.

३. वर्तनवादाने राज्यशास्त्रामध्ये सुधारणाच केलेल्या नाहीत तर त्याचे स्वरूपच बदलून टाकलेले आहे. राज्यशास्त्राला नवी मुल्ये, नवी भाषा, नवी अभ्यासपद्धती तथा नवीन दिशा प्रदान केलेली आहे.

४. वर्तनवादाने राज्यशास्त्राच्या अभ्यासाच्या कक्षा व्यापक बनविल्या. औपचारिक घटकाबरोबरच राजकीय प्रक्रियेला प्रभावित करणाऱ्या अनौपचारिक घटकावरही लक्ष केंद्रित केले. .

५. आतापर्यंत राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी मूल्य तथा आदर्शांनाच महत्त्व दिले होते; परंतु वर्तनवादाने राज्यशास्त्राला वास्तवतेचा आधार मिळवून दिला.

६. वर्तनवादाने आपल्या शास्त्रीय अनुभववादाच्या माध्यमातून नवीन दृष्टिकोन व अभ्यासाच्या नवीन पद्धती विकसित केल्या.

निष्कर्षत: रूपाने असे म्हणता येईल की, वर्तनवादाची प्रमुख लक्षणे, शास्त्रीय पद्धत, अनुभववादी दृष्टिकोन व मूल्यनिरपेक्षवाद राज्यशास्त्राच्या अभ्यासकांनी आत्मसात केलेले आहेत. आधुनिक राज्यशास्त्राच्या निर्मितीत वर्तनवादाची भूमिका उल्लेखनीय आहे. वर्तनवादाच्या अभ्यासाने राज्यशास्त्राच्या कक्षा व्यापक बनल्या, राजकीय प्रक्रिया, राजकीय समस्या, याची मांडणी करून त्या सोडविण्यासंदर्भात मार्ग शोधण्यावर भर दिला गेला.

वर्तनवाद हा शासन आणि राजकारण यांचा व्यक्ती आणि गटांच्या राजकीय वर्तनाच्या संदर्भात शास्त्रशुद्धरित्या अभ्यास करणारा एक महत्त्वपूर्ण दृष्टिकोन मानला जातो. हा दृष्टिकोन व्यक्ती, गट, संस्था आणि संघटनांच्या औपचारिक भूमिकांवर भर देण्यापेक्षा व्यक्ती आणि गटांच्या प्रत्यक्ष वर्तनावर अधिक भर देतो. वर्तनवादाच्या स्वरूप आणि व्याप्तीविषयी अभ्यासकांमध्ये एकमत दिसून येत नाही. तथापि, वर्तनवादी अभ्यासक हे आपल्या अभ्यास आणि संशोधनामध्ये अधिक पद्धतशीरपणा, तसेच नेमकेपणा आणण्याचा प्रयत्न करतात. ते पद्धतशीरपणे मिळविलेल्या माहितीचे मोजमाप करतात, व्यक्ती आणि गटांच्या राजकीय वर्तनात असलेला सारखेपणा आणि नियमितपणा शोधून काढतात, त्यासाठी वस्तुनिष्ठ गृहीतके निर्माण करून ती संशोधनक्षेत्रात तपासून पाहतात. तत्त्व आणि व्यवहारात असलेला निश्चित संबंध ते शोधून काढतात. प्रत्यक्ष वर्तन आणि वस्तुस्थिती यांचा सिद्धान्ताशी मेळ घालणे हे वर्तनवाद्यांच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. मानवी वर्तनाविषयीची माहिती आणि ज्ञान एकत्रित करून त्यांचा सामाजिक, राजकीय आणि आर्थिक अंगांशी असलेला संबंध शोधणे हेही वर्तनवाद्यांचे एक उद्दिष्ट असते.

### ३.२.२ उत्तर–वर्तनवादी दृष्टिकोन (Post-Behavioural Approach) :

''वर्तनवादी क्रांतीने आम्ही आमच्या विश्लेषणाला न्याय देऊ शकली नाही, म्हणून आम्हाला उत्तर–वर्तनवादी बनले पाहिजे.'' – डेव्हिड इस्टन.

१९६० च्या दशकाची समाप्तीपूर्वीच डेविड इस्टनद्वारे जे स्वत: वर्तनवादी क्रांतीच्या प्रमुख समर्थकापैकी एक आहेत. त्यांनी वर्तनवादी दृष्टिकोनावर जोरदार हल्ला चढवला ते प्रथम वर्तनवादी जे आता उत्तर–वर्तनवादी बनले. इस्टनच्या म्हणण्यानुसार राजकारणाच्या आकलनास कठोर शास्त्रीय संशोधनपद्धतीच्या साच्यात परिबद्ध करण्याचा प्रयत्न केला जात होता, त्यास नवी दिशा देण्यासाठी इस्टनने 'उत्तर–वर्तनवादी क्रांती'चा उद्घोष केला.

### ३.२.२.१ उत्तर– वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ :

वर्तनवादी क्रांतीच्या अभ्यासकांनी आपल्या अभ्यास संशोधनात मूल्यनिरपेक्ष अभ्यासावर भर दिला होता. संशोधन साधनापेक्षाही अध्ययनतंत्रे महत्त्वाची मानली. यामुळे राजकीय विश्लेषणाला शास्त्रीयतेचा स्तर प्राप्त झाला; परंतु त्यांच्या निष्कर्षात समर्पकता व वैद्य–शाश्वततेचा अभाव राहिला. उत्तर–वर्तनवादी राजकीय विश्लेषणात मूल्यांना समाविष्ट करून राजकीय विश्लेषणाला अधिक परिपूर्ण व प्रासंगिक बनविण्यासाठी प्रयत्नशील होते. अशा पद्धतीने उत्तर–वर्तनवाद एक सुधारणावादी प्रवाह म्हणून पुढे आला. कारण याने राजकीय प्रक्रियेच्या अभ्यासाचा नवीन समन्वयात्मक दृष्टिकोन प्रस्तुत केले, ज्यात तथ्य व मूल्य या दोन्हीचा एकत्रित वापर करून परिस्थितीनुरूप वापराला महत्त्व दिले.

डेव्हिड इस्टनने असे मत प्रदर्शन केले की, सहाव्या व सातव्या दशकात बहुतांश वेळ अनावश्यक संशोधनात खर्च केला गेला. राज्यशास्त्रज्ञ आपापल्या विद्यापीठाच्या वातानुकुलित मनोऱ्यात बसून सर्वसाधारणत: वेगवेगळ्या प्रकारची प्रतिमाने संकल्पनात्मक चौकटीतील प्रारुपे आणि अधिसिद्धांत निर्माण करण्यात व्यस्त होते. त्यांनी फार कमी क्षेत्रकार्याकडे लक्ष दिले. बाहेरील वास्तविक जगाशी फार कमी संबंध आला त्यामुळे

सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक उलथापालथी विषयी  त्यांचा संबंध आला नाही. तत्कालीन समाजात निर्माण झालेल्या समस्यांची पूर्वकल्पना देण्यात वर्तनवादी कमी पडले. उत्तर वर्तनवाद्यांनी असे मत प्रदर्शित केले असल्याचे आढळते. त्यांच्या मते, जे संशोधन सामाजिक समस्यांशी कोणत्याच अर्थाने संबंधित नाही त्याचा उपयोग काय?

उत्तर-वर्तनवादाने वर्तनवादावर अवश्य टीका केली; परंतु त्याने परंपरावादास पुन्हा प्रस्थापित करण्याचे समर्थन केले नाही. त्याने वर्तनवादाचे योगदान मान्य करत राज्यशास्त्राच्या नव्या क्षितिजाचा संकेत दिला. हे न केवळ प्रतिक्रियेचे सूचक होते, न केवळ सुधारणेची मागणी होती. उत्तर-वर्तनवाद्याने कोणत्याही विशिष्ट विचारप्रणालीचा पुरस्कारही केला नाही. त्यांच्या प्रमुख दोन मागण्या होत्या. त्या म्हणजे समर्पकता आणि कृती या होत.

उत्तर-वर्तनवाद, वर्तनवादाची पुढची पायरी आहे. वर्तनवादात ज्या उणिवा राहिलेल्या आहेत त्या पूर्ण करण्यासाठी उत्तर-वर्तनवादाचा जन्म झाला. एक सुधारणावादी आंदोलन तथा नवीन दिशेचा संकेत आहे.वर्तनवादी दृष्टिकोनाच्या जमेच्या बाजू मान्य करून पुढे राज्यशास्त्राचे संशोधन अधिक प्रस्तुत व उपयुक्त कसे करता येईल असा भविष्यलक्षी विचार उत्तर-वर्तनवादी विचारवंत करीत होते, डेव्हिड इस्टन हा त्याचा प्रमुख प्रवक्ता होता. त्यांच्या मते, हे जे आत्मपरीक्षण वर्तनवादोत्तर प्रवाहाने केले ते राज्यशास्त्राच्या व्याप्तीत व उद्दिष्टात क्रांती घडवून आणणारे ठरले. ज्यांनी एकत्र येऊन जे केले त्यांच्यात कट्टर डाव्या विचारप्रणालीपासून थेट उजव्या विचारप्रणालीचे अभ्यासक होते.

**उत्तर- वर्तनवादी क्रांती होण्यासाठी जबाबदार कारणे :**

उत्तर वर्तनवादी क्रांतीचा जन्म वर्तनवादातील रूढीवाद, जडता आणि दिशाहीनतेच्या कारणातून झालेला आहे. डेव्हिड इस्टन १९६९ मध्ये ६५ व्या अमेरिकन पॉलिटिकल सायन्स असोसिएशनच्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले की, वर्तनवादी क्रांतीने आम्ही आपल्या विश्लेषणाला समर्पकता देऊ शकलो नाही. आपण गोळा केलेले ज्ञान कशासाठी आहे? आपले संशोधन कार्य कितपत प्रस्तुत आहे? आपला दृष्टिकोन परिपूर्ण आहे काय? विद्वानांचे सामाजिक उत्तरदायित्व कोणत्या प्रकारचे आहे? असे प्रश्न अभ्यासकांना नंतरच्या दशकात भेडसावू लागले होते. वरील प्रश्नांना पूरक असे संशोधन करणे गरजेचे होते. वर्तनवादाच्या मर्यादा स्पष्ट झाल्याने त्यात सुधारणा करणे गरजेचे होते. यामुळेच डेव्हिड इस्टनने उत्तर-वर्तनवादी क्रांतीची घोषणा केली. उत्तर-वर्तनवादी क्रांतीच्या उदयाची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१. ही वर्तनवादाच्या विरुद्ध एक प्रतिक्रिया आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर वर्तनवादाच्या माध्यमातून राज्यशास्त्राला आधुनिक सैद्धांतिक व शास्त्रीय रूप देण्याचा प्रयत्न करण्यात आला; परंतु ही परिपूर्ण अभ्यास पद्धत नाही. स्वत: वर्तनवादी अभ्यासकही नाराज होते.

२. नैसर्गिक शास्त्राची अभ्यास पद्धत व सामाजिक शास्त्रे याच्या अभ्यासपद्धतीत मूलभूत फरक आहे. सामाजिक शास्त्राला नैसर्गिक शास्त्राची अभ्यास पद्धत लागू करणे घातक आहे. कारण समाज व व्यक्तीचे

स्वरूप परिवर्तनशील असते. तेव्हा त्याचे अध्ययन नैसर्गिक शास्त्रासारखे संभव नाही. वर्तनवादाद्वारे केलेले विभाजन कृत्रिम आहे. व्यक्तीच्या आकांक्षा, विश्वास, भावना याचे विश्लेषण शास्त्रीय पद्धतीने करणे अशक्य असते.

३. उत्तर-वर्तनवादी वर्तनवाद्यांच्या संशोधनाप्रती असंतुष्ट होते. वर्तनवाद्यांनी संशोधनात तथ्य-मूल्य विवादालाच जास्तीचे प्राधान्य दिले. वर्तनवाद्यांनी मूल्याला शास्त्रीय अभ्यासाची दुर्बलता मानली व तथ्याला प्राधान्य दिले. तथ्यात्मक स्वरूपाचे अध्ययन वास्तविक अध्ययन समजले; परंतु उत्तर-वर्तनवाद्यांनी तथ्य आणि मूल्य या दोन्हींनाही व्यक्तीच्या संदर्भात सप्रमाण मानून या दोन्हीत कृत्रिम भेद करणे अयोग्य मानले.

४. वर्तनवादी क्रांतीबरोबरच समाज तथा राजकीय व्यवस्थेला जागतिक संकटे व समस्यांनी घेरले. अंतर्गत अशांतता, यादवी, राजकीय अस्थिरता, आण्विक युद्धाचे भय, वांशिक संघर्ष, व्हिएतनामचे अघोषित युद्ध, लोकसंख्या विस्फोट इत्यादी संकटांनी राजकीय व्यवस्थेसमोर मोठेच आव्हान निर्माण केले होते. यासंदर्भातचे विश्लेषण करण्यात वर्तनवादी अपयशी ठरले होते. यातूनच उत्तर-वर्तनवादी क्रांतीची निर्मिती झाली.

### ३.२.२.२ उत्तर- वर्तनवादी दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये :

डेव्हिड इस्टनने उत्तर-वर्तनवादाची दोन प्रमुख लक्षणे सांगितली. १) संशोधनाची समर्पकता किंवा प्रासंगिकता आणि २) कार्यनिष्ठता किंवा कार्य या तत्त्वांनुसार उत्तर-वर्तनवादी संशोधन कार्याला गती देतील. डेव्हिड इस्टनने उत्तर- वर्तनवादाची ७ लक्षणे सांगितली आहेत.

**१. प्रथम उपयोगिता त्यानंतर तंत्र :**

संशोधन तंत्रापेक्षा संशोधनाचा हेतू अधिक महत्त्वाचा असतो. समाजापुढील तातडीच्या प्रश्नांच्या संदर्भात राज्यशास्त्रीय संशोधन हे अर्थपूर्ण व प्रस्तुत असायला पाहिजे तसे ते नसल्यास अशा संशोधनाचा उपयोग काय? संशोधन जर प्रस्तुत असेल तर ते काटेकोर नसले तरी चालेल.

राजकीय संशोधनात तंत्राला इतके महत्त्व नाही जितके मूलतत्त्वांना, मूल्यांना आहे अर्थात जर तांत्रिकदृष्ट्या एखादे संशोधन उच्च कोटीचे असेल, मात्र समकालीन समस्यांची उकल करण्यास असमर्थ असेल तर त्यापासून अलिप्त राहणेच योग्य ठरते.

**२. सामाजिक परिवर्तन व समाजोन्मुखता :**

राजकीय वास्तवाच्या वर्णन-विश्लेषणातच व्यस्त राहिल्यामुळे वर्तनवादी दृष्टिकोन स्थितीवादी व परिवर्तनवादी ठरला आहे. व्यापक सामाजिक संदर्भ लक्षात न घेता त्यात तथ्य संकलन केले गेले. त्यामुळे तो सामाजिक पुराणमतवादाने ग्रस्त झाला आहे. तथ्यांना विस्तृत सामाजिक संदर्भांशी जोडून पाहिले पाहिजे.

**३. राजकीय वास्तवाचा सामना :**

वर्तनवादाने अमूर्तीकरण आणि विश्लेषणावर लक्ष केंद्रित करत राज्यशास्त्राच्या कटू वास्तवाकडे पाठ फिरविली असल्याचा निष्कर्ष इस्टनने काढला होता. भौतिक सुखसमृद्धी असूनदेखील वर्तमानकाळ संकट, संघर्ष

आणि चिंताजनक आहे. त्यातून उभारी घेण्यासाठी मार्ग सुचविणे व शोधणे ही जबाबदारी राज्यशास्त्राची नाही तर कोणाची आहे, असा प्रश्नही इस्टनने उपस्थित केला होता.

**४. मूल्याभिमुखता :**

वर्तनवादाने सामाजिक मूल्यांना इतके कमी महत्त्व दिले होते की, त्याचे मोजमापही करणे अवघड होते. आपले सर्व ज्ञान मूल्यांच्या आधारावरच टिकून असते; म्हणून मूल्यांना जर ज्ञानाची प्रेरणाशक्ती मानली नाही तर ज्ञानाचा दुरुपयोग होण्याचा धोका कायम राहतो. राजकारणात मूल्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची ठरते. शास्त्राच्या नावे मूल्यांना राज्यशास्त्राच्या अभ्यासक्षेत्राबाहेर ठेवता येत नाही. ज्ञानाचा उपयोग योग्य साध्याची प्राप्ती करण्यासाठी करायचा असेल तर मूल्यांना पुन्हा एकदा राज्यशास्त्राच्या केंद्रस्थानी आणणे आवश्यक असल्याचे इस्टनचे मत होते.

**५. बुद्धिजीवींची भूमिका :**

तटस्थ व वस्तुनिष्ठ संशोधक अशी भूमिका स्वत:कडे घेऊन राज्यशास्त्रज्ञांनी आपली सामाजिक जबाबदारी टाळू नये. उत्तर-वर्तनवाद राज्यशास्त्रज्ञांकडे अशी मागणी करतो की, बुद्धिजीवी म्हणून त्यांनी समाजात मोठमोठी कार्ये केली पाहिजेत. मानवी मूल्यांचे संरक्षण करणे ही त्यांची विशेष जबाबदारी आहे. ते जर केवळ तंत्रज्ञ असतील तर त्यांना चौकशीचे स्वातंत्र्य कशाला हवे? किंवा समाजाने त्यांना संरक्षण तरी का द्यावे?

**६. ज्ञानाचे रूपांतर कृतीत व्हावे :**

ज्ञानाचा उपयोग नवसमाजनिर्मितीसाठी व्हावा. सामाजिक समस्यांचे आकलन झाल्यानंतर राज्यशास्त्रज्ञ कारवाईपासून पाठ फिरवू शकत नाहीत. १९ व्या शतकापर्यंत चिंतनात्मक शास्त्र ठीक होते. जेव्हा विभिन्न शास्त्रांची नैतिक तत्त्वे एकसारखी होती; परंतु समकालीन समाजात इतके वैचारिक मतभेद होते की, राज्यशास्त्रास चिंतनाची लक्ष्मणरेषा ओलांडून भरीव कार्याच्या क्षेत्रात उतरावे लागले. त्यामुळे या नाजूक समयी समाजास विघटनापासून वाचवू शकले. थोडक्यात, स्वत:ची बांधिलकी ओळखून संशोधकांनी कृतिप्रवण होण्याची गरज आहे.

**७. व्यवसायांचे राजकियीकरण अटळ :**

संशोधन संस्था, मंडळे वा विद्यापीठे यांना यापुढे सामाजिक, शासकीय प्रश्नांवर भूमिका घ्याव्याच लागतील. अलिप्त राहून चालणार नाही. बुद्धिजीवींना एक सकारात्मक भूमिका पार पाडावयाची असते. अर्थात त्यांना समाजासाठी उपयुक्त साध्ये निश्चित करावयाची असतात आणि त्या दिशेने प्रेरित करावयाचे असते. हे एकदा स्वीकारल्यानंतर सर्व व्यवसायांना राजकारणाशी जोडून घेणे अनिवार्य आणि वांच्छनीय ठरेल.

सामाजिक शास्त्रज्ञाने काय करावे व कोणते अग्रक्रम बाळगावेत, याबद्दलचे महत्त्वाचे मुद्दे वरील सात सूत्रांत आहेत. व्यावसायिक नीतिमत्ता, विज्ञानाचे सामाजिक संदर्भ व विचारवंतांची राजकीय भूमिका यासंबंधी त्यात मौलिक प्रश्न उपस्थित केले गेले आहेत.

उपरोक्त डेव्हिड इस्टन प्रणीत उत्तर वर्तनवादाच्या वैशिष्ट्यानंतर उत्तर वर्तनवादाची काही सर्वसाधारण वैशिष्ट्य पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**(१) बुद्धिवाद्यांची भूमिका :**

राज्यशास्त्रज्ञ बुद्धिवंत, विचारवंत आहे. त्यांनी केवळ तथ्यांचे किंवा समस्यांचे किंवा त्याकरिता आवश्यक तंत्राचे संशोधन करीत बसणे अयोग्य आहे. या कठीण प्रसंगी त्यांची भूमिका रचनात्मक असायला पाहिजे. काही आदर्श व मानवी मूल्यांना टिकवून ठेवणे हे राज्यशास्त्राचे मूलभूत कर्तव्य आहे. प्रत्येक काळात उपस्थित सर्व समस्यांच्या अभ्यास करून त्यावर उपाय योजना शोधून काढणे व सामाजिक, आर्थिक, राजकीय अस्थिरता दूर करणे. ही राज्यशास्त्राची रचनात्मक भूमिका आहे. असे शास्त्रज्ञ तत्कालीन समस्यांचा विचार करीत नसतील तर त्यांची भूमिका यंत्रवत बनून राहील.

**(२) राज्यशास्त्रज्ञाची सक्रियता :**

उत्तर वर्तनवाद्यांनी परिस्थिती परिवर्तनासाठी कार्य करावे. म्हणजे ते कर्तव्यनिष्ठ असावे. समाजाच्या पुनर्मांडणीत महत्त्वाची भूमिका असावी. पुनर्रचनेच्या कार्यात स्वत:ला झोकून देणे ही वैज्ञानिकाची भूमिका असायला पाहिजे. उत्तरवर्तनवादी म्हणतात की, राज्यशास्त्रज्ञ चेतनाशील आहेत. उत्तरवर्तनवाद्यांच्या मते केवळ कोरे चिंतन करण्यापेक्षा त्याचे संशोधन असे असावे की, तत्कालीन समस्यांचे समाधान होईल. अर्थात संशोधकाचे संशोधीत ज्ञान कार्यात्मक असावे.

**(३) मूल्यसापेक्षता :**

वर्तनवाद्यांनी मानवी मूल्यांना नाकारले आणि मूल्यनिरपेक्षतेवर वैज्ञानिकतेचे कठोरतेने पालन केले. त्यामुळे राज्यशास्त्र निरस व प्रयोजनहीन बनले. खरे पाहता राजकीय सिद्धांतात मूल्यांना खूप महत्त्व आहे. ईस्टनच्या मते व्हिएतनामवर जेव्हा बॉम्ब हल्ला होत होता. तेव्हा वर्तनवादी त्यांच्या शवांना मोजण्याचे काम करीत होते. सभ्यता, आदर्श व मानवी मूल्यांची सुरक्षा करणे बुद्धिवाद्यांचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. त्याबद्दल राज्यशास्त्रज्ञ तठस्थ राहू शकत नाही. जर योग्य मूल्य आदर्श नसतील तर त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. म्हणून उत्तरवर्तनवाद्यांनी वर्तनवादातील मूल्यनिरपेक्षतेला बाजूला सारून राजकीय सिद्धांतामध्ये मूल्यांना महत्त्व प्राप्त करून दिले.

**(४) व्यवसायीकरणावर भर :**

वर्तनवादी सामाजिक समस्येवर तटस्थ राहण्यावर भर देतात. तर उत्तरवर्तनवादी त्याबद्दल सक्रिय भूमिका दर्शवितात. त्यांच्या मते, राज्यशास्त्राची समाजात सकारात्मक भूमिका असावी. ते समाजात विशिष्ट उद्देशापर्यंत पोहचण्याकरिता सुव्यवस्थित दिशा प्राप्त करून देण्याचे आवाहन करतात. बुद्धिवाद्यांच्या संघाला केवळ निरपेक्ष संशोधन करण्यापेक्षा मानवी मूल्यांच्या संरक्षणाकरिता संघर्षाच्या मैदानात उतरायला पाहिजे. अर्थातच राज्यशास्त्राच्या व्यवसायाचे मार्गदर्शन व्हावे. ते केवळ वर्णन राहू नये. १९६९ मध्ये अमेरिकन राज्यशास्त्रज्ञांच्या वार्षिक अधिवेशन बैठकीत व्यवसायीकरणाची मागणी केली व त्यातच उत्तर वर्तनवादाचा उगम झाला.

**(५) तंत्र साधने व पद्धतीपेक्षा विषय समस्या महत्वाचे :**

वर्तनवाद्यांनी तंत्र व संशोधनाच्या पद्धतीवर अधिक भर दिला. परंतु त्या मानाने मुख्य समस्या गौण ठरल्या गेल्या. विषयाच्या संदर्भात तंत्रपद्धती शोधून काढणे, त्याचा विकास करणे योग्य आहे. परंतु त्याचबरोबर त्या तंत्रपद्धतींचा उपयोग ज्या करीता करायचा असतो, ती सार वस्तू अधिक महत्त्वाची असते. डेव्हिड ईस्टनच्या मते, संशोधनाकरिता सूक्ष्म तंत्रे व उपकरणे योग्य आहे. परंतु त्यापेक्षाही ज्या करीता त्या उपकरणांचा उपयोग केला जातो, तो उद्देश महत्त्वाचा आहेत. उद्देश अस्पष्ट असण्यापेक्षा ते अचूक असणे योग्य आहे हा विज्ञानाचा मूलमंत्र आहे. अयोग्य परिशुद्धतेपेक्षा योग्य तंत्र अधिक लाभदायक ठरते. त्याप्रमाणे उत्तरवर्तनवादी तंत्रज्ञानापेक्षा व तंत्रसाधनांपेक्षा विषयांच्या संदर्भात गांभीर्याला अधिक महत्त्व देतात.

**(६) सामाजिक परिवर्तनावर भर :**

वर्तनवादात सामाजिक परिस्थितीवर अधिक भर देण्यात आला. परंतु उत्तर वर्तनवादांनी त्यावर मात करून सामाजिक परिवर्तनावर अधिक भर दिला. वर्तनवादात तथ्य गोळा करणे, त्याचे विश्लेषण करणे, त्याचे वर्णन करणे, हे सर्व करतांना मूल्यनिरपेक्षता लक्षात घेणे व त्यानुसार राजकीय सिद्धांताची मांडणी करणे यावर भर होता. परंतु या सर्वांचा सामाजिक संदर्भात काय महत्त्व आहे याचा विचारच केला गेला नाही. त्यामुळे वर्तनवाद्यांनी 'जैसे थे' अशी सामाजिक परिस्थिती कायम ठेवली. काय असावे? यापेक्षा काय असू नये? यावर वर्तनवाद्यांनी विचार केला नाही. म्हणून वर्तनवादी उदासीन असल्याचे दिसून येतात. परंतु उत्तर वर्तनवादात परिवर्तनावर अधिक भर देण्यात आला. काय आहे त्यापेक्षा काय असू नये? यावर अधिक भर देण्यात आला व त्यानुसार काय असावे? याचाही विचार करण्यात आला व त्यातून सामाजिक परिवर्तन कसे साधता येईल याचा प्रयत्न उत्तर वर्तनवादात केला गेला.

अशाप्रकारे पारंपारिक राजकीय सिद्धांत व आधुनिक राजकीय सिद्धांत यांच्यात मेळ घालून उत्तर वर्तनवाद उदयास आला. वर्तनवादाला आलेले अपयश दूर करता यावे व त्यातून राजकीय सिद्धांत जास्तीत जास्त पारदर्शक करता यावेत. यासाठी उत्तर वर्तनवादाच्या काळात राजकीय सिद्धांतावर नव्याने विचार होऊ लागला. या उत्तर वर्तनवादाच्या वैशिष्ट्यांनी राजकीय सिद्धांतामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा उत्तर वर्तनवादी राजकीय सिद्धांताच्या वैशिष्ट्यांचे वर्णन वरील प्रमाणे केले जाते.

## ३.२.२.३ उत्तर– वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन :

१९६५ नंतर राज्यशास्त्रात जी बौद्धिक विचारांची लाट निर्माण झाली ती वर्तनवादोत्तर विचार म्हणून ओळखली जाते. ती लाट निर्माण होईपर्यंत राज्यशास्त्रात वर्तनवादाचा प्रचंड प्रभाव होता. वर्तनवादामुळे व्यक्ती आणि समाज कसे असावेत याकडे अधिक लक्ष देण्यापेक्षा ते कसे आहेत याकडे लक्ष दिले गेले, त्यामुळे व्यक्ती आणि समाज यांच्यातील परिवर्तन आणि विकास याकडे समाज वैज्ञानिकांनी जवळजवळ दुर्लक्ष केले. अर्थातच १९६५ नंतर राज्यशास्त्रज्ञांकडून अशी अपेक्षा केली गेली की त्यांनी समाजाशी असलेला त्यांचा अभ्यासाचा संदर्भ कायम ठेवावा, विचारमूल्यांकडे अधिक लक्ष द्यावे आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग व्यक्ती आणि

समाजाचे परिवर्तन करण्यासाठी करावा. उत्तर-वर्तनवादाने वर्तनवादाच्या योगदानास सामावून घेऊन त्याच्या विकासाची नवी दिशा दाखवली. त्यामुळे ते सामाजिक पुनर्निर्माणासाठी सहाय्यक ठरेल. यात अनुभवजन्य दृष्टिकोनाच्या विकसित रूपाचा तात्त्विक दृष्टिकोनाशी मेळ घालण्याचा प्रयत्न करण्यात आला होता हे सत्य आहे की, १९७० च्या दशकापासून राजकीय सिद्धांतातील मूल्यांच्या विश्लेषणात नव्याने अभिरुची निर्माण झालेली होती आणि वर्तनवादाशी संबंधित अभ्यासास सामाजिक समस्यांची उकल करण्यासाठी उपयुक्त बनवलेजात आहे. यादृष्टीने वर्तनवादी परंपरेने उत्तर-वर्तनवादाच्या योगदानास आत्मसात केले होते.

उत्तर वर्तनवादीविचार ही वर्तनवादावरील प्रतिक्रिया असल्याचे दिसते. ती पूर्णपणे विकसित झालेली विचारप्रणाली नाही; मात्र काही राजकीय विचारवंतांनी मांडलेला तो एक दृष्टिकोन निश्चित आहे. उत्तर वर्तनवादीविचार मांडणाऱ्यांच्या मते, वर्तनवाद्यांनी अभ्यासापेक्षा अभ्यास-पद्धतीलाच अधिक महत्त्व दिले, त्यामुळे राज्यशास्त्रातील महत्त्वाचे प्रश्न आणि वास्तव हे राज्यशास्त्राच्या अभ्यासविषयापासून दूर राहिले. उत्तर वर्तनवादीविचारवंतांचे असे म्हणणे दिसून येते की, तंत्रापेक्षा आशय महत्त्वाचा असतो आणि शुद्धवैज्ञानिक दृष्टिकोनापेक्षा सामाजिक संदर्भ महत्त्वाचा असतो. शैक्षणिक तटस्थतेपेक्षा अनेकदा कृती महत्त्वाची असते.

वर्तनवादीविचार हा निर्माण होण्याचे कारण म्हणजे गेल्या दोन-तीन दशकांत झालेला माहिती आणि ज्ञानाचा प्रचंड स्फोट. मानवाचे कल्याण कशात आहे? मानवाविषयीचे वास्तव शोधण्यात, की त्याच्या कल्याणाचा विचार करण्यात? तसे पाहिले तर उत्तर वर्तनवादीविचार मांडणारी मंडळी ही राज्यशास्त्राकडे पारंपरिक दृष्टिकोनातून पाहताना दिसतात. त्यांना वर्तनवादाची उद्दिष्टे आणि अभ्यासपद्धतीच पसंत नाही असे दिसते. नव्या दमाचे राज्यशास्त्रज्ञ हे अधिक सुधारणावादी आणि कृतिशील असल्यामुळे ते राज्यशास्त्राचा आधुनिक संदर्भ लक्षात घेऊन विचार मांडतात. राज्यशास्त्रातील मूल्ये आणि अभ्यासपद्धतीचा शास्त्रीय संशोधनातील मर्यादांशी मेळ घालून उत्तर वर्तनवादीविचारवंत राज्यशास्त्राकडे पाहताना दिसतात. उत्तर वर्तनवादीविचारामुळे वर्तनवादाची पीछेहाट झाली असे मात्र म्हणता येत नाही, उलट वर्तनवादीविचारांमुळे पारंपरिक राज्यशास्त्र आणि आधुनिक राज्यशास्त्र यांचा समन्वय साधला गेला.

उत्तर वर्तनवादी अभ्यासकांनी त्यांना अभिप्रेत असलेले राज्यशास्त्र नेमके कसे असेल? अंतर्गत यादवी, भीषण विषमता, हिंसक आंदोलन, भूमिगत चळवळी, अण्वस्त्रे, लोकसंख्या स्फोट, राजकीय दडपशाही, वंशभेद, सामाजिक न्यायास नकार, व्यक्तिस्वातंत्र्यात कपात वगैरे असंख्य प्रश्नांना त्यातून उत्तरे कशी मिळतील? या प्रश्नांची उत्तरे उत्तर-वर्तनवादाने दिलेली नाहीत. त्यामुळे त्यांची सूत्र म्हणजे पारंपरिक राज्यशास्त्राची केवळ विडंबनात्मक पुनरुक्तीच वाटते. केवळ वर्तमान संशोधनाविषयीचे असमाधान एवढे एकच कारण त्यांना एकत्र येण्यासाठी सापडले आहे. हे ऐक्य नकारात्मक आहे. यांच्या अध्ययनातून खऱ्या क्रांतीऐवजी प्रतिक्रांतीचीच शक्यता मोठी आहे. राज्यशास्त्र म्हणजे राजकारणाचे केवळ तंत्रज्ञान नाही तर विचारप्रणाली असते. यांच्याकडून ही अपेक्षा पूर्ण होऊ शकत नाही.

## ३.३ सारांश :

वर्तनवादी विचार हा काही पूर्णपणे नवा विचार म्हणता येणार नाही. तथापि, अभ्यासाचा वर्तनवादी

दृष्टिकोन हा १९५० पासून महत्त्वाचा मानला जाऊ लागला. १९६० नंतर सामाजिक शास्त्रांच्या विविध दृष्टिकोनांत वर्तनवादाला विशेष स्थान प्राप्त झाले. १९७० नंतर तर वर्तनवादाची लाटच निर्माण झाली. वर्तनवाद हा केवळ एक अभ्यासविषय न राहता सामाजिक शास्त्रांना विज्ञानाचा किंवा शास्त्राचा दर्जा प्राप्त करून देणारा विचार ठरला. सर्व सामाजिक शास्त्रांचा अभ्यास वर्तनवादी अभ्यासपद्धतीने होऊ लागला. विश्लेषणाची संख्याशास्त्रीय साधने निर्माण झाली. राज्यशास्त्रीय लेखन करणारे विचारवंत वर्तनवादी दृष्टिकोनातून राजकीय प्रश्नासंबंधी लिहू लागले. अमेरिकेतील बहुतेक सर्व विद्यापीठांनी राज्यशास्त्राचे अभ्यासक्रम वर्तनवादी पद्धतीमध्ये बसविले. १९८० च्या सुमारास मात्र वर्तनवादाला विरोध होऊ लागला. अभ्यासाच्या आशयापेक्षा वर्तनवाद अभ्यासपद्धतीलाच अधिक महत्त्व देतो, असा आरोप केला जाऊ लागला. वर्तनवादावर झालेल्या या टीकेला 'उत्तर वर्तनवादी किंवा वर्तनवादोत्तर क्रांती' असे म्हटले गेले. परिणामत: राज्यशास्त्राला वर्तनवादी शास्त्र म्हणण्याऐवजी एक अपरिपूर्ण शास्त्र असे म्हटले जाऊ लागले.

## ३.४ पारिभाषिक शब्द :

**१) वर्तनवाद :** दुसऱ्या महायुद्धानंतर पारंपारिक राज्यशास्त्राच्या विरोधात व्यापक क्रांतीला सुरुवात झाली. या क्रांतीला वर्तनवाद या नावाने ओळखले जाते.

**२) राजकीय वर्तन :** वर्तनवादी दृष्टिकोनानुसार, राजकीय वर्तन अर्थात जे व्यक्ती व्यक्त करते वास्तव राजकारणात विविध भूमिका निभावतात त्यांच्या वर्तनावर लक्ष केंद्रित करणे होय.

**३) उत्तर–वर्तनवादी क्रांती :** सामाजिक व राजकीय व्यवस्थेतील समस्या सोडविण्यासाठी नव्याने संशोधन करण्याच्या गरजेतून वर्तनवादी हे उत्तर वर्तनवादाकडे वळले. यालाच उत्तर वर्तनवाद किंवा वर्तनवादोत्तर क्रांती असे म्हटले गेले.

**४) मूल्य निरपेक्षता :** वर्तनवाद्यांच्या मते, मूल्यनिरपेक्षता म्हणजे संशोधन कार्य करीत असताना संशोधकाने स्वत:ची मुल्यांत्मक बांधिलकी दूर ठेवली पाहिजे.

**५) परिमाणीकारण :** उपलब्ध साधन सामग्री व तथ्यामध्ये स्पष्टता व निश्चितता आणण्यासाठी परीमापन व परिमाणीकरण केले जाते.

**६) मूल्याभिमुखता :** उत्तर वर्तनवाद्याच्या मते, मूल्याभिमुखता अर्थात ज्ञानाचा उपयोग योग्य साध्यांची प्राप्ती करण्यासाठी करावयाचा असेल तर मूल्यांना पुन्हा एकदा राज्यशास्त्राच्या केंद्रस्थानी आणणे.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय :

१) वर्तनवादी दृष्टिकोनाचा अर्थ सांगून त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) वर्तनवादी दृष्टीकोनाच्या उदयाची कारणमीमांसा स्पष्ट करा.

३) वर्तनवादी दृष्टिकोनाचे महत्व सांगा.

४) वर्तनवादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन करा.

५) उत्तर वर्तनवादी क्रांतीची कारणमीमांसा करा.

६) उत्तर वर्तनवादी दृष्टीकोनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

७) उत्तर वर्तनवादी दृष्टीकोन म्हणजे काय ते सांगून त्याचे महत्व विषद करा.

## ३.६ वस्तुनिष्ठ प्रश्न :

१) वर्तनवादी सिद्धांत कोणी मांडला?

**उत्तर :** डेव्हिड ईस्टन

२) 'ह्यूमन नेचर इन पॉलिटिक्स' हा ग्रंथ कोणी लिहिला?

**उत्तर :** ग्राहम वालास

३) उत्तर वर्तनवादी सिद्धांत कोणी मांडला?

**उत्तर :** डेव्हिड इस्टन

४) उत्तर वर्तनवाद्यांनी मूल्यांना महत्त्व दिले हे चूक की बरोबर सांगा.

**उत्तर :** बरोबर

५) "The Political System" हा ग्रंथ कोणी लिहिला?

**उत्तर :** डेव्हिड इस्टन

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१) O. P. Guba - 'An Introduction to Political Theory'.

२) फड एस. बी. - उच्चतर आधुनिक राजकीय सिद्धांत, विद्या बुक्स पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

३) देव विजय - आधुनिक राजकीय विश्लेषण कोश, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

४) Varma S. P., - 'Modern Political Theory', Vikas, New Delhi, (1975)/


❍❍❍

घटक ४

# राजकीय सिद्धांतातील संकल्पना

## (Concepts in Political Theory)

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

(अ) राजकीय सत्ता (Political Power)

४.२.१ राजकीय सत्ता – अर्थ

४.२.२ राजकीय सत्तेचे प्रकार

४.२.३ राजकीय सत्तेचे सिद्धांत

(अ) मनोविश्लेषणवादी सिद्धांत
(ब) समाजशास्त्रीय सिद्धांत
(क) उदारमतवादी लोकशाही सिद्धांत
(ड) मार्क्सवादी सिद्धांत

४.२.४ स्वयंअध्ययन प्रश्न

(ब) अधिसत्ता (Authority)

४.२.२ अधिसत्ता अर्थ/व्याख्या
४.२.३.१ अधिसत्तेचे प्रकार
४.२.२.२ स्वयंअध्ययन प्रश्न

(क) अधिमान्यता (Legitimcy)

४.२.३ अधिमान्यता अर्थ
४.२.३.१ अधिमान्यतेचे आधारभूत घटक

४.२.३.२ **स्वयंअध्ययन प्रश्न**

४.३ **पारिभाषिक शब्द**

४.४ **स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

४.५ **सारांश**

४.६ **सरावासाठी स्वाध्याय**

४.७ **संदर्भ पुस्तके**

## ४.० उद्दिष्टे :

राजकीय सिद्धांतातील संकल्पना या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१) राजकीय सिद्धांतातील संकल्पना अभ्यासता येतील.

२) राजकीय सत्तेचा अर्थ, स्वरूप आणि सिद्धांत समजून घेता येतील.

३) राजकीय सत्तेचे प्रकार समजून घेता येतील.

४) अधिसत्तेचा अर्थ, स्वरूप व प्रकार स्पष्ट करता येतील.

५) अधिमान्यतेचा अर्थ आणि त्याचे आधारभूत स्पष्ट घटक समजून घेता येतील.

## ४.१ प्रस्तावना :

राज्यशास्त्रातील आधुनिक राजकीय संकल्पना म्हणून राजकीय सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या संकल्पनाचा समावेश होतो. प्लेटो, ॲरिस्टॉटल यांच्या काळापासून अनेक विचारवंतांनी राजकीय विश्लेषणात सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्रीय चिंतनाचा विषय समूजन मांडणी केली. आधुनिक वर्तनवाद्यांनी तर सत्ता या संकल्पनेला संपूर्ण राज्यशास्त्राची गुरूकिल्ली मानली. राजकीय प्रक्रियेतील सत्तेच्या सर्वसाधारण वापरामुळे ती राजकीय जीवनाचा केंद्रबंदू ठरते, असा विचार डेव्हिल इस्टन, आर. एच. टोणी, लॉसवेल आणि बईन्ड रसेल यांनी मांडली. अपेक्षित परिणाम घडवून आणणारी क्षमता किंवा व्यक्ती यांच्या बळावर अन्य व्यक्तीचे वा समूहाचे आपल्या इच्छेप्रमाणे बदल घडवून आणण्याची क्षमता अशा स्वरूपात सत्तेची मांडणी करण्यात आली. सत्ता ही संकल्पना राज्यशास्त्राची मध्यवर्ती संकल्पना मानली असली तरी तिच्या मर्यादा स्पष्ट होत गेल्या. राजकारणात सत्तेलाच महत्त्व असते, हे समीकरण वस्तुस्थिती व त्यावेळची समिकरणे यामुळे त्यावर मर्यादा आल्या. त्यातून सत्तेला कायदेशीर मान्यता अधिसत्ता ही संकल्पना उदयास आली. सत्तेला अधिमान्यता मिळाली की ती ‘अधिसत्ता’ बनते. लोकांना अधिसत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. कायदेशीर समाज परिवर्तनाचे व समाजवर्तनाचे नियंत्रणाचे साधन म्हणून रॉबर्ट डहाल, मॅक्सवेअर, सी. जे. फेडरिक आणि प्रा. लास्की इत्यादी विचारवंतांनी राज्यशास्त्रात मांडली. सत्ताधारकाच्या सत्तेला कायदेशीर मान्यतेबरोबर जनतेची मान्यता असणे

आणि सत्तेविषयी जनतेमध्ये औचित्याची, विश्वासाची आणि नैतिक व्यवहाराची भावना निर्माण होणे याला 'अधिमान्यता' म्हणतात. लिपसेट यांच्या मते, 'अधिमान्यता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था की सर्वार्थाने समाजहिताच्या दृष्टीने योग्य आहे असा विश्वास जनतेत निर्माण करण्याची व टिकवून धरण्याची त्या व्यवस्थेची क्षमता होय. अशा प्रकारे शासन संरचना, कार्यपद्धती, कृती, धोरणे, अधिकारी आणि सत्ताधाऱ्याचे राजकारण या दृष्टीने सत्ता, अधिसत्ता आणि अधिमान्यता या राजकीय संकल्पना महत्त्वाच्या आहेत. या घटकामध्ये आपण या संकल्पनांचा अर्थ, त्याचे स्वरूप, वैशिष्टे आणि प्रकार यांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.२ विषय–विवेचन :

### ४.१ राजकीय सत्ता (Political Power) :

सत्ता संकल्पना ही राजकीय सिद्धांतामधील सर्वात मध्यवर्ती संकल्पना आहे. सर्वसाधारण सत्ता म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे आणि आपल्या पद्धतीने दुसऱ्याचे वर्तन बदलण्याचे सामर्थ्य किंवा क्षमता म्हणजे सत्ता होय. पारंपरिक राज्यशास्त्राचे विचारवंत प्लेटो, अरिस्टॉटलपासून वर्तनवादी दृष्टिकोनाचे डेव्हिड इस्टन लासवेल आणि कप्लान यांच्यापर्यंत सत्ता ही संकल्पना मध्यवर्ती राजकीय संकल्पना म्हणून त्याची मांडणी केली. राजकीय व्यवस्था आणि राजकारणाचा विचार करता करता सत्ता या घटकाचे त्यामध्ये असणारे (स्थान) महत्त्वपूर्ण स्थान कोणालाही नाकारता येणार नाही. आधुनिक वर्तनवादी विचारवंत डेव्हीड इस्टन, लास्वेल, आलमंड इत्यादी विचारवंतांनी वर्तनवादी दृष्टिकोन राज्यशास्त्राचा सत्तालक्षी दृष्टीकोन विकसित केला. त्यामध्ये सत्ता ही संकल्पना मूळ संकल्पना मानली. अनेक विचारवंतांच्या मते राज्यशास्त्र म्हणजे सत्ताविषयक अभ्यास करणारे शास्त्र होय आणि शासन व्यवस्थेतील राजकारण हे सत्तेभोवती फिरत असते, राजकारण हा राजकीय सत्ता संपादन करण्यासाठीचा खेळ आहे. अशा प्रकारे राज्यशास्त्र म्हणजे सत्तासंबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र होय, असे गृहीत धरून सत्ता आणि त्याची परिणाम क्षमता या आधारावर 'राजकीय सत्तेची' संकल्पना राज्यशास्त्रात मांडण्यात आली.

**राजकीय सत्तेचा अर्थ व व्याख्या :**

राजकीय सिद्धांतामध्ये राजकीय सत्ता ही संकल्पना सर्वात मूळ संकल्पना आहे. प्राचीन राजकीय विचारवंत प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकआयव्हॅली, मार्क्स इत्यादी विचारवंतांबरोबर रॉबर्ट डहाल, बर्नाड रसेल, लासवेल, चार्लस् मेरीयन इत्यादी आधुनिक विचारवंतांनी आधुनिक राजकीय विश्लेषणातसुद्धा 'राजकीय सत्ता' संकल्पनेला मध्यवर्ती स्थान दिले आहे. सत्ता या संकल्पनेत निर्णय निर्धारण आणि निर्णय अंमलबजावणी करण्याचा अधिकार महत्त्वाचा मानला जात असला तरी व्यक्तीच्या वर्तनात अपेक्षित बदल घडवून आणण्याची क्षमता आणि स्वत:च्या इच्छेनुसार इतरांच्या कृतीवर नियंत्रण ठेवण्याची क्षमता म्हणून राजकीय सत्ता संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे.

**१) बर्ट्रांड रसेल :** आपल्या इच्छेप्रमाणे इतरांच्या संबंधात परीणाम किंवा बदल घडवून आणण्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे राजकीय सत्ता होय.

२) **चार्लस मेरियन :** व्यक्तीच्या ठिकाणी असणारी इतरांच्या धोरणावर प्रभाव टाकण्याची क्षमता म्हणजे 'सत्ता' होय.

३) **आर. एच. टोनी :** व्यक्ती किंवा गट जिच्या बळावर अन्य व्यक्तीचे वा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून धेवू शकतात, अशी क्षमता होय.

४) **डेव्हीड इस्टन :** एक व्यक्ती वा गट जेंव्हा एखाद्या स्वत:च्या इच्छेनुसार इतरांच्या कृती निर्धारित करतो तेंव्हा त्यांच्यातील संबंध म्हणजे सत्ता होय.

५) **मिचेल :** विशिष्ट समुहात किंवा व्यवस्थेत प्रभुत्व किंवा श्रेष्ठत्व निर्माण करण्यासाठी लागणारी क्षमता म्हणजे राजकीय सत्ता होय.

थोडक्यात, वरील सर्व व्याख्यांचा अभ्यास केला असता सत्ता ही मनुष्यामध्ये अपेक्षित परिणाम घडवून आणणारी, व्यक्तीचे किंवा गटाचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे घडवून आणणारी संकल्पना आहे. राजकीय सत्तेमध्ये मानवी वर्चस्वाला प्राधान्य आहे. व्यक्ती, राजकीय व्यवस्था आणि परिस्थिती यानुसार राजकीय सत्तेचे प्रकटीकरण किंवा अविष्करण होत असले, तरी निर्णय घेण्याची क्षमता व स्वत:च्या इच्छेनुसार व्यक्ती व समूहाच्या वर्तनात बदल घडवून आणणारी आणि नियंत्रण ठेवणारी संकल्पना म्हणजे 'राजकीय सत्ता' होय. व्यक्तीच्या राजकीय निर्णयावर परिणाम घडवून आणण्याची आणि निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची शक्ती अशा शब्दांत सत्तेचा अर्थ राज्यशास्त्र कोषात स्पष्ट केला आहे.

**राजकीय सत्तेची वैशिष्टे :**

**(अ) सत्ता वापरण्यासाठी क्षमता लागते :**

व्यक्ती किंवा व्यक्ती समुहावर सत्तेचा वापर करून अपेक्षित परिणाम घडवून आणण्यासाठी क्षमता आवश्यक असते. जी व्यक्ती सत्तेचा वापर करणार आहे, त्या व्यक्तीकडे असलेल्या गोष्टी-साधने पैसे, सामर्थ्य आणि गुण इत्यादी घटकामुळे ती इतरांच्या वर्तनावर नियंत्रण ठेऊ शकते किंवा त्याचे वर्तन आपल्या इच्छेप्रमाणे बदलून घेवू शकते. अशा प्रकारचे सामर्थ्य एका व्यक्तीकडेच असते. त्या क्षमता सामान्य व्यक्तीकडे नसतात. त्यामुळे ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्ती समुहाच्या अंगी सत्ता वापरण्याची क्षमता असते, तिच सत्तेचा वापर करू शकते. त्याच्या पाठीमागे सत्तेचे मुलस्रोत आणि अधिबलने असतात. चार्लस मेरियन यांनी आपल्या 'झेश्रळींळलरश्र ढहशेीू' या ग्रंथात सत्तेच्या अविष्करणासाठी व्यक्तीची समाजातील क्षमता महत्त्वाची असते, असे म्हटले आहे. प्रभाव व वैयक्तिक क्षमता यावर सत्तेचे अविष्करण अवलंबून असते, असे त्याचे मत होते.

**(ब) सत्ता वर्तनात्मक असते :**

सर्वसाधारण सत्ता वर्तन नियंत्रित करणारी आणि आपल्या इच्छेप्रमाणे इतरांचे वर्तन व कृती निर्धारित करणारी असते. त्यामुळे जी व्यक्ती किंवा समूह सत्तेचा वापर करताना दुसऱ्याचे वर्तन आपल्याप्रमाणे

बदलण्यास भाग पाडत असते. त्यासाठी ती साम, दाम, दंड, भेद यांचा वापर करते. आपल्याला अपेक्षित सत्ताग्राहकाच्यामध्ये बदल घडवण्यासाठी पाशवी सामर्थ्याचा वापर करू शकते. त्यातून त्याचे सामर्थ्य समाजासमोर येते. थोडक्यात, सत्तेचा मूळ हेतू वर्तन नियंत्रणात्मक असतो.

**(क) सत्ता व्यक्तीसापेक्ष, गटसापेक्ष असते :**

राजकीय व्यवस्थेमध्ये किंवा समाजात व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपले वर्चस्व, प्रभुत्व निर्माण करून सत्ताधारी बनते तेंव्हा ती व्यक्तीसापेक्ष किंवा गटसापेक्ष असते. व्यक्तीमधील गुण, संपत्ती, चारित्र्य, कार्यक्षमता, ज्ञान आणि निर्णयक्षमता या गोष्टी सत्तेच्या अविष्करणासाठी प्रभावी असतात. त्या सर्व क्षमता सर्व व्यक्तीकडे असणे शक्य नाही त्यामुळे ज्या व्यक्तीकडे या क्षमता प्रभावी आहेत, तिच व्यक्ती सत्तेचा वापर करू शकते. त्यामुळे सत्ता व्यक्तीसापेक्ष आहे. उदा. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पंडीत नेहरू, जयप्रकाश नारायण तसेच असे काही बहुसंख्यांक गट असतात त्यांची कायम स्वरूपी राजकीय सतेवर पकड असते. त्यांची क्षमता आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक परिस्थितीतून प्रकट होते व ते राजकीय सत्ता संपादन करण्यात यशस्वी होतात. त्यामुळे सत्ता ही व्यक्तीसापेक्ष बरोबर गटसापेक्ष असते.

**(ड) सत्ता प्रसंगविशिष्ट किंवा परिस्थितीसापेक्ष असते :**

सामान्यत: सत्ता प्रसंगविशिष्ट किंवा परिस्थितीसापेक्ष असते. एखाद्या व्यक्तीची किंवा व्यक्तिसमूहाची सत्ता वैयक्तिक सामर्थ्याबरोबरच तिची क्षमता किंवा सत्ता विशिष्ठ प्रसंगाच्या भूमिकेत तपासावी लागते. कारण व्यक्ती सत्ताक्षमता ही विभिन्न प्रसंगात कमी-अधिक असू शकते. त्यामध्ये व्यक्तीचे गुण, पद, प्रतिष्ठा आणि तिची संवेदनशिलता महत्त्वाची असते. एखाद्या पदावर असणारी व्यक्ती पद गेल्यावर सत्तेचा वापर करू शकत नाही. त्यामुळे त्या व्यक्तीचे पद हा महत्त्वाचा घटक सत्तेसाठी मानला जातो. त्यामुळे सत्ता प्रसंगविशिष्ट असते.

**(इ) सत्ता नेहमी मर्यादित असते :**

व्यक्ती किंवा व्यक्तीसमूह आपल्या सत्ता इतरांच्या वर्तनात बदल करण्यासाठी किंवा त्यांच्या वर्तनावर नियंत्रण करण्यासाठी गाजवत असली तरी ती नेहमीच मर्यादित असते. जी व्यक्ती सत्तेचा वापर करते तिला पद, प्रतिष्ठा, प्रसंग आणि परिस्थिती याची मर्यादा येत असते आणि त्या मर्यादीत राहूनच सत्तेचा वापर करावा लागतो. जर व्यक्तीने किंवा व्यक्तीसमूहाने सत्तेचा अतिरेक केला तर त्यांचे हुकूमशाहीत रूपांतर होते. या प्रवृत्तीविरुद्ध जनप्रवाह तयार होऊन क्रांती होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक राजकीय सत्तेवर पद-प्रतिष्ठा, कायदा, जनता आणि परिस्थितीची मर्यादा असतेच. त्यामुळे सत्ता ही मर्यादित असते.

### ४.१.२ राजकीय सत्तेचे प्रकार (Types of Political Power) :

राजकीय सत्ता ही निरनिराळ्या स्वरूपात आढळत असल्यामुळे व त्यासंबंधी विचार अनेक विचारवंतांनी आपापल्या पद्धतीने व दृष्टिकोनातून केला असल्यामुळे सत्तेचे वेगवेगळे प्रकार पाहायला मिळतात. पारंपारिक राज्यशास्त्रापासून ते आधुनिक राजकीय विश्लेषणापर्यंत 'सत्ता' ही राज्यशास्त्रातील मूलभूत संकल्पना म्हणून अभ्यासली जाते. पारंपरिक राज्यशास्त्रातील प्लेटो, ॲरिस्टॉटल इत्यादी विचारवंतांनी राजकीय सत्तेचा साकलिक

पद्धतीने अभ्यास करून सत्तेचा संबंध सवयीवर व त्याच्या गुणवैशिष्ट्यांवर अवलंबुन असते, असा विचार मांडला. वर्तनवादी आणि व्यवस्थावादी विचारवंत चार्लस मेरिअम, हेरॉल्ड, लासवेल, डेव्हीड इस्टन, अब्राहम कप्लान, कॅटलीन इत्यादी विचारवंतांनी आधुनिक राजकीय विश्लेषणात राजकीय सत्तेचा सूक्ष्म पद्धतीने अभ्यास करून सत्तेची संकल्पना मांडली. राजकीय प्रक्रियेचा अर्थच राजकीय सत्तेला आकार देणे, तिचे वितरण करणे आणि त्याची अंमलबजावणी करणे, असा होतो अशी भूमिका मांडली. त्यांनी राज्यशास्त्राच्या अभ्यासाचा 'सत्तालक्षी दृष्टीकोन' म्हणजे 'पॉवर ॲप्रोच' मांडला. त्यामुळे राजकीय सत्तेचे वेगवेगळे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. राजकीय सत्तेचे प्रकार पुढीलप्रमाणे –

**(अ) क्रेस पायनी** यांनी सत्ताधारक व सत्ताग्राहक यांच्यातील प्रत्यक्ष संबंधाच्या आधारे राजकीय सत्तेचे पुढील ६ प्रकार केले आहेत.

१. बलसत्ता, २. अमिष सत्ता, ३. प्रतिक्रियात्मक सत्ता, ४. अडसर सत्ता, ५. आकर्षण सत्ता, ६. अनुनायात्मक सत्ता.

**(ब) हॅरॉल्ड लासवेल** यांनी मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून निरोगी, समाधानी, नैतिक आणि सामाजिक जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून 'झ्रेशी रपव झशीीपरश्र खपीशलीीळूं' या ग्रंथात पुढील प्रकार पाडले आहेत.

१. भ्रामक व दिखाऊ राजकीय सत्ता, २. उघड किंवा स्पष्ट राजकीय सत्ता, ३. कायदेशीर किंवा विधिमय राजकीय सत्ता.

**(क) बर्ट्रांड रसेल** यांनी पुढीलप्रमाणे राजकीय सत्तेचे प्रकार सांगितले आहेत.

१. पारंपरिक राजकीय सत्ता, २. नग्न राजकीय सत्ता, ३. क्रांतिकारक राजकीय सत्ता.

वरील वेगवेगळ्या राजकीय विचारवंतांच्या राजकीय प्रकारांचा अभ्यास केला असता सर्वसाधारण पुढीलप्रमाणे राजकीय सत्तेचे प्रकार पडतात...

**१) पारंपरिक सत्ता :** पारंपरिक सत्ता सवयी, श्रद्धा, संस्कृती, धर्म आणि नैतिकतेवर आधारित असते.

**२) प्रतिकावर आधारित सत्ता :** समाजातील प्रतिके आणि त्यावर आधारित श्रद्धा यावर ही प्रतिक सत्ता अवलंबून असते.

**३) नग्न सत्ता :** नग्न सत्ता ही बळ वा पाशवी शक्ती यावर आधारित असते. यामध्ये बळाचा वापर केला जातो.

**४) क्रांतिकारी सत्ता :** प्रस्थापित सत्तेविरुद्ध किंवा त्यांच्या हुकूमशाही पद्धतीविरुद्ध उठाव क्रांती म्हणून निर्माण झालेली सत्ता होय.

**५) कायदेशीर सत्ता :** राज्यघटना वा राजकीय संकेत यांच्या आधारावर निर्माण झालेली सत्ता म्हणजे कायदेशीर सत्ता होय.

**६) प्रगट किंवा गुप्त सत्ता :** जेंव्हा सत्तेचा वापर प्रकट स्वरूपात होतो, उघडपणे होतो त्याला प्रकट सत्ता म्हणतात. तर जेव्हा अप्रगट किंवा गुप्त स्वरूपात तिचा वापर होतो तेव्हा ती गुप्त सत्ता असते.

**७) दिखाऊ किंवा भ्रामक सत्ता :** जेंव्हा सत्ता स्वत:च्या ताब्यात नसताना किंवा सत्ता आहे पण त्यांचा वापर दिखाव्यासाठी केला जातो तिला दिखाऊ किंवा भ्रामक सत्ता म्हणतात.

**८) आत्मीक सत्ता :** व्यक्ती आपल्या आंतरिक सामर्थ्याच्या आधारावर सत्ता प्राप्त करते तिला आत्मीक सत्ता म्हणतात. यासाठी आत्मक्लेश व आत्मशुद्धी आवश्यक असते.

**९) बलसत्ता :** व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाच्या विशिष्ट बळाच्या आधारावर सत्ता मिळवली जाते किंवा गाजवली जाते तिला बलसत्ता म्हणतात. उदा. शस्त्रबळ, पैसा, संपत्ती, ज्ञान.

**१०) विचारप्रणालीवर आधारित सत्ता :** विचारप्रणाली हे एक सत्ता मिळवण्याचे प्रभावी साधन आहे. तर्कसंगत तत्वावर आधारित विचारप्रणाली सत्ता प्राप्त करते तेंव्हा तिला विचारप्रणालीवर आधारीत सत्ता म्हटले जाते. उदा. चीन – साम्यवाद.

### ४.१.३ राजकीय सत्तेचे सिद्धांत (Theories of Political Power Types) :

**(अ) मनोविश्लेषणवादी सिद्धांत** (Psycho - Analytial Theory) **:**

मनोविश्लेषणवाद हा मानसशास्त्रातील एक आधुनिक दृष्टिकोन आहे. सिग्मंड फ्राईड (१८५६ ते १९३९) यांना मानसशास्त्रातील मनोविश्लेषणवादी दृष्टिकोनाचा संस्थापक मानला जातो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धानंतर हा दृष्टिकोन मानसशास्त्रात रूढ झाला. सिग्मंड फ्राईड यांनी मानवी वर्तनाचे स्पष्टीकरण देण्यासाठी अबोध मन किंवा अबोधावस्थेचा अभ्यास करणे गरजेचे आहे, असे त्याचे मत होते. फ्राईडचा असा विश्वास होता की, मनोविश्लेषणात्मक संकल्पनेच्या संचलनाद्वारे घेतलेल्या निर्णयामध्ये सुप्त आणि अबोध प्रेरणा घेण्यासाठी मन जबाबदार असते. माणसाच्या मनामध्ये स्वाभिमान, अहंकार आणि अतिअहंकार हे मानवी मनाचे तीन पैलू आहेत त्यावर व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व अवलंबून आहे. व्यक्ती फक्त स्वत:च्या मनाच्या नाटकातले कलाकार असतात. ते कधी स्वेच्छेने ढकलले जातात किंवा योगायोगाने ओढले जातात. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हा त्याच्या स्वत:च्या अंतर्गत संघर्षावर अवलंबून असतो. फ्राईडचा असा विश्वास होता की, लोक अबोध प्रेरणा घेऊन जागरूक होवून बरे होऊ शकतात.

मनोविश्लेषणवादी सिद्धांताची मांडणी आणि सर्व मानवी वर्तनाला कवेत घेण्यासाठी त्याची क्षमता या दोन वैशिष्ट्यामुळे फ्राईड हे विसाव्या शतकातील सर्वांत महत्त्वाचे मानसशास्त्रज्ञ मानले जातात. त्यांनी साहित्य, कला, धर्म, पुराणकथा, संस्कृती, सर्वसामान्य वर्तन या सर्व प्रश्नावर प्रकाश टाकला. मानवी मनाची बैठक ईश्वरनिरपेक्ष सहजप्रवृत्ती व चैतन्यशक्ती या आधारे मांडून सृष्टीनियमाचा शोध घेण्याची वैज्ञानिक पद्धत मांडली. फ्राईड यांनी 'मन' ही संकल्पना तीन स्तरात मांडली. पहिली मानवी मनाच्या बोधावस्था, दुसरी बोधपूर्वी अवस्था आणि तिसरी अबोधावस्था अशा तीन स्तरात विस्तारलेल्या असतात हा मुख्य सिद्धांत मांडला. ज्या

मानसिक घटना आणि  भूतकाळातील स्मृती यांची वर्तमानकाळातील व्यक्तीला जाणीव होणे म्हणजे 'बोधस्तर' होय. स्मृती आणि इच्छा याची मानवी मनात जाणीव नसते पण सहजपणे उपलब्ध होऊ शकते, त्याला बोधपूर्वी मन म्हणतात. आणि स्मृती, इच्छा, प्रच्छन प्रेरणा दाबून असतात तो विचार पाशवी व वासनाच्या स्वरूपात मनात भरलेला असतो, त्याला अबोध मन म्हणतात. मनाच्या या प्रकारच्या रचनेमुळे नियंत्रण झुगारून अबोध मन आणि बाह्य वास्तवातील नियमांच्या अंकित असणारे बोध मन यांचे सतत द्वंद्व सुरू असते. असा विचार फ्राईड यांनी मांडला. राजकीय सत्तेची मनोविश्लेषणवादी सिद्धांत मांडताना फ्राईड, वॅटसन, अब्राहम मॅस्लो, कार्ल रॉजर्स पुढीलप्रमाणे सिद्धांत मांडतात.

१. व्यक्तीच्या वर्तनामागे व्यक्तीची सहज प्रेरणा असते.

२. व्यक्तिमत्त्वामध्ये स्व-अहंकार आणि अतिअहंकार किंवा सर्वश्रेष्ठत्व हे तीन मूलभूत घटक असतात.

३. व्यक्तीच्या संवेदन, स्मरण, विचार या क्रियांना सहजप्रेरणेमुळे दिशा मिळते.

४. व्यक्तीमध्ये अहंम असतो त्यामुळे त्याला स्वत:विषयी अतिअभिमान वाटतो. त्यामुळे तो फक्त स्वत:च्या सुखाचाच विचार करत असतो.

५. व्यक्तीला स्वत:च्या हिताच्या पलीकडे काहीही नसते. त्यामुळे स्वत:च्या हितापलीकडे कोणाचा विचार करत नाही.

६. व्यक्तीचे वर्तन अबोध मनाच्या पातळीवरील इच्छा-वासना आणि प्रेरणा याद्वारे नियंत्रित होत असते.

७. व्यक्तीचे वर्तन परिस्थितीच्या प्रभावाने आकारास येते.

८. व्यक्तीच्या वर्तनावर बाह्य जगाविषयी ज्ञान आकलन विचार, स्मरण-संवेदना, माहीती यांचा प्रभाव टाकत असतात.

९. प्रत्येक व्यक्तीला स्वत:च्या स्वत:विषक्षी आपेक्षा व आकांक्षा असतात त्यानुसार त्यांचे वर्तन नियमित होत असते.

१०. व्यक्तीचे जीवनमान सुधारण्यासाठी व्यक्तीच्या स्व-संकल्पना आणि स्वत्व आदर यांना महत्त्व दिले जाते.

अशा प्रकारे राजकीय सत्तेचा मनोविश्लेषणवादी सिद्धांत मांडला आहे.

**मनोविश्लेषणवादी राजकीय सत्तेचा सिद्धांताचे महत्त्व :**

आधुनिक राजकीय सत्तेच्या सिद्धांतामध्ये मनोविश्लेषणवादी सिद्धांताचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सिग्मंड फ्राईड, वॅटसन, कॉर्ल रॉजर्स आणि अब्राहम मास्लो इत्यादी मानसशास्त्रज्ञांनी राजकिय सत्तेचा मनोविश्लेषणवादी सिद्धांताचा पुरस्कार केला. कोणत्याही स्वरूपाची राजकिय व्यवस्था असो त्या व्यवस्थेमध्ये मानवाचे किंवा राजकिय श्रेष्ठीजनांचे महत्त्व अनन्यसाधारण असते. कारण राजकीय सत्तेत मानवाला विविध

प्रकारच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. त्या भूमिका पार पाडत असताना त्या व्यक्तीचा स्वभाव, वर्तन, व्यक्तिमत्त्व आणि कृती महत्त्वाची असते. त्या व्यक्तीच्याच वर्तनावर राजकीय व्यवस्थेचे भवितव्य अवलंबून असते. तसेच सत्ताधारी व्यक्तीच्या वर्तनावरच त्या त्या देशातील राजकीय व्यवस्था आकारास येत असते. उदा. भारत (इंग्लंड) येथे पंडीत नेहरू, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्त्वामुळे लोकशाही व्यवस्था अस्तित्वात आली. याच्या उलट हिटलर, मुसोलिनी यांच्या नेतृत्त्वामुळे जर्मनी व इटली मध्ये हुकूमशाही व्यवस्था अस्तित्वात आली होती. त्यामुळे राजकीय सत्तेच्या मनोविश्लेषणवादी सिद्धांताला महत्त्वाचे स्थान आहे.

**(ब) समाजशास्त्रीय सिद्धांत** (Sociological Theory) **:**

मानवाच्या सामाजिक संबधाचा आणि सामाजिक घटनांचा पद्धतशीर शास्त्रीय अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे सामाजिक शास्त्र होय. समाजशास्त्राचे जनक ऑगस्ट कॉम्त यांनी सामाजिक संबंध आणि प्रगती यांचे शास्त्र म्हणजे समाजशास्त्र होय, अशी व्याख्या केली आहे. सामान्यत: ऑगस्ट कॉम्त, मॅक्सवेबर, किंग्लले, केव्हीस, हंट इत्यादी समाजशास्त्रज्ञांनी समाजशास्त्राच्या व्याख्या स्पष्ट केल्या आहेत. समाजशास्त्र म्हणजे सामाजिक क्रियांचे स्पष्टीकरण करणारे, मानवी सामाजिक जीवनाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र आणि मानवी वर्तनातील सहसंबंध शोधणारे शास्त्र होय. अशी संकल्पना सर्व शास्त्रज्ञांनी मांडल्या. थोडक्यात, समाजशास्त्र हे सामाजिक संबंध आणि मानवी संबंधाविषयी ज्ञान मिळवणे या हेतूने समाजशास्त्रज्ञांनी आपले विचार मांडले.

समाजशास्त्रातील सामाजिक वर्तनाचा अभ्यास हा राजकिय सत्तेला प्रभावित करीत असतो, असे मत जॉर्ज मिसेल आणि व्हॉन वीझ यांनी मांडले. त्यांच्या मते, समाजातील विविध समूहाचे वर्तन हे मानवी संबंधाच्या म्हणजे विविध व्यक्ती-व्यक्तीमधील संबंध, त्याचे वर्तन, व्यक्ती-संस्था संबंध, संस्था-संस्था संबंध यावरून घडत असते. तसेच व्यक्तीचे संपूर्ण जीवन समूहावर आणि संस्थावर अवलंबून असते, व्यक्ती समूहाशिवाय असूच शकत नाही, असा सिद्धांत मांडून मानवी समूहाचे आंतरसंबंध स्पष्ट केले. या समाजशास्त्रांनी सत्तेचा संबंध मानवाचे परस्पर संबंध, मानवाचे सामाजिक वर्तन, विभिन्न मानवी समाज, मानवी सामाजिक समूह यांच्या अभ्यासाच्या दृष्टिकोनाने मांडले.

पुढे १९ व्या शतकापासून समाजशास्त्राच्या अभ्यासाला खरी गती मिळाली. ऑगस्त कॉम्त यांनी झीर्ळीींळींश झहळश्रींेहि आणि झीर्ळीींळींश झेश्रळीं या ग्रंथात कार्ल मार्क्स यांनी दास कॅपिटल, दि पाव्हटी ऑफ फिलॉसॉफी या ग्रंथात हर्बल स्पेन्सर यांनी आपल्या सेंद्रीय सिद्धांतात, विलफ्रेडो परेटो यांनी 'चळपव रपव डेलळशीं' या ग्रंथात राजकीय सत्तेचा समाजशास्त्रीय सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे-

१. संपूर्ण मानवाचे वर्तन हे समूहातून निर्माण होते.

२. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.

३. नवसमाज निर्मितीसाठी सामाजिक घटना महत्त्वाच्या असतात.

४. मानवी समस्यांचे निराकरण हे समाजशास्त्रातील विज्ञानवाद, बुद्धीप्रमाण्यवाद, स्तरिकरण व विश्लेषण यातून होते.

५. समाजरचनेच्या वर्गव्यवस्थेमुळे त्यांच्यात संघर्ष होऊन समाजाचा आर्थिक विकास होऊ शकतो.

६. समाजावर कुटुंब, धर्म, परंपरा यांचा प्रभाव असतो.

७. मानवाच्या सामाजिक वर्तनावर बाह्य भौतिक परिस्थितीचा सुद्धा प्रभाव पडतो.

८. भाषा, धर्म, कायदा व लोकांचे आर्थिक जीवन राजकीय व्यवस्थेचे भवितव्य ठरवू शकतात.

९. संघर्ष हा समाजजीवनाचा एक अविभाज्य घटक आहे. तो सामाजिक वास्तवतेचा घटक असतो.

१०. व्यक्तीच्या आंतरक्रिया या भिन्न हावभावावर किंवा हावभावातून प्रकट होतात.

११. नोकरशाहीचे वर्तन लोकशाही व्यवस्थेच्या विकासासाठी पूरक असते.

१२. परस्परावलंबी घटकांनी युक्त अशी समाजाची समतोल व्यवस्था ही परिवर्तनशील असते.

अशा प्रकारे पॅरोटो, मॅक्स वेबर, जॉन हर्बट मीट, कार्ल मार्क्स, किंग्लजे डेव्हीस, गिन्सवर्ग रॉबर्ट पार्क इत्यादी विचारवंतांनी समाजशास्त्रीय संबंधाच्या दृष्टिकोनातून मानवी वर्तनाचे सिद्धांत मांडले. मानवी वर्तन हे समूहावर अवलंबून असून समतोल समाजव्यवस्था निर्माण करणारे राजकीय श्रेष्ठीजनाचे कार्य आहे, असे मत मांडले. समाजावरच मानवी वर्तन अवलंबून असते, असा सिद्धांत त्यांनी मांडला.

**(क) उदारमतवादी लोकशाही सिद्धांत :**

व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीविकास यांची हमी देवून राज्याने व्यक्तीजीवनात कमीतकमी हस्तक्षेप करावा. राज्याचे कार्ये फक्त समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यापुरतेच मर्यादित असावे आणि राज्याचे व्यक्ती विकासास जास्तीत जास्त संधी द्यावी, या मुख्य तत्त्वाच्या आधारे आधुनिक राजकीय विश्लेषणात उदारमतवादी लोकशाही सिद्धांत मांडला जातो. लोकशाही हा शासन प्रकार नसून तो सामाजिक व आर्थिक जीवनाचा मार्ग आहे आणि शासन हे त्या मार्गातील साधन आहे. आणि व्यक्ती हा विकासाचा केंद्रबिंदू मानून जॉन लॉक, अॅडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, जे. एस. मिल, ऑस्टीन टीचएच ग्रीन इत्यादी विचारवंतांनी उदारमतवादी लोकशाही सिद्धांत मांडला. त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार करून राज्याच्या कार्यक्षेत्राची कक्षा मर्यादित असावी असे मत मांडले.

१७८९ ची फ्रेंच राज्यक्रांती आणि इंग्लंडमधील १६८९ चा बिल ऑफ राईटचा कायदा यांच्या परिणामातून उदारमतवादाचा उदय झाला. जॉन लॉकच्या सामाजिक करारामध्ये सुद्धा उदारमतवादाचे विचार आपल्याला मिळतात. लॉकच्या विचाराचा केंद्रबिंदू हा व्यक्ती असून राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आहे, असे विचार मांडले. याचाच विचार पुढे बेंथम आणि मिल यांनी मांडले. बेंथमने अधिकांचे अधिक सुख या तत्वाच्या आधारे उपयुक्तता वादाचा सिद्धांत मांडला. व्यक्तीने स्वत:चे सुख पहात अधिकात अधिक सुख समाधान मिळवण्यासाठी धडपड करावी, असा विचार मांडला. त्यांच्या मते, राज्य हा व्यक्तीचा गट असून

त्याची संघटना व्यक्तीचे जातीस्त जास्त सुख साध्य करण्यासाठी आणि वाढवण्यासाठी निर्माण झालेली आहे. सर्वसामान्य लोकांचे जास्तीत जास्त सुख साधणे, हे राज्यसंस्थेचे उद्दिष्ट असते. ॲडम स्मिथ यांनी आपल्या 'वेल्थ ऑफ नेशन' (Wealth of Nation) या ग्रंथात मुक्त अर्थव्यवस्थेचा सिद्धांत मांडून व्यक्तीस्वातंत्र्य आणि मुक्त व्यापार सिद्धांताचा पुरस्कार केला. व्यक्तीच्या जास्तीत जास्त सुखासाठी आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासासाठी राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता मुक्त स्पर्धा आणि खाजगी मालकी उद्योगांना प्रोत्साहन द्यावे असे स्मिथचे मत होते. जे. एम. मिल यांनी आपल्या 'On Liberty' या ग्रंथात व्यक्तीच्या विचारस्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्याचा पुरस्कार करून राज्याच्या हस्तक्षेपावर टिका केली. व्यक्ती ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या सार्वभौम असते. त्यामुळे तिला स्वत:ला स्वहितासाठी व तिच्या व्यक्तीमत्त्वाच्या विकासासाठी स्वातंत्र्य दिले पाहिजे, असा विचार प्रकट केला. मिलच्या मते, राज्य ही आवश्यक आपत्ती असून ते समाज कल्याणाचे साधन आहे. बेथम आणि मिलच्या प्रभावाने टी. एच. ग्रीन यानेसुद्धा उदारमतवादाचा पुरस्कार केला. त्याच्या मते, राज्य हे मानवी इच्छेतून निर्माण झाले असून व्यक्तीचा नैतिक विकास साधणे हे राज्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. लोकांना अन्यायी अत्याचारी शासनाचा प्रतिकार करण्याचा अधिकार असावा. लोकांचा प्रतिकार हा बहुमताने होत नसतो तर लोकांचे हित किती प्रमाणात साधले जाईल यावर आधारलेला असतो, असा त्यांनी विचार मांडला. थोडक्यात, उदारमतवादी लोकशाही सिद्धांतामध्ये व्यक्तीस्वातंत्र्य, व्यक्तीविकास, व्यक्तीचे सुख आणि राज्याचे मर्यादित स्वरूप या संकल्पनांचा समावेश आहे. उदारमतवादी लोकशाही सिद्धांताच्या माध्यमातून राजकीय सत्तेचे स्वरूप पुढीलप्रमाणे स्पष्ट होते.

१. कोणतीही राजकीय सत्ता अमर्याद नसते.

२. व्यक्तीला स्वत:च्या विकासासाठी व्यक्ती स्वातंत्र्य आवश्यक असते.

३. व्यक्ती ही शारीरिक व मानसिक दृष्ट्या सार्वभौम असते.

४. शासन हे व्यक्तीविकासाचे साधन आहे.

५. राज्याचे कार्य फक्त समाजात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यापुरते मर्यादित असावे.

६. राज्याने व्यक्ती विकासास जास्तीत जास्त संधी द्यावी.

७. राज्य हे व्यक्ती विकासाचे साधन आहे आणि व्यक्तीचा नैतिक विकास हे राज्याचे उद्दिष्ट आहे.

८. राज्याने व्यक्तीच्या जास्तीत जास्त सुखासाठी प्रयत्न केला पाहिजे.

९. राज्याने आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता मुक्त स्पर्धा व खाजगी मालकीला प्रोत्साहन द्यावे.

१०. व्यक्तीला मुक्त आर्थिक स्वातंत्र्य आवश्यक आहे.

११. व्यक्तीला विकासासाठी विचार स्वातंत्र्य व कृतीस्वातंत्र्य आवश्यक आहे.

१२. राज्याने मर्यादित स्वरूपात आर्थिक कार्याची जबाबदारी घ्यावी.

१३. राज्य हे आवश्यक आपत्ती नसून ते समाजकल्याणाचे साधन आहे.

१४. सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता व शिक्षण ही राज्याची प्राथमिक कर्तव्ये आहेत.

१५. अन्यायी शासनाला प्रतिकार करण्याचा अधिकार लोकांना असावा.

अशा प्रकारे लोकशाही उदारमतवाद्यांनी व्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्ती विकास यासाठी मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. राज्याच्या कार्याचे स्वरूप स्पष्ट केले. राज्य हे समाजकल्याणाचे साधन आहे आणि राज्याचे अन्यायी स्वरूप असेल तर त्याला विरोध करण्याचा अधिकार लोकांना आहे, असा विचार मांडला. त्यांनी व्यक्तिवादाला आणि उपयुक्तता वादाला जास्त महत्त्व दिले. मानवी बुद्धी ही तिच्या कार्यक्षमतेप्रमाणे विवेकी असून आपला विकास करू शकते, असा विचार मांडला. राज्याने फक्त शांतता व सुव्यवस्था राखण्याचे कार्य करावे, अशी अपेक्षा मांडली. एकूणच या सिद्धांताने व्यक्ती आणि व्यक्तीविकास केंद्रबिंदू मानून राज्याला दुय्यम स्थान दिले आहे. या सिद्धांताने व्यक्तीची प्रतिष्ठा आणि तिचे रक्षण करण्याचा पुरस्कार केला आहे.

**(ड) मार्क्सवादी सिद्धांत :**

शास्त्रीय समाजवादाचा जनक कार्ल मार्क्स या समाजवादी विचारवंताने राजकीय सत्तेचा मार्क्सवादी सिद्धांत मांडला. कार्ल मार्क्सने कम्युनिष्ठ मॅनीफेस्टो, दास कॅपिटल, दि पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी या ग्रंथात साम्यवादी विचारसरणीचा आढावा घेतला. त्याने पुढील सिद्धांताच्या माध्यमातून मार्क्सवादी सिद्धांत किंवा समाजवादी समाजरचनेचा सिद्धांत मांडला.

मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांतात मानवाच्या विकासाचा सिद्धांत मांडला आहे. कार्लमार्क्सच्या मते, प्रत्येक वस्तूचा दुसऱ्या वस्तूशी संघर्ष घडत असतो आणि या संघर्षातून परिवर्तन होत असते. इतिहासाचा अभ्यास केला असता मनुष्य हा भौतिक वस्तूंची प्राप्ती करण्यासाठी उत्पादनाची भौतिक साधने आणि मानवी श्रेय यांच्यात संबंध निर्माण होतात. वस्तूचा संबंध उत्पादनाशी येतो आणि उत्पादनाचा संबंध हा अर्थकारणाशी येतो आणि अर्थकारणाचासंबंध मानवी श्रेयाशी येतो. या संबंधानुसार समाजामध्ये राजकीय सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरे घडून येतात, असा सिद्धांत मार्क्सने मांडला. त्यामुळेच इतिहासात सरंजामशाही, भांडवलशाही व समाजवाद अशी स्थित्यंतरे घडून आलेली दिसतात, असे मत मांडले. म्हणजे ऐतिहासिक स्थित्यंतरास आर्थिक संबंधच जबाबदार असतात, असे मत मांडले. ही स्थित्यंतरे वाद-प्रतिवाद आणि सुसंवाद या स्वरूपात घडतात असा सिद्धांत मांडला. आजपर्यंतचा या जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा आणि उत्पादन पद्धतीचा इतिहास आहे, असे मार्क्सने म्हटले आहे. आर्थिक संबंधाच्या अनुषंगाने मार्क्सने मानव जातीच्या इतिहासाचे पुढील पाच अवस्था सांगितल्या आहेत. १) प्राचीन साम्यवाद २) गुलामगिरीचा कालखंड ३) सरंजामशाहीचा कालखंड ४) भांडवलशाही व्यवस्था ५) समाजवादी व्यवस्था ६) साम्यवाद.

मार्क्सने साम्यवादी विचारांच्या विकासामध्ये 'अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत' मांडला आहे. या सिद्धांतामध्ये त्यांनी मजुरांच्या श्रमाचे मूल्य, उत्पादन, विक्री मूल्य यातील तफावत कशी मजुरांची पिळवणूक करते, हे दाखवून दिले. श्रमिकाला त्याच्या श्रमाचा पुरेपूर मोबदला न देता कमी मोबदल्यात वस्तू उत्पादन करून भांडवलदार अधिक नफा मिळवतात. ही आर्थिक शोषणाची पद्धती त्यांनी जगासमोर मांडली. कार्ल मार्क्सने या सिद्धांतातून पुढील सिद्धांत मांडले. १) वस्तूचे मूल्य हे तिच्यावर खर्च झालेल्या सामाजिक श्रमावरून ठरते, २) मानवी

श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होऊ शकत नाही. ३) कामगाराजवळ उत्पादन निर्मितीची क्षमता असते. ४) मजुरी आणि वस्तूच्या बाजारातील किंमतीमधील तफावत हे अतिरिक्त मूल्य असते. ५) अतिरिक्त मूल्याच्या माध्यमातून भांडवलशाहीत संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर लोकांच्या हातात होते. ६) भांडवलदार श्रमिकावर अन्याय करतात व त्यांची आर्थिक पिळवणूक करतात. ७) अतिरिक्त मूल्य सिद्धांतामुळे समाजात 'आहे रे' वर्ग आणि 'नाही रे' वर्ग तयार होतात.

अशा प्रकारच्या अतिरिक्त मूल्याच्या सिद्धांतामुळे समाजात श्रीमंत व गरीब असे वर्ग तयार होतात. त्यांना आहे रे वर्ग आणि नाही रे वर्ग म्हणतात. या दोन्ही वर्गात वर्गसंघर्ष निर्माण होतो. अशा प्रकारचा वर्ग सिद्धांत मार्क्सने आपल्या कम्युनिष्ट मॅनिफेस्टो या ग्रंथात मांडला. कार्ल मार्क्सच्या मते, आजपर्यंतचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे आणि हा वर्गसंघर्ष असंतुष्ट कामगार आणि भांडवलदार यांच्यामध्ये होतो. कामगार भांडवलशाही विरूद्ध क्रांती करतात आणि समाजात कामगारांची हुकूमशाही निर्माण होते. ही हुकूमशाही कांही काळासाठी स्थापन झाल्यानंतर खाजगी संपत्ती व उत्पादन साधनांची सामूहिक मालकी प्रस्थापित करतात. त्यामुळे समाजातील वर्ग-विग्रहाचे प्रमाण कमी होवून समाज वर्गविरहीत बनतो आणि वर्गविहीन समाजव्यवस्था स्थापन होते. म्हणजेच समाजवादी समाजरचना जी वर्गविहीन, राज्यविहीन असेल, असा विचार कार्लमार्क्सने आपल्या साम्यवादी सिद्धांतात मांडला आहे. थोडक्यात, सत्तेच्या मार्क्सवादी सिद्धांतात पुढील वैशिष्ट्ये दिसून येतात.

१. ऐतिहासिक विकासामध्ये भौतिकवाद महत्त्वाचा असतो.

२. समाजपरिवर्तनाचा ऐतिहासिक विकास होत असताना तो संघर्षातून होत असतो.

३. मानवी इतिहासाच्या विकासात आर्थिक घटकाला महत्त्व आहे. संपूर्ण मानवी जीवन आर्थिक पायावर उभारलेले आहे.

४. आजपर्यंतचा इतिहास हा श्रीमंत व गरीब वर्गाच्या संघषर्घाचाच इतिहास आहे.

५. समाजाचा इतिहास हा प्रामुख्याने उत्पादन पद्धतीचाच आहे.

६. आर्थिक संबंधाच्या अनुषंगाने मानव जातीच्या इतिहासात पाच प्रकारच्या अवस्था निर्माण होतात.

७. समाजवादी व्यवस्था ही संपूर्ण मानवी कल्याणाच्या विकासाचे काम करते.

८. वस्तूचे 'अतिरिक्त मूल्य' हे श्रमिकांच्या शोषणाचा मार्ग आहे.

९. वस्तूचे मूल्य हे तिच्यावर खर्च झालेल्या सामाजिक श्रमावरून ठरते.

१०. मानवी श्रमाशिवाय कोणतीही वस्तू निर्माण होऊ शकत नाही.

११. भांडवलशाहीत संपत्तीचे केंद्रीकरण होवून मूठभर लोकांच्या हातात सत्ता एकवटते.

१२. भांडवलदार वर्गाकडून मजूर श्रमिकावर अन्याय होतो, त्याची पिळवणूक होते.

१३. जुलूम करणारा आणि जुलूम सोसणारा अशा दोन्ही वर्गात वर्गसंघर्ष कायम असतो.

१४. आजपर्यंतच्या संपूर्ण समाजाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे.

१५. कामगारांच्या क्रांतीनंतर वर्गविहीन आणि राज्यविहीन समाज व्यवस्था निर्माण होते. तीचे साम्यवादी समाजरचना म्हणून ओळखली जाते.

अशाप्रकारे कार्ल मार्क्स यांनी ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांत, अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत, कामगार क्रांती, कामगारांची हुकूमशाही आणि साम्यवादी समाजरचनेच्या माध्यमातून राजकीय सत्तेचा मार्क्सवादी सिद्धांत मांडला. यामध्ये मार्क्सने आर्थिक घटक हाच समाजपरिवर्तनासाठी महत्त्वाचा असतो, अशी मांडणी केली. ज्या घटकाकडे आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होते त्याच्याकडेच राजकीय सत्ता असते आणि तो गरीब, श्रमिक यांच्यावर अन्याय, अत्याचार करतो. या अन्याय-अत्याचारा विरोधात वर्गसंघर्ष होवून कामगार क्रांती होते. कामगारांची हुकूमशाही निर्माण होते आणि शेवटी साम्यवादी समाजरचना अस्तित्वात येते ती समाजरचना वर्गविहीत, राज्यविहीन असते असा सिद्धांत मांडला.

### ४.२.४ स्वयं अध्ययन प्रश्न :

१. राजकारण म्हणजे .......... चा खेळ होय.

२. निर्णय होण्याची आणि त्या निर्णयाची कार्यवाही करण्याची क्षमता म्हणजे .......... होय.

३. 'Political Power' हा ग्रंथ .......... यांनी लिहिता.

४. .......... यांच्या मते, सत्तेचे शास्त्र म्हणजे राज्यशास्त्र होय.

५. हेरॉल्ड लासवेल यांनी राजकीय सत्तेचे .......... प्रकार सांगितले आहेत.

६. .......... याने राजकीय सत्तेच्या मनोविश्लेषणावर सिद्धांताचा पुरस्कार केला.

७. .......... याने मानव हा समाजशील प्राणी आहे, असे म्हटले आहे.

८. .......... याला समाजशास्त्राचा जनक म्हणतात.

९. .......... याने समाजाविषयीचा सेंद्रीय सिद्धांत मांडला.

१०. उदारमतवादी लोकशाही सिद्धांत .......... महत्त्व देतो.

११. .......... याने राजकीय सत्ता हा ग्रंथ लिहला.

१२. लोकशाहीत अधिसत्तेचे अधिष्ठान .......... ला असते.

### ४.२.२ अधिसत्ता (Authority) :

इंग्रजी भाषेतील Authority या राज्यशास्त्रीय संकल्पनेसाठी 'अधिसत्ता' या शब्दाचा उपयोग केला जातो. ॲथॉरीटी या शब्दाची उत्पत्ती Auctor या रोमन शब्दापासून झालेली असून त्याचा मूळ अर्थ सल्ला किंवा

मसलत असा होतो. रोमन राजकीय व्यवस्थेतील 'वरीष्ठ सभा' या जेष्ठ, अनुभवी व तज्ज्ञ लोकांची सभा म्हणून अस्तित्वात होती. ही 'वरीष्ठ सभा' धर्म, नीती, परंपरा, संकेत, रुढी या आधारावर जनसभेने घेतलेल्या निर्णयाचे परीक्षण करून व विचार-विनिमय करून मान्यता दिली जाते. त्या निर्णयाला अधिकृत दर्जा मिळतो तेव्हा त्यास अधिसत्ता म्हटले जात असे, अशा प्रकारे रोमन काळात सत्ताधारकांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता आणि त्यानुसार आदेश देण्याचा अधिकार व त्या निर्णयाचे पालन करून घेण्याची क्षमता या अर्थाने 'अधिसत्ता' हा शब्द वापरला जात होता. पण सर्वसाधारणपणे राज्यशास्त्रीय दृष्टिकोनातून अधिसत्ता म्हणजे सत्ता धारकाच्या आज्ञांचे पालन त्या आज्ञांच्या पाठीमागे असलेले अधिबलन म्हणजे अधिसत्ता होय. सत्तेला कायद्याची, बहुसंख्य जनतेची अधिमान्यता मिळाली की त्याचे रूपांतर 'अधिसत्तेत' होते. ही अधिसत्ता न्याय, योग्य, वैध आणि न्यायोचित मानली जाते. यामध्ये परस्पर सहकार्य, संमती आणि परस्पर सहभाग अभिप्रेत असतो.

राजकीय सत्तेला आज्ञांचे आपोआप आज्ञापालन मिळते, त्याच्या ठिकाणी बुद्धीसंगत सांगोपांग मांडणी करण्याची क्षमता असणे, तिला असा करण्याचा अधिकार आहे आणि आज्ञाचे पालन करणे, माझे कर्तव्य आहे, अशी भावना बहुसंख्य लोकांच्या कडून अधिबलन मिळते त्यावेळी त्याचे अधिसत्तेत रूपांतर होते. लोकांच्या मान्यतेनुसार चालवणारी किंवा चालवली जाणारी सत्ता म्हणजे अधिसत्ता होय आणि हीच अधिसत्ता लोकांना कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. थोडक्यात, सत्तेला अधिमान्यता मिळाली की तिचे 'अधिसभेत' रूपांतर होते.

### ४.२.२.१ अधिसत्ता व्याख्या :

सत्ताधारक लोकांना कायद्याची, जनतेची आणि इतर नैतिक बाबींच्या संदर्भात निर्णय घेण्याची आणि त्याची अंमलबजावणी करण्याची मान्यता मिळते. त्यावेळी सत्तेचे अधिसत्तेत रूपांतर होते. अधिसत्तेला कायद्याची व जनतेची मान्यता असते. त्यामुळे अधिसत्तेकडून आलेल्या आदेशांचे पालन सहजपणे व बिनविरोध करतात. अधिसत्तेकडून मिळालेल्या आज्ञा, आदेश लोकांना कायदेशीर, योग्य व न्याय वाटतात. थोडक्यात, सत्तेला अधिमान्यता असणे म्हणजे अधिसत्ता होय.

**अधिसत्तेची व्याख्या :**

**१. मॅक्स वेबर :** अधिसत्ता म्हणजे एखादा आदेश किंवा आज्ञा देण्याची किमान राजकीय सत्ता होय.

**२. युनोस्को :** जनतेकडून स्विकारण्यात आलेली व सन्मानीत झालेली व जी सर्वांना माहिती असलेली मान्यताप्राप्त झालेली सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

**३. सी. जे. फ्रेडरिक :** विवेकशील प्रतिक्रयेद्वारे समर्थन करण्याची क्षमता किंवा सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

**४. रॉबर्ट डहाल : अधिमान्यता असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.**

**५. लेली किप्सन :** अधिमान्यतेच्या वेष्टनात असलेली राजकीय सत्ता म्हणजे अधिसत्ता होय.

वरीलप्रमाणे अधिसत्तेच्या व्याख्यावरून असे स्पष्ट होते कि, अधिसत्तेला समाजातील बहुसंख्य लोकांची

मान्यता असते. त्यांनी अधिसत्तेचा स्विकार स्वेच्छेने केलेला असतो. अधिसत्तेला राज्याच्या पाशवी शक्तीचा आधार नसून जनतेची इच्छा तिचा आधार असतो. आधुनिक काळात अधिसत्तेची रचना घटनात्मक तत्त्वावर आधारित असून अधिसत्तेला राज्यघटनेचे कवच असते. थोडक्यात, सत्तेला कायद्याची, लोकांची मान्यता, संमती असणे म्हणजे 'अधिसत्ता' होय.

**अधिसत्तेची वैशिष्टे :**

**१. अधिसत्ता अधिमान्य असते :** अधिसत्ता ही सर्व दृष्टिकोनातून अधिमान्य असते. राजकीय व्यवस्थेतील संवैधानिक तरतुदीनुसार तिला मान्यता असते. तसेच समाजातील बहुसंख्य लोकांची त्याला मन्यता असते. तिला नैतिकतेचे सुद्धा अधिष्ठान असते. त्यामुळे बहुसंख्य जनता अधिसत्तेच्या आदेशाचे पालन आपले कर्तव्य म्हणून करत असते. अधिसत्तेकडून आलेल्या आज्ञा आदेश लोकांना न्याय वाटतात. त्यामुळे अधिसत्ता ही लोकांना कायदेशीर व न्याय वाटते. अधिसत्तेला लोकांच्या संमतीचे पाठबळाबरोबरच कायद्याची अधिमान्यता असते.

**२. संघटनात्मक स्वरूप :** कार्यात्मक स्वरूपात अधिसत्तेला नियमांचे किंवा आज्ञाचे नियमन करावयाचे असेल तर संघटना असणे गरजेचे आहे. विशेषत: आधुनिक राजकीय व्यवस्थेचा विचार करता राष्ट्राचा भूप्रदेश, लोकसंख्या, प्रथा-परंपरा आणि राज्यव्यवस्थेकडून लोकांच्या असलेल्या अपेक्षांचा विचार करता निर्णय निर्धारण आणि निर्णय अंमलबजावणीसाठी अधिसत्तेला संघटनात्मक स्वरूपाशिवाय तरणोपाय नाही. त्यामुळे साकल्याने या सर्व घटकांचा विचार करता अधिसत्तेचे स्वरूप संघटनात्मक असते. अधिसत्ता व्यक्ती व्यक्ती, संस्था संस्था सुसंवाद कायम राखणारी कार्यक्षम यंत्रणा म्हणून अधिसत्तेचे स्वरूप संघटनात्मक असते.

**३. अधिसत्ता प्रतिकात्मक असते :** सत्तेला अधिसत्तेत रूपांतर होण्यासाठी काही प्रतिके आवश्यक असतात. या प्रतिकांच्या आधारावर राजकीय सत्ता जनतेत आदर, निष्ठा, प्रेम निर्माण करून स्वत:ला अधिसत्तेत परावर्तीत करून घेते. उदा. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, बोधचिन्ह, राजचिन्हे, राजमुकूट इत्यादी राष्ट्राची प्रतिके जनतेमध्ये लोकप्रिय असतात. त्यासाठी ते जीवसुद्धा देवू शकतात. त्यामुळे राजकीय अधिसत्ता या प्रतिकांचा वापर करून लोकांकडून आदेशाचे, आज्ञचे सहज पालन करून घेवू शकतात. उदा. ब्रिटीश राजाविषयी राजा मृत आहे, राजा चिरायू होवा. यातून राजाची सत्ता अमूर्त आहे हे मान्य केले जाते.

**४. अधिसत्ता आज्ञार्थी असते :** अधिसत्तेला जनतेकडून आज्ञा करण्याचा अधिकार असतो. त्यामुळे अधिसत्ता जनतेसाठी आदेश किंवा आज्ञा देण्याचे काम करत असते. एवढेच नव्हे तर त्या आज्ञाचे लोकांकडून पालन करवून घेण्याचाही अधिकार अधिसत्तेला असतो. कोणत्याही स्वरूपाची राजकीय व्यवस्था असो, त्यामधील अधिसत्ता लोककल्याणात आणि समाज कल्याणासाठी आदेश किंवा आज्ञा देते आणि त्याचे पालन लोकांच्याकडून घेवू शकते. त्यामुळे अधिसत्ता ही कायमस्वरूपी आज्ञा देणारी किंवा आदेश देणारी आज्ञार्थी असते.

**५. अधिसत्ता कमी खर्चीक असते :** अधिसत्तेद्वारे जेव्हा आज्ञा, आदेश दिले जातात किंवा सामाजिक

वर्तनाचे नियंत्रण केले जाते त्यासाठी अधिसत्तेला कमी साधनसंपत्तीचा वापर करणे शक्य होते. कारण अधिसत्तेला समाजातून सकारात्मक-अधिबलने अधिक असतात. त्यामुळे आदेशाचे पालन करून घेण्यासाठी खर्च कमी होतो. ज्या अधिसत्तेला लोकांचा पाठिंबा असतो, लोकांना ती अधिसत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते. तेथे अधिक शक्तीचा, बळाचा वापर करावा लागत नाही. कमी साधनामध्ये अधिसत्ता आपले कार्य पार पाडू शकते. म्हणून अधिसत्ता कमी खर्चीक आहे. अधिसत्ता ही कायम मान्य आणि स्विकृत असते. त्यामुळे अधिसत्तेचे निर्णय लोक सहजपणे पाळतात.

### ४.२.२.१ अधिसत्तेचे प्रकार :

मॅक्स वेबर यांच्या मते, राजकीय व्यवस्थेमध्ये राजकीय अधिसत्तेला महत्त्वाचे स्थान आहे. कोणत्याही स्वरूपाची अधिसत्ता ही रूढी, परंपरा संकेत, व्यक्तीचे नेतृत्त्वगुण, दिव्यवलय आणि वैधानिक बुद्धीमत्ता यावर आधारित असते. या वरील आधारावरच लोक अधिसत्तेच्या आज्ञेचे व आदेशाचे पालन करत असतात. आणि अधिसत्तेला अधिमान्यता मिळवून देणारे ते आधार आहेत. त्या आधारावरच मॅक्स वेबर यांनी अधिसत्तेचे पुढील 'तीन' प्रकार सांगितले आहेत.

**१. पारंपारिक अधिसत्ता :** पारंपारिक अधिसत्ता म्हणजे रूढी, परंपरा संकेत यावर आधारित असलेली अधिसत्ता म्हणजे पारंपारिक अधिसत्ता होय. या प्रकारातील अधिसत्तेला किंवा सत्ताधारकाला त्या विशिष्ट समुहातील लोकांची मान्यता मिळालेली असते. तिचा आधार दिर्घकाळापासून चालत आलेल्या रूढी-परंपरा संकेत हा असतो. परंपरागत अधिसत्तेची अधिबलने ही परंपरागत पिढ्यान पिढ्यांच्या वहीवाटीवर आधारलेली असतात. या अधिसत्तेच्या पाठीमागचा मूळ स्रोत हा व्यक्ती किंवा कायदा नसून परंपरा हा असतो. पितृसत्ताक कुटूंब पद्धती हे पारंपारिक अधिसत्तेचे उदाहरण आहे. कुटूंबातील प्रमुखाला जी सत्ता प्राप्त होते ती वंशपरंपरागत असते. तिच्या पाठीमागे रुढी व परंपरा असते. त्यामुळे कुटूंबातील सर्व लोक त्या व्यक्तीची सत्ता मान्य करतात. पारंपारिक अधिसत्तेचे उदाहरण म्हणून प्राचीन काळातील टोळी राज्ये, इंग्लंड व नेपाळमधील राजेशाही इत्यादी. यामधील अधिसत्ता ही वंशपरंपरेवर आधारित आहे. विशेष म्हणजे तेथील लोकांनीही ती सत्ता मान्य केलेली आहे. जशी व्यक्ती व व्यक्ती समुहाला परंपरागत आधारावर अधिसत्ता प्राप्त होते तशी त्या अधिसत्तेवर परंपरेची मर्यादा असते. अधिसत्तेने वर्तन करताना रुढी-परंपरा यांचा आदर करूनच आपले अधिकार गाजवणे आवश्यक आहे. पारंपारिक अधिसत्ता ही रूढी-परंपरा संकेत यावर आधारित असल्यामुळे तिला कोणतेही आव्हान नसते. कारण या अधिसत्तेला कायदेशीर आधार नसतो. ती वंशपरंपरागत असल्यामुळे पारंपारिक अधिसत्तेत सत्ताधिशाचा शब्द आज्ञा, निर्णय आणि आदेश म्हणजे कायदा असतो. आधुनिक राजकीय व्यवस्थेत परंपरागत अधिसत्तेचा प्रकार जवळ जवळ संपुष्टात आला आहे.

**२. दिव्यवलयी अधिसत्ता :** दिव्यवलयी अधिसत्ता ही सत्ताधारी व्यक्तीच्या अलौकिक गुणावर किंवा दिव्यशक्तीवर आधारित असते. जेव्हा सत्ताधारकापाशी काहीतरी दिव्यशक्ती किंवा अलौकिक गुण आहेत ते लोकांच्या कल्याणासाठी वापर करतील, अशी लोकांची खात्री होते आणि त्यामुळे त्या व्यक्तीवर वा त्याच्या अलौकिक गुणावर विश्वास ठेवून त्याच्या आदेशाचे पालन निमूटपणे केले जाते तेव्हा दिव्यवलयी अधिसत्ता

अस्तित्वात येते. उदा. महात्मा गांधी, पंडीत नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस इत्यादी. दिव्यवलयी अधिसत्ता धारण करणाऱ्या व्यक्तीला निर्णय घेण्याचे अमर्याद स्वातंत्र्य असते. कारण तिच्या ठिकाणी असलेल्या शक्तीवर लोकांचा अमर्याद विश्वास असतो. त्यांना विरोध करण्याची मन:स्थिती लोकांच्यामध्ये नसते. त्यांचे सर्व आदेश मान्य करण्याच्या मन:स्थितीत असतात. अशा प्रकारे दिव्यवलयी अधिसत्ता ही अलौकिक गुण, दिव्य शक्ती, आकर्षण आणि व्यक्तित्व यावर आधारित असल्यामुळे ती वैयक्तिक स्वरूपाची असते. त्यामुळे जोपर्यंत लोकांचा त्यांच्या नेतृत्त्व कौशल्यावर किंवा अलौकिक व्यक्तिमत्त्वावर विश्वास असतो तोपर्यंतच त्याची दिव्यवलयी सत्ता टिकून राहते. लोकांचा विश्वास उडाला की दिव्यवलयी सत्ता डळमळीत होते. मॅक्स वेबरने या 'दिव्यवलयी अधिसत्तेला' अधिक अस्थिर अधिसत्ता म्हटले आहे.

**३. विधीविवेकजन्य अधिसत्ता :** राजकीय सत्तेची यथायोग्यता परिणामकारक, मूल्यसमरसता, विश्वासार्हता आणि विधीनियमानुसार लोकांची स्विकृती व मान्यता मिळते अशा अधिसत्तेला विधी विवेकजन्य अधिसत्ता म्हणतात. ही अधिसत्ता वैधानिक तत्त्वानुसार, नियमानुसार आणि स्वत:च्या सद्‌विवेकानुसार कार्यान्वित होत असते. लोकहित हाच हेतू या अधिसत्तेचा असल्यामुळे लोकांची संमती या अधिसत्तेला असते. वैधानिक अधिसत्तेसमोर सर्व शक्ती समान असतात. त्यांच्या समोर भेदभाव नसतो. तसेच ही सत्ता विधीनियमांचे उल्लंघन करणाऱ्यावर कारवाई करू शकते. त्यामुळे आधुनिक राज्यव्यवस्थेची उभारणी विधीविवेक अधिसत्तेच्या संकल्पनेवरच निर्माण झालेली दिसून येते. राष्ट्रपतीपासून ते कनिष्ठ अधिकाऱ्यापर्यंत या अधिसत्तेची उदाहरणे देता येतील, अशा प्रकारे मॅक्स वेबरने अधिसत्तेची तीन प्रकार सांगून पारंपारिक सत्ता व दिव्यवलयी अधिसत्ता अविकसीत देशात अस्तित्वात येते तर विधीविवेकनिष्ठ अधिसत्ता विकसीत देशात आढळून येते असे स्पष्टीकरण केले आहे.

### ४.२.२.२ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. ॲथॉरिटी या शब्दाची निर्मिती .......... या रोमन शब्दापासून झालेली आहे.

२. अधिमान्यता असलेली राजकीय सत्ता म्हणजे .......... होय.

३. लोकांना .......... सत्ता कायदेशीर व श्रेष्ठ वाटते.

४. राष्ट्रध्वज हे .......... अधिसत्तेचे वैशिष्ट आहे.

५. पारंपारिक अधिसत्ता .......... आधारित असते.

६. वैधानिक सत्तेला .......... ची मान्यता असते.

७. मॅक्स वेबरने अधिसत्तेचे .......... प्रकार सांगितले आहेत.

८. सामाजिक परिवर्तनाचा वर्तुळगामी सिद्धांत .......... यांनी मांडला.

९. वर्गसंघर्षाचा आणि वर्गविहीन समाजाचा सिद्धांत .......... ने मांडला.

### ४.२.३ अधिमान्यता (Legitimacy) :

सत्ता, अधिसत्ता प्रमाणे आधुनिक राजकीय विश्लेषणात 'अधिमान्यता' या संकल्पनेला महत्त्वाचे स्थान आहे. अधिमान्यता ही संकल्पना रामायण, महाभारतापासून ते प्लेटो ॲरिस्टॉटल आणि आधुनिक राजकीय विश्लेषक मॅकआयव्हॅली डेव्हीड इस्टन कॉप्लान, लासवेल इत्यादी विचारवंतांनी 'अधिमान्यतेची' संकल्पना मांडली आहे. उदा. रामायण, महाभारत यामध्ये राजाची सत्ता, प्लेटोची न्याय संकल्पना, ॲरिस्टॉटलची सार्वभौम कायद्याची सत्ता, सामाजिक करार या सर्व संकल्पनेत अधिमान्यतेची संकल्पना आढळते. थोडक्यात, अधिमान्यता म्हणजे राज्यातील सत्ताधारी व्यक्तीला जनतेची मान्यता असणे होय. तसेच प्रस्थापित राजकीय सत्तेविषयी लोकांच्या मनात विश्वासाची भावना निर्माण होणे म्हणजे अधिमान्यता होय. प्रत्येक राजकीय सत्तेचे विशिष्ठ लक्षण म्हणजे अधिमान्यता होय. कारण प्रत्येक राजकीय व्यवस्था अधिमान्यतेवर आधारित असते आणि ज्या राजकीय सत्तेला लोकांची अधिमान्यता नसते ती राजकीय व्यवस्था अस्थिर असते. त्या व्यवस्थेचे विघटन होते त्यामुळे आधुनिक राजकीय व्यवस्थेच्या दृष्टीने 'अधिमान्यतेला' अनन्यसाधारण महत्त्व आहे.

अधिमान्यता (Legitimacy) हा शब्द Legitimus या लॅटीन शब्दापासून निर्माण झालेला असून रोमन ग्रीक विचारवंत सिसेरो याने वैधानिक व न्यायिक सत्ता यासाठी Legitimus हा शब्द वापरलेला होता. अधिमान्यता म्हणजे राज्यातील सत्ताधारकाव्या सत्तेला सामान्य जनतेची मान्यता असणे होय. अधिमान्यतेची संकल्पना आधुनिक राजकीय विश्लेषणात सर्वप्रथम एस. एम. लिपसेट या अमेरिकन विचारवंताने मांडली. इ. स. १९४९ मध्ये त्यांनी Political Science Review या मासिकात अधिमान्यतेची संकल्पना स्पष्ट केली आणि आपल्या Political Man या ग्रंथात अधिमान्यतेच्या संकल्पनेचे विश्लेषण केले आहे.

**अधिमान्यतेची व्याख्या :**

१. **लिप्सेट :** यांच्या मते, अधिमान्यता म्हणजे अशी राजकीय व्यवस्था कि, जी सर्व सामर्थ्यानिशी समाजहितासाठी कार्य करते, असा विश्वास जनतेत निर्माण करण्याची व ती टिकवून ठेवण्याची त्या राजकीय व्यवस्थेची क्षमता होय.

२. **रॉबर्ट डहाल :** शासनाच्या संरचना, कार्यपद्धती, कृती, निर्णय, धोरणे, अधिकारी वा पुढारी यांच्या ठिकाणी अचूकपणा, औचित्य, नैतिक, चांगुलपणा हे गुण आहेत आणि त्यामुळे आपण त्यांचा स्विकार केला पाहिजे, असा जो विश्वास लोकांना वाटतो, त्याला अधिमान्यता म्हणतात.

३. **मार्टीन लिप्सेट – डाल्फ स्टर्नबर्गर :** यांच्या मते, राजकीय सत्तेचा पाया अधिमान्यता हा असून राज्यशासन चालवण्याचा अधिकार आपणास आहे, असे शासन संस्थेला वाटते आणि त्याला काही प्रमाणात लोकांची मान्यता असते त्याला 'अधिमान्यता' म्हणतात.

वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता असा निष्कर्ष काढता येईल की, राजकीय व्यवस्थेला लोकांची खास मान्यता आणि खास संपत्ती होय. सत्तेला ज्यावेळी अधिमान्यता मिळते तेव्हा त्याचे रूपांतर अधिसत्तेत होते आणि अधिसत्ता लोककल्याणाची कार्ये करते असा जनतेचा विश्वास असतो. त्यामुळे प्रत्येक शासकीय

कृतीला किंवा शासनाच्या धोरणांना लोकांचा पाठिंबा मिळतो, त्यालाच अधिमान्यता म्हणतात. जिथे राजकीय सतेला अधिक अधिमान्यता असते तेथील राजकीय व्यवस्थेत कायदा व सुव्यवस्था पहायला मिळते. शासन स्थिर असते आणि याच्या उलट जिथे राजकीय सत्तेला अधिमान्यता कमकुवत असते तेथे कायदा व सुव्यवस्थेसाठी दंडशक्तीचा वापर करावा लागतो. तेथील शासन अस्थिर असते. अशा प्रकारे लोकांना राजकीय सत्तेविषयी औचित्याची, कार्यपद्धती विषयी विश्वासाची व चांगुलपणाची भावना आणि कृती असणे म्हणजे 'अधिमान्यता' होय.

### ४.२.३.१ अधिमान्यतेचे आधारभूत घटक :

सत्ताधारकांना, राजकीय व्यवस्थेला, तिच्या उपव्यवस्थेला व तिच्या कार्यपद्धतीला अधिमान्यता मिळवण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करावल लागतात. त्यासाठी पुढील व्यवस्था अनेक मार्गाचा अवलंब करीत असते. ते मार्ग म्हणजेच अधिमान्यतेचे आधारभूत घटक होय. ते पुढीलप्रमाणे –

**१. विचारप्रणालीतून मान्यता :** सत्ताधारकाला विशिष्ट विचारप्रणालीतून राजकीय अधिमान्यता प्राप्त होऊ शकते. सामान्यत: सत्ताधारक अधिमान्यता प्राप्त करत असताना विशिष्ट विचारांच्या आधारे किंवा मूल्यांच्या आधारे एक आदर्श संदर्भ चौकट लोकांसमोर उभी ठेवतात आणि अधिमान्यता मिळतात. सत्ताधाऱ्यांनी मांडलेल्या विचाराविषयी ज्यावेळी जनतेमध्ये विश्वास उत्पन्न होतो त्यावेळी त्याला लोक अधिमान्यता देतात. सत्ताधारक आपले विचार आपल्या भाषणातून आणि प्रचारातून लोकांसमोर सतत समर्थन करून अधिमान्यता मिळवण्याच्या प्रयत्नासाठी कटिबद्ध असतात. या विशिष्ट विचारसरणीच्या आधारावरच राजकीय श्रेष्ठीजन अधिमान्यता प्राप्त करून सत्ताधीश होतो व ते टिकवण्याचा प्रयत्न करतात. उदा. नाझीवाद, हिटलर, फॅसीवाद, मुसोलिनी, इंदिरा गांधी–वीस कलमी कार्यक्रम इत्यादी.

**२. चिन्हे आणि प्रतिकाद्वारे अधिमान्यता :** राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत, गौरवशाली ऐतिहासिक परंपरा, प्रसिद्ध घोषवाक्ये यांच्या आधारे जनतेचा विश्वास संपादन केला जातो. अशा चिन्हांना आणि प्रतिकांना मोठ्या श्रद्धेने लोकांनी स्विकारलेली असते. कारण या प्रतिकाबाबत जनतेमध्ये श्रद्धा असतात आणि त्याचाच वापर करून दिव्यवलयी व्यक्तिमत्त्व 'अधिमान्यता' प्राप्त करण्याचा प्रयत्न करीत असते.

**३. प्रभावी, अलौकिक व दिव्यवलयी व्यक्तीमत्त्वाद्वारे अधिमान्यता :** अधिमान्यता मिळवण्यासाठी राजकीय श्रेष्ठीजनाजवळील ज्ञान, कौशल्य, अलौकिक शक्ती काही वेळा आधार बनते. विशिष्ट परिस्थितीवर मात करून एखादा नेता किंवा समुदाय कसा लोकोपयोगी निर्णय घेतो यावरती लोक प्रभावी होतात व त्यांना अधिमान्यता देतात. लेनिन, स्टॅलीन, माओ, महात्मा गांधी, पंडीत नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इंदिरा गांधी आणि सध्याचे नरेंद्र मोदी यांनी आपल्या प्रभावी नेतृत्त्वातून आणि कार्यातून अधिमान्यता मिळवली आहे आणि सत्ताधीश झालेले आहेत. राजकीय श्रेष्ठीजनामधील असामान्य कर्तृत्व, क्षमता, ज्ञान, कौशल्य, प्रसंगावधानता इत्यादी आधार अधिमान्यता मिळवण्यासाठी पूरक ठरतात. अशा दिव्यवलयी नेत्यांचा जनमानसात आदर असतो.

**४. विवेक–विधीव्यवस्था यातून अधिमान्यता :** ज्यावेळी सत्ताधारक विवेकाच्या किंवा नैतिकतेच्या निकषावर सिद्ध होवून कार्यक्षमपणे कार्य कार्य करतो त्यावेळेस त्याचा प्रभाव जनसामान्यावर पडतो आणि त्याला अधिमान्यता मिळते. विवेकाच्या आधारावरती अधिमान्यता मिळवलेल्या व्यक्तीने कायमस्वरूपी सद्विवेकाचा वापर करावा लागतो. त्याने कायमच जनतेच्या कल्याणासाठी काय चांगले, काय वाईट, योग्य, अयोग्य याचा विचार करून कृती केली पाहिजे ही मर्यादा त्याच्यावर पडते त्याचप्रमाणे ही सत्ता संविधानिक व अन्य वैधानिक तत्त्वातून मिळते. म्हणजेच सत्ताधीशाला संविधान, कायदे या आधारावर अधिमान्यता मिळते. त्यामुळे त्याची आज्ञा, आदेश, निर्णय लोक सहजपणे पाळतात. येथे त्याला कायदेशीर किंवा संविधानातील अधिमान्यता मिळालेली असते.

**५. सांस्कृतिक मूल्ये किंवा परंपरेतून अधिमान्यता :** अधिमान्यता विशिष्ठ सांस्कृतिक मूल्यांच्या आधारे अधिमान्यता मिळवू शकते. तशीच ती समाजातील रूढी, परंपरा, संकेत या मार्गानेही प्राप्त करू शकते. सांस्कृतिक मूल्ये, श्रद्धा, रूढी, परंपरा, संकेत हे लोकांच्या भावनेशी संबंधित मूल्ये आहेत. त्यामुळे समाजातील सर्व लोक या मूल्यावर अधिक प्रेम करत असतात. त्यावर लोकांची श्रद्धा, आस्था आणि आदर असतो. त्यामुळे सत्ताधारकांनी या मूल्यांची काळजीपूर्वक जोपासना केली तर त्यांना अधिमान्यता मिळू शकते. उदा. इंग्लंडमधील राजेशाही, उमरावगृह, भारतातील भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ इत्यादींनी हिंदू प्रथा–परंपरेचा सांस्कृतिक मूल्यांचा प्रखर प्रचार आणि प्रसार केल्यामुळे आज त्यांचा भारतीय राजकारणावर प्रभाव आढळून येतो.

**६. राजकीय व्यवस्थेची कार्यक्षमता :** आधुनिक राजकीय व्यवस्थेमध्ये 'अधिमान्यता' ही सध्यकालीन राजकीय व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर, राजकीय स्थिरतेवर आणि आर्थिक–स्थितीवर अवलंबून असते. जी शासन व्यवस्था राजकीयदृष्ट्या स्थिर, कार्यक्षम, भ्रष्टाचारमुक्त, कल्याणकारी याबाबत यशस्वी झाली असेल तर ती अधिमान्यता सहजपणे प्राप्त होवू शकते. अमेरिकेची राजकीय व्यवस्था किंवा शासन राजकीयदृष्ट्या स्थिर व आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यामुळे अमेरिकेच्या व्यवस्थेला सहजपणे अधिमान्यता मिळालेली आहे. पण याच्या उलट पाकिस्तानचा विचार करता राजकीय अस्थिरता आणि लष्करी शासनाचा प्रयोग यामुळे लोकांचा राजकीय व्यवस्थेसंबंधी भ्रमनिराष झाल्यामुळे तेथील लोकांची प्रभावी अशी 'अधिमान्यता' राजकीय व्यवस्थेला मिळालेली नाही.

**७. कार्यपद्धती अधिमान्यता :** सत्ताधारक सत्ता धारण केल्यानंतर त्यांची कार्यपद्धती, निर्णय पद्धती संविधानाला व वैधानिक नियमांना धरून असेल तर लोकांची 'अधिमान्यता' सहजासहजी मिळते. रूसोने 'सर्वसाधारण ईहा' या संकल्पनेतून या अधिमान्यतेचा पुरस्कार केला आहे. त्याच्या मते, राज्यकर्त्यांच्या विशिष्ठ कृतीचा निर्णय कोणत्या पद्धतीत घेण्यात आला त्यावर त्याची अधिमान्यता अवलंबून असते. अधिमान्यतेच्या आधारे लोक सत्ता प्रतिनिधींच्या हाती सोपवित असले तरी त्यामुळे ते प्रतिनिधी सार्वभौम होवू शकत नाहीत. असा जर प्रकार घडला तर लोक त्यांची अधिमान्यता काढून घेतात. थोडक्यात, अधिमान्यता ही कार्यपद्धतीवर सुद्धा अवलंबून असते.

**८. समाजीकरणातून अधिमान्यता :** अधिसत्तेला मान्यता देण्याची मानवाची प्रवृत्ती ही जन्मसिद्ध नसते. तो जरी सामाजिक प्राणी असला तरी त्याची अधिमान्यतेची प्रक्रिया किंवा भावना ही सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून घडत असते. ही समाजीकरणाची प्रक्रिया समाजातील विविध प्रकारचे हितसंबंधी गट, व्यवसाय, संघटना, सांस्कृतिक संघटना करीत असतात व ही प्रक्रिया कायमस्वरूपी घडणारी असते. वरील घटक समाजीकरणासाठी नभोवाणी, वृत्तपत्रे, दूरदर्शन आणि डिजिटल मिडीयाचा वापर करतात. राजकीय समाजीकरणाद्वारे लोकांची राजकीय मूल्ये, दृष्टिकोन, श्रद्धा यांचे ज्ञान करून दिले जाते. अपेक्षित असे वर्तन व लोकमत घडवून आणून राजकीय व्यवस्थेला 'अधिमान्यता' मिळवून दिली जाते. थोडक्यात, समाजीकरणाच्या माध्यमातून अधिमान्यता मिळवली जाऊ शकते.

**अधिमान्यतेचा पेचप्रसंग :**

'अधिमान्यतेचे संकट' हे राजकीय, सामाजिक नेतृत्त्वावरील आत्मविश्वास कमी होणे, बेकायदेशीर, असामाजिक व दडपशाहीचे वर्तणूक किंवा दडपशाहीचे वाढते प्रमाण आणि राज्यातील प्रतिसाद देण्यासंदर्भातील राजकीय संरचनाचे, अपयशाचे प्रतिबिंब करणारे सार्वजनिक दृष्टिकोनाने निर्माण होते. ज्यावेळी अधिमान्य व्यवस्था मूलभूत मानवी गरजाकडे दुर्लक्ष करणे, कायदेशीर व्यवस्थेचा बोजबारा उडतो आणि शेवटी संबधित प्रश्नाकडे दुर्लक्ष होऊन ही परिस्थिती हाताळण्यात अधिमान्यता कमी पडते. त्यावेळी अधिमान्य ते समोर पेचप्रसंग निर्माण होवून राजकीय व्यवस्था कोसळू शकते असा विचार हेबरमास यांनी १९७३ मध्ये मांडला. जेष्ठ समाजशास्त्रज्ञ हेबरमास यांनी अधिमान्यतेचा प्रेचप्रसंगाचा अभ्यास प्रशासकिय कार्ये संस्था किंवा नेतृत्त्व यांच्या आत्मविश्वासातील घट या दृष्टिकोनातून त्याचा विस्तार केला. कोणत्याही कायदेशीर संस्था त्यांची अंतिम लक्ष्ये साध्य करण्यासाठी प्रभावी संरचना राखण्यासाठी किंवा स्थापित करण्यासाठी प्रशासकिय क्षमता नसते त्यावेळी हा पेचप्रसंग निर्माण होते असे मत मांडले. हेबरमास यांच्या नंतर लिपसेट यांनी सामाजिक परिवर्तन, सामाजिक सहभाग आणि कार्यक्षमतेचा अभाव इत्यादी कारणांच्या आधारे अधिमान्यतेचा पेचप्रसंग तयार होतो, अशी मांडणी केली आहे.

**१. सामाजिक बदल :** बदलत्या परिस्थितीला अनुसरून मनुष्य आपल्या सामाजिक संबंधात जाणीवपूर्वक बदल करत असल्यामुळे सामाजिक परिवर्तन घडते. मानवाची जगण्यासाठी सतत धडपड सुरू असते. त्यासाठी तो प्रयत्नपूर्वक पर्यावरणाशी जुळवून घेवून स्वत:मध्ये परिवर्तन करत असतो. म्हणजेच बदलत्या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधातील बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते. त्यामुळे समाज गतिमान होतो. अशा गतिमान बदलत्या समाजाबरोबर राजकीय बदल घडून येणे अपेक्षित असते. पण अशावेळी समाजातील राजकीय श्रेष्ठीजन, सत्ताधारक प्रस्थापित गटाला अशी भीती वाटत असते कि, या समाजातील राजकीय स्थित्यंतरामुळे आपली सत्ता, पद, प्रतिष्ठा धोका पोहचून आपल्याला राजकीय व्यवस्थेत प्रवेश मिळणार नाही. अशी भिती त्यांना वाटत असल्यामुळे ते नव्या सामाजिक परिवर्तनाला विरोध करतात. त्यामुळे अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होतो. असा विचार जीन ब्लाँडेल यांनी मांडला. अशा प्रकारचे क्रायसिस भारत, अमेरिका, चीन व पाकिस्तान मध्ये निर्माण झालेले दिसतात.

**२. राजकीय सहभागाची समस्या :** बाढत्या प्रमाणात लोकांचा सहभाग राजकीय प्रक्रियेमध्ये होणे, हे आधुनिक व्यवस्थेचे ठळक वैशिष्ठ आहे. रॉबर्ट-डहाल यांच्या मते, राजकीय सहभागात पुढील चार वर्गाचा समावेश होतो. १) सत्ताधारी वर्ग, २) सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग, ३) राजकारणात आवड असलेला वर्ग, ४) राजकारणात उदासिन वर्ग होय. असे वर्गीकरण करून रॉबर्ट डहाल यांनी राजकीय सहभागाची संकल्पना मांडली असली तरी आधुनिक राजकीय व्यवस्थेत सत्ताधारी वर्ग किंवा सत्तेसाठी प्रयत्न करणारा वर्ग हा समाजातील अल्पसंख्य, दुर्बल, कमकूवत गटांना राजकीय सत्तेपासून दूर ठेवले जाते, त्यांना सत्तेतत सामावून घेतले जात नाही किंवा राजकीय प्रक्रियेत त्यांना प्रवेश नाकारला जातो. त्यावेळी अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होतो, असे लिपसेट यांचे मत होते. हा असंतुष्ट गट क्रांतीचा मार्ग स्विकारून व्यवस्थेला धक्का पोहचवण्याचा धोका असतो. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निमाण होवू शकतो. त्यामुळे सत्ताधाऱ्यांनी 'सर्वसमावेशक राजकीय सहभागाची प्रक्रिया राबवणे गरजेचे आहे. त्यामुळे व्यवस्थेला धोका कमी होवून 'अधिमान्यतेची समस्या' होणार नाही.

**३. कार्यक्षमतेचा अभाव :** समाजशास्त्रज्ञ हेबरमास आणि लिपसेट यांनी सांगितले आहे कि सत्ताधारी कोणही असो उदा. राजकीय श्रेष्ठीजन, प्रशासकीय अधिकारी, इत्यादींनी परिस्थितीनुसार येणाऱ्या समस्या संकटे यांचे निराकरण कार्यक्षमपणे समर्थपणे केले तर त्यांना अधिमान्यतेचा प्रश्न निर्माण होत नाही. पण युद्ध, आर्थिक अस्थिरता, दारिद्र्य, बेकारी इत्यादी समस्याबाबत जर राजकीय व्यवस्थेने किंवा राजकीय श्रेष्ठीजनांनी याचे निराकरण योग्य प्रकारे केले नाही तर अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण होऊ शकतो. बेजबाबदारपणा, अकार्यक्षमता, नाकर्तेपणासारख्या राज्यकर्त्यांच्या वर्तनामुळे सामान्य जनतेला त्याचे वाईट परिणाम भोगावे लागतात. अशावेळी जनता त्या राजकीय व्यवस्थेचा किंवा राजकीय श्रेष्ठीजनांचा पाठिंबा काढून घेतात. सहाजिकच त्यावेळी अधिमान्यता धोक्यात येते. त्यासाठी कार्यक्षमतेचा अभाव हा 'अधिमान्यतेचा पेचप्रसंग निर्माण करण्यास कारणीभूत ठरतो' असे मत लिप्सेट यांनी मांडले.

### ४.२.३.२ स्वयं अध्ययन प्रश्न :

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अधिमान्यता म्हणजे काय?

२. एस. एम. लिप्सेट यांनी कोणत्या मासिकात अधिमान्यतेची संकल्पना स्पष्ट केली?

३. 'Political Man' हा ग्रंथ कोणी लिहिला?

४. लेतिटीमसी (Legitimacy) हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे?

५. अधिमान्यतेचा एक आधारभूत घटक सांगा.

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

**१) राजकीय विश्लेषण :** राजकीय सिद्धांताचे नवीन स्वरूप

२) **राजकीय सत्ता :** इच्छेनुसार बदल करण्याची क्षमता

३) **व्यक्तीसापेक्ष :** व्यक्ती व्यक्तीनुसार बदलणारी

४) **परिस्थिती सापेक्ष :** विशिष्ट परिस्थितीनुसार निर्माण होणारी

५) **सत्ताधारी :** ज्याच्या हातात सत्ता आहे, अशी व्यक्ती किंवा गट

६) **भ्रामक :** अस्तित्वात नसलेली

७) **अमिष सत्ता :** कोणतेतरी लालूच दाखवून निर्माण केलेली सत्ता

८) **मनोविश्लेषणवाद :** मानसशास्त्रातील एक आधुनिक दृष्टिकोण

९) **प्रतिकात्मक :** विशिष्ठ प्रतिकावर आधारित

१०) **वैधानिक :** कायदेशीर

## ४.४.१ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

४.२.४ **(अ)** १) राजकीय सत्तेचा, २) सत्ता, ३) चार्लस मेरियन, ४) जॉर्ज कॅटलीन, ५) तीन, ६) सिग्मन फ्रॉईड, ७) ॲरिस्टॉटल, ८) ऑगस्ट काम्त, ९) हर्बर्ट स्पेन्सर, १०) व्यक्तीस्वातंत्र्य, ११) चार्लस् मरियन, १२) लोकमत.

४.२.२.२ **(अ)** १) Auctor (ऑक्टर), २) अधिसत्ता, ३) अधिसत्ता, ४) प्रतिकात्मक, ५) धर्म-परंपरा-रूढी, ६) संविधानाची, ७) तीन, ८) विलफ्रेडो परेरो, ९) कार्ल मार्क्स.

४.२.२.३ **(अ)** १) सत्ताधारकांना जनतेची भावना असणे म्हणजे अधिमान्यता होय.

२) Political Science Review `ा मासिकात.

३) एस. एम. लिपसेट

४) 'Legitimus' या लॅटीन शब्दापासून

५) विचारसरणी, व्यक्तिमत्त्व, रूढी, परंपरा संकेत.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा.**

१) राजकीय सत्तेचा अर्थ

२) राजकीय सत्तेचा मार्क्सवादी दृष्टिकोन

३) अधिसत्तेचा अर्थ

४) दिव्यवलयी अधिसत्ता

५) अधिमान्यतेचा आधार-विचारसरणी

६) मार्क्सचा वर्गसंघर्ष सिद्धांत

**ब) सविस्तार प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१) राजकीय सत्तेचा अर्थ सांगून राजकीय सत्तेचे प्रकार स्पष्ट करा.

२) राजकीय सत्तेचा उदारमतवादी लोकशाही सिद्धांत स्पष्ट करा.

३) अधिसत्ता म्हणजे काय? अधिसत्तेचे प्रकार स्पष्ट करा.

४) अधिमान्यता म्हणजे काय? अधिमान्यतेचे आधारभूत घटक स्पष्ट करा.

५) राजकीय सत्तेचा समाजशास्त्रीय सिद्धांत स्पष्ट करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


| | | |
|---|---|---|
| १) डेव्हीड इस्टन | : | ‘The Decline of Modern Political Theory', The Journal of Politics, 1 Feb, 1951 |
| २) जे एस. मिल. | : | ‘Utilitarianlism', London Parkar Son & Brown, 1863. |
| ३) डॉ. भा. ल. भोळे | : | राजकीय सिद्धांत आणि संकल्पना, पिंपळापुरे. (१९८६) |
| ४) वा. भा. पाटील | : | राजकीय सिद्धांत, प्रशांत, जळगाव. (२०१५) |
| ५) व्होरा आणि पळशीकर | : | राज्यशास्त्र कोष, दास्ताने प्रकाशन, नागपूर. (१९८७) |
| ६) जे. एस. मिल | : | स्वातंत्र्याविषयी |
| ७) राम बापट | : | कार्लमार्क्सचा विचार |
| ८) प्रा. बी. बी. पाटील | : | राजकीय सिद्धांत, फडके प्रकाशन, कोल्हापूर. |
| ९) तिजारे, पेशवे | : | आधुनिक राजकीय सिद्धांत, मंगेश, नागपूर. (१९७९) |
| १०) चि. ग. घांग्रेकर | : | राज्यशास्त्र सिद्धांत आणि राजकीय विचार, मंगेश नागपूर. (१९९४) |
| ११) डॉ. विजय देव | : | राजकीय विश्लेषण कोष, डायमंड, पुणे. (१९८८) |
| १२) Varma, S. P. | : | "Modern Political Theory', Vikas, N. Delhi. (1975) |


❍❍❍

घटक १

# स्त्रीवाद

## (Feminism)

---

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

 १.२.१ स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप

 १.२.२ स्त्रीवादाचा उगम आणि विकास

 १.२.३ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये

 १.२.४ स्त्रीवादाचे सिध्दांत

 १.२.४.१ उदारमतवादी स्त्रीवाद

 १.२.४.२ मार्क्सवादी स्त्रीवाद

 १.२.४.३ जहाल स्त्रीवाद

 १.२.४.४ भारतीय स्त्रीवाद

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकात आपण 'स्त्रीवाद' (Feminism) या संकल्पनेचा अभ्यास करणार आहोत. या घटकाच्या अभ्यासांती आपणास,

१) स्त्रीवादाचा अर्थ, उगम आणि विकास समजून घेता येईल.

२) स्त्रीवादाची वैशिष्टे आणि स्त्रीवादाचे विविध मतप्रवाह (सिद्धांत) समजून घेता येतील. स्त्रीवादातील विविध मतप्रवाहामधील परस्परसंबंध स्पष्ट होतील.

## १.१ प्रास्ताविक :

मागील (पाचव्या) सत्रात आपण राजकीय सिद्धांताचा अभ्यास केला आहे. या सत्रात आपण राज्यशास्त्रातील आधुनिक संकल्पनांचा (Modern Political Concepts) अभ्यास करणार आहोत. यातील बहुतांश संकल्पनांचा विकास हा पाश्चात्य देशामध्ये झालेला आहे. १९ व्या आणि २० व्या शतकामध्ये तसेच चालू (२१ व्या) शतकामध्ये अनेक नवनवीन राजकीय मतप्रवाह निर्माण झाले. यातून नवीन राजकीय संकल्पनांचा उगम व विकास होत गेला. यातील स्त्रीवाद, बहुसंस्कृतीवाद, पर्यावरणवाद आणि नागरी समाज या काही प्रमुख संकल्पनांचा राज्यशास्त्राच्या दृष्टिकोनातून आपण पुढील चार घटकामध्ये अभ्यास करणार आहोत.

या घटकात आपण 'स्त्रीवाद' समजावून घेणार आहोत. 'स्त्रीवाद' ही बहुआयामी संकल्पना आहे. एका विशिष्ट व्याख्येतून ती शब्दबद्ध करणे कठीण काम आहे. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर खऱ्या अर्थाने 'स्त्रीवादाला' चालना मिळाली. १९६० नंतर 'स्त्रीवादी चळवळ' आणि 'स्त्रीवादी साहित्य' अशा दोन पातळीवर स्त्रीवादाचा विकास होत गेला. स्त्रीवादाबाबतचे अनेक नवीन सिद्धांत २० व्या शतकात मांडले गेले. चालू शतकातील दोन दशकात स्त्रीवादाच्या चळवळीचे स्वरूप अधिक व्यापक झालेले दिसून येते. जागतिकीकरणाचा परिणाम स्त्रीवादाच्या चळवळीवर झालेला दिसून येत आहे.

## १.२ विषय-विवेचन :

### १.२.१ स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप :

स्त्रीवादाच्या अर्थाबाबत विचारवंतामध्ये एकमत आढळत नाही. त्यामुळे स्त्रीवाद याचा अर्थ काळपरत्वे, देशपरत्वे, व्यक्तीपरत्वे बदलतो. स्त्रीवादामध्ये पुढील मुद्यांचा अंतर्भाव होतो.

- स्त्री-पुरुष समानता हे अंतिम ध्येय असे मानणारा विचार होय.
- स्त्रीयांवर 'स्त्री' म्हणून होणाऱ्या अन्यायाला प्रतिकार करणारी चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय.
- स्त्री केंद्रीत समाजव्यवस्था आणण्यासाठी कार्यरत असणारी चळवळ होय.
- सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात स्त्री-पुरुष विषमतेला विरोध करणारी विचारसरणी.

पुरुषांपासून फारकत घेऊन स्त्रीने आपला स्वतंत्र सुभा निर्माण करणे म्हणजे स्त्रीवाद नव्हे, तर स्वत:च्या

सामर्थ्याचा शोध घेऊन आपल्या विकासासाठी पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून जीवन जगण्याचे स्त्रीवाद समर्थन करतो. पितृसत्ताक समाजव्यवस्थेने प्रस्तापित केलेली परंपरा मोडून स्त्रीयांचा विकासाचा मार्ग चोखाळणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद स्त्री आणि पुरुष यांच्यातील सामाजिक भेद नाकारतो, स्त्रीवाद्यांच्या मते, स्त्री आणि पुरुष यांच्यात केवळ 'लिंग भेद' (Sex Discrimination) आहे, 'सामाजिक लिंग भेद' (Gender Discrimnation) नाही.

पुरूषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला देवता किंवा दासी मानले गेले आहे. सामाजिक संकेत आणि मूल्यांच्या नावाखाखली तिला 'माणूस' म्हणून स्थान नाकारण्यात आले आहे. तिच्यातील मानवत्व नाकारून तिला वस्तुरूप दिले आहे. स्त्रीला गुलाम म्हणूनच वागविणे कसे योग्य आहे, याचे उदात्तीकरण करण्यात आले आहे. स्त्री शोषणास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या सामाजिक लिंगभेदाच्या (Gender iscrimination) विरुद्धची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय.

स्त्रीवाद म्हणजे केवळ स्त्री हक्कांचे समर्थन नव्हे तर स्त्रीची 'स्त्री' अशी ओळख निर्माण करून देणे म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीचे कुटुंबातील स्थान स्वत:च्या शरीरावरील हक्क आणि राजकीय, सामाजिक, शैक्षणिक इ. क्षेत्रातील समानता मिळविण्यासाठी स्त्रीयांनी दिलेला संघर्ष म्हणजे 'स्त्रीवाद' होय. या विचारसरणीचा मानस स्त्री-पुरुष विषमतेवर आधारित असणारे हे जग बदलण्याचा आहे. थोडक्यात, स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट करून किंवा समानता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने मांडलेला विचार आणि कृती कार्यक्रम म्हणजे स्त्रीवाद होय. हा विचार स्त्री-पुरुष यांच्यात विषमता आहे आणि स्त्रीयांना दुय्यम वागणूक दिली जाते, या गृहीतकावर आधारित आहे.

**व्याख्या :**

'स्त्रीवाद' (Feminism) समजावून घेण्यासाठी 'स्त्रीवाद' या संकल्पनेच्या काही व्याख्या अभ्यासने आवश्यक आहे.

१) वेबस्टर शब्दकोषानुसार, ''पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना राजकीय हक्क असणे म्हणजे स्त्रीवाद होय.'

२) एनसायक्लोपिडिया ब्रिटानिका नुसार, ''स्त्री-पुरुष यांच्यातील सामाजिक, आर्थिक व राजकीय समानता याबाबतचा विश्वास म्हणजे स्त्रीवाद होय.''

३) थॉम्पसन यांच्या मते, ''स्त्रीवादाचा उद्देश पुरुषी वर्चस्वाची वास्तविकता उघड करणे आणि स्वत:ला माणूस म्हणून मान्यता मिळावी, यासाठी स्त्रीयांच्या जगातील झगडा आहे.''

४) विद्युत भागवत यांच्या मते, ''स्त्रीवाद ही संकल्पना स्त्रीयांच्या समस्यासंबंधीची सर्वसमावेशक अशी मांडणी आहे.''

५) विद्या बाळ यांच्या मते, ''स्त्रीवर केवळ ती स्त्री आहे म्हणून लादलेल्या बंधनापासून स्त्रीयांची मुक्ती करणे म्हणजे स्त्रीवाद होय.''

### १.२.२ स्त्रीवादाचा उगम आणि विकास :

स्त्री जीवनाचा इतिहास पाहिला तर असे दिसून येते की, स्थिर कृषी संस्कृतीपासून पुरुषप्रधान समाजव्यवस्था अस्तित्वात येईपर्यंत स्त्रीला मौन स्थान दिलेले होते. तिचे कार्य 'चूल आणि मूल' इतके मर्यादित होते. पुरुषांच्या अधिपत्याखाली राहून तिने घर सांभाळावे, त्याच्या मर्जीप्रमाणे आपले जीवन कंठावे. अशा प्रकारची धारणा रूढ होती. या अवस्थेत स्त्रिला एक उपभोग्य वस्तू म्हणून (व्यक्ती म्हणून नव्हे) पाहिले जात होते. तिचा बौद्धिक आणि मानसिक विकास होऊ दिला नाही. अशा अवस्थेतून स्त्रीला मुक्त करण्यासाठीचा जो विचार पुढे आला, त्यातूनच स्त्रीवादाचा जन्म झाला.

१९६० नंतर 'स्त्रीवाद' फक्त विचारसरणी म्हणून पुढे आली. अर्थात, स्त्रीवादात अभिप्रेत असणारा स्त्री-पुरुष समानतेचा विचार गेल्या ३०० वर्षात हळूहळू उत्क्रांत झाला आहे. ढोबळपणे स्त्रीवादी विचारांचा विकासाचा अभ्यास तीन टप्प्यात केला जातो.

**१. स्त्रीवादी चळवळीचा पहिला टप्पा :**

१९२० पूर्वीच्या स्त्रीवाद चळवळीला पहिल्या टप्प्यातील चळवळ म्हणून अभ्यासावी लागते. याची सुरवात १८ व्या शतकाच्या शेवटी झाली. मेरि कुलस्टोन क्राप्ट यांनी 'दि व्हिंडीकेशन ऑफ राईटस ऑफ वुमेन' (१७९२) (The Vindication of Rights of Women) या ग्रंथातून स्त्रीयांवरील अन्यायाला वाचा फोडली. त्यांनी या ग्रंथातून स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने सक्षम आहेत, त्यांना देखील विवेकबुद्धी (ठशरीप) आहे, हे ठासून सांगितले. स्त्रीया पुरुषांपेक्षा बौद्धिक आणि शारीरिकदृष्ट कमजोर असतात, हा विचार त्यावेळी प्रमाण मानला जात होता.

ग्रीक तत्त्ववेत्ता ॲरिस्टॉटल, अमेरिकेचे पहिले अध्यक्ष थॉमस जेफरसन आणि थोर शास्त्रज्ञ चार्लस डार्विन यांनी स्त्रीयांना बौद्धिक आणि शारीरिक कारणावरून त्यामुळे पुरुषांच्या बरोबरीने वागणूक देता येणार नाही, असे विचार मांडले होते. परिणामत: सार्वजनिक क्षेत्रात काम करण्यास स्त्रीया सक्षम नसतात, हा विचार त्या काळात प्रमाण मानला जात होता. मेरि वुलस्टोनक्राप्ट यांनी हा विचार खोदून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला. यातून प्रेरणा घेवून १८४८ साली अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे महिलांच्या हक्कासाठी पहिली परिषद भरविण्यात आली. यास 'सेनिका फॉल्स कनव्हेन्शन' असे म्हणतात. या परिषदेत स्त्रीयांना नागरिक म्हणून नाकारले गेलेले हक्क आणि दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक या विरोधात आवाज उठविला गेला.

१८४८ पासून १९२० पर्यंत अमेरिका व युपरोपमध्ये स्त्रीयांना पुरुषांच्या प्रमाणे नागरी हक्क मिळावेत. विशेषत: मताधिकार मिळावा यासाठी अनेक चळवळी झाल्या. या चळवळींना 'सफ्रजेट' चळवळी म्हटले जाते. (Suffrage सफरेज म्हणजे मताधिकार) या काळातील स्त्रीवादी चळवळीतील लोकांचा असा विश्वास होता की, स्त्रीयांना पुरुषांप्रमाणे मताधिकार मिळाल्यास स्त्री-पुरुष समता प्रस्थापित होईल. फ्रेंच आणि अमेरिकन राज्यक्रांतीने 'स्वातंत्र्य, समता आणि बंधूता' या लोकशाही मूल्यांचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला होता. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीला पोषक वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे सर्वप्रथम १८९३ साली न्यूझिलंडमध्ये त्यानंतर १९१८ साली इंग्लंडमध्ये आणि १९२० साली अमेरिकेमध्ये स्त्रीयांना मताधिकार देण्यात आले.

या कालखंडात उदारमतवादी स्त्रीवादासोबत समाजवादी (मार्क्सवादी) स्त्रीवादाचा विचार मांडला जात होता. पूर्व युरोप व रशियात हा विचार पुढे आला. उपेक्षित वर्गातील महिलांचे प्रश्न मांडण्याचा प्रयत्न २० व्या शतकाच्या प्रारंभी झाला.

या कालखंडातील बहुतांश स्त्रीवादी परंपरावादी होते. त्यांची मागणी स्त्रीयांवरील होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडणे, स्त्रीयांना पुरुषांप्रमाणे अधिकार व नागरी हक्क मिळविणे, स्त्री-पुरुष समानतेला अडथळा करणाऱ्या कायद्यांना विरोध करणे, स्त्रीयांवरील अवाजवी बंधनांना विरोध करणे, यापुरती मर्यादित होती. या टप्प्यातील स्त्रीवादी चळवळ अमेरिका, इंग्लंड, नेदरलँड, कॅनडा इत्यादी पाश्चात्य देशांपुरती मर्यादित होती.

**२. स्त्रीवादी चळवळीचा दुसरा टप्पा :**

स्त्रीवादी चळवळीचा दुसरा टप्पा का सुरू झाला? या प्रश्नाचे उत्तर प्रथम शोधावे लागेल. पहिल्या टप्प्यात स्त्रीयांना वाटत होते की, पुरुषांच्या बरोबरीने नागरी हक्क व मताधिकार मिळाल्यामुळे स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होईल. परंतु तसे काही झाले नाही. स्त्रीयांना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात दुय्यम वागणूकच मिळत गेली. याला प्रतिकार करणारे दोन मतप्रवाह १९२० नंतर उदयास आले. त्यातील एकमत प्रवाह उदारमतवादी होता. दुसरा जहालवादी मतप्रवाह होता. उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रीयांच्या राजकीय व कायदेशीर समानतेप्रमाणे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात समानतेची मागणी पुढे चालू ठेवली. स्त्रीयांना केवळ शिक्षिका, नर्स इत्यादी क्षेत्रात संधी दिली जात होती. उदारमतवादी स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्यांनी स्त्रीयांना देखील डॉक्टर, इंजिनियर, उद्योग इत्यादी क्षेत्रात संधी मिळाली पाहिजे, अशी मागणी केली.

याच टप्प्यात जहाल स्त्रीवादी गटाने स्त्रीयांच्या विरोधातील दमणकारी (अीिशीीशव) पद्धतींना प्रखर विरोध केला. १९६८ ते १९८० हा काल जहाल स्त्रीवादी चळवळींचा कालखंड म्हणून ओळखला जातो. अमेरिका सुंदरी स्पर्धेला १९६९ साली जहाल स्त्रीवाद्यांनी विरोध केला. त्यांच्या मते, अशा स्पर्धा स्त्रीला एक व्यक्ती म्हणून नव्हे तर वस्तू म्हणून दाखविण्याचे माध्यम आहे.

अमेरिकेतील बेटी फ्रिडन यांनी 'फेमिनाईन मिस्टीक' (१९६३) या पुस्तकातून महिलांचा सार्वजनिक क्षेत्रातील सहभाग खूपच कमी, किंबहुना नसल्यात जमा आहे, हे स्पष्ट केले. महिलांना सर्व क्षेत्रात संधी मिळाली पाहिजे यासाठी आग्रही भूमिका मांडली. त्यांनी अमेरिकेस लिंग आधारित भेदभाव बेकायदेशीर ठरवावा, अशी मागणी केली. अद्याप अमेरिकेत असा कायदा नाही.

गर्भपात करण्याचा अधिकार, मुलांना जन्म देण्याचा अधिकार, कुटुंब व विवाहविषक अधिकार याबाबत महिलांना स्वातंत्र्य असावे इत्यादी मागण्या या काळात करण्यात आल्या. घटस्फोटाच्या कायद्यातील भेदभाव विरोधी चळवळीचा हा कालखंड होता. या काळात कर्मठ, पितृकेंद्री आणि पुरुषधर्जिणे कायदे व परंपरांना विरोध केला गेला. या काळात स्त्रीवादी चळवळीची व्याप्ती जगभर पसरली.

केवळ कायदे करून स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित होणार नाही. यासाठी प्रखर चळवळ करून सामाजिक

परिवर्तन केले पाहिजे, हा विचार पुढे आला. प्रस्थापित समाजातील तत्त्वज्ञान सिद्धांत, संकल्पना सर्व पुरुषप्रधान समाजाने निर्माण केल्या आहेत. त्या सर्व झुगारून नवीन तत्वज्ञान, सिद्धांत व संकल्पना विकसित केल्या पाहिजेत, अशी मांडणी या काळातील जहाल स्त्रीवादी विचारवंतांनी केली. सिमॉन दि बोव्हा यांनी 'दि सेकंड सेक्स' (१९४९) या पुस्तकातून स्त्री समस्यांची मांडणी केली. स्त्री-पुरुष विषमता ही व्यापक समस्या असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. पितृसत्ताक व्यवस्थेत स्त्रीयांना दुय्यम स्थान दिले जाते, यावर प्रहार केला. त्याप्रमाणे केट मिलेट यांनी 'सेक्सुअल पॉलिटीक्स' या पुस्तकातून समाजाचा स्त्रीविषयक मानसिक दृष्टिकोन कसा आहे, यावर प्रकाश टाकला आहे.

त्यामुळे या टप्प्यातील स्त्रीवादी चळवळीला जहाल स्त्रीवादी चळवळ असे संबोधले जाते.

**३. स्त्रीवादी चळवळीचा तिसरा टप्पा :**

१९९० नंतर स्त्रीवादी चळवळीचा तिसरा टप्पा सुरू होतो. वसाहतवाद आणि साम्यवाद यांचा शेवट आणि मुक्त अर्थव्यवस्थेची सुरवात अशा काळात स्त्रीवाद विषयक नवीन दृष्टिकोन विकसित झाला. या काळात 'स्त्री स्वातंत्र्य' किंवा 'स्त्री मुक्ती' या संज्ञांचा अर्थ व्यक्तीसापेक्ष आणि स्थलसापेक्ष असावा, असा विचार पुढे आला.

'जगातील सर्व महिलांचे प्रश्न एकसारखे नाहीत' या गृहित तत्त्वावर स्त्रीवादाचा तिसरा टप्पा आधारित आहे. कारण भारतीय महिलांचे प्रश्न, चीनी महिलांचे प्रश्न, मुस्लीम जगतातील महिलांचे प्रश्न व पाश्चात्य जगातील महिलांचे प्रश्न एकाच मोजपट्टीने मोजल्यास योग्य होणार नाही. त्याचप्रमाणे भारतातील दलीत महिलांना पुरुष व जातीव्यवस्था या दोन्हींच्या अन्यायाला विरोध करावा लागतो. त्याचप्रमाणे काळा-गोरा भेदभाव निग्रो महिलांना सहन करावा लागतो. त्यामुळे प्रत्येक स्त्रीला तिच्या स्वातंत्र्याची व्याख्या करण्याची मुभा असावी. 'स्वातंत्र्य' आणि 'समता' या संकल्पना सापेक्ष आहेत.

या टप्प्यात जगातील विविध देशातील विविध स्त्रीवादी विचार पुढे आले. दलित स्त्रीया, वर्णभेद पिडीत स्त्रीया यांचे प्रश्न 'प्रस्थापित' स्त्री वर्गापेक्षा जास्त गंभीर आहेत. प्रगत पाश्चात्य देशाप्रमाणे आशिया आणि आफ्रिका खंडातील स्त्रीयांना देखील त्या त्या समाजातील परिस्थितीनुसार पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य मिळाले पाहिजे.

तिसरा किंवा चालू काळातील स्त्रीवादाला जागतिकीकरणाची व माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीची जोड मिळाली आहे. त्यामुळे स्त्रीयांवरील अन्यायाला आता जागतिक पातळीवर मांडणे सोपे झाले आहे. समाज माध्यमांच्या मुळे अनेक देशातील महिला सहजपणे एकत्र येत आहेत व महिलांच्या प्रश्नांची मुक्त चर्चा करत आहेत. समलिंगी संबंधांना लोकमान्यता मिळावी, लिव इन रिलेशनशीप सारख्या गोष्टीचा स्विकार व्हावा, असा विचार पुढे येत आहे.

या टप्प्यातील स्त्रीवादी चळवळीला अमेरिकेत गर्ल स्त्रीवाद (Girl Feminism) म्हणतात तर युरोपमध्ये नव स्त्रीवाद (New Feminism) असे म्हणतात. यामध्ये वांशिक व धार्मिक मुलतत्त्ववादांचा स्त्रीया कशा बळी

पडतात, या विरोधात आवाज उठविला जात आहे. तिसऱ्या टप्प्यातील स्त्रीवादी चळवळीबाबत विविध मतप्रवाह पहावयास मिळतात. याबाबत एकमत दिसून येत नाही.

अशा प्रकारे स्त्रीवादाच्या चळवळीच्या पहिल्या टप्प्यात स्त्रीविरोधी कायदे व परंपरा यांच्याविरोधी चळवळी झाल्या. दुसऱ्या टप्प्यात पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना सर्व नागरी व राजकीय हक्क मिळावेत यासाठी प्रयत्न झाले. तिसऱ्या टप्प्यामध्ये स्त्री स्वातंत्र्याचा व्यक्तीकेंद्रीत विचाराला महत्त्व प्राप्त झाले. त्यामुळे स्त्रीवादाचे स्वरूप बदलत गेल्याचे दिसून येते.

### १.२.३ स्त्रीवादाची वैशिष्ट्ये :

स्त्री व पुरुष या दोन घटकांनी बनलेल्या मानवी समाज व्यवस्थेत या दोन्ही घटकात समानत्व नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेने स्त्रीला गौण स्थान दिले आहे. या व्यवस्थेला स्त्रीवादाने आव्हान दिले आहे. डॉ. रचना माने यांनी या स्त्रीवादाची पुढील वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत.

१. स्त्रीवाद ही कृतीशिलतेची अपेक्षा असणारी विचारसरणी आहे.

२. स्त्रीयांची, स्त्रीयांच्या हितसंबंधाचा विचार करणारी विचारप्रणाली आहे.

३. स्त्रीवादाने पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषी राजकारण उघड केले.

४. स्त्रीवादाने पुराण धर्मग्रंथातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाला आव्हान दिले.

५. स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारून तिला माणूस म्हणून ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न स्त्रीवादाने केला.

६. स्त्रीवादाने ज्ञान परंपरा, साहित्य परंपरा, भाषा, शिक्षण, धर्म, कला, कायदा, आध्यात्म, नीतिव्यवस्था या घटकांचे स्त्रीच्या दृष्टिकोनातून पुनर्वाचन/पुनर्मूल्यांकन केले. प्रत्येक घटकाकडून नव्या परिप्रेक्षातून पाहिले.

७. स्त्रीवादाने सामाजिक लिंगभेद (Gender Discrimination) नाकारला.

८. पुरुषप्रधान व्यवस्थेतील पुरुषकेंद्री विचारप्रक्रियेमुळे समाजरूपी वर्तुळाच्या परिघावर राहिलेल्या स्त्रीला केंद्रस्थानी आणण्यासाठी लढा दिला.

९. व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या ध्यासातून उदयास आलेल्या या विचारसरणीला मानवतावादाचे, समतावादाचे अधिष्ठान आहे.

### १.२.४ स्त्रीवादाचे सिध्दांत :

स्त्रीवादाकडे पाहण्याच्या दृष्टीकोनातून स्त्रीवादविषयक विविध सिध्दांत अस्तित्वात आले आहेत. त्यापैकी कांही प्रमुख सिध्दांत म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद इत्यादी.

### १.२.४.१ उदारमतवादी स्त्रीवाद :

उदारमतवादी विचारसरणीचा उदय प्रथम युरोप खंडात १८ व्या शतकात झाला. प्रत्येक व्यक्तीला विचार स्वातंत्र्य हवे असे उदारमतवाद मानतो. व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीप्रतिष्ठा ही उदारमतवादाची दोन महत्त्वाची मूल्ये आहेत. ''माणूस हा विवेकशील प्राणी आहे'' (Man is a rational animal) या गृहितकावर उदारमतवादाचे तत्त्वज्ञान आधारित आहे. उदारमतवाद सार्वजनिक जीवनात 'व्यक्तीचे हित', 'व्यक्तीचे स्वातंत्र्य' व 'व्यक्तीची प्रतिष्ठा' यांना महत्त्वाचे स्थान देतो. त्यामुळे व्यक्तीवर समाजाला किंवा राज्यव्यवस्थेला अवाजवी बंधने घालता येणार नाहीत. सार्वजनिक हितासाठी व्यक्ती स्वातंत्र्यावर काही मर्यादा असू शकतात. परंतु, खाजगी जीवनात व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य असावे असे उदारमतवाद मानतो.

१८ व्या आणि १९ व्या शतकात कांही उदारमतवादी विचारवंतांनी स्त्री-स्वातंत्र्याचा देखील पुरस्कार केला. पुरुषांप्रमाणे स्त्रीयांना देखील व्यक्तीस्वातंत्र्य असले पाहिजे असे मानणारा विचार म्हणजे उदारमतवादी स्त्रीवाद होय. स्वातंत्र्य, समता, व्यक्तीप्रतिष्ठा ही मूल्ये स्त्रीयांनादेखील लागू पडतात असे उदारमतवादी स्त्रीवाद मानतो.

समाजातील स्त्रीच्या दुय्यम स्थानाबद्दल आणि तिला नाकारण्यात आलेल्या स्वातंत्र्याच्या विरुध्द काही विचारवंतांनी आवाज उठविला. त्यापैकी काही निवडक उदारमतवादी स्त्रीवादी विचारवंत पुढीलप्रमाणे:-

मेरी वोल्स्टोनक्राफ्ट यांनी 'ए विंडिकेशन ऑफ दि राईटस् ऑफ वुमेन, १७९२' या आपल्या ग्रंथात स्त्रीवादाची मांडणी केली आहे. पुरुष हा विचारप्रधान, विवेकी आणि धाडसी असतो; याउलट स्त्री ही भावनाप्रधान, अविवेकी आणि नाजूक असते, हा पारंपरिक विचार त्यांनी नाकारला. स्त्री देखील पुरुषांप्रमाणे विवेकी आणि विचारक्षम असून तिलादेखील पुरुषांप्रमाणे स्वातंत्र्य आणि सर्व नागरी अधिकार मिळाले पाहिजेत. स्त्रीयांच्या गुलामगिरीविरुध्द तिने आवाज उठविला. इंग्लंडमधील रक्तविरहित क्रांतीने (१६८८) आणि फ्रेंच राज्यक्रांतीने (१७८९) देऊ केलेले हक्क आणि स्वातंत्र्य स्त्रीयांना देखील मिळाले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. शिक्षण आणि विकासाची संधी दिल्यास स्त्रीयादेखील पुरुषांप्रमाणे आपली क्षमता सिध्द करू शकतात असा त्यांचा दावा आहे.

जॉन स्टुअर्ट मिल याने 'सब्जेक्शन ऑफ वुमेन' (१८६९) या पुस्तकाद्वारे स्त्रीयांना मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीचा प्रश्न ऐरणीवर आणला. कुटुंब संस्थेमध्ये स्त्रियांच्या पारंपरिक भूमिकांचे (माता-पत्नी-गृहिणी) खूपच उदात्तीकरण केले जाते. स्त्रीच्या व्यक्तीमत्त्व विकासाला आणि स्वातंत्र्याला बाधक ठरणाऱ्या विवाहसंस्था व कुटुंबसंस्था यावर त्याने भाष्य केले आहे. या संस्था स्त्री स्वातंत्र्य नाकारतात, त्यामुळे स्त्रीयांना गुलामगिरीचे जीवन जगावे लागते. स्त्रीमधील विविध क्षमतांना संधी नाकारली जाते. त्यामुळे स्त्रीयांचा विकास खुंटला आहे.

फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉ द बोवुवा यांनी 'दि सेकेंड सेक्स' (१९४९) या ग्रंथातून स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. तिने Sex व Gender या दोन शब्दातील अंतर स्पष्ट केले आहे. तिच्या मते, स्त्री

आणि पुरुष यांच्यात केवळ जैविक लिंगभेद (Sex Discrimination) नैसर्गिक आहे. परंतु सामाजिक लिंगभेद (Gender Discrimination) समाजनिर्मित आहे. समाजातील लिंगभेद (Gender Discrimination) नष्ट करून स्त्रीला माणूस म्हणून वागणूक मिळाली पाहिजे. स्त्रीत्व केवळ जैविक नसून ते समाजात घडविले जाते असे मत बोवुवा यांनी व्यक्त केले आहे. पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेल्या मूल्यव्यवस्थेत स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थानच दिलेले नाही. त्यामुळे अशा समाजाची बंधने झुगारून स्त्रीयांनी स्वातंत्र्य मिळविले पाहिजे.

दुसऱ्या जागतिक महायुध्दानंतर बेटी फ्रेडन यांनी 'दि फेमिनाईन मिस्टिक' (१९६३) या ग्रंथातून अमेरिकेतील मध्यमवर्गीय सुखवस्तू कुटुंबातील स्त्रीयांच्या गुलामगिरीचे वर्णन केले आहे. त्यांना कशा पध्दतीने स्वातंत्र्य नाकारले गेले आणि त्यांच्या शोषणाचे चित्रण फ्रेडन यांनी केले आहे.

ब्रिटनमधील स्त्रियांच्या मतदानाच्या हक्कांकरिता आणि समान हक्क मिळावेत यासाठी एमिलाइन पॅकहर्स्ट यांनी १८८९ मध्ये 'सफ्रजेट' चळवळ राबविली. पुढे १९२० साली अमेरिकेत व १९१८ साली इंग्लंडमध्ये स्त्रीयांना मताधिकार मिळाला. स्त्रीवादी चळवळीचे हे मोठे यश होते.

दुसऱ्या जागतिक युध्दाच्या काळात अमेरिका आणि युरोपमध्ये स्त्रीयांना सार्वजनिक क्षेत्रात काम करण्याची मोठ्या प्रमाणात संधी मिळाली. युध्दोत्तर काळात समान कामासाठी समान वेतन या तत्त्वानुसार महिलांना न्याय देण्याचा प्रयत्न झाला. स्त्रीयांना सार्वजनिक क्षेत्रात संधी मिळाल्यामुळे तिचा आर्थिक विकास होण्यास मदत झाली. तथापि, सार्वजनिक क्षेत्रातील कांही विशिष्ट पदासाठी स्त्रीयांचा विचार केला गेला. उदा. शिक्षिका, परिचारिका, कारकून, खाजगी सचिव अशा भूमिका स्त्रीयांसाठी आणि अधिकार आणि जबाबदारीची पदे पुरुषांसाठी अशी विभागणी दिसून आली. त्यामुळे स्त्रीवादी चळवळीने स्त्रीयांना सर्व क्षेत्रात समान संधी मिळावी यासाठी आग्रही भूमिका घेतली.

थोडक्यात, उदारमतवादी स्त्रीवाद्यांनी स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने सर्व हक्क मिळावेत. यासाठीची भूमिका मांडली. संपत्ती, शिक्षण, व्यवसाय, मताधिकार इ. गोष्टीत स्त्रीयांना समान हक्क मिळाला पाहिजे, असा विचार त्यांनी मांडला. पुरुषप्रधान समाजाने निर्माण केलेल्या लैंगिक नैतिकतेच्या कल्पना किती पक्षपाती आहेत हे त्यांनी दाखवून दिले. तसेच या संकल्पना स्वातंत्र्य व समता या तत्त्वांच्या विरोधी जाणाऱ्या आहेत. हेही स्त्री चळवळीने सांगितले. एकमेकांच्या संमतीने होणारा लैंगिक व्यवहार निकोप आणि नैसर्गिक असू शकतो, अशी भूमिका उदारमतवादी स्त्रीवादाने घेतली.

- **आक्षेप :–**

१. सार्वजनिक जीवनातील स्त्रियांच्या हक्कांवर भर देणाऱ्या उदारमतवादी स्त्रीवादाने खाजगी जीवनात स्त्रीयांच्यावर होणाऱ्या अन्यायाकडे दुर्लक्ष केले आहे.

२. समाजात केवळ राजकीय आणि सामाजिक समता प्रस्थापित केल्याने स्त्रीयांना आपले हक्क

मिळणार नाहीत. त्यासाठी व्यापक वैचारिक प्रबोधनाची गरज आहे. याकडे उदारमतवादी स्त्रीवादाने दुर्लक्ष केले आहे.

३. पुरुषसत्ताक व्यवस्थेबरोबरच वर्ग, वर्ण, वंश याआधारे होणाऱ्या स्त्रियांच्या शोषणाची दखलही उदारमतवादी स्त्रीवादाने घेतली नाही.

### १.२.४.२ मार्क्सवादी स्त्रीवाद :

उदारमतवादी स्त्रीवादाच्या मर्यादा लक्षात घेतल्या असता मार्क्सवादी स्त्रीवादाचा विचार महत्त्वाचा ठरतो. मार्क्सवादी स्त्रीवादाच्या मांडणीनुसार स्त्रीयांच्या शोषणाचे मूळ कारण समाजातील वर्ग रचना हे आहे. स्त्रीयांच्या शोषणाला पुरुषांचे वर्तन जबाबदार नसते, तर समाजातील सामाजिक व आर्थिक संरचना कारणीभूत असते असे मार्क्सवादी स्त्रीवादी मानतात.

१. समाजात आर्थिक आणि राजकीय विषमता असते. अशा समाजातील केवळ मध्यम आणि उच्च वर्गातील स्त्रीयांना स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो. आर्थिकदृष्ट्या उपेक्षित वर्गातील स्त्रीयांना नागरी स्वातंत्र्य मिळत नाही.

२. इतिहासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर स्त्रीयांचे शोषण जन्माला आले. हे शोषण कमी किंवा नष्ट करावयाचे असेल तर ज्या व्यवस्थेत शोषण केले जाते ती व्यवस्थाच नष्ट करावी लागते.

३. साम्यवादी समाजात प्रत्येक स्त्रीला रोजगार उपलब्ध होऊ शकतो. त्यामुळे स्त्रीयांचे आर्थिक परावलंबत्व नष्ट होईल. घरकाम व मुलांचे संगोपन ही कौटुंबिक कार्येही सामुदायिकरित्या पार पाडली जाणार असल्याने या पारंपरिक जबाबदारीतून स्त्रीया मुक्त होतील.

४. श्रमाच्या बाजारपेठेत स्त्रीयांचा सहभाग किती वाढतो आणि स्त्रीया वर्ग संघर्षात किती प्रमाणात सहभागी होतात, यावर स्त्रीमुक्तीचे यश अवलंबून आहे, असे मार्क्सवादी मानतात.

फुरिअर, रॉबर्ट ओवेन, विल्यम थॉम्प्सन, फ्रेडरिक एंजल्स, ऑगस्ट वेवेल, क्लॅरा झेट्रकिन या विचारवंतांनी स्त्रीवादाचे विश्लेषण मार्क्सवादी दृष्टिकोनातून केले आहे.

फुरिअरने विवाहसंस्था कशी कालबाह्य झाली आहे, हे सांगून स्त्री-पुरुषातील मुक्त प्रेम, समलिंगवाद व बहुविवाहांचा पुरस्कार केला. स्वयंपाक, घरकाम आणि बालसंगोपन ही कामे सामूहिक स्वरूपात केली जावीत असे मत तिने मांडले.

रॉबर्ट ओवेनने 'न्यू मॉरल ऑर्डर' या ग्रंथात विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार मांडला. विवाह संस्था ही दु:खाचे, सामाजिक विषमतेचे आणि दारिद्र्याचे कारण असून ती कृत्रिम संस्था आहे असे मत मांडले आहे.

एंजल्सने 'दि ओरिजीन ऑफ दि फॅमिली, प्रायव्हेट प्रॉपर्टी अँड स्टेट' (१८४५) या ग्रंथात विवाह

संस्थेचा उदय खाजगी मालमत्तेशी कसा जोडला आहे याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यांच्या मते, 'कुटुंबात पुरुष भांडवलदार तर स्त्री श्रमिक असते.' पुरुषांनी स्त्रीयांवर एकपतीत्व लादले. एकपतीत्व हा विवाहाचा अनैसर्गिक प्रकार असून पुरुषप्रधान समाजाने तो स्त्रीयांवर लादला. संपत्ती पुरुषांनाच संक्रमित व्हावी अशा प्रकारची व्यवस्था विकसित करण्यात आली. त्यामुळे मालमत्ताधारक पुरुष आणि मालमत्ताविहीन स्त्रीया असे दोन वर्ग निर्माण झाले. या समाजात स्त्रीयांचे शोषण होते. उलटपक्षी, एंजेल्सच्या मते, श्रमिक वर्गामध्ये मालमत्तेचा अभाव असल्याने स्त्रियांना अधिक स्वातंत्र्य मिळते. या वर्गातील स्त्रीया स्वत: सार्वजनिक क्षेत्रात काम करत असल्यामुळे त्या पुरुषांवर पूर्णपणे अवलंबून नसतात. त्यामुळे या वर्गातील स्त्रीयांचे शोषण तुलनेने कमी होते.

मारियारोझा डोलाकास्टा यांनी मार्क्सवादी दृष्टीकोनातून स्त्रीवादाची मांडणी केली आहे. त्यांच्या मते, भांडवलशाही व्यवस्थेत स्त्रियांच्या कामाला अनुत्पादक समजले जाते. परंतु घरकाम हे केवळ गरजेचेच नाही तर 'उत्पादक' काम आहे. स्त्रीया घरात राहून श्रमिक दलाचे पुनरुत्पादनाचे काम करतात. त्यामुळे भांडवलशाहीला मजुरांचा तुटवडा पडत नाही. त्याचबरोबर घरकामापासून मुक्ती मिळाल्यामुळे पुरुष सार्वजनिक क्षेत्रात जास्त काम करू शकतात आणि उत्पादनवाढीस हातभार लावतात. म्हणजेच स्त्रीयांचे उत्पादन क्षेत्रातील योगदान मोठे आहे. परंतु त्याची दखल घेतली जात नाही. त्यामुळे स्त्री वर्गावर अन्याय होतो. यासाठी शासनाने अशा रितीने घरकाम करणाऱ्या महिलांना मोबदला दिला पाहिजे.

मार्गरिट बेनस्टनच्या मते, घरकामाच्या मोठ्या जबाबदारीतून स्त्रीची सुटका होत नाही, तोपर्यंत सार्वजनिक क्षेत्रात तिने काम करणे म्हणजे तिचे अधिक शोषण आहे. कारण, स्वयंपाक आणि मुलांचे संगोपन या कौटुंबिक जबाबदारीतून स्त्रीला मुक्त न करता तिला सार्वजनिक उद्योगात कामगार बनविणे म्हणजे तिचे शोषण आणखी तीव्र करणे होय. यासाठी मार्क्सवादी स्त्रीवाद घरकाम सामुदायिक रीतीने व्हावे यासाठी आग्रही असतात.

कौटुंबिक पातळीवर असणारा सामाजिक लिंग भेदभाव सार्वजनिक क्षेत्रात देखील कसा आढळतो, यावर मार्क्सवाद्यांनी प्रकाश टाकला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील काही विशिष्ठ क्षेत्रातच (शिक्षिका, परिचारिका, खाजगी सचिव, स्वयंपाकी) स्त्रीयांना संधी दिली जाते. याउलट अधिकाराची पदे (राजकारण, बँक, पोलीस) स्त्रीयांना देण्याचा समाजाचा कल दिसत नाही. याविरुध्द मार्क्सवादी स्त्रीवादी झगडतात.

◆ **मर्यादा :–**

१. पुरुषी वर्चस्ववादाच्या भावनेतून स्त्रीयांवर अन्याय होतो, स्त्रीयांचे शोषण होते, या मूलभूत गोष्टीकडे मार्क्सवादी दुर्लक्ष करतात आणि केवळ भांडवलशाहीत स्त्रीयांच्या शोषणाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न करतात.

२. भांडवलशाही नष्ट करून साम्यवादी (सोविएत युनियन) आणि समाजवादी राजवटी स्थापन झालेल्या देशांमध्ये देखील स्त्रीयांचे शोषण थांबलेले नव्हते. या देशातील स्त्रीयांना देखील

दुय्यम स्वरूपाची वागणूक मिळाल्याचा इतिहास आहे. त्यामुळे भांडवलशाही नष्ट झाली की, स्त्री शोषण थांबेल हा आशावाद खरा नाही.

### १.२.४.३ जहाल स्त्रीवाद :

केट मिलेट, ख्रिस्तीनी डेल्फाय, जर्मेनी ग्रीअर, शुलमिथ फायरस्टोन यांनी जहाल स्त्रीवादाचा पुरस्कार केला आहे. जहाल स्त्रीवाद हा शब्दप्रयोग (Radical Feminism) या इंग्रजी संकल्पनेचा अनुवाद आहे. जहाल स्त्रीवाद हा सुसंघटित विचारप्रवाह नाही. स्त्री स्वातंत्र्याचे आणि स्त्री मुक्तीचे अतिरेकी किंवा कट्टर समर्थन करणारा विचारप्रवाह म्हणजे जहाल स्त्रीवाद होय. स्त्री शोषण करणाऱ्या पुरुषी प्रवृत्ती विरुध्द आक्रमक लढा देऊन संपूर्ण समाजव्यवस्थाच बदलण्याचा आग्रह धरणारी ही विचारधारा आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शारीरिक, लैंगिक, भौतिक, ज्ञानात्मक, मानसिक इ. सर्व प्रकारच्या शोषणाला स्त्रीया बळी पडतात. अशा प्रकारच्या शोषणाला जहाल स्त्रीवाद प्रखर प्रतिकार करतो.

जहाल स्त्रीवाद १९६० ते १९८० च्या दशकात एक सशक्त दृष्टिकोन म्हणून पुढे आला. याकाळात पुरोगामी चळवळीत सहभागी होणाऱ्या स्त्रीयांना पुरोगामी विचार मानणाऱ्या पुरुषांकडून दुय्यम वागणूक मिळाली. तसेच कृष्णवर्णीय स्त्रीयांना कृष्णवर्णीय पुरुषांबरोबरच श्वेतवर्णीय स्त्रिया आणि पुरुषांच्या शोषणाला सामोरे जावे लागत होते. यातून जहाल व आक्रमक स्त्रीवादाचा जन्म झाला. सर्व पातळ्यांवर स्त्रीयांवर अन्याय होतो आणि त्याला प्रतिकार केला पाहिजे असे जहाल स्त्रीवादाचे मत आहे.

लैंगिक जुलूमाद्वारे होणारा सामाजिक जुलूम समजावून घेणे हा जहाल स्त्रीवादाचा हेतू आहे. प्रजोत्पादन व्यवस्था ही समाजातील पायाभूत संबंधांचे निर्धारण, नियंत्रण व नियमन करत असते. ही व्यवस्था पुरुष सत्तेचा आधार असते. शारीरिक भेद व आपल्या निर्मितीसाठी स्त्रीचे पुरुषावरील अवलंबित्व यात स्त्रीच्या शोषणाचे मूळ आहे. 'मातृत्वाच स्त्री जीवनाची कृतार्थता व इतिकर्तव्यता आहे' या तत्त्वज्ञानावर जहालवादी विचारवंतांनी हल्ला चढविला. उलट मातृत्वाशिवाय स्त्री जीवनाची असणारी उदात्तता, कृतार्थता आणि अर्थपूर्णत: याचे समर्थन केले. स्त्रीमुक्तीसाठी जीवशास्त्रीय क्रांतीची गरज जहाल स्त्रीवादींनी अधोरेखित केली.

केंट मिलेट यांनी 'सेक्सुअल पॉलिटिक्स' (१९७१) या ग्रंथात व्यक्त केलेल्या मतानुसार स्त्री आणि पुरुष यांच्यातील भेदाची जडणघडण समाजामध्ये होते. मुलगा आणि मुलगी यांचे खेळ, कपडे, केशरचना, आहार, कामे, जीवनशैली या सर्वांमध्ये पुष्कळ भिन्नता आहे. या माध्यमातून त्यांचे कार्यक्षेत्र भिन्न आहे असे त्यांच्या मनावर बिंबविले जाते. तसेच मुलांच्या आणि मुलींच्या लैंगिकतेत फरक आहे आणि मुलींची लैंगिकता दुय्यम स्वरूपाची आहे असेही बिंबविले जाते.

स्त्रीच्या प्रजननक्षमतेचे उदात्तीकरण करून तिच्या मातृत्वाचा पुरुषसत्ताक व्यवस्थेत गौरव केला

जातो. जहाल स्त्रीवाद्याच्या मते गर्भारपण, बाळंतपण व मुलांचे संगोपन या गोष्टी स्त्रियांना बंधनात ठेवणाऱ्या आहेत. गर्भारपण आणि बाळंतपण या गोष्टींचे उदात्तीकरण करून त्या स्त्रीयांच्यावर लादल्या जातात. अनेकदा मातृत्व हे स्त्रीवर लादले जाते. आधुनिक काळात वैद्यक शास्त्रातील तंत्रज्ञानाचा वापर करून स्त्रीयांना या बंधनातून मुक्त व्हावे असा विचार जहाल स्त्रीवाद मांडतो. गर्भनियंत्रक साधने व कृत्रिम गर्भधारणा यांचे त्यांनी स्वागत केले आहे. ॲड्रिया डॉर्किन या जहाल अमेरिकन स्त्रीवादीने असे म्हटले आहे की, ''स्त्री जन्मत नाही, स्त्री घडवली जाते, असे करताना तिच्यातील माणूसत्व संपविले जाते.'' "Women is not born, she is made. In the making, her humanity is destroyed."

जहाल स्त्रीवादी कुटुंब संस्थेला स्त्रीयांच्या शोषणाचे प्रतिक मानतात. कुटुंबात स्त्रीचे दुहेरी शोषण होते. तिच्या श्रमशक्तीचा कुटुंबात मोबदला गणला जात नाही. कुटुंबसंस्था स्त्रियांचे केवळ श्रम वापरते. स्त्रियांच्या कुटुंबातील कामांना 'उत्पादक' समजले जात नाही. याचा फायदा पुरुषांना होतो. ते सार्वजनिक क्षेत्रात आपले योगदान देतात. त्यांना त्याचा आर्थिक आणि सामाजिक (प्रतिष्ठा) लाभ मिळतो. स्त्रीयांना मात्र आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे घरकामाला मोबदला किंवा घरकामापासून मुक्ती हे जहाल स्त्रीवाद्यांनी ठासून सांगितले.

कुटुंबसंस्थेमध्ये स्त्रीयांचे लैंगिक शोषण होत असते. विवाहाच्या नावाखाली स्त्रीला आपल्या लैंगिकतेचे समर्पण करावे लागते. कुटुंबात लैंगिक हिंसाचार किंवा लैंगिक सुखापासून वंचितता या गोष्टींना सामोरे जावे लागते. त्यामुळे जहाल स्त्रीवाद विवाह, कुटुंब, मातृत्व या सर्व गोष्टींना स्त्री शोषणाच्या साधन व्यवस्था मानतात.

राज्यसंस्था देखील पुरुषप्रधान समाज व्यवस्थेचे द्योतक आहे. स्त्रीयांना जाणीवपूर्वक सत्तेपासून दूर ठेवले जाते. मताधिकार व सर्वोच्च पदांपासून स्त्रीयांना दूर ठेवण्याचा प्रयत्न होतो. राज्यसंस्था स्त्रियांना सत्तेच्या क्षेत्रापासून दूर ठेवते किंवा स्त्रीयांना सत्तेत माफक वाटा दिल्याचे दाखवून पुरुषांचे वर्चस्व कायम ठेवते.

◆ **मर्यादा :–**

१. जहाल स्त्रीवाद हा अतिरेकी आणि एकांगी दृष्टिकोन आहे.
२. विवाह आणि कुटूंब या संस्थज्ञंचे अस्तित्व धोक्यात आल्यास अनेक नवीन सामाजिक प्रश्न निर्माण होतील.

### १.२.४.४ भारतीय स्त्रीवाद :

प्राचीन काळापासून धर्म, रूढी आणि परंपरा यांच्या नावाखाली स्त्रीला भारतीय समाजात दुय्यम स्थान दिले गेले. तिला अनेक मानवी हक्क नाकारले गेले. तिच्या गुलामगिरीच्या जीवनाचे उदात्तीकरण करण्यात आले. त्यामुळे स्वातंत्र्य, समता, न्याय या गोष्टींपासून भारतीय स्त्री प्राचीन काळापासून वंचित रहावे लागले. इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये तिच्या शोषणाचे प्रमाण आणि स्वरूप बदलत राहिले.

कांही भारतीय समाज सुधारकांना १९ व्या शतकात ब्रिटिश सत्तेच्या अंमलामुळे स्त्रीयांवरील अन्यायाची जाणीव निर्माण झाली. १९ व्या शतकापासून आजतागायत भारतामध्ये स्त्रीयांना समान हक्क मिळावेत, त्यांचे शोषण थांबावे यासाठी सामाजिक आणि राजकीय पातळीवर अनेक चळवळी झाल्या, अनेक सुधारणा कायदे अस्तित्वात आले या सर्वांचा आढावा भारतीय स्त्रीवादामध्ये घेणे आवश्यक आहे.

१९ व्या शतकात भारतात इंग्रजी शिक्षण घेणारा एक नवीन वर्ग निर्माण झाला. शिक्षणामुळे भारतीयांना उदारमतवादी विचारांची ओळख झाली. राजाराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, ईश्वरचंद्र विद्यासागर, लोकहितवादी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, न्यायमूर्ती रानडे, गोपाळ गणेश आगरकर या समाज सुधारकांनी स्त्री शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, स्त्रीयांचे हक्क हे मुद्दे हाती घेऊन समाजात जाणीवजागृतीचे प्रयत्न सुरू केले. ही भारतातील स्त्रीवादी चळवळीची सुरुवात होती. ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन, सांस्कृतिक सत्यधर्म इ. संस्थांनी स्त्री हक्कांसाठी प्रयत्न केले. या काळात सतीची प्रथा, विधवा विवाहावरील बंदी, केशवपन, द्विभार्या पध्दत या सारख्या स्त्रीयांचे शोषण करणाऱ्या परंपरांच्या विरोधात चळवळी सुरू झाल्या. याचा परिणाम म्हणून १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा झाला, १८५६ मध्ये विधवा पुनर्विवाहाचे विधेयक मंजूर झाले, आणि १८६० मध्ये गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहीतवादीनी छळ करणाऱ्या पतीपासून पत्नीला विभक्त होता आले पाहिजे आणि तिला पोटगी मिळाली पाहिजे असा विचार मांडला. मुलीचे लग्न वयोमर्यादा १२ वर्ष निश्चित करण्यात आली.

१९ व्या शतकात महाराष्ट्रात महात्मा फुलेंनी आणि भारताच्या विविध भागात ख्रिश्चन मिशनरीनी स्त्री शिक्षणासाठी प्रयत्न केले. म. फुलेंनी स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबाबत स्पष्ट भूमिका घेतली. त्यांनी स्त्री शिक्षणाचा आग्रह धरला. स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी भारतीय समाजाने नैतिकचेचे वेगवेगळे मानदंड निर्माण केले आहेत. याविरुध्द त्यांनी आवाज उठविला. लैंगिक स्वातंत्र्याच्या बाबतीत स्त्रीयांना कठोर बंधन असताना पुरुषांना मात्र लैंगिक स्वातंत्र्य होते. स्त्रीयांना भोगवस्तू म्हणून पाहिले जात. म. फुलेंच्या मते, ब्राह्मण आणि ब्रह्मणेतर या दोन्ही वर्गातील स्त्रीयांचे शोषण कसे होते हे स्पष्ट केले आहे. ब्राह्मण स्त्रीयांना कठोर कौटुंबिक बंधनात रहावे लागत होते. तर बहुजन व दलित कुटुंबातील स्त्रीयांना कुटुंबातील पुरुषांच्या अत्याचाराबरोबर उच्चवर्णीय लोकांच्या अत्याचाराला बळी पडावे लागत. स्त्रीयांना न्याय मिळावा यासाठी म. फुलेंनी विधवा पुनर्विवाह, बालविवाह बंदी, सतीप्रथा बंदी, स्त्री शिक्षण, सत्यशोधक विवाह पध्दती इ. उपक्रम हाती घेतले.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर यांनी भारतातील स्त्री शोषणाला येथील धार्मिक आणि परंपरांची पार्श्वभूमी कारणीभूत असल्याचे स्पष्ट केले. मनुस्मृती, नारदस्मृती, पुराणे, रामायण, महाभारत इ.च्या माध्यमातून स्त्रीला आणि शूद्रांना गुलाम केले आहे. सती किंवा विधवा विवाहास बंदी यासारख्या अमानुष परंपरा स्त्री शोषणाला जबाबदार आहेत. शूद्र जातीतील स्त्रियांच्या लैंगिक शोषणाविरुध्द डॉ. आंबेडकरांनी आवाज उठविला. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून स्त्रीयांना मालमत्तेचा आणि घटस्फोटाचा अधिकार असावा याचे तर्कशुध्द समर्थन केले.

म. गांधींनी देखील भारतीय संदर्भात स्त्री स्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे. म. गांधींच्या मते, स्त्रीयांनादेखील पुरुषांच्याप्रमाणे हक्क व स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. स्त्रीने मुक्त होणे म्हणजे पुरुषांचे अंधानुकरण करणे नाही. तर मुक्त होणे म्हणजे व्यक्ती म्हणून आत्मभान येणे, निर्भय आणि स्वावलंबी बनणे होय. कौटुंबिक जीवनात स्त्री आणि पुरुष यांच्यात मैत्रीचे नाते असावे आणि कौटुंबिक जबाबदाऱ्या सामूहिक पध्दतीने पार पाडल्या जाव्यात असे गांधीजी म्हणत. तसेच स्त्रीयांनी आर्थिक स्वावलंबनासाठी प्रयत्नशील रहावे, त्यामुळे स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान मिळेल.

स्वातंत्र्योत्तर काळात राम मनोहर लोहिया यांनी स्त्री स्वातंत्र्यविषयक विचार मांडले आहेत. देशाच्या प्रगतीमध्ये स्त्री आणि पुरुष यांचे योगदान एकसमान आहे. स्त्रीयांना योनिसुचितेसारख्या शरीरविषयक रूढींच्या नावाखाली स्वातंत्र्य नाकारले जाते आणि त्याचे दमण केले जाते. स्त्री पुरुष यांच्यातील लैंगिक भेदभाव आणि स्त्रीयांचे शोषण नष्ट करण्याची गरज लोहिया यांनी मांडली.

२० व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतातील स्त्रीवादी चळवळीला अनेक आघाड्यांवर यश प्राप्त झाले. राष्ट्रीय आणि प्रादेशिक पातळीवर विविध महिला संघटनांची स्थापना झाली. महिला आयोग अस्तित्त्वात आले. कामाच्या ठिकाणी महिलांना सुरक्षितता देणारे कायदे निर्माण झाले. पंचायत राज संस्थामध्ये व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ३३% आरक्षणाची घटनात्मक तरतूद (१९९३) करण्यात आली. (आता हे प्रमाण ५०% करण्यात आले आहे.) २००५ साली कौटुंबिक हिंसाचारातून महिलांना संरक्षण देणारा कायदा तयार करण्यात आला. त्याचप्रमाणे कामांच्या ठिकाणी महिलांचे शोषण होणार नाही, यासाठी २०१३ मध्ये कायदा संमत झाला. शासनाच्या विविध खात्यांमध्ये महिलांसाठी आरक्षण देण्यात आले. महत्त्वाची गोष्ट म्हणजे पोलीस, लष्कर, रेल्वे, वाहतूक व दळणवळण इ. पुरुषांची मक्तेदारी असणाऱ्या क्षेत्रामध्ये स्त्रीयांना संधी देण्यात आली आहे.

१९७० च्या दशकात उत्तराखंड येथे झालेले चिपको आंदोलन, १९९० च्या दशकातील आंध्र प्रदेशमधील दारू बंदीसाठीचे आंदोलन आणि २०१२-१३ साली दिल्लीमधील निर्भया हत्या प्रकरणाचे आंदोलन, या सर्व आंदोलनातील स्त्रीयांचा सहभाग उल्लेखनीय होता. या स्त्रीयांच्या आंदोलनामुळे शासनाला आपले निर्णय बदलावे लागले व स्त्रीयांच्या मागण्या मान्य कराव्या लागल्या.

- **मर्यादा :-**

भारतातील स्त्रीवादी चळवळीच्या प्रमुख दोन मर्यादा आढळतात. भारतातील स्त्रीवादी चळवळीमध्ये मध्यमवर्गीय स्त्रीयांच्या प्रश्नाचाच विचार झाला. दलित, उपेक्षित स्त्रीयांच्या प्रश्नासाठी विशेष कार्य झाले नाही. ग्रामीण स्त्रीयांच्या प्रश्नाकडे देखील दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

वरील अभ्यासावरून हे स्पष्ट होते की, स्त्रीवाद ही केवळ राजकीय विचारसरणी नाही. स्त्रीवाद एक चळवळ आहे, स्त्रीवाद, स्त्री व पुरुष यांच्यात चिरकाल टिकणारी समानता प्रस्थापित करणारा विचार आहे. स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा हक्क प्राप्त करून देणे व तिला मिळणाऱ्या दुय्यम वागणुकीला

विरोध करणे, हे स्त्रीवादाचे उद्दिष्ट आहे. धर्म, नैतिकता, मूल्ये या आधारे स्त्री-पुरुष यांच्यात केला जाणारा भेदभाव संपुष्टात आणणे, या चळवळीचा उद्देश आहे. स्त्रीवाद आणि स्त्रीवादी चळवळी यामुळे २० व्या शतकात आणि चालू शतकात जागतिक, राष्ट्रीय आणि प्रादेशिक स्तरावर अनेक बदल घडून आले आहेत. स्त्रीयांना संरक्षण देणारे कायदे आणि संस्था अस्तित्वात आल्या आहेत. परिणामत: अनेक क्षेत्रात आज स्त्रीया काम करताना दिसून येतात.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१ :**

**(अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१. .................. व्यवस्थेमुळेच स्त्रीयांचे शोषण होते, यावर स्त्रीवादाने भर दिला आहे.

*(अ) हुकूमशाही* *(ब) पुरुषप्रधान* *(क) स्त्रीप्रधान.*

२. ''दि व्हिंडीकेशन ऑफ राईटस् ऑफ वुमेन'' हे स्त्रीवादाचे समर्थन करणारे पुस्तक .................. यांनी लिहिले.

*(अ) मेरी वुलस्टोन क्राफ्ट* *(ब) बेटी फ्रेडन* *(क) अँड्रीया डॉर्किन*

३. .................... या विचारसरणीने स्त्रीचे दास्यत्व किंवा दैवत्व नाकारले.

*(अ) उदारमतवादाने* *(ब) भांडवलशाहीने* *(क) स्त्रीवाद.*

४. स्त्रीवादी चळवळीचे मुख्य ...................... टप्पे केले जातात.

*(अ) एक* *(ब) दोन* *(क) तीन*

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२ :**

**(ब) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या गृहीतकावर उदारमतवादाचे तत्त्वज्ञान आधारीत आहे.

२. 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथाचे लेखक कोण?

३. 'स्त्रीत्व केवळ जैविक नसून ते समाजात घडविले जाते' हे विधान कोणाचे?

४. 'न्यू मॉरल ऑर्डर' या ग्रंथात विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार कोणी मांडला?

५. मार्क्सवादी दृष्टीकोनातून स्त्रीवादाची मांडणी करणाऱ्या दोन विचारवंताची नावे सांगा.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३ :**

**(क) रिकाम्या जागा भरा.**

१. केट मिलेट यांनी ............... स्त्रीवादाचा पुरस्कार केला आहे.

*(अ) मवाळ* *(ब) जहाल* *(क) साम्यवादी.*

२. जहाल स्त्रीवादी कुटुंबसंस्थेला स्त्रीयांच्या ............ प्रतिक मानतात.

*(अ) विकासाचे (ब) शिक्षणाचे (क) शोषणाचे.*

३. ............... यांनी हिंदू कोड बीलासाठी आग्रही भूमिका घेतली.

*(अ) म.फुले (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (क) राजाराम मोहन रॉय.*

४. स्त्री आणि पुरुष यांच्यासाठी भारतीय समाजात नैतिकतेचे ............ मानदंड आहेत.

*(अ) एकसमान (ब) वेगवेगळे (क) एकरूप*

## १.३ सारांश :

स्त्रीवाद ही आधुनिक काळातील एक महत्त्वाची बहुआयामी अशी संकल्पना आहे. 'स्त्रीवाद' म्हणजे नेमके काय? याबाबत अभ्यासकांचे एकमत आढळत नाही. तथापि, समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याचे ध्येय असणारी विचारसरणी आणि स्त्रीला समाजात दिली जाणारी दुय्यम वागणूक विरोधातील चळवळ म्हणजे स्त्रीवाद होय. पितृसत्ताक समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीयांचे होणारे मानसिक, लैंगिक, शारीरिक, आर्थिक आणि राजकीय शोषण यांच्याविरुध्द लढणारी चळवळ म्हणजे स्त्रीवाद (Feminism) होय.

मेरी वुलस्टोन क्राफ्टने 'दि व्हिंडीकेशन ऑफ राइट्स ऑफ वुमेन' (१७९२) या ग्रंथाच्या माध्यमातून स्त्रीच्या शोषणाला वाचा फोडली. इंग्लंड, अमेरिका या देशात सुरू झालेला हा विचार हळूहळू जगभर पसरला. १९ व्या आणि २० व्या शतकात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयांना हक्क व स्वातंत्र्य मिळावे यासाठी जगभर चळवळी सुरू झाल्या. १९६० नंतर 'स्त्रीवाद' एक प्रखर विचार म्हणून पुढे आला.

२० व्या शतकाचा उत्तरार्ध आणि २१ व्या शतकाची सुरुवात या काळात स्त्रीवादाने शिक्षण, धर्म, भाषा, कला, कायदा, नैतिकता इ. घटकांचे स्त्रीच्या दृष्टिकोणातून पुर्नमांडणी केली. यातून स्त्रीवाद विषयक विविध मतप्रवाह निर्माण झाले.

उदारमतवादी स्त्रीवाद, मार्क्सवादी स्त्रीवाद, जहाल स्त्रीवाद, भारतीय स्त्रीवाद इ. काही प्रमुख स्त्रीवादी सिध्दांत विकसित झाले. या सर्व स्त्रीवादी विचारसरणीचे समर्थन करणाऱ्या विचारवंतांचा उद्देश एकच होता, परंतु मार्ग भिन्न होते. स्वातंत्र्य, समता, न्याय ही उदारमतवादाची तत्त्वे स्त्री आणि पुरुष या दोघांनाही लागू पडतात असे उदारमतवादी स्त्रीवाद मानतो. समाजातील आर्थिक व राजकीय विषमतेमुळे दुर्बल घटकातील स्त्रीयांचे शोषण होते असे मार्क्सवादी स्त्रीवाद मानतो. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक, शारीरिक किंवा लैंगिक या सर्व प्रकारच्या शोषणाला जहाल स्त्रीवाद प्रखर विरोध करतो. तसेच भारतीय समाजाच्या परिप्रेक्षातून स्त्रीवादाकडे पाहिले जाते. मागील दोन शतकापासून भारतीय स्त्रीयांच्या सामाजिक, राजकीय व आर्थिक उन्नतीसाठी अनेकांनी योगदान दिले आहे. यास भारतीय स्त्रीवाद म्हणतात.

## १.४ पारिभाषिक शब्द :

- **वर्णभेद :** गोरे आणि काळे असा भेदभाव करणारी विचारसरणी.
- **बहुजन :** समाजातील मोठा समाज/वर्ग.
- **कृष्णवर्णीय :** आफ्रिका व अमेरिका खंडातील रंगाने काळे असणारे लोक.
- भांडवलशाही : खाजगीकरणाचे व उदारीकरणाचे धोरणाचे समर्थन करणारी विचारसरणी.
- **सफ्रजेट :** स्त्रीयांना मताधिकार मिळावा यासाठीची इंग्लंड व अमेरिकेतील २० व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील चळवळ
- **बहुआयामी :** विविध अर्थ सांगणारी संकल्पना.
- **Gender and Sex :** या दोन्ही शब्दांचे मराठी भाषांतर लिंग असे होते. परंतु या घटकात 'Gender Discrimination' म्हणजे सामाजिक दृष्ट्या लिंगभेद करणे असा आहे आणि 'Sex Discrimination' म्हणजे जीवशास्त्रीय दृष्टीने लिंग भेद करणे.

## १.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – १ :**

**(अ)** १. (ब) पुरुषप्रधान.

२. (अ) मेरी वुलस्टोन क्राफ्ट.

३. (क) स्त्रीवाद.

४. (क) तीन.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – २ :**

**(ब)** १. 'माणूस हा विवेकशील प्राणी आहे' या गृहितकावर स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान आधारित आहे.

२. फ्रेंच स्त्रीवादी लेखिका सिमॉ द बोवुवा यांनी 'दि सेकंड सेक्स' (१९४९) हे पुस्तक लिहिले आहे.

३. सिमॉन दि बोवुवा.

४. रॉबर्ट ओवेन यांनी विवाह संस्था नष्ट करण्याचा विचार मांडला.

५. रॉबर्ट ओवेन, फ्रेडरिक एंजेल्स, ऑगस्ट वेबेल इ.

**स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न – ३ :**

**(क)** १. (ब) जहाल.

२. (क) शोषणाचे.

३. (ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

४. (ब) वेगवेगळे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

❒ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. स्त्रीवादाचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करा.

२. स्त्रीवादाचा उगम आणि विकास यांची चर्चा करा.

३. स्त्रीवादाचा उदारमतवादी सिध्दांत स्पष्ट करा.

४. स्त्रीवादीच्या मार्क्सवादी दृष्टिकोनाची चर्चा करा.

५. जहाल स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट करा.

६. भारतीय स्त्रीवादी चळवळीचा आढावा घ्या.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. भागवत, विद्युत (१९९७) : 'महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने', समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

२. माने, रचना (२०१३) : 'स्त्रीवाद संकल्पना आणि स्वरूप', अक्षर दालन, कोल्हापूर.

३. जी. एल. शर्मा (२०१५) : 'सामाजिक मुद्दे', रावत पब्लिकेशन, जयपूर.

४. रासम, वासंती : 'भारतातील महिला अधिकारांचे स्वरूप', नवज्योत, सप्टेंबर २०१४.

५. सुमंत, यशवंत : 'स्त्रीमुकतीकडून मानवमुक्तीकडे', मिळून साऱ्याजणी, जाने ते जून, १९९९.

६. नाईक, शोभा (२००७) : 'भारतीय संदर्भातून स्त्रीवाद', लोकवाङमयगृह, मुंबई

७. पाटील, भारती : 'स्त्रीयांचा सत्तेतील सहभाग, सबलीकरण प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा.

८. Patel Vibhat : 'Womens Challenges of New Millennuum', Cryan Publication, Delhi (2002).

९. Patel Vibhat : Women's movement in Contumporary India.

१०. Fire Major Women's Movement in India, Indian Expreess, 18 June 2021.

११. Bhosale S. D. : "Gender Discrimination, Role of Social Reforms and Feminist Movement in India, Navajyot, Dec., 2014.

१२. Heather Mckee Hurwitz, Women's Movement, Reseaarch Gate, January (2013)


❍❍❍

घटक २

# बहुसंस्कृतीवाद

## (Multiculturalism)

---

२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ बहुसंस्कृतीवाद अर्थ आणि विकास

  २.२.२ विल किमलिका यांचा बहुसंस्कृतीवाद सिद्धांत

  २.२.३ राष्ट्रवाद आणि बहुसंस्कृतीवाद

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न – उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### २.० उद्दिष्टे :

या घटकात आपण बहुसंस्कृतीवाद ही राजकीय सिद्धांतामधील महत्त्वाची संकल्पना अभ्यासणार आहोत प्रत्येक राज्य ऐतिहासिक काळापासून भाषेच्या आणि संस्कतीच्या आधारे निर्माण झाले होते. परंतु व्यवसाय उद्योग कामासाठी लोक विकसित देशांकडे स्थलांतरित झाले होते या दृष्टिकोणाच्या आधारे बहुसंस्कृतीची पाहणी करत असताना समाजातील विविध संस्कृती व उपसंस्कृती बहुविध मार्गाने समजून घेण्याचा प्रयत्न बहुसंस्कृतीवादाच्या संकल्पनेतून अभ्यासणे महत्त्वाचे आहे. त्याच्या बरोबर ठळकपणे आपण,

१) बहुसंस्कृतीवादाचा अर्थ आणि विकास समजून घेणार आहोत.

२) विल किमलिका यांचा बहुसंस्कृतीवाद सिद्धांत समजून घेणार आहोत.

३) राष्ट्रवाद व बहुसंस्कृतीवाद समजून घेणार आहोत.

## २.१ प्रस्तावना :

बहुसंस्कृतीकता ही एक सांस्कृतिक वैविध्याला सामावून घेणारी आधुनिक संकल्पना असून जात, धर्म, पंथ, लिंग यांचा विचार न करता सर्वसमावेशकतेतून सामाजिक व राजकीय सलोख्याला प्राधान्यक्रम देणारी आहे. जगातील बहुतांश राष्ट्रांमध्ये वांशिक आणि सांस्कृतिक वैविध्य आढळून येते, या वैविध्य पूर्णतेला, न्यायिकतेची जोड देण्यासाठी बहुसांस्कृतिकतावादाचा उदय सर्वप्रथम युरोपियन राष्ट्रांमध्ये झाला.

बहुसंस्कृतीवादामध्ये सांस्कृतिक वैशिष्ट्यपूर्ण वैविध्याला घटनात्मकदृष्ट्या आदर व सन्मान दिला जातो. सांस्कृतिक वैविध्यता ही दोन किंवा अधिक वांशिक वा सामाजिक सहवासातून अस्तित्वात येते. या सहअस्तिवात लोकांचे धर्म, विचार, परंपरा, रूढी या वेगवेगळ्या असल्या तरी त्यांच्या सहजीवनामध्ये एक प्रकारचा सामूहिक वैविध्याची वेगळीच छटा अस्तित्वात असते, म्हणजेच या सामूहिक सहअस्तित्वात लोकांमध्ये एकमेकांच्या हक्कांचा सन्मान व आदर तसेच अस्तित्वाचा आग्रह आणि मान्यता असते. महायुद्धाच्या कालखंडानंतर युरोपियन देशामध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्थलांतरानंतर काही राष्ट्रामध्ये बहुसंस्कृतीवादी सिद्धांत प्रबळ झालेले दिसतात. १९७० नंतर खऱ्या अर्थाने बहुसंस्कृतीकतवादावर सर्वत्रच विचारमंथने होऊ लागलेली दिसून येतात. कारण स्थानिक अल्पसंख्याक आणि बहुसंख्याकांनी आपआपल्या सामाजिक व राजकीय हक्कासाठी चालविलेल्या चळवळीच्या माध्यमातून बहुसंस्कृतीवादावर अनेक विचारवंतांनी यावर चिंतन केले गेले. तसं पाहिलं तर बहुसंस्कृतीवाद ही एक तत्त्वज्ञान आणि सामाजिक धोरणाचा भाग मानला जातो, या राजकीय तत्त्वज्ञानानुसार राष्ट्रांमधील वांशिक भेदाचे अनेक अंग असतात त्यात रूढी, भाषा, प्रथा, परंपरा उपासना पद्धती आणि इतर या सर्वांचा अंगिकार करून राष्ट्रीय एकरूपता टिकवण्यासाठी व सामाजिक सलोखा राखण्यासाठी याचा आधार घेतला जातो.

आजच्या युरोपियन राष्ट्रामध्ये देखील बहुसंस्कृतीक ते वरून काही पेचप्रसंग उत्पन्न झालेले दिसून येतात. जर्मनीत स्थलांतरितांना सामावून घेण्याच्या मुद्द्यावरून युरोपीय देशांमध्ये बहुसंस्कृतीकतेचा प्रश्न ऐरणीवर आहे.

सांस्कृतिक विविधता हाडामासी खिळलेल्या भारतीय समाजात बहुसंस्कृतीकता हा वादाचा मुद्दा बनला नसला तरी पाश्चात्य देशांत त्यावरुन चर्चेचे मोहोळ उठले आहे. या युरोपियन देशांमध्ये स्थलांतरितांचा (मुस्लीम) प्रश्न उभा आहे. स्थलांतरितांना त्यांच्या संस्कृतीप्रमाणे वागण्याची मुभा देवून जर्मनीने बहुसांस्कृतिकता मान्य करायची की स्थलांतरीतांनी जर्मनीमधील समाजजीवनात एकरूप होऊन जर्मन नागरिकत्वाच्या अटी मान्य करावयाच्या असा सध्याचा प्रश्न असलेला दिसून येतो.

१९६० च्या दशकात जर्मनीनने गेस्ट वर्कर्सना आपल्या देशात येण्याचे निमंत्रण दिले. (कारण तेव्हा जर्मनीला मनुष्यबळाची कमतरता/गरज होती.) त्यावेळी तुर्कस्थानातील अनेक नागरिकांनी उदरनिर्वाहाचा मार्ग म्हणून जर्मनीत स्थलांतर केले. परंतु जर्मनीत राहूनही ते आपली संस्कृती आचार, विचार, रूढी, प्रथा, परंपरा

जपून होते. याच दरम्यान पाश्चात्य राष्ट्रात सर्वप्रथम कॅनडाने बहुसांस्कृतिकतेची संकल्पना स्विकारली विविध संस्कृतीच्या नागरिकांनी बहुसंस्कृतीकतेची संकल्पना स्विकारली. विविध संस्कृतीच्या नागरिकांनी परस्परांचा आदर करणे, हे या संकल्पनेत अपेक्षित आहे.

जर्मनीत १९८० च्या दशकात बहुसंस्कृतीकतेची ही संकल्पना उचलून धरण्यात आली. मात्र या संकल्पनेबाबत तेथे फारशी स्पष्टता झाली नाही. बर्लिनची भिंत पाडल्यानंतर तेथील स्थलांतरितांची संख्या वाढली. १९९० च्या दशकात जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जर्मनीय वांशिक भिन्नता अधिक प्रमाणात आढळून लागली. मात्र अमेरिकेतील 'मेल्टिंग पॉट' प्रमाणे (सुरुवातीच्या काळात स्थलांतरितांनी आपली संस्कृती जपणे व हळूहळू अमेरिकी समाज जीवनात एकरूप होणे) जर्मनीतही तसे घडावे अशी अपेक्षा करण्यात आली, पण जर्मनीत तसे कधी घडले नाही. स्थलांतरितांनी अस्मिता संस्कृती व त्यानुसार त्यांचे जीवन व्यवहार हे मुद्दे त्यांच्यासाठी नेहमीच महत्त्वाचे ठरत गेले. दुसरीकडे सरसकट तेही या समाजाने एकदच व्हावे, यासाठी प्रयत्न केले नाहीत.दरम्यान, ११ सप्टेंबरची घटना घडली आणि दहशतवादाचा मुद्दा प्राधान्याचा बनला. त्यावेळी झालेली 'क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स'ची चर्चा, फ्रान्समधील मुस्लीम तरुणींनी हिजाब बांधण्यावरून उठविलेले वादळ, मुस्लीमांच्या भावना दुखवल्यावरून डच चित्रपट निर्माते व कलाकार थिओ वॅन गोग यांची करण्यात आलेली हत्या, महमंद पैगंबर यांच्या व्यंगचित्रावरून जगभर झालेला हिंसाचार, लंडनमधील बॉम्बस्फोट इत्यादी घटनांमुळे पाश्चात्य देशात मुस्लीमांच्या विरोधात वातावरण बनले. त्याच पार्श्वभूमीवर जर्मनीत बहुसंस्कृतीवादची चर्चा होण्यास सुरुवात झाली.

## २.२ विषय–विवेचन :

### २.२.१ बहुसंस्कृतीवाद अर्थ आणि विकास :

**बहुसंस्कृतीवादाचा अर्थ :** बहुसंस्कृतीवाद म्हणजे एखाद्या समाजात विविध संस्कृतींचे सहअस्तित्व व सहजीवन मान्य करणे आणि राज्यघटनेच्या व कायद्याच्या विशिष्ट मर्यादित वेगवेगळ्या संस्कृतीचा अंगीकार करणाऱ्या समाजघटकांना त्यांच्या सांस्कृतिक परंपरा आणि आचार यांचे पालन करण्याचे स्वातंत्र्य देणे त्यामुळे बहुसंस्कृतीकता अस्तित्वात येते. बहुसंस्कतीकतामध्ये वंश वा सांस्कृतीचे अस्तित्व असते जे एकाच भौतिक, भौगोलिक क्षेत्रात त्यांच्या त्यांच्या अस्तित्वात असलेल्या फरकांना सामावून घेते. मग ते धार्मिक, भाषिक अथवा वांशिक, लिंगावर आधारित का असेनात, बहुसंस्कृतीकता हे एक तत्त्व आहे. जे सर्व क्षेत्रात विद्यमान सांस्कृतिक विविधता ओळखते आणि या विविधतेच्या अधिकारास मान्यता व प्रोत्साहन देते. सामुदायिक आदर आणि सहिष्णुता यांच्या देवाण–घेवाणीतून बहुसंस्कृतीकता अस्तित्वात येते.

आजच्या जगातील बहुतांश राष्ट्रे ही बहुविध असलेली दिसून येतात. एकाच राष्ट्रातील लोकांचे बहुविध वंश, भाषा, संस्कृती असलेल्या दिसून येतात अशा एकसंध राष्ट्रात बहुविध लोकांना घटनात्मक संरचनेत एकसंघ बांधणी करणे हे देखील एक प्रकारचे प्रश्न अनेक राष्ट्रांपुढे असलेले दिसून येतात. याचाच शोध आणि त्याची उत्तरे शोधण्याचे कार्य ही संकल्पना करते, एकाच राष्ट्रात अनेक वंशाने नटलेल्या त्याच्या बहुविविधतेला अनुलक्षुन त्यांचे नागरी व राजकीय हक्क जोपासले गेले. पाहिजेत याच तत्वाला अनुसरून बहुसंस्कृतीकता निर्देश

करते. आजच्या अनेक राष्ट्रांमध्ये लोकशाही मुल्यांचा अंगिकार करून देखील राष्ट्रांमध्ये वांशिक भेदभाव उफाळलेले दिसून येतात. पाश्चात्य राष्ट्रामध्ये अशी अनेक राष्ट्रे आहेत. ज्या राष्ट्रामध्ये अनेक कारणांनी बहुविध वंश, संस्कृती एकाच भूभागावर रहिवास करतात तेथील बहुसंख्यांक व अल्पसंख्यांकाचे अनेक सामाजिक व राजकीय प्रश्न भेडसावत आहेत.

''बहुसंस्कृतीवाद ही अशी प्रक्रिया आहे. ज्यात समन्यायी तत्त्वाचा अंगिकार करून सर्वच धर्म, वंश, पंथाच्या लोकांना भेदभाव विरहित समान आणि मान्यता दिली जाते.

यावरून असे म्हणता येईल कि, सामाजिक सलोखा व एकात्मता टिकविण्यासाठी जबाबदार नागरिकत्वाच्या विकासासाठी समानतेची जागतिक चेतना जागृतीसाठी व सांस्कृतिक आदान-प्रदानासाठी बहुसंस्कृतीकतेचा आदर व सन्मान यांची स्विकृती करणे अत्यावश्यक आहे. बहुसंस्कृतीवादाची संकल्पना ही तशी गुंतागुंतीची आहे. कॅनडा राष्ट्राशी संबधीत विचार केला तर तेथील कायद्यानुसार कॅनडात राष्ट्र तेथील वांशिक व सांस्कृतिक बहुविविधतेचा आदर, सन्मान करून त्यांचा वारसा जपण्याचा न्यायिक तत्त्वाचा आधार घेवून अवलंब व प्रोत्साहन देतात. थोडक्यात, बहुसांस्कृतिकता हा एक विचारप्रवाह आहे. काही प्रमाणात वैचारिक चळवळ म्हणता येईल की, ज्या राष्ट्रामध्ये काही वंश अल्पसंख्यांक गटात विभागले गेले आहेत, जे स्वत:ची वेगळी संस्कृती, वांशिकता यांची जपणूक करण्याचा प्रयत्न करतात.

बहुसंस्कृतीकता ही दोन शब्दाने अस्तित्वात आलेली आहे. एक बहु म्हणजे एकापेक्षा अधिक आणि संस्कृती म्हणजे जीवन जगण्याचा वा जीवनाकडे व जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अशा दोन शब्दापासून हा शब्द तयार झाला आहे. संस्कृती ही एकप्रकारची वेगळी ओळख निर्माण करते. ही ओळख जेव्हा आपण संस्कृतीला वंश, भाषा, राष्ट्रीयत्व व धर्माशी जोडतो.

**बहुसंस्कृतीवादाच्या विकासाचे टप्पे :**

बहुसंस्कृतीवादाच्या विकासाचे तीन टप्पे सर्वसाधारणपणे पडतात. यातून बहुसंस्कृतीवाद ही संकल्पना अधिकाधिक विकसित होत गेली. युरोपीय देशामध्ये ज्या वेळी राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा उदय झाला अशावेळी एक संस्कृती, एक भाषा, एक धर्म इ. तत्त्वे या कल्पनेचे मुख्य आधार होते. त्यानुसार युरोपामधील सर्व राष्ट्रांची निर्मिती झाली. परंतु या राष्ट्रामध्ये भिन्न संस्कृतीच्या आचारविचाराचा विकास केला गेला नाही. त्यामुळे या अल्पसंख्यांक समूहामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. म्हणून अल्पसंख्यांक गटांनी त्या देशातल्या राष्ट्रीय एकजिनसी संस्कृतीला आव्हान देण्यास सुरुवात केली. त्यातून एकजिनसी संस्कृतीच्या विचारप्रणालीवर टिका होताना दिसते आणि या टिकेचा भाग म्हणून बहुसंस्कृतीवादाचा विकास होताना दिसतो. बहुसंस्कृतीवादाच्या विकासाचे टप्पे खालीलप्रमाणे पाहता येतात.

**१) बहुसंस्कृतीवादाचा विकासाचा पहिला टप्पा :**

१९६० च्या दशकामध्ये वांशिक चळवळ निर्माण झाली. या कालखंडास बहुसंस्कृतीवादाचा पहिला टप्पा मानला जातो. ही वांशिक उच्चनिच्चता किंवा कृष्णवर्णियांच्या हक्काची चळवळ होती. आपले नागरी हक्क

प्राप्त करण्यासाठी उभारलेला हा व्यापक असा लढा होता. ज्याचे नेतृत्त्व मार्टिन ल्यूथर किंग यांनी केले. हा एक पहिलाच सांस्कृतिक आग्रहाने ओळख सांगणारा प्रयोग होता. वर्षानुवर्षे संस्कृतीचा वाहक असणारा, अमेरिकन राष्ट्रवादाची जी एकजिनसी संस्कृती त्यामधून निर्माण झालेल्या उपसंस्कृतीचा घटक असणारा कृष्णवर्णीय समाज होय. जो कृष्णवर्णीय समाज त्यांच्या नागरी हक्काची चळवळ अतिशय टोकदार बनली आणि त्यातूनच या समाजाची स्वत:ची एक वेगळी राजकीय, सामाजिक ओळख प्रस्थापित झाली. पुढे तिचा प्रभाव कमी होत गेल्यामुळे ब्लॅक पँथरची जहालवादी चळवळ उदयास आली. या चळवळीमुळे अनेक आफ्रिकन, अमेरिकन मुस्लीम या सैनिकी ब्लॅक पँथरचे नेतृत्त्व करीत होते. अशाप्रकारे अमेरिकन संस्कृतीतील अंतर्गत विरोध करण्यासाठी या प्रकारच्या वेगळ्या सांस्कृतिक विचारांनी प्रेरित झालेल्या संघटना कार्य करताना दिसू लागल्या. परंतु या चळवळी बहुसंस्कृतीवादाचे ठाव आहे, असे संबोधले गेले नाही. तर तिला एकजिनशी संस्कृतीमध्येच समावेशित असलेला दुसरा आवाज म्हणून ओळखले गेले. फ्रान्समधील स्काशियनची चळवळ, बेल्जियममधील प्लॅन्डर्सची चळवळ, ऑस्ट्रेलियातील आदिवासी वा मूळगामी चळवळ, न्यूझीलंडमधील माओरी चळवळ इ. चळवळी सुरू झाल्या होत्या. अशा तऱ्हेने जागतिक पातळीवर असे चित्र या टप्प्यावर पाहण्यास मिळते.

**२) बहुसंस्कृतीवादाच्या विकासाचा दुसरा टप्पा :**

वर्णवंशविरोधी (Black Consciousness) चळवळी पासून अनेक देशामध्ये १९७० च्या दशकामध्ये चळवळी सुरू झाल्या. अनेक वांशिक व सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या चळवळी ज्याला आपण बहुसंस्कृतीक राष्ट्रवाद म्हणतो या चळवळी उदयास आलेल्या आपणास दिसतात. कॅनडामध्ये क्युबेक प्रांतामध्ये जे फ्रेंच भाषिक लोक आहेत त्यांनी स्वत:चा वेगळा फ्रेंच राष्ट्रवाद सांगण्यास सुरुवात केली. अशा प्रकारे प्रत्येक देशातील भाषिक समूह हे आपली वेगळी राजकीय ओळख सांगू लागले. कॅनडात जी सुरुवात झाली तसे इंग्लंडमध्ये स्कॉटिश व वेल्स राष्ट्रवादाच्या चळवळी सुरू झाल्या. स्पेनमध्ये कॅटॉलॉनिया व बास्क प्रांतामध्ये अनेक विभक्तवादी चळवळी तिथल्या राष्ट्रवादाच्या विरोधामध्ये सुरू झालेल्या दिसतात. अशाप्रकारे अनेक देशामध्ये प्रामुख्याने पहिल्या जगामध्ये वांशिक राष्ट्रवाद व सांस्कृतिक ओळख निर्माण व्हावी, यासाठी राजकीयदृष्ट्या प्रयत्न करताना अनेक वांशिक गट दिसून येतात.

**३) बहुसंस्कृतीवादाच्या विकासाचा तिसरा टप्पा :**

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपच्या पूर्नरचनेची जबाबदारी आणि उद्ध्वस्त झालेल्या युरोपला पुन्हा उभे करण्यासाठी आणि तेथे काम करण्यासाठी श्रमिक व कामगारांची आवश्यकता होती. त्यामुळेच आशिया आणि आफ्रिका खंडातील तिसऱ्या जगातील वासाहतीक देशातील लोकांना मागवायला सुरुवात केली आणि त्यामधून असे चित्र दिसले की दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपच्या पूर्नरचनेसाठी जगातील कामगार स्थलांतरित झाले. ते पहिल्या जगातील अनेक देशामध्ये कामाच्या निमित्ताने जात आहेत. यामुळे जगातील अनेक समूह मोठ्या प्रमाणात स्थलांतरित झाले. तेव्हा ते समूह आपआपली मूळ संस्कृती घेऊन गेले आणि सांस्कृतिक गटाने राहू लागले. ही प्रक्रिया १९९० ते २००० सालापर्यंत चालू होती. परंतु युरोप व

अमेरिकेतील देशांनी स्थलांतर कायदा करून त्यावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला. पण तोपर्यंत स्थलांतरित समूहांनी आपली सांस्कृतिक ओळख निर्माण केली होती आणि या गटामध्ये राजकीय जनजागृती झाल्याची दिसते. १९९० नंतर जागतिकिकरणाच्या प्रक्रियेमुळे साम्यवादी जग कोलमडून पडले आणि सगळे वांशिक गट विखुरले गेले त्यातून त्यांनी आपली स्वत:ची सांस्कृतिक ओळख सांगण्यास सुरुवात केली. त्यामुळे जागतिक पातळीवर सांस्कृतिक संघर्ष हा प्रश्न निर्माण झाला आणि या संघर्षाच्या माध्यमातून बहुसंस्कृतीवाद उदयास आला.

बहुसंस्कृतीवादामध्ये सांस्कृतिक विविधतेला पोषणकारी मूल्य मानले. समाजाचे रक्षण व्हावे आणि प्रत्येक संस्कृतीचा विकास व्हावा या दृष्टीकोनातून १९६० च्या दशकापासून ते खऱ्या अर्थाने १९७० च्या दशकात बहुसांस्कृतिवादाला महत्त्व प्राप्त झाले. १९३८ च्या सुमारास कल्चरल मोझॉक असा शब्द जॉन गिबन यांनी आपल्या कॅनेडियन मोझॅक या पुस्तकात मांडला होता. १९६५ मध्ये जॉन पीटर यांनी व्हर्टीकल मोझॅक हा शब्दप्रयोग केला होता. पुढे जगातील प्रत्येक देशामध्ये बहुसंस्कृतीवादाचे राजकारण व सिद्धांत आणि संकल्पनेच्या माध्यमातून आवश्यक व गरजेचे वाटू लागले. यामधूनच बहुसंस्कृतीवादाच्या विकासामध्ये चार्ल्स टेलर या कॅनेडियन तत्त्वज्ञाने १९९२ मध्ये 'मल्टिकल्चरॅलिझम ॲन्ड द पॉलिटिक्स ऑफ रेकगनीशन' हे पुस्तक लिहिले आणि यामध्ये सांस्कृतिक गटांच्या हक्कांची मान्यता आणि प्रत्येक गटाला समानतेची हमी याची चर्चा केली. प्रत्येक संस्कृतीला आपली स्वत:ची ओळख मिळविणे आणि त्याना समानतेची मान्यता मिळण्यासाठी प्रयत्न करणे हे मुख्य तत्त्व बहुसंस्कृतीवादाच्या सिद्धांताचे तत्वज्ञान आहे. पुढे भिखु पोरख यांनी आपल्या बहुसंस्कृतीवादाच्या विचारांची मांडणी केली.

**भिखु पारेख आणि बहुसंस्कृतीवाद :**

सामाजिक विचारवंत, राजकीय तत्त्वज्ञ म्हणून गांधीवादी विचारवंत अनिवासी भारतीय तत्त्वज्ञ भिखु पारेख यांना ओळखले जाते. यांनी Contemporay Political Thinkers (1982), Gandhis Political Philosophy (1989), Colonialism Tradition and Reform (1999) आणि सर्वांत महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे Rethinking Multiculturalism : Cultural Diversity and Political Theory हा होय. दुसऱ्या महायुद्धानंतर स्थलांतरित झालेल्या समूहानी १९९० नंतर आपली ओळख सांगण्यास सुरुवात केली. कारण त्यांना आपआपल्या समूहांनी आपली संस्कृती, परंपरा जतन करायच्या होत्या. त्यामुळे इंग्लंडमध्ये आशियाई लोकांची संख्या वाढली होती आणि स्कॉटलंड मध्ये फुटीरतावादी चळवळ सुरू झाली होती. त्यामुळे इंग्लंड सरकारने या प्रश्नावर विचार करण्यासाठी Commission of Multi-Ethinic Britain नावाची समिती नेमली. त्याचे अध्यक्ष भिखू पारेख होते. या समितीने सरकारला आपला अहवाल सादर केला. त्यातील काही प्रमुख गोष्टी पुढीलप्रमाणे –

१. जागतिकीकरणामुळे विज्ञान व तंत्रज्ञान विकासामुळे आणि बदलत्या परिस्थितीमुळे जग हे अत्यंत जवळ येत आहे. त्यामुळे स्थलांतराचे प्रमाण वाढत जाणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कामगारांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे प्रत्येक देशातील विविध संस्कृतीचे लोक रहात असल्याचे दिसून येते.

२. सांस्कृतिक संघर्ष हे लोकांमधल्या दोन प्रक्रियेच्या माध्यमातून घडते पहिला म्हणजे जे स्थलांतरित झालेले लोक आहेत ते आपली धार्मिक, सांस्कृतिक अस्मिता निर्माण करतात. दुसरे म्हणजे देशांतर्गत असलेल्या लोकांमध्ये आपली सांस्कृतिक भाषिक अस्मिता निर्माण होते. कारण ते स्थानिक परंपरावर भर देतात. त्यातून अस्मितेचे राजकारण निर्माण होते समूह आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करतात. हे संघर्ष बळाच्या आधारे दडपून टाकता येत नाहीत.

३. जगातील बहुतेक देश बहुसांस्कृतिक बनत आहेत. अशा बहुसांस्कृतिक देशात लोकशाही व्यवस्था असली पाहिजे आणि या व्यवस्थेमधील राज्यघटनेत असे बदल करावे की, ज्यामुळे बहुसांस्कृतिक समाजाला सुखासमाधानाते जगता येईल.

४. बहुसांस्कृतीक समाज निर्मितीमुळे एकात्म राज्याचा जो काळ होता. त्यातील सार्वभौमत्वाची कल्पना लयास गेली आहे. त्यामुळे उदार लवचिक संघराज्याची निर्मिती करणे आवश्यक आहे. म्हणून संघराज्यवाद, उदारवाद देशाच्या परंपरेनुसार जगातील सर्व देशानी स्विकरावा.

५. समाजात वेगवेगळे सांस्कृतिक घटक असणे सांस्कृतिक विकासास आवश्यक आहे. त्यामुळे समाजाचा जो साचेबंदपणा आहे तो जाईल. समाजात नव घटक निर्माण होवून नव्या विचाराने आहे, ती संस्कृती समृद्ध बनेल त्यामुळे बहुसांस्कृतिक समाज हा अडचणीचा नसून तो लाभदायी आहे.

६. बहुसंस्कृतीवादामध्ये एक व्यापक सहिष्णू, उदारमताच्या समाजाची कल्पना अपेक्षित आहे, अशा समाजाची निर्मिती करण्यासाठी सर्व धार्मिक श्रद्धांना मान्यता देणे, इतरांच्या स्वायत्ततेला महत्त्व देणे, संस्कृतीचे जतन करणे आणि राज्यात ऐक्य टिकवून ठेवणे अशा प्रकारची धोरणे अवलंबली पाहिजे. वरील मुद्द्याचा समावेश अहवालात केला होता. भिखू पारेख यांनी बहुसंस्कृतीकतेचे तीन मार्मिक मुद्द्यांवर चिंतन केलेचे दिसून येते.

१. मानवाची सांस्कृतिक ओळख ही तो ज्या सांस्कृतिक संरचनेमधील जगात वाढतो आणि जगतो त्या सांस्कृतिक संरचनेत त्याची ओळख आणि सामाजिक संबंध निर्माण होतात. त्यातच त्याला जीवनविषयक अर्थ प्राप्त होतात.

२. वेगवेगळ्या संस्कृतीनी आपआपल्या सांस्कृतिक जडणघडणीतून जीवन जगत असताना मानवी अस्तित्वाच्या क्षमतांची जाणीव झाली. या मानवी अस्तित्वाच्या मौलिक आणि बौद्धीक क्षितिजाच्या गरजा आणि मर्यादा लक्षात घेवून त्या जपण्याचा प्रयत्न केला गेला, याचा अर्थ असा नव्हे कि विशिष्ठ संरचित सांस्कृतिक जडणघडणीत वाढलेली व्यक्ती स्वत:च्या सांस्कृतिक परिघात चांगले जीवन जगू शकत नाही. थोडक्यात, कोणतीच संस्कृती ना चांगली ना वाईट अशी असते. त्यामुळे प्रत्येक संस्कृतीला स्वतंत्र आणि विकासाची संधी दिली पाहिजे.

३. प्रत्येक संस्कृती काही आंतरिक स्वरूपात उदार आणि लोकशाही मुल्याधारित असली पाहिजे. प्रत्येक संस्कृतीचे अस्तित्व टिकवण्यासाठी आंतरिक सुधारणा आणि नव्याचा स्विकार करणारी उदार भूमिका असली पाहिजे.

या तीन सांस्कृतिक मुद्द्यांमध्ये सामंजस्य साधल्यानंतर बहुसंस्कृतीकता अस्तित्वात येवू शकते, असे भिखु पारेख मांडतात.

## २.२.२ विल किमलिका यांचा बहुसंस्कृतीवादाचा सिद्धांत :

बहुसंस्कृतीवाद हा अल्पसंख्यांकाच्या हक्काचे समर्थन कशा पद्धतीने करतो. याविषयी क्वीन्स विद्यापीठाचे प्राध्यापक विचारवंत विल किमलिका यांनी आपल्या विचारांची प्रस्तुतता केली आहे. त्यांनी बहुसंस्कृतीवादाबद्दल संशोधन केले असून त्या आधारे त्यांनी 'मल्टिकल्चरॅलिझम – सक्सेस', 'फेल्युअर ॲन्ड द फ्युचर', 'मल्टीकल्चरल सिटीजनशीप : अ लिबरल थेअरी ऑफ मायनॉरीटी राईटस्' (१९९५), कन्टेम्परारी पॉलिटिकल फिलॉसॉफी इ. पुस्तके लिहिली. विल किमलिकाच्या मते हे समूह म्हणजे तो वांशिक–सांस्कृतिक या दोन शब्दाला आधारभूत मानून बहुसांस्कतीवाद त्या समूहाच्या हक्कांसाठी वापरला जातो. यामध्ये जातीय गट, स्थलांतरित, राष्ट्रीय अल्पसंख्यांक, स्वदेशी लोक, वांशिक व सांस्कृतिक गट इत्यादी बाबींना समाविष्ठ केला जातो. त्यांच्या मते, वांशिक व सांस्कृतिक गटांची वैशिष्ट्ये ही समान असतात. ती म्हणजे नागरिकांचे राजकीय व सार्वजनिक हक्क संरक्षित केलेले असतात. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे सांस्कृतिक समूहांना मान्यता देणे आणि सामावून घेणे व त्यांची ओळख निर्माण करणे गरजेचे आहे.

बहुसंस्कृतीवाद अभ्यासत असताना समाजातील विविधतेचे दोन प्रकार सांगितले आहेत. पहिला म्हणजे पूर्वीपासूनच संच नियंत्रित असलेल्या सांस्कृतिक समूहांना एकत्रित आणून एका मोठ्या राज्यात त्यांचा समावेश केला जातो. त्यामुळे त्या राज्यात सांस्कृतिक समूहाना एकत्रित आणून एका मोठ्या राज्यात त्याचा समावेश केला जातो. त्यामुळे त्या राज्यात त्या लोकांची सांस्कृतिक विविधता निर्माण होते. दुसरे म्हणजे, विविध व्यक्ती समूह स्थलांतरित होवून एकत्र राहत असलेल्या समाजामध्ये सांस्कृतिक वैविध्य निर्माण झालेले असते. यामध्ये अनुक्रमे राष्ट्रीय अल्पसंख्यांक व वांशिकसमूह वैविध्य असते, विल किमलिका संबोधतात की, सांस्कृतिक वैविध्यता टिकविणे अत्यंत आवश्यक आहे. कारण अल्पसंख्याक समूहांना जी दुय्यमत्वाची वागणूक दिली जाते ती कुठे तरी संपवली पाहिजे आणि त्या समूहांची संस्कृती, प्रथा, परंपरा ही अबाधित राहिली पाहिजे आणि त्यामधून त्यांचा उत्कर्ष झाला पाहिजे, अशी आग्रही भूमिका विल किमलिका मांडतात. ही दुय्यमत्व नष्ट करण्यासाठी विल किमलिका यांनी आपल्या बहुसंस्कृतीवादाच्या सिद्धांतामध्ये पुनर्वितरणाचे व मान्यतेचे राजकारण या दोन तत्त्वामधून बहुसांस्कृतिकता जपली जावू शकते, असे मत व्यक्त करतात.

**विक किमलिकांचा**
**बहुसंस्कृतीवादी सिद्धांत**

- मान्यतेचे राजकारण अल्पसंख्यांक
  - ↓ स्वशासनाचा हक्क
- अमेरिकेतील आफ्रिकन स्त्रिया अपंग समलिंग आणि तृतीयपंथी
  - ↓ बहुसांस्कृतिक हक्क (संस्कृती, प्रथा, परंपरा, भाषा, भूषा, आचार, उच्चार, विचार पाळण्याचा प्रसार करण्याचा हक्क)
- पुनर्वितरणाचे राजकारण आर्थिक सामाजिक, राजकीय बाबीविषयी
  - ↓ विशेष प्रतिनिधीत्वाचा हक्क
    - १) राजकीय प्रक्रियेत सहभागाचे
    - २) राजकीय प्रक्रियेत प्रतिनिधीत्व
    - ३) धोरणनिर्मितीमध्ये सहभागाचा हक्क

**अ) पुनर्वितरणाचे राजकारण :**

या तत्त्वानुसार समाजातील विषमता व अन्याय दूर करण्याचे तत्त्व राजकारण असून उदारमतवादी, कल्याणकारी, साम्यवादी राज्यामध्ये या तत्वाचा किंवा राजकारणाचा अवलंब केला जातो. पूर्वीपासूनच समाजामध्ये उत्पादन साधनांचे विषय वितरण झाल्यामुळे समाजातील दुर्बल घटकांचे शोषण पिळवणूक होते. त्यामुळे राज्यसंस्थेने आर्थिक बाबीमध्ये सकारात्मक बदल करण्यासाठी हस्तक्षेप करून हे दुय्यमत्व / विषमता दूर करावी, अशी अपेक्षा आहे. परंतु तरीही राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक विषमता कायम राहण्याची शक्यता आहे. कारण आर्थिक लाभामुळे समाजात बदल होत नाही तर त्या बरोबर सामाजिक व राजकीय घटकांमध्ये ही व्यापक बदल अपेक्षित असतो.

**ब) मान्यतेचे राजकारण :**

सामाजिक पार्श्वभूमी पूर्वीपासून सबल असणारा वर्ग हा परंपरने अधिमान्यता प्राप्त असतो. समाजातील वंचित व शोषित घटकांना बरोबरीचा दर्जा व मान्यता हवी असते. मात्र जे अल्पसंख्य गट, स्त्रिया, समलिंगी गट, त्यांना समाजात मान्यता प्राप्त करण्यासाठी लढा द्यावा लागतो. आपण या समाजाचा एक घटक असल्याने आपले अस्तित्व बरोबरीचे आहे आणि प्रस्थापित समाजाने ते मान्य करावे, असे त्यांना वाटत असते. यासाठी त्यांचा संघर्ष असतो. आपले वेगवळेपणाचे अस्तित्व मान्य करून आपला तिरस्कार न करता त्यांना समान समाजमान्यता मिळावी, अशी त्यांची भूमिका असते.

बहुसंस्कृतीवादाच्या सिद्धांतमध्ये मुख्यत्व करून अल्पसंख्यांकाच्या हक्काचे समर्थन करणे, हा असून त्याच्या मते या अल्पसंख्यांक समूहांना खालील तीन प्रकारचे अधिकार असावेत.

१) स्वशासनाचा अधिकार/हक्क,

२) बहुसांस्कृतिक हक्क,

३) विशेष प्रतिनिधीत्वाचा हक्क

**१) स्वशासनाचा हक्क :** अल्पसंख्याकांना स्वशासनाचा अधिकार असतो तो असला पाहिजे आणि तो पाहिजे. स्वशासनाचा हक्क हा संविधानाच्या संघराज्याच्या चौकटी राहून तो त्यांना प्रदान केले पाहिजेत तसेच स्वशासनाचे वेगवेगळे अविष्कार असू शकतात किंवा त्याचे कार्यक्षेत्र वेगळे असू शकते. म्हणून संघराज्याच्या चौकटिस हक्क दिले पाहिजे. जे पिढ्यान्‌पिढ्या सांस्कृतिक समूह एका प्रदेशामध्ये राहिले आहेत. त्यांना एक ऐतिहासिक आधार आहे. अशा समूहांनी आपल्या संस्कृतीची ओळख निर्माण करण्याची भावना आहे, ते समूह स्वशासनाची मागणी करतात. स्वशासनाचा अधिकार हा राजकीय स्वायत्ततेपुरता मर्यादित असला पाहिजे आणि त्या समूहाची संस्कृती सुरक्षित राहिली पाहिजे.

**२) बहुसांस्कृतिक हक्क :** संस्कृती, प्रथा, परंपरा, भाषा, आचार-विचार पाळण्याचा प्रसार करण्याचा हक्क म्हणजे बहुसांस्कृतिक हक्क होय आणि तो असला पाहिजे, असे किमलिका म्हणतात अल्पसंख्यांकाचे बहुसांस्कृतीक हक्क मान्य केले पाहिजेत कारण प्रत्येक व्यक्ती वा व्यक्तीसमूह ही कोणत्याही संस्कृतीचा भाग असतो. त्यामुळे त्याला त्याच्या सांस्कृतिक सदस्यत्वाची शाश्वती मिळाली पाहिजे तसेच त्या समूहाला दुसऱ्या संस्कृतीचा वाहक वा सदस्य व्हायचे असल्यास ही मान्यता मिळाली पाहिजे. त्यामुळे त्या व्यक्तीला खऱ्या अर्थाने जीवन जगता येईल. कारण राज्याच्या नियमाबरोबर काही सांस्कृतिक परंपरागत नियम तयार झालेले असतात त्याचाही व्यक्तीला वापर करण्याचा अधिकार असला पाहिजे. सांस्कृतिक अधिकार हे समूहांना आणि त्यांच्या व्यवहारांना कायदा प्रदान करते. त्यामुळेच सांस्कृतिक अधिकार असेल.

**३. विशेष प्रतिनिधीत्वाचा हक्क :** विल किमलिकाच्या मते, बहुसंस्कृतीवादामध्ये हा हक्क अल्पसंख्यांक समाजाला राजकीय दृष्ट्या सक्षम करण्यासाठी महत्त्वाचा आहे. कारण अल्पसंख्यांक समुदायाला राजकीय प्रक्रियेत मत नोंदविण्याचा, नेतृत्त्व करण्याचा, धोरण ठरविण्याचा आपले विशिष्ट विचार समाजहितास्तव नोंदविण्याची संधी मिळणे यासाठी आवश्यक आहे. कारण वेगवेगळ्या समूहामध्ये / गटांमध्ये, संस्था, घटना, व्यवहार व सामाजिक समस्येबद्दल वेगळी माहिती असते. त्याचा तो दृष्टीकोन असतो. त्यामुळे त्या समूहाचे सदस्य सामाजिक कामामध्ये चांगले योगदान देऊ शकतात आणि त्यांना राजकीय प्रक्रियेत समाविष्ठ केले तर त्याच्यामध्ये सार्वजनिक ज्ञान वाढेल ते राष्ट्राच्या विकास निर्मिती प्रक्रियेत मुख्य प्रवाहात येतील. जे दुर्लक्षित अल्पसंख्यांक आहे. त्यांना जाणीवपूर्वक प्रतिनिधीत्व देवून समाजामध्ये एकोपा निर्माण केला पाहिजे. त्यामुळे राष्ट्राचीशक्ती वाढेल. उदा. स्त्रियांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्वासाठी राखीव जागा ठेवणे.

अल्पसंख्यांकांचे अधिकार आणि त्याचे बहुसंस्कृतीवादातील महत्त्व विल किमलिका यांनी समर्पक पद्धतीने स्पष्ट केले आहे.

### २.२.३ बहुसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवाद :

समाजघटकांना एकत्र आणण्यासाठी राष्ट्रवादाचा विचार आजच्या आधुनिक कालखंडामध्ये महत्त्वाचे घटक म्हणून त्याकडे पाहिले जाते. सर्व भाषिक, धार्मिक व वांशिक अस्मितांना अधिक महत्त्व न देता राष्ट्रीय अस्मिता, राष्ट्रअभिमान बळकट करणे महत्त्वाचे वाटते. राष्ट्रवाद ही एक मानसिक भावना आहे जी प्रादेशिक व सांस्कृतिक अस्मितांच्या आधारे निर्माण केली जाते. विशेष करून प. युरोपात राष्ट्रवादाच्या संकल्पनेचा विचार करताना एक भाषा, एक संस्कृती, सलग भूप्रदेश, आर्थिक हितसंबंध व एकत्वाची मनोधारणा यावर भर देण्यात आला आणि यातूनच समाजाच्या एकत्वाचे महत्त्व मांडण्यात आले. पण एकजिनसीपणा कसा आणायचा? सामाजिक एकीकरण कसे घडवून आणायचे आणि समाजात जी विविधता आहे, तिची व्यवस्था कशी लावायची हा प्रश्न होताच. कारण आधुनिक समाजात वेगवेगळ्या प्रकारचे अल्पसंख्याक गट निर्माण झाले आहेत. पाश्चात्य देशात दोन प्रकारची राष्ट्रे निर्माण झाली. यामध्ये अनुक्रमे,

(१) नागरी राष्ट्र

(२) वांशिक राष्ट्र

**(१) नागरी राष्ट्र :** ज्या राष्ट्रामध्ये घटनेवर व राज्यव्यवस्थेवर लोकांचा विश्वास आहे व अधिकारांचे योग्य वाटप करण्यात आले आहे. राष्ट्रनिर्मिती अथवा राष्ट्र उभारणीसाठी कोणत्याही प्रकारच्या अती अडचणी निर्माण झाल्या नाही. या देशांमध्ये राष्ट्रउभारणीसाठी भाषा, शिक्षण व्यवस्था आणि शिक्षण व्यवस्थेमधील प्रवेशाचे धोरण, त्यामधील अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके, सरकारी नोकऱ्यांत अल्पसंख्याकांचे प्रतिनिधित्व सरकारचे नागरिकत्वाचे धोरण, प्रसारमाध्यमे आणि त्यांची भूमिका या सर्व बाबींचा समावेश होतो. उदा. आफ्रिकेत अमेरिकनाच्या नागरी हक्काचा प्रश्न महत्त्वाचा होता आणि तो प्रश्न सोडवत असताना अब्राहम लिंकन, मार्टीन ल्यूथर किंवा यांच्या सारख्यांचा बळी गेला. पुढे जर आपण पाहिले तर अमेरिकेच्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीमध्ये तत्कालिन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सारखे उमेदवार स्थलांतरिताच्या विरोधी व मुस्लिमांच्या विरोधी प्रचार करून जनमत आकर्षित करण्याचा प्रयत्न करतात किंवा ब्रिटनमध्ये झाललेल्या जनमत संग्रहात पं. युरोप व आशियातील निर्वासित आपल्या देशात येतील म्हणून युरोपिय संघातून बाहेर पडण्याचा निर्णय ब्रिटीश लोकांनी घेतलेला दिसून येतो. या सर्व व्यवहारात समावेशकता किती हा महत्त्वाचा प्रश्न असतो. उदारमतवादी, लोकशाही चौकट असणाऱ्या देशात व्यक्तीचे अधिकार सामाजिक आणि धार्मिक गटांचे अधिकार आणि त्यांची अंमलबजावणी यामध्ये समसमानता साधणे गरजेचे असते.

**(२) वांशिक राष्ट्र :** वांशिक राष्ट्रात राष्ट्राची उभारणी एका विशिष्ट वंशाच्या, धर्माच्या व राष्ट्रकाच्या आधारे केली जाते. इस्राईल हे या प्रकारच्या राष्ट्राचे उदाहरण आहे. पण प्रत्येक राष्ट्राचा पायाभूत घटक म्हणून एक सांस्कृतिक, वांशिक अस्मिता असतेच आणि त्या देशातील जनता त्याला एकरूप झालेली असते. अशा प्रकारच्या राष्ट्रात बहुसंख्यांकांची अस्मिता पायाभूत मानली जाते तिचा आदर आणि स्वीकार करावा, अशी भूमिका असते आणि अल्पसंख्याकांना काही महत्त्वाच्या जागांपासून दूर ठेवले जाते जेव्हा जेव्हा आपण

बहुसंस्कृतीवादाचा विचार करतो तेव्हा आपणास वंशविरोधी चळवळीपासून जेव्हा १९७० च्या दशकामध्ये अनेक वांशिक, सांस्कृतिक व राष्ट्रवादाच्या चळवळी झाल्या. यामधून बहुसंस्कृतिक राष्ट्रवाद या पद्धतीच्या चळवळी उदयाला आल्या. उदा. कॅनडामध्ये क्युबेक प्रांतामध्ये जे फ्रेंच भाषिक आहेत त्यांनी स्वत:चा फ्रेंच राष्ट्रवाद सांगितला. कॅनेडीयन संस्कृती मध्ये आपले हितसंबंध जपले जात नाहीत. यासाठी आम्हाला स्वायत्तता पाहिजे, ही मागणी कुवेत प्रांतातून केल्याची दिसते. अशा तऱ्हेने बहुसंस्कृतीवादास वाव कमी असतो. लोकशाही स्वरूप बहुमतवादी असते.

राजकीय व्यवस्थेमध्ये सहभाग व सामाजिक व्यवस्थेमध्ये अल्पसंख्यांकांचे समावेशन हा वादग्रस्त मुद्दा असतो. कोणत्याही समाजामध्ये बहुसंख्यांकांची भाषा व संस्कृती यांना अधिक महत्त्व असते. याला कोणत्याही व्यवस्थेमधील अर्थव्यवस्था ही पाठीशी घालते व त्यास आर्थिक पाठबळ देत असते. त्यामुळे अल्पसंख्यांक भाषिकांना अडचणींना सामोरे जावे लागते.

बहुसंस्कृतिक व बहुधार्मिक देशांमधील अल्पसंख्यांक सांस्कृतिक घटकांपुढे खालील पाच पर्याय उपलब्ध असतात.

१) त्या सांस्कृतिक वा धार्मिक गटाची वस्ती जर बऱ्याच वर्षापासून एका सलग भूप्रदेशात असेल तर वर्चस्वाखाली राहायचे नाही म्हणून राष्ट्रीय स्वयंनिर्णयाच्या अधिकाराची मागणी करून स्वत:चे वेगळे राष्ट्र स्थापन करणे उदा. भारतातील मुसलमानांनी हिंदू बहुसंख्याकांच्या वर्चस्वाखाली राहायचे नाही म्हणून १९४७ साली पाकिस्तानची स्थापना केली. चार बाल्टिक राष्ट्रे रशियापासून, तिमोर इंडोनेशिया पासून, सिंगापूर हे मलेशियापासून याच पद्धतीने अलग झाले.

२) आपल्या शेजारी आपल्या धर्माचे पालन करणारे वा आपली भाषा बोलणारे राष्ट्र असेल तर त्या राष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्थलांतर करणे याचे उदाहरण म्हणजे भारत व पाकिस्तान फाळणी झाल्यानंतर सुमारे ७३ लाख मुसलमानांनी पाकिस्तानात तर ७२ लाख हिंदू व शिखांनी भारतात स्थलांतर केले. रशियाच्या विघटनानंतर अनेक ज्यू इस्राईलमध्ये व कझाकिस्थानातील जर्मन जर्मनीकडे स्थलांतरित झाले, पण त्याने प्रश्न सुटत नाही. कारण भारतात आजही १५ कोटी मुस्लीम पाकिस्तानात ३० लाख हिंदू व बांग्लादेशात १ कोटी १० लाख हिंदू आहेत.

३) अल्पसंख्य घटक बहुसंख्याक संस्कृतीशी जुळवून घेतात. पण त्याचबरोबर आपले सांस्कृतिक अधिकार कायम ठेवण्यासाठी सरकारशी वाटाघाटी करतात आणि घटनात्मक व कायदेशीर संरक्षण त्याद्वारा प्राप्त करतात. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनीमध्ये ही परिस्थिती आहे.

४) अल्पसंख्यांक गट जर एखाद्या सलग भूभागावर राहत असतील तर केंद्र सरकारकडून ते काही मर्यादित प्रमाणात स्वायत्त व स्वशासित शासनयंत्रणा उभा करू शकतात. ते आपली भाषा व संस्कृती, अर्थकारण,

शिक्षण संस्था यांचे रक्षण करून आपल्या अस्मितेचे रक्षण करू शकतात. परराष्ट्र धोरणे, संरक्षण संचार व मुद्राव्यवस्था वगळता त्यांना पूर्ण स्वायत्तता असते. जम्मू काश्मिरच्या ३७० कलमामागे हीच पार्श्वभूमी होती आणि नागालँडमध्ये होऊ घातलेल्या करारात हीच तत्त्वे समाविष्ट आहेत.

५) आपण अल्पसंख्यांक आहोत, आपण बहुसंख्यांक समाजाशी फारसे एकरूप न होता दुय्यम स्थान पत्करून राष्ट्राच्या परिघावर राहू व त्याद्वारा आपल्या संस्कृतीचे व भाषेचे संरक्षण करू, असे अल्पसंख्यांकांना वाटत असते. जगभरच्या आदिम जनजाती अशा प्रकारचे जीवन स्वीकारताना दिसतात. जागतिक पातळीवरील अल्पसंख्यांक जमाती या प्रकाराचा वापर करून आपली अस्मिता जपण्याचा प्रयत्न करतात.

वांशिकता हा राष्ट्रवादाचा मुख्य आधार मानला जातो. जागतिक पातळीवरील राष्ट्रीय समाज म्हणून ओळख हे त्या देशातील बहुसंख्य समाजाचे हिताचे रक्षण करतात. लोकशाही उदारमतवादी व्यवस्थेमध्ये निवडणूकांच्या माध्यमातून या व्यवस्थेला अधिमान्यता दिली जाते. अल्पसंख्यांकांना व सांस्कृतिक घटकांना उदारमतवादी लोकशाहीमध्ये अधिकार किंवा सत्तेत सहभागित्व देण्यासंदर्भात दोन मुख्य मार्ग आहेत. एका सलग भूप्रदेशात राहणाऱ्या एक भाषिक, एक सांस्कृतिक समाजाला काही प्रमाणात संघराज्यात्मक व्यवस्थेमध्ये स्वायत्तता प्रदान करणे. जगातील बहुतेक शासनव्यवस्थेमध्ये संघराज्य शासनव्यवस्था ही दुहेरी व्यवस्था असते व प्रांतांच्या वा घटकराज्याच्या पातळीवर वेगळे सरकार असते. अशा व्यवस्थेमध्ये सत्तेचे वाटप हे घटनात्मक विधीनियमानुसार होते व घटकराज्यांना स्वायत्तता मिळते. लेनिनच्या मते, राष्ट्रकांच्या भाषा आणि संस्कृतीच्या विकासासाठी त्यांना स्वायत्तता मिळाली पाहिजे. संघराज्य व्यवस्थेमध्ये सत्तेचे वितरण कशा पद्धतीने करायचे हा प्रश्न महत्त्वपूर्ण असतो. कारण अमेरिका व स्वित्झर्लंड या देशामधील संघराज्यीय व्यवस्थेमध्ये राज्यांना व्यापक अधिकार देण्यात आले आहेत. याउलट भारतीय संघराज्यव्यवस्थेत मात्र राज्ये जरी अधिकारांची मागणी करीत आहेत. पण भाषिक आणि सांस्कृतिक अंगांनी अलग असणाऱ्या घटकराज्यांमध्ये बहुसंख्यांक भाषिक गटांचे वर्चस्व असते. अशा तऱ्हेने ज्या ठिकाणी वांशिक, भाषिक, धार्मिक अल्पसंख्याक यांच्या हक्काचा प्रश्न असतो. उदा. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात भाषावर प्रांतरचना करीत असताना वेगवेगळ्या प्रांतात वरचढ जातीचे वर्चस्व निर्माण होईल आणि त्यामुळे अल्पसंख्यांक जातीवर त्याचे विपरित परिणाम होतील, असे मत मांडले होते.

**अल्पसंख्यांकाचे प्रतिनिधित्व :**

अल्पसंख्यांकांच्या प्रतिनिधित्वाचा प्रश्न ते ज्या देशात अल्पसंख्यांक आहेत त्या देशात निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय प्रतिनिधीत्व देण्यात येते. त्यामुळे युरोपीय देशामध्ये प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाच्या वेगवेगळ्या पद्धती स्वीकारण्यात आल्या आहेत. भारत व इंग्लंडमध्ये बहुप्रतिद्वंदी मतदारसंघात ज्या उमेदवारास सर्वांत जास्त मते मिळतात तो निवडला जातो व या व्यवस्थेत अल्पसंख्याकांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळत नाही. अल्पसंख्यांकांना

प्रतिनिधीत्वासाठी प्रमाणशीर प्रतिनिधीत्वाचा पुरस्कार केला जातो. त्यामुळे जागा मिळतात मात्र याचा धोका म्हणजे जातीय संघटन मजबूत होते परंतु लोकसभेत कोणत्याच पक्षाला बहुमत मिळत नाही.

बहुसांस्कृतिक समाजात वेगवेगळ्या गटातील वर्गातील लोकांना अधिकार मुक्तपणे मिळावेत, बहुसंख्य समाजाने आपले आचार-विचार अल्पसंख्य समाजावर लादू नयेत आणि वेगवेगळ्या सांस्कृतिक घटकांना आपली भाषा व जीवन जगण्याच्या पद्धती टिकवण्याची संधी मिळावी, ही याबाबतची भूमिका आहे.


आजच्या आधुनिक युगामध्ये राष्ट्रवादाचा विचार हा समाजघटकांना एका नव्या पायावर एकत्र आणायचा आहे. सर्व वांशिक, धार्मिक, भाषिक, अस्मितांना दुय्यम स्थान देवून राष्ट्रहित, राष्ट्राभिमान मजबूत करणे गरजेचे आहे. राष्ट्रवाद ही मानसशास्त्रीय भावना आहे जी प्रादेशिक व सांस्कृतिक अस्मितांच्या आधारे निर्माण केली जाते. आधुनिक युगामध्ये बहुसंस्कृती वाद व राष्ट्रवाद यांच्यातील संबंध द्वंद्वात्मक आहे. कारण राष्ट्रवादाच्या मळ प्रेरणा एकात्मवादी आहेत. पण राष्ट्रवादाची भावना प्रादेशिक व सांस्कृतिक अस्मितांना पूर्णपणे नष्ट करू शकत नाही. उदा. ब्रिटनसारख्या प्रागतिक देशात स्कॉटिश, नॅशनल पार्टीचा वाढता प्रभाव हे दाखवून देतो. सोव्हिएत संघ, झेकोस्लाव्हाकिया, युगोस्लाव्हिया या राष्ट्राचे विघटन हेच दर्शवते.

बहुसंस्कृतीक वादाच्या मते, राष्ट्रवादाचे व राष्ट्रराज्याचे महत्व मान्य करूनही समाजाची सांस्कृतिक बहुविधता मान्य करावी आणि विविध सांस्कृतिक घटकांना त्यांच्या भाषेचे व संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करण्याचा हक्क मान्य करावा आणि समाजामध्ये अशी परिस्थिती निर्माण करावी की ज्यामध्ये विविध समाजघटकांना आपले सांस्कृतिक आणि शैक्षणिक अधिकार योग्यरित्या उपभोगता येवू शकतील.

## २.३ सारांश :

आधुनिक कालखंडामध्ये वेगवेगळ्या व्यवस्थामधील सांस्कृतिक समूह संघर्ष करीत असतात. ते संघर्ष मिटविण्यासाठी बहुसंस्कृतीवाद या संकल्पनेला अनन्य साधारण महत्त्व आहे. याचा संबंध न्यायाचा आहे. कारण न्याय म्हणजे समाजातील विविध घटकांमध्ये अधिकारांचे आणि हक्कांचे योग्य असे वितरण करणे. कारण समाजातील एकतेची भावना ही विशिष्ट एका गोष्टीमुळे नष्ट होते ती म्हणजे एखाद्या घटकाला जाणीवपूर्वक डावलले जाते व त्याचे न्यायहक्क त्यास मिळत नाहीत. खऱ्या अर्थाने आणि विचारवंतांनी नोंदविलेल्या मताप्रमाणे बहुसंस्कृतीवाद हा अल्पसंख्याक, समलिंगी समाज, स्त्रिया, स्थलांतरित, निर्वासित आणि समाजातील दुर्लक्षित घटक आहेत, त्या घटकांना समान हक्क द्यावेत आणि त्यांना न्यायाने वागवावे यामुळे राष्ट्रीय एकता व राष्ट्राची भावना जास्त मजबूत होईल.

राष्ट्रामध्ये सर्व समूहगटांना समान सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक हक्क खऱ्या अर्थाने प्राप्त झाले तर ते ज्या राष्ट्रात राहतात त्याच्या प्रती त्यांच्या मनात आपुलकीची व सौख्याची भावना निर्माण होईल. यातूनच नवा बहुसांस्कृतिक समाज आकारला येईल. साधारणपणे बहुसंस्कृतीवाद खालील आकृतीद्वारे स्पष्ट करता येईल.




**२.४ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ :**

◆ **बहुसंस्कृतीवाद :** बहु म्हणजे एकापेक्षा अधिक आणि संस्कृती म्हणजे जीवन जगण्याचा वा जीवनाकडे व जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन या दोन शब्दापासून तयार झाला आहे.

**२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न :**

१. .............. म्हणजे एखाद्या समाजात विविध संस्कृतीचे सहअस्तित्व व सहजीवन मान्य करणे होय.

२. 'मल्टीकल्चरॅलिझम-सक्सेस फेल्युअर अॅड द फ्युचर' हा ग्रंथ .......... यांनी लिहिला आहे.

३. विषमता दूर करण्यासाठी विल किमलिका दोन प्रकारचे राजकारण स्पष्ट करतात, एक म्हणजे पुनर्वितरणाचे राजकारण व ............ होय.

४. भिखू पारेख यांनी आपल्या ........... या पुस्तकामध्ये बहुसंस्कृतीवादातील महत्त्वाचे मुद्दे मांडले आहेत.

**उत्तरे :**

१. बहुसंस्कृतीवाद, २. विल किमलिका, ३. मान्यतेचे राजकारण,

४. रिंथिंकिंग मल्टिकल्चरलीझम : कल्चरल डायव्हर्सिटी अॅन्ड पॉलिटिकल थिअरी.

**२.६ सरावासाठी स्वाध्याय :**

१. बहुसंस्कृतीवादाचा अर्थ सांगून बहुसंस्कृतीवादाच्या विकासाच्या टप्प्यांची चर्चा करा.

२. विल किमलिकांचा बहुसंस्कृतीवादाचा सिद्धांत स्पष्ट करा.

३. बहुसंस्कृतीवाद आणि राष्ट्रवाद सविस्तर स्पष्ट करा.

४. बहुसंस्कृतीवाद ही संकल्पना स्पष्ट करा.

**२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :**

१. चौसाळकर, अशोक (२०१७) : ‘आधुनिक राजकीय सिद्धांत’, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स, प्रा. लि. पुणे.

२. सुमंत यशवंत (२०१८) : ‘विचारसरणीच्या विश्वास’, युनिक ॲकॅडमी पब्लिकेशन्स, प्रा. लि. पुणे.

३. Kymlicka W. (2009) : 'Contemporary Political Philosophy', Oxford University Press.

४. Parekh Bhiku (2002) : 'Rethinking Multiculturalism' Harvard University Press.

५. Verma S. P. (1975) : 'Modern Political Theory', Vikas Publishing, New Delhi.

❍❍❍

**घटक ३**

# पर्यावरणवाद
## (Environmentalism)

---

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे

३.२.२ पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये

३.२.३ पर्यावरण संरक्षण आणि जागतिक प्रश्न

३.२.४ जागतिक तापमानवाढ (Global Warming)

३.३ सारांश

३.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

### ३.० उद्दिष्टे :

१) विद्यार्थ्यांना पर्यावरण, पर्यावरणशास्त्र, पर्यावरणवाद यासारख्या संकल्पनांची ओळख करून देणे.

२) पर्यावरणवादाच्या उदयाच्या कारणांचा अभ्यास करणे.

३) पर्यावरणवादाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

४) पर्यावरण संरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या जागतिक प्रयत्नांची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.

५) जागतिक तापमान वाढ- कारणे, परिणाम व उपाययोजना यांची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे.

६) विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणसंरक्षणासंबंधीची जाणीव जागृती निर्माण करणे.

## ३.१ प्रास्ताविक :

मानवी हस्तक्षेपामुळे आज पृथ्वीवरील पर्यावरणीय समतोल ढासळत चालला आहे. त्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत की, ज्यामुळे पृथ्वीवर नैसर्गिक साधन संपत्ती, मानवी समाज यांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पर्यावरण समस्या वैश्वीक स्वरूपाच्या आहेत. वाढती लोकसंख्या, मोठ्या प्रमाणात वाढलेले शहरीकरण, औद्योगिकीकरण, बेसुमार जंगलतोड, वाढती वाहनांची संख्या, चंगळवादी जीवन पध्दती आणि पर्यावरण संरक्षणवषियक दृष्टिकोनाचा अभाव या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून पर्यावरणीय समस्या दिवसेंदिवस उग्र होत आहेत. त्याच्यापासूनचे धोके वाढत आहेत. म्हणून आपण सर्वांनी पर्यावरण, निसर्गातील साधनसंपत्ती, निसर्ग आणि मानव यातील संबंध समजावून घेतले आहेत.

प्रस्तुत घटकामध्ये पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे, वैशिष्ट्ये, पर्यावरण संरक्षणविषयक जागतिक प्रयत्न आणि जागतिक तापमानवाढ-स्वरूप, परिणाम व उपाय याची माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्व माहितीचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करून निसर्गाचे, पर्यावरणाचे, पर्यायाने अखिल मानव जातीचे संरक्षण यासाठी वैश्विक, सामूहिक व मानवतावादी दृष्टीने प्रयत्न करावेत. आपल्यासहीत समाजात पर्यावरण संरक्षणविषयक जागृती करावी ही एक छोटीसी अपेक्षा.

**प्रमुख पर्यावरणीय समस्या**

१. जागतिक तापमान वाढ

२. अवर्षण

३. भूकंप

४. साथीचे रोग

५. आम्ल पर्जन्य

६. दुर्मीळ वनस्पतींचा ऱ्हास

७. समुद्र पातळीत वाढ

## ३.२ विषय–विवेचन :

◆ **पर्यावरणवाद (Environmentalism) :**

मानव हा निसर्गातील सर्व सजीवामधील बुध्दिमान प्राणी आहे. त्याने आपल्या बुध्दीच्या जोरांवर आपला विकास इतरांच्या तुलनेत अधिक केला आहे. कुठेतरी कड्याकपारी, झाडाच्या डोलीत, गुहेमध्ये राहणारा, भूक लागल्यानंतर कांहीतरी खाणारा आणि मिळेल तिथे विसावा घेणारा निसर्ग अवस्थेमधील मानव आणि आजचा मानव यांची तुलना करता मानवाच्या प्रगतीची झेप लक्षात येते. बौध्दीक–प्रगल्भतेच्या जोरांवर प्रगतीचे अनेक शिखरे त्यांने सर केली आहेत. जैवतंत्रज्ञान, नॅनो तंत्रज्ञान, संगणकीय तंत्रज्ञान, अणुऊर्जा इत्यादीच्या आधारे मानवाने प्रचंड प्रगती साधली आहे. पण मानवाच्या या प्रगतीच्या प्रवासात मानव आणि निसर्ग यांची मैत्री जोपर्यंत राहिली तोपर्यंत मानवाला आपल्या प्रगतीचा लाभ घेता आला. पुढे मानवाने आपल्या विकासामध्ये तो जसजसा निसर्गापासून दूर गेला तस–तसे त्याच्या विकासामध्ये अनेक अडथळे निर्माण झाले. मानवाने आपल्या विकासामध्ये आपली जीवनपध्दती सुधारली, ती सुखकारक बनली, पण ज्या निसर्गाच्या सोबतीने हे मिळविले, त्या निसर्गाची योग्य ती काळजी न घेतल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले.

मानवी विकासाला आड येणाऱ्या समस्या, अडचणींची चिकित्सा करणे, त्या जाणून घेणे, त्या कमी करण्यासाठी उपाययोजना करतो की, ज्यामुळे मानवी जीवन अधिक–अधिक सुखी संपन्न होईल. मानवाचा शाश्वत विकास आणि निसर्गाची जपणूक यामध्ये समतोल राहील यासाठी एक नवीन अभ्यासविषय पुढे आला आणि त्याचे नांव आहे पर्यावरणवाद.

गेल्या ५०–६० वर्षापासून एक नवीन विषय म्हणून पर्यावरणवाद पुढे आला आहे. मानवाने आपल्या विकासामध्ये निसर्गाची काळजी न घेतल्यामुळे, निसर्ग साधनांच्या केलेल्या प्रचंड लुटीमुळे मानवी जीवनावर विघातक परिणाम करणारे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून १९७२ मध्ये स्टॉकहोम परिषदेला महत्त्व द्यावे लागेल. कारण प्रथमच त्या परिषदेमध्ये ''वर्तमान मानवी जीवन आणि मानवाच्या भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित राहायचे असेल तर मानवी विकासाबरोबर निसर्गाची काळजी घेतली पाहिजे'' असा विचार मांडला गेला आणि तिथून पुढे पर्यावरणवादाचा अभ्यास सुरु झाला.

पर्यावरणवादाच्या अभ्यासामध्ये पुढील संकल्पना महत्त्वाच्या आहेत.

**१. पर्यावरण (Environment) :**

ही संज्ञा फ्रेंच भाषेतील Environ या शब्दापासून प्रचलित झाली असून तिचा अर्थ To Suround म्हणजेच सभोवताली असणे किंवा सभोवतालची परिस्थिती असा आहे. या सभोवतालच्या परिस्थितीमध्ये अनेक सजीव–निर्जीव घटकांचे अस्तित्व पाहावयास मिळते. म्हणून या सभोवतालच्या परिस्थितीत निसर्गनिर्मित व मानवनिर्मित घटकांचे मिळून पर्यावरण बनते. ही पर्यावरणीय मांडणी पृथ्वीवर सर्वत्र

सारखी नाही. ती कालसापेक्ष, स्थलसापेक्ष आणि जीवसापेक्ष आहे. पृथ्वीवरील पर्यावरण संज्ञेत सूर्यप्रकाश, पाणी, हवा, जीवसृष्टी, जंगल, नद्या यांची मांडणी सर्वत्र सारखी नाही. म्हणून संपूर्ण पृथ्वी हे देखील एक पर्यावरण आहे. पृथ्वीवरील ही पर्यावरणीय मांडणी गतिशील, सर्वसमावेशक आहे. पर्यावरणाच्या काही महत्त्वाच्या व्याख्या पुढीलप्रमाणे :-

१. *''जैविक व अजैविक घटक यांच्यातील परस्पर क्रियांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र होय.''* – ***डॅनियल चिरास.***

२. *''पृथ्वीवरील पर्यावरणाचे आकलन व मानवी जीवनावर पर्यावरणीय घटकांचा होणारा परिणाम, प्रभावांचा अभ्यास म्हणजे पर्यावरणशास्त्र. यामध्ये पर्यावरणीय प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना याचाही अभ्यास केला जातो.''* – ***जॉन टर्क.***

३. *''विविध प्रकारची जीवसृष्टी आणि मानवी समूह व समाज ज्या परिसरात राहतात व विकसि तहोतात त्या परिसरातील त्या सर्व घटकांच्या मांडणीला पर्यावरण असे म्हणतात.''* – ***मराठी विश्वकोष.***

४. *''सजीवांनी अनुभवलेल्या भौतिक रासायनिक व जैविक परिस्थितीची गोळाबेरीज म्हणजे पर्यावरण.''* – ***जैविस्मिय.***

५. *''व्यक्ती जीव अथवा समूह यांचे अस्तित्व व विकास यांच्यावर परिणाम करणारी बाह्यस्थिती, घटक किंवा वस्तु म्हणजे पर्यावरण.''* – ***फंक व वॅगनन्स.***

◆ **पर्यावरणशास्त्र :**

पर्यावरणशास्त्रात निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाचा शास्त्रीय पध्दतीने अभ्यास केला जातो. सर्वांगीण समतोलीत विकास हा पर्यावरणशास्त्राचा आत्मा मानला जातो. निसर्गाची जपणूक आणि मानवी कल्याण हा पर्यावरणशास्त्राचा मुख्य अभ्यासविषय आहे. मानवाने आपल्या विकासाच्या वाटचालीत निसर्गाविषयी बेदरकारपणा, निष्काळजीपणा, नैसर्गिक साधनसंपत्तीची विकासाच्या नावाखाली लयलूट केली. निसर्गाची स्वत:ची अशी एक निर्मिती आहे, त्या निर्मितीमध्ये एक शिस्त असते. निसर्गाला स्वत:ची अशी एक भाषा असते, पण मानवाने ते लक्षात न घेतल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. त्याचा मानवी जीवनावर विपरित परिणाम झाला.

निसर्गनिर्मित पर्यावरण मानवी विकासाला पूरक व उपयुक्त असते हा रचनात्मक विचार पर्यावरणशास्त्रात व्यक्त होतो. निसर्गाची स्वत:ची एक निर्मिती व शिस्त असते. त्यामध्ये मानवी हस्तक्षेप करू नका हे पर्यावरणशास्त्र सांगते.

परिवर्तन विकास– आणि बदल हे शांतताप्रिय, नि:स्वार्थी व कल्याणकारी भावनेतून व्हावेत,

म्हणून पर्यावरण संवर्धन- संवर्धनातून विकास आणि परत विकासातून पर्यावरणीय संरक्षण हे पर्यावरणशास्त्राचे अभ्यास विषय ठरावेत.

◆ **पर्यावरणवाद :**

पर्यावरण व मानव यांचा जवळचा संबंध आहे. हे संबंध परस्परांना पूरक व उपयुक्त आहेत. मानवी जीवन विकसीत होत असताना त्याचा परिणाम जसा पर्यावरणावर होतो. तसा पर्यावरणातील बदलाचा परिणाम मानवी जीवनावर होतो. पर्यावरण आणि मानव यांचा हा संबंधाचा प्रवास अडचणीचा ठरत आहे. या संबंधात पर्यावरण श्रेष्ठ की मानव श्रेष्ठ यासाठी मानवाने सतत प्रयत्न केलेले आहेत, पण अलीकडच्या काळात मानवाचे बुध्दीकौशल्य, स्वार्थ, लोभ, मोह यातून पर्यावरणीय मांडणीचा मोठ्या प्रमाणात दुरुपयोग केला आहे. त्यातून अनेक पर्यावरणवादी प्रश्न निर्माण होऊन त्याचे मानवी जीवनावर परिणाम होताना दिसतात.

वास्तविक पाहता पर्यावरण आणि मानव यामध्ये, पर्यावरणाची निर्मिती आधी नंतर मानवाची त्यामुळे 'जो प्रथम त्याला अग्रक्रम' (First Come First) या उक्तीनुसार प्रथम पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि नंतर मानवी विकास आणि विकासाचे संवर्धन पण मानवाने हा नियम न लक्षात घेतल्यामुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून या ठिकाणी आधी पर्यावरणाला अग्रक्रम दिला गेला असला तरी ते सर्व मानवी विकासाला उपयुक्त व पूरक आहे. हे लक्षात घेऊन पर्यावरणानंतर निर्माण झालेल्या मानवाने अधिक जबाबदारीने पर्यावरणाचे संरक्षण केले पाहिजे. आज मानवाने साधलेला विकास शाश्वत राहून भविष्यकालीन मानवी पिढ्यासाठी पूरक उपलब्धी हे मानवाने ध्येय ठेवले पाहिजे.

आपण जर जबाबदारीने वागलो नाही तर अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण होतील. उदा. आज आपण नद्यांना पवित्र मानतो. पण त्यांची वेळीच काळजी घेतली नाही तर त्या मोठी प्रदूषित गटारी होतील. मोठ्या धरणांची काळजी नाही घेतली तर ती निरुपयोगी ठरतील. आजचा पांढराशुभ्र दिसणारा ताजमहाल पुढे तसाच राहील याची शाश्वती देता येणार नाही.

थोडक्यात, निसर्ग आणि माणूस, आधुनिक काळात निर्माण झालेले पर्यावरणीय प्रश्न, त्यांचे मानवी जीवनावर होणारे विपरीत परिणाम आणि या सर्वात शेवटी त्या सर्वांवरील उपाययोजना की, ज्यामुळे मानवी विकासाची शाश्वती आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यासाठी पर्यावरणवादाची मांडणी.

◆ **पर्यावरणाचे स्वरूप :**

निसर्गात निर्माण झालेले पर्यावरण आणि मानव यांचा परस्पर संबंधावर आधारित पर्यावरणवादाचे स्वरूप पाहावयास मिळते. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

१. निसर्ग आणि मानव यामध्ये निसर्गाची निर्मिती मानवाआधी झाली आहे. त्यामुळे पर्यावरणवादामध्ये निसर्गकेंद्री मांडणी पाहावयास मिळेत. निसर्गाच्या अस्तित्त्वावर मानवी अस्तित्त्व अवलंबून असल्यामुळे निसर्गाला अग्रक्रम दिला आहे.

२. पर्यावरण आणि मानवी संस्कृती यांचा जवळचा संबंध आहे. मानव व पर्यावरण यांच्या सबंधात आज जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्याचबरोबर मानवी संस्कृतीच्या अस्तित्त्वाचाही प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून पर्यावरण संरक्षण व मानवी संस्कृतीचा शाश्वत विकास हे पर्यावरणवादाचे मुख्य अभ्यास विषय आहेत.

३. पर्यावरणवाद हा सुधारणावादी दृष्टिकोन आहे. मानवाने विकासाच्या प्रवासात जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण केले आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करून मानवी विकासाचे सातत्य आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन यामध्ये सुधारणा घडवून आणणे हा पर्यावरणवादाचा मुख्य उद्देश आहे.

४. पर्यावरणवाद हा आंतरविद्याशाखीय विषय आहे. कारण पर्यावरणाची व्याप्ती प्रचंड आहे. त्यामुळे पर्यावरणीय प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी निरनिराळ्या विद्याशाखांमधील संदर्भीय माहितीचा आधार घ्यावा लागतो. सर्व सामाजिक शास्त्रे, शुध्द शास्त्रे, भूशास्त्रे ज्ञानशाखांची गुंफण पर्यावरणवादामध्ये पाहावयास मिळते.

५. भांडवलशाहीला विरोध- औद्योगिक क्रांतीनंतर मानवाने जो विकास साधला आहे, त्या विकासातून पुढे भांडवलशाहीचा उदय झाला आहे. यामध्ये आर्थिक समृध्दी, विकासाच्या नावाखाली भांडवलशाही राष्ट्रात जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. त्यामध्ये पर्यावरणीय साधनसंपत्तीची लूट केली जात आहे. त्यातून अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. उदा. जल-वायू-ध्वनी-मृदा प्रदूषण. विकासाच्या नावाखाली पर्यावरणाचा ऱ्हासास कारणीभूत ठरणाऱ्या भांडवलशाही पर्यावरणवादाचा विरोध आहे.

६. मानवी संस्कृतीचा अभ्यास- निसर्ग आणि मानव यांचा फार जवळचा संबंध आहे. निसर्गातील पर्यावरणीय साधनांचा, परिस्थितीचा आधार घेत मानवी संस्कृती विकसित झाली आहे. पण अलीकडच्या काळात विकासाच्या नावाखाली मानवाने पर्यावरणीय साधनांची प्रचंड लूट केल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. म्हणून मानवी संस्कृतीच्या विकासातील सातत्य आणि पर्यावरणाचे संरक्षण व जपणूक हा विचार पर्यावरणवादामध्ये महत्त्वाचा आहे.

७. जनजागृतीची गरज - आतापर्यंत विज्ञानाच्या आधारे मानवाने मोठी प्रगती केली आहे. पण त्या क्रांतीच्या वाटचालीत निसर्गाची काळजी न घेतल्यामुळे अनेक समस्या निर्माण

झाल्या म्हणून पर्यावरणीय समस्यांचे आकलन करून त्या सोडविण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. म्हणून दि. १८ डिसेंबर, २००३ मध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरण शिक्षण हा विषय शालेय व महाविद्यालयीन स्तरावर अनिवार्य करावा असा निर्णय दिला आहे, आणि त्याची अंमलबजावणी आता सुरू आहे.

### ३.२.१(अ) पर्यावरणवादाच्या उदयाची कारणे :

पर्यावरणवाद हा आधुनिक काळातील एक महत्वाचा अभ्यासविषयक असला तरी त्याचा नेमका उदय व विकास कसा झाला हे पाहायचे असेल तर या विषयाच्या अनुषंगाने विविध संकल्पना, विविध वाद, विविध शास्त्रज्ञांचे दृष्टिकोन यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. मानव व निसर्ग यांच्या संबंधातील मांडणीमध्ये मानवी विकास हा पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे काय? आणि मानवी विकासात केवळ मानवी प्रयत्नच महत्त्वाचे आहेत? या दोन प्रश्नांच्या उत्तर शोधण्याच्या प्रयत्नामधून पर्यावरणवादाचा उदय झाला असावा.

मानव आणि निसर्ग यांच्यातील संबंधामध्ये निसर्गाची निर्मिती प्रथम झाली असून निसर्गरचनेतच मानवाची निर्मिती-विकास आणि वाढ शक्य आहे. या निसर्गवादी विचारातून पर्यावरणवादाचा उदय झाला आहे. निसर्गवाद यापुढे जावून म्हणतो- मानवी इच्छा व स्फूर्तीसुध्दा निसर्गावर अवलंबून आहे. ही विचारसरणी प्रामुख्याने १९व्या शतकाच्या सुरुवातीला मांडली गेली.

पर्यावरणवाद हा आधुनिक विचार असला तरी त्या प्रकारचा दृष्टिकोन अगदी प्राचीन काळातसुद्धा मांडलेला दिसून येतो. इ.स.पूर्व ५ व्या शतकात हेपोक्रॅटस् या ग्रीक विचारवंताने, ''मानवी जीवन पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे'' असे स्पष्ट केले आहे. त्यानंतर ॲरिस्टॉटल या ग्रीक विचारवंताने त्या काळात नाईल नदीच्या इजिप्तवरील परिणामांची शास्त्रीय चिकित्सा केली होती.

१९ व्या शतकात पर्यावरणवादाला एक विशिष्ट अशी ओळख दिली ती जर्मन शास्त्रज्ञ रॅट्झेल याने. त्याच्या मते, पृथ्वीच्या पृष्ठभागावरील निसर्गरचनेचा मानवी विकासावर परिणाम होतो. जशी प्राकृतिक रचना तसे मानवी जीवन विकसीत होते. त्याच्या मते, पृथ्वीवरील निसर्ग आणि मानव यांचा जवळचा संबंध असला तरी मानव हा उत्क्रांतीचा अंतिम अविष्कार आहे. थोडक्यात, निसर्गाच्या मदतीने विकसित झालेले मानवी जीवन निसर्गाद्वारेच नियंत्रित होते. त्यामुळे मानवाने निसर्गाशी मैत्री केली पाहिजे.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात जीवशास्त्राचा विकास आणि डार्विनच्या सिध्दांताला मिळालेली शास्त्रीय मान्यता हा सुध्दा पर्यावरणवादाचा एक महत्वाचा टप्पा मानला जातो. याच काळात पर्यावरणवादास विज्ञाननिष्ठता लाभली. पुढे Ecology ह्या नवीन शास्त्राचा उदय झाला, त्यामध्ये पर्यावरणवादी मांडणी करण्यात आली.

''मानव हा त्याच्या प्रत्येक कृतीच्या बाबतीत मुक्त नसून तो पूर्णपणे नैसर्गिक व आर्थिक नियमांचा गुलाम आहे,'' म्हणजेच मानव कृतीशील नसून आकृतीशील आहे.''

इंग्लंडमध्ये बकल या शास्त्रज्ञाने ''इंग्लंडमधील नागरीकरणाचा इतिहास'' आणि ''इंग्लंडमधील सांस्कृतिक इतिहास'' या ग्रंथामध्ये पर्यावरणवादाची मांडणी केली आहे. त्याच्या मते, मानवाच्या प्रत्येक क्रिया त्याच्या इच्छेनुसार होतात, पण मानवी इच्छा निसर्गनियमाने नियंत्रित होतात. प्रत्येक मानवी घटना निसर्गामुळे बदलणारे मानवी मत आणि मानसिक क्रियेमुळे बदलला जाणारा निसर्ग यांच्या दृढसंबंधाचे द्योतक आहे.

२० व्या शतकाच्या सुरुवातीला पर्यावरणवादाच्या मांडणीत मौलिक भर घातली ती एडमंड + डेमॉजिन्सने. त्याने मानवी स्थलांतराच्या मुद्यावर आधारित निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाची चर्चा केली आहे. मानवी जीवन आणि पर्यावरणीय घटक यांची घनिष्ठता स्पष्ट केली आहे.

पर्यावरणवादी विचारसरणीच्या विकासातील शेवटचा टप्पा एलन सेंपल चा 'भौगोलिक पर्यावरणाचे परिणाम' हा ग्रंथ होय. त्यामध्ये तिने मानव आणि पर्यावरण यांच्या संबंधात पर्यावरण श्रेष्ठ असून मानव तिची निर्मिती आहे. मानवाला मिळालेली बुद्धी कार्यक्षमता आणि कार्य करण्यासाठी आवश्यक असणारी स्फूर्ती ही नैसर्गिक घटकावर अवलंबून आहे.

ग्रिफिथ टेलर या निसर्गवाद्याने निसर्ग आणि मानव यांच्या संबंधाचा 'थांबा आणि पुढे जा' या नियमाच्या आधारे सुवर्णमध्य काढण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या मते, निसर्गाने घालून दिलेल्या चौकटीत मानवाला मुक्तपणे विकास करता येतो.

भारतात पर्यावरणाचा अभ्यास फार पूर्वीपासून होत आला आहे. रामायण, महाभारतात वन्य जीवांची काळजी घेण्याविषयी मते व्यक्त करण्यात आली आहेत.

अलीकडच्या काळात छ. शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रातून 'पर्यावरणाच्या संरक्षणाचे महत्त्व' अधोरेखीत केलेले पहावयास मिळते. त्याचवेळी संत तुकारामानी आपल्या अभंगामधून वृक्षांचे, वन्य जीवांचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले आहे.

### ३.२.२ (ब) पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये :

पृथ्वीवरील निसर्ग, पर्यावरणीय मांडणी आणि मानवी समाज यांचा अतिशय जवळचा संबंध आहे. यामध्ये परस्परांचे अस्तित्त्व परस्परांना पूरक व विकसासाठी उपयुक्त ठरले आहे. निसर्गातील पर्यावरणीय मांडणीत मानव विकसित होवू शकला, त्याचवेळी मानवी विकासामुळे निसर्गाचे संरक्षण व संवर्धन होऊ शकते. पण पुढील काळात मानवाची स्वार्थी प्रवृत्ती, नैसर्गिक साधनांची करण्यात आलेली लूट, निसर्गाकडे केलेले दुर्लक्ष यामुळे निसर्गाच्या ऱ्हासास सुरुवात झाली, त्याचा विपरीत

परिणाम पृथ्वीवरील पर्यावरणावर होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या. उदा. सर्वच क्षेत्रातील प्रदूषण, दुष्काळ, भूकंप, महापूर इत्यादी.

म्हणून निसर्गाचे पर्यायाने पृथ्वीवरील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन आणि मानवाचा शाश्वत विकास यासाठी अभ्यास व उपाययोजना सुचविणे या गरजेतून पर्यावरणाचा अभ्यास सुरू झाला. त्यातून पर्यावरणवाद (Environmentalism) हा विषय पुढे आला. या विषयांचे स्वरूप आणि अभ्यासविषय लक्षात घेता पर्यावरणवादाची वैशिष्ट्ये थोडक्यात पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. निसर्गाची श्रेष्ठता :–**

पर्यावरणवादामध्ये निसर्ग आणि मानव यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. मानवाने आपला विकास करत असताना पर्यावरणाकडे अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. माणूस हा बुध्दिवान प्राणी असल्यामुळे तो निसर्गापेक्षा स्वत:ला श्रेष्ठ मानतो. पण हे खरे नाही. कारण निसर्गाशिवाय मानवाची प्रगती शक्य नाही. या पृथ्वीवर निसर्ग आणि माणूस यामध्ये निसर्ग अगोदर निर्माण झाला नंतर माणूस. त्यामुळे निसर्गाचे श्रेष्ठत्त्व मान्य करून मानवाने आपला विकास करावा, त्यामध्ये पर्यावरणाने संरक्षण व संवर्धन करावे. हे पर्यावरणवादात मान्य केले जाते.

**२. निसर्गाबरोबर मैत्री :–**

पृथ्वीवरील निसर्ग व मानव यांचे अस्तित्त्व परस्परांना पूरक व उपयुक्त ठरले आहे. इथे निसर्गाची श्रेष्ठता मान्य करण्यात आली असली तरी निसर्गाबरोबर मैत्री करूनच मानवाला आपला शाश्वत विकास करता येणे शक्य आहे. निसर्ग व मानव यामध्ये स्पर्धेपेक्षा सहकार्याचे परस्परविषयी संरक्षणाचे संबंध आवश्यक आहेत. म्हणून माणसाने निसर्गाबरोबर मैत्रीच केली पाहिजे.

**३. निसर्ग मानवाचा शिक्षक :–**

पृथ्वीवरील निसर्गामध्ये त्याची स्वत:ची अशी एक मांडणी आहे. परिवर्तन आणि त्यामध्ये सातत्य हा निसर्गाचा महत्त्वाचा गुण. त्याचा लाभ मानवाला आपल्या विकासासाठी करता आला. आतापर्यंत मानवाने आपल्या विकासात अनेक गोष्टी निसर्गाकडून शिकल्या आहेत. म्हणूनच निसर्ग हा माणसाचा शिक्षक मार्गदर्शक आहे. उदा. निसर्गात पक्षी हवेत उडतात ते पाहून आपल्याला ही हवेत संचार करता येईल काय? या प्रश्नाचे उत्तर शोधत माणसाने विमानाचा शोध लावला. माणसाने आतापर्यंत लावलेले सर्व शोध निसर्गाच्या मार्गदर्शनाखाली लावले आहेत. म्हणून निसर्ग मानवाचा शिक्षक, मार्गदर्शक आहे. मानवी विकासाबरोबर निसर्गरूपी शिक्षकाचीसुध्दा काळजी घेतली पाहिजे.

**४. सर्व सजीवांचा विचार :–**

पर्यावरणवादामध्ये मानवी विकास व निसर्ग संरक्षण असा मर्यादित अभ्यास केला जात नाही.

पर्यावरणवादात पर्यावरणाचे संरक्षण, मानवी विकास आणि निसर्गातील सर्व सजीवसृष्टींच्या संरक्षणाचा विचार केला जातो. जसे जंगलाचे संरक्षण, पशुपक्ष्यांचे संरक्षण, समुद्रातील सागरी जीवसृष्टींचे संरक्षण. त्यामुळे पर्यावरणवादाची व्यापकता लक्षात येते. 'आपण जगा, इतरांना जगू द्या.'

**५. पर्यावरणीय प्रश्न आणि मानवी विकासाचा अभ्यास :–**

पर्यावरणवाद हा प्रामुख्याने पर्यावरणीय प्रश्न आणि मानवी विकास याचा अभ्यास करतो. पण त्यामध्ये परिपूर्णता लाभण्यासाठी इतर विद्याशाखातील सिध्दांत, मार्गदर्शन, तत्त्वे यांचा आधार घ्यावा लागतो. त्यामुळे पर्यावरणवादात सर्व सामाजिक, सांस्कृतिक, नैसर्गिक घटकांचा अभ्यास केला जातो. म्हणून पर्यावरणवाद हा आंतरविद्याशास्त्रीय आहे.

**६. पर्यावरणवाद हा सुधारणावादी विचार आहे :–**

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. ते सोडविण्यासाठी निसर्ग आणि मानव यांच्या संबंधातील सुधारणा करून पर्यावरणाचे संरक्षण व मानवी विकास हा पर्यावरणवादाचा मुख्य विचार आहे. मानवी हस्तक्षेप कमी करून निसर्गाचे संरक्षण हा सुधारणावादी दृष्टिकोन पर्यावरणवादात आहे.

**७. औद्योगिकीकरणामुळे प्रदूषणात वाढ :–**

पर्यावरणावादामध्ये निसर्गाचे संरक्षण व संवर्धन करून मानवाचा शाश्वत विकास व्हावा यासाठी अवाजवी औद्योगिकीकरणाला विरोध केला जातो. मानवी विकासात औद्योगिकीकरणाला जरूर महत्त्व आहे. पण ज्या औद्योगिकीकरणामुळे ध्वनी, वायू, जल प्रदूषणाचा समस्या निर्माण होतील त्याला मात्र पर्यावरणवाद विरोध करते.

**८. पर्यावरणवादाचे वैश्विक रूप :–**

मानवी हस्तक्षेपामुळे आज जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्या प्रश्नांची व्यापकता सर्व जगभर पसरली आहे. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी जगभरचा विश्वसमुदायाची मदत आवश्यक आहे. सर्व विश्वसमुदायाने प्रामाणिक प्रयत्न व प्रतिसाद देवून पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले तरच पृथ्वीवरील पर्यावरण वाचेल आणि माणूसही. अशी ही पर्यावरणवादाची वैश्वीक धारणा आहे.

**९. पर्यावरणवाद व लोकमत जागृती :–**

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहे. पृथ्वीवरील पर्यावरण धोक्यात आले आहे. त्या सर्वांचा शास्त्रीय, समाजशास्त्रीय अभ्यास करून निसर्गप्रेमाचे, पर्यावरणाचे शिक्षण देणे आणि त्यातून पर्यावरणीय समस्यांची सोडवणूक होईल अशी पर्यावरणवादाची मांडणी आहे.

### ३.२.३ (क) पर्यावरण संरक्षण आणि जागतिक प्रश्न :

मानवाच्या पर्यावरणातील अतिरेकी हस्तक्षेपामुळे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. आतापर्यंत मानवाचा विकास निसर्गातील उपलब्ध साधनसामग्रीच्या आधारे झाला असला तरी या विकास प्रक्रियेत मानवाने निसर्गाची शिस्त, नियमितता, काळजी न घेतल्यामुळे दुष्काळ, भूमिपात, वनस्पतींचा ऱ्हास, प्रदूषण, ओझोनक्षय इ. मानवनिर्मित आपत्ती निर्माण झाल्या या आपत्ती आज मानवाच्या अस्तित्त्वावर प्रश्नचिन्ह उभे करत आहे. म्हणून मानवाला या निसर्गात राहावयाचे असेल तर ते निसर्गाबरोबर, निसर्गाशी मैत्री करत. जर निसर्गाचा नाश कराल तर तुमचाही नाश होईल, हा संदेश नेहमी निसर्ग देत असतो.

आज मानवाच्या स्वार्थी प्रवृत्तीमुळे जे कांही पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. ते प्रश्न कोणत्या तरी एका समाजाचे, प्रदेशाचे, राष्ट्राचे नसून ते जगाचे आहेत. पूर्वी हे प्रश्न मर्यादित राहिल्यामुळे त्याचा परिणाम तेवढ्या भागापुरता सिमीत असे, पण दिवसेंदिवस हे सर्व पर्यावरणीय प्रश्न सर्व जगभर व्यापून राहीले. म्हणून पर्यावरणातील समस्या ही सर्व विश्वसमुदायासमोरील समस्या आहे, त्यामुळे त्यासाठी सर्व विश्व समुदायाने एकत्रीत, परस्पर सहकार्याने प्रयत्न केले पाहिजे. पर्यावरणाकडे बघण्याचा मानवाचा दृष्टिकोन बदलला पाहिजे.

**◆ पर्यावरण जनजागृती :–**

आज मानवी हस्तक्षेपामुळे जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत, ते प्रश्न सोडविण्यासाठी सर्वत्र पर्यावरणविषयी जनजागृती केली पाहिजे. भौतिक विकासाबरोबर पर्यावरण जागृती झाली पाहिजे. आपण राहत असलेल्या सभोवतालच्या पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. आज संगणकीय क्रांतीमुळे 'सर्व जग एक खेडे' (Global Village) बनले आहे. त्यामुळे पर्यावरण जागृती तशी सोपी झाली आहे. पण स्वार्थी प्रवृत्तीचा त्याग करून जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतील. समाजातील सर्व संस्था, समाजघटक, शासनसंस्था, नागरिक या सर्वांचा त्यामध्ये प्रामाणिक सहभाग राहिला पाहिजे.

आज महाराष्ट्रातील 'पश्चिमघाट आंदोलन', 'नर्मदा बचाव आंदोलन', 'जंगलसंरक्षणासाठीचे आंदोलन', 'पाणी आडवा, पाणी वाचवा', 'मूर्ती दान द्या', 'नद्यांमध्ये रक्षाविसर्जन करू नका' अशा विश्व कार्यक्रमातून प्रयत्न सुरू आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी, संवर्धनासाठी, जनतेत पर्यावरणाविषयीची जागृती काही दिन साजरे केले पाहिजेत.

उदा. २ फेब्रुवारी – जागतिक पाणस्थळ दिन.
२८ फेब्रुवारी – जागतिक विज्ञान दिन.
२१ मार्च – जागतिक वन दिन.

२३ मार्च – जागतिक हवामान दिन.

२२ एप्रिल – वसुंधरा दिन.

५ जून – जागतिक पर्यावरण दिन.

१६ सप्टेंबर – ओझोन बचाव दिन.

४ ऑक्टोबर – प्राणी कल्याण दिन.

२९ डिसेंबर – आंतरराष्ट्रीय जैविक विविधता दिन.

◆ **भारतातील काही महत्त्वाच्या पर्यावरणविषयक चळवळी :**

अलीकडच्या काळातील पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी करण्यात आलेल्या चळवळी पुढीलप्रमाणे :–

**१. १९७३ चे चिपको आंदोलन :–**

हिमालयातील गढवाल, कुमाऊ यासारख्या डोंगरी भागातील आदिवासींनी त्या भागातील बेकायदा वृक्षतोड थांबविण्यासाठी आंदोलन केले. या आंदोलनाचे नेतृत्त्व सुंदरलाल बहुगुणा यांनी केले.

**२. नर्मदा बचाव आंदोलन :–**

नर्मदा नदीवर बांधण्यात आलेल्या सरदार सरोवरामुळे धरणमागील पाणलोट क्षेत्रामध्ये जी गावे विस्थापित झाली. धरण बांधणीमुळे निर्माण झालेले पर्यावरणीय प्रश्न त्या सर्वांच्या सोडवणूकीसाठी मेधा पाटकर यांनी हे आंदोलन केले.

**३. पश्चिम घाट बचाओ आंदोलन :–**

महाराष्ट्रामध्ये पसरलेल्या सह्याद्रीच्या पर्वतरागांच्या घाटमाथ्यावर मोठ्या प्रमाणात जैवविविधता पहावयास मिळते, पण विशेषत: खाणउद्योगामुळे ही जैवविविधता धोक्यात आली आहे. तिच्या संवर्धनासाठी काय करता येईल. हे सांगण्यासाठी माधव गाडगीळ समितीचा अहवाल महत्त्वाचा आहे. पर्यावरण व जैवविविधता यांच्या संरक्षणासाठी ही चळवळ सुरू करण्यात आली.

**४. बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी (BNHS) :–**

१८८३ मध्ये मुंबई येथे ही संस्था स्थापन करण्यात आली असून वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी जनजागृती, संशोधन व निसर्गशिक्षण इ. कार्य या संस्थेमार्फत केले जाते.

◆ **पर्यावरण संरक्षणासाठी भारतातील महत्त्वाचे कायदे :**

आज एकविसाव्या शतकात जे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत, त्याविषयी भारतात

पूर्वीपासून जागृती असलेली पहावयास मिळते. सम्राट अशोक, छ. शिवाजी महाराज यासारख्या शासनकर्त्यांनी त्या काळात पर्यावरणाची काळजी घेण्याविषयी कायदे केले होते. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगामधून वृक्षांचे, वन्यजीवांचे महत्त्व सांगितले आहे. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारतात पर्यावरण संरक्षणासाठी कायदे करण्यात आले. त्यांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

### १. भारतीय राज्यघटना :-

भारत हा एक महत्त्वाचा देश आहे, ज्याच्या राज्यघटनेत पर्यावरण संरक्षण व संवर्धनाविषयीच्या तरतूदी आहेत. राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६-५१ मध्ये राज्यांच्या धोरणांची मार्गदर्शक तत्त्वे स्पष्ट करण्यात आली आहेत. त्यामध्ये कलम ४८(अ) मध्ये म्हटले आहे. ''प्रत्येक राज्याने आपल्या राज्यातील पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन केले पाहिजे. पर्यावरणाची गुणवत्ता वाढविली पाहिजे.''

### मूलभूत कर्तव्ये :-

भारतीय राज्यघटनेत भारतीय नागरिकांच्यासाठी मुलभूत कर्तव्यांची यादी दिली आहे. (कलम ५१-क) त्यामध्ये कलम ५१एए(ग) मध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. ''नैसर्गिक साधनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन हे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य आहे. इथली जंगलसंपत्ती, वन्यजीवसृष्टी, नद्या, तळी, सरोवरे, पशुपक्षी यांचे संरक्षण करणे त्यांच्याविषयी दयाभाव दाखविणे, प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे. त्याचवेळी त्याला पूरक व पोषक उपाययोजना व सुधारणा राज्यशास्त्राच्या पातळीवरून कराव्यात असे सुचविण्यात आले आहे.

भारतीय घटनाकर्त्यांनी राज्यघटनेत भारतीय नागरिक व राज्यकर्ते यासाठी पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जे मार्गदर्शन व सूचना केल्या आहेत. त्या लक्षात घेता पुढील काळात काही महत्त्वाचे कायदे करण्यात आले.

(१) १९७२ चा वन्यजीव संरक्षण कायदा.
(२) १९७४ चा जल (प्रतिबंध व प्रदूषण) कायदा,
(३) १९८० चा वनसंवर्धन कायदा,
(४) १९८१ चा हवा प्रदूषण नियंत्रण कायदा,
(५) १९८६ चा पर्यावरण संरक्षण कायदा.

### ◆ पर्यावरण संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न :-

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही जागतिक समुदायाची गरज आहे. कारण आज सर्व पर्यावरणीय समस्यांचे स्वरूप जागतिक बनले आहे. म्हणून त्यासाठी जशी स्थानिय-राष्ट्रीय प्रयत्नाची गरज आहे, तशी जागतिक पातळीवरून प्रयत्न व जनजागृतीची गरज आहे. त्यादृष्टीने

पर्यावरण संरक्षणासाठी जागतिक पातळीवरून करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आडावा थोडक्यात पुढीलप्रमाणे :-

**१. अंटार्क्टिका संरक्षण करार (१९५९)**

१९५९ मध्ये अंटार्क्टिका खंडावरील पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने राष्ट्राराष्ट्रामध्ये एक बहुपक्षीय करार करण्यात आला त्यानुसार- (१) या खंडाचा वापर केवळ शास्त्रीय संशोधनासाठी करावा. (२) अणुपरीक्षण किंवा लष्करी कवायती यासाठी या खंडाचा वापर करू नये. (३) हा खंड कायमस्वरूपी बर्फाच्छादित असून तिथे कायमस्वरूपी मानवी वस्ती नसल्यामुळे त्याची मालकी कोण्या एका राष्ट्राकडे नाही. पण पर्यावरणीय समतोलासाठी या खंडाचे जागतिक महत्त्व आहे. म्हणून त्याचे संरक्षण करणे सर्व राष्ट्रांची जबाबदारी आहे.

**२. स्टॉकहोम पर्यावरण परिषद (१९७२)**

१९७२ मध्ये पर्यावरणाच्या संरक्षण व संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्न करण्याच्या उद्देशाने स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय परिषद बोलाविण्यात आली. त्यामध्ये पुढील गोष्टी निश्चित करण्यात आल्या.

१. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही वैश्विक गरज आहे.
२. त्यासाठी जागतिक पातळीवरून सर्व राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न केले पाहिजेत.
३. त्यासाठी सामूहिक प्रयत्नासाठी २६ कलमी जाहीरनामा तयार करण्यात आला.
४. पर्यावरण संरक्षण व संवर्धनासाठी जागतिक लोकमत निर्माण करण्यासाठी शिक्षण, प्रशिक्षण आणि संपर्क माध्यमांचा प्रभावी वापर केला पाहिजे.

वरील सर्व उद्दिष्टांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ५४ सदस्यांचे एक कार्यकारी मंडळ निर्माण करण्यात आले. जगभर पर्यावरणसंबंधी जागृती व्हावी, त्यासाठी कृती कार्यक्रम करता यावेत यासाठी **'५ जून जागतिक पर्यावरण दिन'** म्हणून निश्चित करण्यात आला.

**३. नैरोबी पर्यावरण परिषद (१९८२)**

स्टॉकहोम परिषदेमध्ये ठरविण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांचा आढावा यासाठी ही परिषद बोलाविण्यात आली होती. त्यामुळे पुढील बाबींवर चर्चा करण्यात आली.

१. मानवाच्या आर्थिक विकासामुळे झालेले पर्यावरणीय प्रदूषण.
२. आर्थिक विकास व पर्यावरण संरक्षण हे परस्परांशी संबंधित असल्यामुळे त्यामध्ये समतोल दृष्टिकोन स्विकारला पाहिजे.

### ४. मॉट्रियल ठराव (१९८७)

१६ सप्टेंबर, १९८७ मध्ये जगातील बावीस राष्ट्रांनी हा ठराव केला. औद्योगिक क्षेत्रातील मोठमोठ्या कारखान्यामधून उत्सर्जित होणाऱ्या घातक वायुमुळे वातावरणातील ओझोन थरावर विपरीत परिणाम कसा होत आहे याची चर्चा प्रामुख्याने या ठरावामध्ये करण्यात आली आहे. त्यानंतर ओझोन थराच्या संरक्षणासाठी घातक वायू उत्सर्जनावर निर्बंध घालण्यात यावेत असे ठरविण्यात आले. '१६ सप्टेंबर' हा दिवस 'ओझोन दिवस' म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले.

### ५. आम्ल पर्जन्यविषयीची करार (१९८८)

जगभर वायूप्रदूषणामुळे 'आम्ल पर्जन्य' ही समस्या निर्माण झाली आहे. त्या समस्येवर चर्चा करून उपाययोजना सुचविण्यासाठी २४ युरोपीयन देशांनी १९८८ मध्ये एक करार केला त्यामध्ये -

अ) नायट्रोजन ऑक्साईडच्या उत्सर्जनात ५०% घट करणे.

ब) वायू व जलप्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करणे हे ठरविण्यात आले.

### ६. रिओ वसुंधरा परिषद (१९९२)

संयुक्त राष्ट्रसंघटना (युनो) च्या पुढाकाराने ब्राझीलची राजधानी रिओ द जानिरो येथे १९९२ साली 'वसुंधरा परिषद' बोलाविण्यात आली. त्यामध्ये १०० देश सहभागी झाले. त्यामध्ये मानवाच्या चिरकालीन विकास आणि पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. त्यामध्ये-

१. आर्थिक विकास आणि पर्यावरण संरक्षण साधणे.
२. पर्यावरण व मानवाधिकार यांचा संबंध घनिष्ठ बनविणे.
३. आर्थिक विकासामधून निर्माण झालेल्या पर्यावरणीय समस्यांवर उपाययोजना करणे ठरविण्यात आले.

### ७. क्योटो करार (१९९७)

जपानमधील क्योटो शहरात १९९७ मध्ये ही परिषद बोलाविण्यात आली. यामध्ये ''जागतिक तापमान वाढ'' (Global Warming) या विषयाच्या अनुषंगाने चर्चा हा मुख्य उद्देश होता. या परिषदेत खालील विषयांवर चर्चा करण्यात आली.

१. पृथ्वीवरील वाढत्या तापमानाची समस्या.
२. तापमान वाढीवर परिणाम करणारे घटक, प्रामुख्याने हरितगृहे.

'जागतिक तापमान वाढ' या महत्त्वाच्या जागतिक पर्यावरण समस्येवर चर्चा व उपाययोजना यासाठी ही परिषद बोलाविण्यात आली होती. पण या कराराला अमेरिका वा अन्य विकसीत राष्ट्रांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्यामुळे या कराराची अंमलबजावणी होऊ शकली नाही. त्यामुळे जागतिक तापमान वाढीची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत चालली आहे.

### ३.२.४ जागतिक तापमानवाढ (Global Warming) :

मानवी हस्तक्षेपामुळे आज जे अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामध्ये 'जागतिक तापमान वाढ' ही एक मोठी समस्या सर्व जगासमोर निर्माण झाली आहे. या समस्येमुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी किंबहुना मानवी अस्तित्त्व धोक्यात आले आहे. आज ही समस्या वैश्विक समस्या बनली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सर्व जगभराच्या राष्ट्रांनी सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी जागतिक लोकमत तयार केले पाहिजे. वेळीच या समस्येचे गांभीर्य लक्षात घेतले नाही तर त्याचे फार मोठे भयावह परिणाम पृथ्वीवरील पर्यावरण आणि मानवी अस्तित्त्वावर होतील.

जागतिक तापमान वाढ ही समस्या समजावून घेण्यासाठी पृथ्वीवरील निसर्गरचना, पर्यावरणीय मांडणी, वातावरणीय मांडणी इ. भूगोलाच्या अभ्यासविषयाचा आधार घ्यावा लागेल.

◆ **ओझोनचे कार्य व ओझोन क्षयाचे परिणाम :**

पृथ्वीवरील वातावरणात जे हवेचे थर आहेत, त्यामध्ये जमिनीपासून साधारण १५ ते ४० कि.मी. उंचीवर स्थितांवर या थरात ओझोन वायू ($O_3$) सापडतो. पृथ्वीवरील ऑक्सीजन व सूर्याकडून पृथ्वीवर येणारी अतिनिल किरणे यांच्या संयोगातून हा वायू तयार होतो.

सर्व पृथ्वीवर या वायूचा थर जमिनीपासून १५ ते ४० कि.मी. उंचीवर व्यापून राहिला आहे. हा ओझोन थर म्हणजे पृथ्वीवरील जीवसृष्टीला लाभलेली एक संरक्षण यंत्रणा आहे. या ओझोन थरामुळे सूर्याकडून पृथ्वीवर येणाऱ्या अतिनिल व विघातक किरणांचे शोषण होते. किरणांच्याबरोबर येणारी तीव्र उष्णाता शोषली जाते आणि पृथ्वीवरील जीवसृष्टीला जेवढी आवश्यक उष्णता हवी तेवढीच पृथ्वीवर सोडली जाते. हा वायू फिक्या निळ्या रंगाचा असून तो वजनाने हलका आहे. सकाळी या वायूचा थर कांहीसा खाली येतो. त्याचा परिणाम म्हणून सकाळी वातावरण आल्हाददायक, हवा शुध्द असते. वातावरणातील ओझोनचे प्रमाण कमी-जास्त होत असते. ओझोनचे ऑक्सीजनमध्ये रूपांतर झाले की, ओझोन कमी होतो तर ऑक्सीजनपासून ओझोन निर्मिती झाली की ओझोनचे प्रमाण वाढते.

◆ **ओझोन क्षयाची कारणे :-**

पृथ्वीवरील जीवसृष्टीला वरदान ठरलेला ओझोन थर दिवसेंदिवस विरळ होत आहे. ओझोन थराला छिद्रे पडू लागली आहेत. या ओझोन क्षयाची कारणे थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. **वाढते औद्योगिकीकरण :-**

औद्योगिक क्रांतीनंतर जगभर मोठ्या प्रमाणात कारखानदारी वाढली. त्यामधून मानवी विकासाला जरूर हातभार लागला असला तरी कारखानदारीमधून अनेक पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले. आज पृथ्वीवर वायू प्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली. कारखान्यामधून प्रामुख्याने नायट्रोजन आणि

क्लोरीन वायू हवेत सोडले जातात की, जे ओझोन थराला मारक आहेत. या दोन वायूंच्या हवेतील वाढत्या प्रदूषणामुळे ओझोन थर कमी-कमी होत चालला आहे.

**२. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात वापरण्यात येणारी रासायनिक खते व किटकनाशके :-**

आधुनिक काळात प्रगत शेतीच्या नावाखाली, शेतीमधून अधिकाधिक उत्पन्न मिळविण्याच्या हव्यासापोटी शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात रासायनिक खतांचा वापर केला जातो. पिक संवर्धनासाठी अनेक प्रकारची किटकनाशकांची फवारणी केली जाते. या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून माती प्रदूषण-जल प्रदूषण-वायू प्रदूषण होय. रासायनिक खते व किटकनाशके यांच्या रासायनिक विघटनामधून मोठ्या प्रमाणात नायट्रोजन व ऑक्साईड द्रव्ये वातावरणात मिसळतात, ज्याचा विपरित परिणाम ओझोन थरावर होतो.

**३. हवाई वाहतूक :-**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे आज सर्वत्र हवाई वाहतूक वाढलेली दिसून येते. विमाने हवेतून ज्या ऊंचीवरून प्रवास करतात आणि वातावरणात जो धूर सोडतात, त्याचा विपरित परिणाम ओझोन थरावर होतो.

**४. क्लोरोफ्युरोकार्बन (CFC) चा वापर :-**

आज सर्वत्र संगणकीय वस्तू वापरातून काही समस्या निर्माण झाल्या आहेत. विशेषत: सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक भागांची स्वच्छता करण्यासाठी क्लोरोफ्युरोकार्बन (CFC) चा वापर होतो, याचे विघटन होत नाही, त्यामुळे त्याचा विपरीत परिणाम ओझोन थरावर झाला आहे.

◆ **ओझोन क्षयाचे परिणाम :-**

वरील गोष्टींमुळे ओझोन थर दिवसेंदिवस विरळ होत आहे. जर आपण त्याची दक्षता घेतली नाहीतर पृथ्वीवरील पर्यावरण, निसर्गसृष्टी, सर्व सजीवसृष्टी धोक्यात येईल. ओझोन क्षयाचे परिणाम पुढीलप्रमाणे :-

१. जर दिवसेंदिवस ओझोन थर असाच विरळ होत गेला तर सूर्यापासून पृथ्वीकडे अतिनिल किरणासोबत येणाऱ्या प्रचंड उष्णतेचे शोषण करण्याची क्षमता कमी होईल. त्यामुळे पृथ्वीवरील तापमानामध्ये वाढ होईल.

२. पृथ्वीवरील वाढत्या तापमानामुळे ध्रुवीय क्षेत्रातील बर्फ वितळण्याची प्रक्रिया वाढेल.

३. पृथ्वीवरील तापमानवृध्दीमुळे पर्जन्यमानावर विपरीत परिणाम होतील. विशेषत: मोसमी हवामानाच्या प्रदेशात पर्जन्यमानामध्ये मोठ्या प्रमाणात चढउतार होतील.

४. औद्योगिककरणातून होणारे वायूप्रदूषण आणि वाढते तापमान याचा परिणाम म्हणून आम्ल

पर्जन्य, काळे पर्जन्य पाहावयास मिळेल. त्यातून दृष्टिदोष, श्वसनाचे रोग वाढतील. रक्ताभिसरणावर विपरीत परिणाम होईल.

५. पृथ्वीवरील सागरजलाची पातळी वाढेल, त्यामुळे सागरी किनाऱ्यावरील मानवी वस्त्या धोक्यात येतील. सागरी किनारे, बंदरे, शहरे, यांच्यावर याचा विपरीत परिणाम होतील. मासेमारी धोक्यात येईल.

६. कृषिक्षेत्रावर तापमानवाढीचे परिणाम होतील. अन्नधान्य व भाजीपाला यांचे उत्पादन कमी होऊन अन्नटंचाईची समस्या निर्माण होईल.

७. पृथ्वीवरील वाढत्या तापमानामुळे सजीवसृष्टीच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल. कारण पृथ्वीवरील नैसर्गिक मांडणीत सजीव सृष्टी आणि एक विशिष्ट पातळीपर्यंतचे तापमान यांचा जवळचा संबंध आहे. पण ओझोन क्षयामुळे तापमान वाढेल आणि पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीला धोका निर्माण होईल.

८. दुष्काळ, वाळवंटी प्रदेशांची वाढ होईल.

◆ **ओझोन थराचे महत्त्व :–**

पृथ्वीवरील वातावरणातील ओझोन थराचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपण कडक सूर्यप्रकाशात डोक्यावर गॉगल घातल्यानंतर जो अनुभव येतो, तोच अनुभव ओझोन यामुळे पृथ्वीवरील सर्व जीवसृष्टीला येत असतो. सूर्यापासून पृथ्वीकडे अतिनिल किरणासोबत येणाऱ्या प्रचंड उष्णतेचे शोषण करून हवी तेवढीच उष्णता पृथ्वीवर पाठवून सर्व सजीवसृष्टीचे संरक्षण करणारा सर्वात मोठा गॉगल म्हणजे ओझोन थर होय. पण या ओझोन थरात जरा जरी बदल झाला तर त्याचे विपरीत परिणाम पृथ्वीवरील सजीवसृष्टीवर होतात. म्हणून या ओझोनरूपी गॉगलचे संरक्षण केले पाहिजे.

(टीप : ओझोन वायूचे मोजमाप डॉबसन एकक (DU) मध्ये केले जाते.)

◆ **ओझोन क्षय थांबविण्याविषयीच्या उपाययोजना :–**

मानवाने आपल्या बौध्दिक क्षमतेच्या जोरावर प्रचंड प्रगती केली आहे. पण ज्या निसर्गाच्या साथीने ही प्रगती साधली, त्या निसर्गाची योग्य ती काळजी न घेतल्यामुळे नैसर्गिक साधनांचा दुरुपयोग केल्यामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणात ऱ्हास होत आहे. त्यातून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत, त्यापैकी 'जागतिक तापमान वाढ' ही एक वैश्विक समस्या. ही समस्या सर्व जगभर व्यापून राहिल्यामुळे त्यासाठी सर्वच विश्वसमुदायाने एकत्रितपणे सामुदायिक प्रयत्न केले पाहिजेत. ते थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. औद्योगिक क्षेत्रातील मोठमोठ्या कारखान्यामधून सोडण्यात येणाऱ्या घातक वायू प्रदूषकावर बंधन घालणे.

२. कृषी क्षेत्रातील रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा वापर कमी करणे, नैसर्गिक शेतीचे महत्त्व लक्षात घेऊन रासायनिक शेतीकडून सेंद्रीय शेतीकडे वाटचाल केली पाहिजे.

३. आपल्या दैनंदिन जीवनात गरजेपुरता प्रवास, गरजेपुरता वाहनांचा वापर, वैयक्तिक जीवनपध्दतीत बदल ही मानसिकता विकसीत केली पाहिजे.

४. आज आयटी क्षेत्रात रोज नवनवीन शोध लागतात. त्या शोधावर आधारित नवनवीन साधनांची निर्मिती केली जाते. पण इथे या क्षेत्रात वापरण्यात येणाऱ्या साधनामुळे विघटीत न होणारा घनकचरा ही नव्यानेच एक समस्या निर्माण झाली आहे. म्हणून आयटी क्षेत्रात गरजेपुरतीच साधने वापरली पाहिजेत.

५. आणि सर्वात शेवटी या पृथ्वीवर निसर्ग आणि माणूस यांची मैत्री वाढविली पाहिजे. निसर्गाचे संरक्षण व संवर्धन आणि मानवाचा विकास या पायावर ही मैत्री वाढली पाहिजे. त्यादृष्टीने निसर्ग संरक्षणविषयीचे दृष्टिकोन विकसित केले पाहिजेत. मानवाचा विकास हा निसर्गाचा ऱ्हास करून होत नसून निसर्गाचे संरक्षण व मैत्री यातून होतो आणि तोच टिकतो हे लक्षात घेतले पाहिजे.

६. पर्यावरण शिक्षणाची अनिवार्यता आणि लोकशिक्षणातून पर्यावरणाविषयीची जागृतीमधूनसुध्दा सकारात्मक प्रयत्न करता येतील.

### ◆ जागतिक पातळीवरून ओझोनचे संरक्षण :

**१. मॉंट्रियल ठराव (१९८७)**

१९८७ मध्ये जगातील बावीस राष्ट्रांनी ठराव करून प्रथमच जागतिक तापमान वाढीविषयी चिंता व्यक्त करण्यात आली, त्यावर चर्चा करण्यात आली त्यानंतर १९९८ पर्यंत ओझोन थरावर घातक परिणाम करणारे औद्योगिक वायू उत्सर्जन ५०% कमी करण्याविषयीचा निर्णय घेण्यात आला. तसेच १६ सप्टेंबर हा दिवस 'ओझोन डे' साजरा करण्याविषयी ठरविण्यात आले.

**२. लंडन परिषद (१९८९)**

या आंतरराष्ट्रीय परिषदेत जागतिक तापमान वाढीवर चर्चा करण्यात येऊन यामध्ये ओझोन संरक्षणासाठी (उऋड) चा वापर कमीतकमी करण्यावर आणि त्याच्या वापरावर बंदी घालण्याचे ठरविण्यात आले.

**३. युनो (UNO)**

संयुक्त राष्ट्रसंघटनेमार्फत पर्यावरण वैश्विक जनजागृतीसाठी ओझोन संरक्षणाचे महत्त्व सर्वांना कळावे यासाठी '१६ सप्टेंबर' जागतिक ओझोन दिवस निश्चित करण्यात आला आहे.

४. **क्योटो करार (१९९७)**

१९९७ मध्ये जपानमधील क्योटो शहरात ही परिषद घेण्यात आली. 'पृथ्वीवरील तापमान वाढ आणि त्यावरील उपाययोजना' हे या परिषदेचे मुख्य उद्दिष्ट होते. यामध्ये वरील विषयाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा झाली. त्यामध्ये ग्रीन हाऊस गॅसेसचे प्रमाण कमी करण्याविषयीचा महत्त्वपूणृ निर्णय घेण्यात आला. सन २००५ मध्ये या कराराला जगातील १४१ देशांनी मान्यता दिली आहे. पण जागतिक महासत्ता म्हणून जागतिक राजकारण नियंत्रण करणारी अमेरिकेने मात्र या कराराला मान्यता दिलेली नाही.

◆ **पर्यावरण समस्येतील राजकारण :–**

आज जगभर सर्वत्र एकसमान विकास झालेला नाही, त्यामुळे विकसीत आणि विकसनशील राष्ट्रे असे दोन महत्त्वाचे गट जागतिक पातळीवर पाहावयास मिळतात. दुसऱ्या महायुध्दाच्या अंतापर्यंत जगभर अनेक साम्राज्यवादी देश राज्य करीत होते, त्या साम्राज्यवादी देशानी साम्राज्याअंतर्गत वसाहतीमधून नैसर्गिक साधने व मानवी संसाधन याचा मोठ्या प्रमाणात वापर करून आपली प्रगती साधली. त्यामध्ये गरीब देशातील पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात लूट केली. त्या देशात पुढे काही पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले.

दुसरे महायुद्धाचा एक ठळक परिणाम म्हणजे राजकीय साम्राज्यवाद संपला, पण रशिया व अमेरिका या दोन महासत्तांच्या नेतृत्त्वाने वैचारिक साम्राज्यवाद सुरू झाला. इथे साम्राज्यवादांचे स्वरूप बदलले, पण निसर्गाची लूट पुढे सुरू राहिली. कालांतराने रशियन महासत्तेचे पतन झाल्यानंतर आज एकमेव महासत्ता म्हणून अमेरिका नेतृत्त्व करते. वास्तविक जगाचे नेतृत्व करताना अमेरिकेने पर्यावरणीय समस्या सोडविण्यासाठीसुध्दा नेतृत्त्व करायला पाहिजे होते. पण आज पर्यावरणाचे राजकारण केले जात आहे. विकसित देश आजही 'जागतिक तापमान वाढीस' मोठ्या प्रमाणात जबाबदार आहेत, पण ही समस्या सोडविण्यासाठी पाहिजे तेवढे लक्ष देत नाहीत. निसर्गाच्या साधनसंपत्तीचे सर्वात मोठे लाभार्थी विकसित देश पण पर्यावरण समस्यांचा फटका, जबाबदारी विकसनशील देश. असे विचित्र पर्यावरणीय राजकारण पाहावयास मिळते.


म्हणून सर्वच राष्ट्रांनी 'जागतिक तापमानवाढ' या समस्येचे गांभीर्य ओळखले पाहिजे. नि:स्वार्थी, निकोप भावनेतून ही समस्या सोडविण्यासाठी सामुहिकपणे प्रयत्न करणे गरजेचे आहे. 'चिरस्थायी विकास आणि भविष्यकालीन पिढ्यांची काळजी' या मानवतावादी भूमिकेतून सर्वांनी आपली पृथ्वी, पृथ्वीवरील निसर्ग, पर्यावरण आणि शेवटी माणूस वाचविणे गरजेचे आहे. म्हणून शेवटी असे म्हणता येईल, ''पृथ्वी वाचली तर मानव वाचेल'' म्हणून आपण सर्वांनी पृथ्वी वाचवू या (SAVE THE EARTH).

जागतिक तापमान वाढीचा परिणाम दर्शविणारा खालील तक्ता पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल.

**तक्ता क्र. १ समुद्र पातळीतील १ मीटर वाढीमुळे अंदाजे होणारे परिणाम**

| देश | समस्याग्रत लोक | | जमीन | |
|---|---|---|---|---|
| | लोकसंख्या दशलक्ष | एकूण % | कि. मी. | एकूण % |
| चीन | ७२ | ७ | ३५,००० | --- |
| बांगला देश | ७१ | ६० | २५,००० | १७.५ |
| जपान | १५ | १५ | २,३०० | ०.६ |
| नेदरलँड | १० | ६७ | २,१६५ | ५.९ |
| भारत | ७.१ | १ | ५,८०० | ०.४ |
| इजिप्त | ४.७ | ९ | ५,८०० | १.० |
| नायजेरिया | ३.२ | ४ | १८,६०० | २.० |

◆ **ओझोन क्षय : परिणाम आणि वातावरणातील बदल :–**



## ३.३ सारांश :

'पर्यावरणीय संरक्षण' ही एक वैश्विक समस्या आहे. आज विज्ञानामुळे जग जवळ आले आहे. आज जगातील कोणताही देश स्वयंपूर्ण नाही. त्याला जगातील इतर देशांची मदत घ्यावी लागते. आज राष्ट्रा-राष्ट्रात जगाचे नेतृत्त्व करण्यासाठी जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. आज प्रत्येक देश आपला जास्तीत जास्त विकास करू पाहात आहे. त्यातून विकासाच्या नावाखाली नैसर्गिक साधनांची प्रचंड लूट केली जात आहे. त्यातून पर्यावरणाचा समतोल बिघडून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्या समस्यांचे वैश्विक परिणाम दिसू लागले आहेत. जसे जागतिक तापमान वाढ. विकासाच्या नावाखाली राष्ट्रा-राष्ट्रांत तीव्र स्पर्धा होत आहे. त्यातून विकसनशील व विकसीत राष्ट्रगट निर्माण झाले आहेत. 'पर्यावरण संरक्षण' ही आज सर्वांची गरज आहे. पण जागतिक पातळीवर विकसित राष्ट्रे, प्रामुख्याने अमेरिका पर्यावरण संरक्षणास अपेक्षित प्रतिसाद देत नाही. जगातील बडी राष्ट्रे पर्यावरणाचे राजकारण करतात.

आज पृथ्वीवरील पर्यावरणीय समस्यांची सोडवणूक करून निसर्ग पर्यायाने मानवी समाज वाचवायचा असेल तर राष्ट्रा-राष्ट्रांनी वैयक्तिक प्रतिष्ठा बाजूला ठेवून, मानवतावादी दृष्टिकोनातून, प्रामाणिकपणे आपला सहभाग दिला तरच हे सर्व प्रश्न संपतील, आणि आपली पृथ्वी वाचेल. म्हणून,

**"SAVE THE EARTH"** यासाठी,

***सर्वांचा सहभाग! सर्वांचे प्रयत्न!! सर्वांना लाभ!!!***

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. निसर्ग हा मानवाचा मित्र आहे.

२. निसर्गातील साधन संपत्ती मानवी विकासातील मुख्य स्रोत आहे.

३. 'पर्यावरण' मानवी विकासाला पूरक व पोषक आहे.

४. नैसर्गिक साधन सामग्रीची बेसुमार लूट करून मानवाने केलेला विकास हा विकास नसून विनाश आहे.

५. पर्यावरणवाद व मानवी संस्कृती यांचा घनिष्ठ संबंध.

६. वाढती लोकसंख्या-वाढते शहरीकरण-वाढते औद्योगिकीकरण अनेक पर्यावरणीय जन्म देते.

७. वातावरणातील ओझोन वायूचा थर पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी एक प्रभावी सुरक्षा कवच. निसर्गातील मोठा गॉगल.

८. 'पर्यावरण संरक्षण' - वैश्विक समस्या.

९. पर्यावरण संरक्षणासाठी संयुक्त राष्ट्रसंघटना (UNO) सहीत जगभरातील सर्व देश प्रयत्न करतात.

१०. 'पर्यावरण शिक्षण' आधुनिक काळात सर्वांसाठी अनिवार्य व आवश्यक अभ्यास विषय आहे.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय :

### (अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. पर्यावरणाची व्याख्या व स्वरूप सांगून महत्त्व स्पष्ट करा.

२. मानव आणि निसर्ग यांच्या संबंधाची सविस्तर चर्चा करा.

३. पर्यावरणातील मुख्य समस्या व त्यावरील उपाययोजना.

४. पर्यावरणवादाची मुख्य वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

५. जागतिक पातळीवरून करण्यात आलेले पर्यावरण संरक्षणासाठीचे प्रयत्न.

६. 'जागतिक तापमान वाढ' एक वैश्विक समस्या चर्चा करा.

७. 'पर्यावरण शिक्षणाची अनिवार्यता' सविस्तर मांडणी करा.

### (ब) टिपा लिहा.

१. पर्यावरणवाद.

२. मानव आणि निसर्ग.

३. पयावरणीय समस्या.

४. औद्योगिकीकरणाचे परिणाम.

५. जागतिक तापमान वृध्दीचे परिणाम.

६. पर्यावरण संरक्षणासाठीच्या चळवळी.

७. शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षण.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


**१. जी. एल. शर्मा** (२०१५) : 'सामाजिक मुद्दे', रावत पब्लिकेशन, जयपूर.

**२. बाचल वि. मा. :** 'राजकीय सिद्धांत'.

**३. भोळे भा. ल. :** 'राजकीय सिद्धांत विश्लेषण'.

४. **Bhandari D. R.** "History of European Political Philosophy".

५. **Ghanshym M. Shaha,** "Social Movements in India : A Review Literature, Sage, New Delhi (1990).

६. **Singh Rajendra,** "Social Moverments, Old and New : A Postmodernist Critique," New Delhi, Sen Publication (2001).

७. **De Steiguer,** "The origins of Modern Environmental Thought", Uty. of Arizona Press (2006).

८. **भोळे भा. ल., बेडकीहाळ किशोर :** 'बदलता महाराष्ट्र', आंबेडकर अकादमी, सातारा (२००३).

९. **बापट राम :** 'राज्यसंस्था, भांडवलशाही आणि पर्यावरणवाद', लोकवाङ्मय, मुंबई (२०१३).

❍❍❍

घटक ४

# नागरी समाज

## (Civil Society)

---

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ नागरी समाजाचा अर्थ व विकास

४.२.१.१ नागरी समाज – उदारमतवाद

४.२.१.२ नागरी समाज – राजकीय आर्थिक व्यवस्था

४.२.१.३ नागरी समाज – राजकीय आर्थिकता

४.२.२ नागरी समाज – जॉन लॉक

४.२.३ नागरी समाज – हेगेल

४.२.४ नागरी समाज – मार्क्स

४.२.५ नागरी समाज – ॲटोनिओ ग्रामसी

४.२.६ उत्तर वसाहतवाद व नागरी समाज

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द

४.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्टे :

१) नागरी समाज संकल्पना स्पष्ट करणे.

२) नागरी समाज व राजकीय समाज फरक स्पष्ट करणे.

३) नागरी समाजाबद्दल तत्त्वज्ञांचे विचार व विवेचन.

## ४.१ प्रास्ताविक :

अलीकडील काही दशकापासून नागरी समाज ही संकल्पना रूढ झालेली आहे. यापूर्वी राज्य व नागरी समाज या दोहोंचा अर्थ एकच मानला जात असे. मात्र अलीकडील काळात यामध्ये असणारा फरक स्पष्टपणे जाणवत आहे. नागरी समाज म्हणजे समाजातील अशा व्यक्तींचा समूह की, जो नागरिकांच्या कल्याणासाठी तसेच समाजाच्या कल्याणासाठी कार्यरत असतो. वास्तविक ही संघटना गैरसरकारी असते. ती कार्य करत असताना संघटना व संस्थांच्याद्वारे नागरिकांच्या इच्छांचे व हितसंबंधाचे संरक्षण करीत असते. अशा संघटना व संस्था समाजात स्वतंत्र असतात, त्या सरकारच्या कोणत्याही बंधनात नसतात. आधुनिक काळात नागरी समाजाची उपयुक्तता लोकशाही समाज निर्माण करण्यासाठीसुद्धा झालेली आहे, कारण लोकशाहीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींसाठी त्यांचा सातत्याने संघर्ष दिसून येतो. उदा. भाषण स्वातंत्र्यासाठी संघर्ष, न्यायालयीन स्वातंत्र्यासाठी संघर्ष इ. युरोपमध्ये तर नागरी समाजाचा व्यवस्थेविरुध्द असणारा संघर्ष म्हणजे नागरी मूल्यांच्यासाठी सुरू असलेला संघर्ष मानला जातो. कारण नागरिकांना समाजात जीवन जगत असताना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. त्यामध्ये सरकारच्या ध्येय धोरणांचा देखील हात असतो, अशावेळी संघर्ष करत असताना संघर्ष करणारे नागरी समाजाचे नेते व कार्यकर्ते समाजात असणाऱ्या चांगल्या मूल्यांसाठी संघर्ष करीत असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये १९९१ नंतर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत मुक्त अर्थव्यवस्थेचे महत्त्व वाढले. समाजवादी व्यवस्थेच्या बंदिस्त विळख्यातून मुक्त झालेला समाज स्वातंत्र्याची फळे मुक्तपणे चाखू लागला, परंतु भांडवलशाही राष्ट्रांनी याच काळात आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या जोरावर व मुक्त व्यापाराच्या कल्पनेतून जगासमोर नवी आव्हाने उभी केली. गतिमान अर्थव्यवस्थेबरोबर विकासाची स्वप्ने दाखविण्यात आली, परंतु त्यामुळे नागरिकांचे हक्क डावलण्यात येऊ लागले. यामध्ये शेतजमिनी ताब्यात घेणे, सरकारी मालमत्ता कमी किंमतीमध्ये खरेदी करणे, नागरिकांच्या मूलभूत सोयींकडे दुर्लक्ष होणे, शिक्षण, आरोग्य, दळणवळण यासारख्या मूलभूत सोयी सर्वसामान्य लोकांना परवडण्याच्या पलीकडे जाऊ लागल्या. हे विविध आंतरराष्ट्रीय कंपन्या व राष्ट्रीय कंपन्यांच्या प्रचंड भांडवल गुंतवणुकीला दिलेल्या प्राधान्यामुळे घडून आले. सरकारी गुंतवणुकीचे प्रमाण कमी होऊन खाजगी गुंतवणूकीला प्राधान्य दिल्यामुळे खाजगी क्षेत्रामध्ये नागरिकांच्या सोयीपेक्षा नफा मिळविण्याकडे जास्त लक्ष देण्यात येऊ लागले. परिणामी, नागरिकांचे हक्क डावलले जाऊ लागले, याला विरोध करण्यासाठीच गैर सरकारी संघटना स्थापल्या जाऊन समाजातील सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले जाऊ लागले, यांनाच पुढे नागरी समाज म्हणून ओळखले जाऊ लागले.

वास्तविक, भांडवलशाही व्यवस्था व समाजवादी व्यवस्था यांच्यातून निर्माण झालेल्या शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भांडवलशाही व्यवस्था जोराने फोफावली. प्रगती व विकासाबरोबर दुष्परिणामदेखील जाणवू लागले. विविध देशातील मध्यमवर्गीय जनतेला याचे चटके जास्त बसू लागले, त्यांना विरोध करण्यासाठी नागरी समाज संघटना निर्माण झाल्या. सर्वसामान्य जनतेचे हक्क, नैतिक मूल्ये, सार्वजनिक मालमत्ता, नैसर्गिक साधनसंपत्ती, स्वातंत्र्य, न्याय या गोष्टींच्या संरक्षणासाठी गेल्या दोन ते तीन दशकांमध्ये नागरी समाज संघटनांनी लढा उभारला. या नागरी समाज संघटनामध्ये शैक्षणिक, प्रसारमाध्यमे, खाजगी क्षेत्रातील संस्था, विद्यार्थी, तरुण यांचा प्रामुख्याने समावेश होतो. यामुळेच नागरी समाजाचे योगदान, त्यांचे संबंध, त्यांची ध्येय धोरणे, त्यांना होणारा रसद पुरवठा या सर्वांचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

## ४.२ विषय–विवेचन :

### ४.२.१ नागरी समाजाचा अर्थ व विकास :

नागरी समाज ही संकल्पना नागरी (Civil) व समाज (Society) या दोन शब्दापासून बनलेली आहे. नागरी हा शब्द देशातील नागरी सेवा, देशातील नागरिक, सभ्य, सुसंस्कृत व्यक्ती यांच्यासाठी वापरतात. तसेच समाज (Society) हा शब्द अनेक व्यक्तीचा समूह, संघटित व्यक्तींचा समूह, मूल्यांसाठी एकत्रित आलेला समुदाय यांच्यासाठी वापरला जातो. ॲरिस्टॉटलच्या 'पॉलिटिक्स' या ग्रंथात 'नागरी समाजासाठी' (Koinonia Politike) ही संज्ञा वापरली आहे. यामध्ये लोकसमूदायापासून नगर राज्य (Polis) निर्मिती होवून यामध्ये नागरिकांच्याकडून नियमांचे व नैतिकतेचे पालन केले जात असे. या ठिकाणी राहणारे नागरिक समान कायद्याने नियंत्रित केले जातात. ज्यावेळी नागरी समुदायाने कायद्याचे नियंत्रण मान्य केले, त्याचवेळी नागरी समाजाच्या अस्तित्त्वावर बंधने आली, म्हणजेच मानव हा 'राजकीय प्राणी' बनला. रोमन विचारवंत सिसेरो, मध्ययुगीन काळातील समाजसुधारणावादी विचारवंत विल्यम मोअरबेक (William Morebeke) आणि बिनार्दो ब्रुनेई यांच्या मते, नागरिकांचे कायदे व राज्याची सत्ता यांच्यामध्ये वेगळेपणा दिसू लागला. त्यातूनच सरंजामदार व जमीनदार, राज्य वापरत असलेल्या अधिकारांना विरोध करू लागले. अलीकडच्या काळात वेवलेव्ह हॉवेल यांच्या मते, पूर्व युरोपमध्ये नागरी संघटना राज्य सरकारकडून प्रभावित करणाऱ्या साम्यवादी सरकारना विरोध करू लागल्या.

वास्तविक अठराव्या शतकामध्ये अज्ञानाचा अंध:कार दूर होत असताना आधुनिक विचारांच्या सुरवातीस नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला. यापेक्षा अगोदरदेखील विचारांच्या इतिहासात पाहिले असता मानवी समुदायात एकमेकांत संघर्ष उत्पन्न होऊ नयेत म्हणून मानवाच्या राजकीय संघटना निर्माण झाल्या. प्राचीन काळात याचा 'चांगला समुदाय' असाच उल्लेख आढळतो. **सॉक्रेटिस**च्या मते, समाजातील नागरिकांच्यामध्ये असणारा संघर्ष लोकांनी एकत्रित येऊन आपली मते भाषणाद्वारे प्रकट करून (dialetic) सोडवावित. त्यातून समाजासाठी आवश्यक असणाऱ्या बाबी स्पष्ट होतील

असे सांगितले. यावरूनच स्पष्ट होते की, नागरी समाजातील प्रश्न संभाषणाने सोडविल्याने नगरराज्यामधील नागरिकांच्यात असणारी सभ्यता दिसून येईल. प्लेटोच्या मते, आदर्श राज्य म्हणजे चांगला नागरी समाज होय. यामध्ये नागरिक समाजाच्या भल्यासाठी, स्वातंत्र्यासाठी, धाडस, आधुनिकता व न्याय यावर विश्वास ठेवत. अशा नागरी समाजाचे संरक्षण करण्याची जबाबदारी 'तत्त्वज्ञानी राजाची' होती. ॲरिस्टॉटलच्या मते, नगरराज्य नागरिकांच्या संघटनांची संघटना होती. यामध्ये नागरिकांच्यावर राज्य करण्यासाठी नागरीकच मदत करत असत. त्यांची (Koinonia Politike) ही संकल्पना म्हणजे 'राजकीय समुदायाची' संकल्पना होती.

रोमन विचारवंत सिसेरो यांच्या मते, 'आदर्श समाज' नागरिकांच्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याबाबत खात्री देत असे. त्यावेळचे तत्त्वज्ञानी राज्य व समाज यामध्ये भेद मानत नसत. त्याकाळात राज्य नागरिकांचे व समुदायाचे प्रतिनिधीत्व करत आणि सभ्यतेला आदर्श नागरिकांची गरज असे. त्यांच्यामते, मानवाकडून एकत्रित येऊन समाजाला आकार दिला जात असे. समाजात शांतता निर्मितीसाठी नागरिक एकत्र येत असत. यावरून प्राचीन राजकीय विचारवंतांच्याकडून नागरी समाजाच्या अस्तित्त्वाला मान्यता दिली. मध्ययुगामध्ये या व्यवस्थेत खूपच बदल घडून आले. सरंजामशाही पद्धतीच्या विकासामुळे आदर्श नागरी समाजाची संकल्पना राज्यव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहातून बाजूला पडली. राज्यव्यवस्थेत निर्माण होणारे प्रश्न संभाषणाद्वारे सोडविण्यापेक्षा मुद्यावर भर दिला जाऊ लागला. ही व्यवस्था प्रबोधन काळापर्यंत तशीच राहिली.

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर वेस्टफालियाच्या तहाने जगामध्ये अनेक सार्वभौम राष्ट्रांचा जन्म झाला. ही राष्ट्रे विशिष्ट भूप्रदेशात सार्वभौम होती. ज्या राज्यांमध्ये राजेशाही होती त्यांनी सरंजामशाही नष्ट करून सैन्याचे एकत्रीकरण केले. त्याला राष्ट्रीय सैन्य असे नाव देऊन व्यावसायिक नोकरशाही निर्माण केली. करवसुलीसाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली. यामुळेच संपूर्ण राज्यव्यवस्थेवर त्यांचे प्रत्यक्ष नियंत्रण आले. सरकारच्या होणाऱ्या खर्चाचे नियमन करण्यासाठी राज्याची अर्थव्यवस्थाच राजांनी आपल्या ताब्यात घेतली. यामुळेच संपूर्ण युरोपभर १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत सर्व सत्ता राजांच्या ताब्यात गेली व सर्वंकष वादाचा जन्म झाला. संपूर्ण सत्ता राजांच्या हाती एकवटलेली सर्वंकर्ष व्यवस्था प्रबोधन काळ सुरू होईपर्यंत म्हणजेच अज्ञानाचा अंध:कार दूर होईपर्यंत टिकून राहिली. यानंतर प्रबोधन, मानवतावाद आणि वैज्ञानिक क्रांती यांचा परिणाम या व्यवस्थेवर होऊन वंशपरंपरागत राजसत्ता, त्यांनी निर्माण केलेली शासन व्यवस्था, मूलभूत हक्कांच्या वाटपामध्ये असलेली विषमता याबाबत विचारवंतानी सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये प्रश्न निर्माण केले. यामुळेच सर्वंकर्षवादी व्यवस्थेमधून बाहेर पडून सर्वसामान्य जनतेच्या हक्कांचे राज्य निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या काळात आधुनिक विचारसरणीच्या विचारवंतांना दैवी शक्तीच्या आधारे निर्माण झालेली राज्य व्यवस्था चुकीची वाटू लागली, त्यांनी राजसत्ता व धर्मसत्ता यांच्या एकत्रीकरणाला विरोध करण्यास चालू केले. कारण त्यांच्या मते, मानवाच्या विकासामध्ये वरील व्यवस्था प्रमुख

अडचण होती. याला हळूहळू जनतेचा पाठिंबा मिळू लागला. यामुळे राजसत्ता व धर्मसत्ता ही जनमताच्या विरोधात असल्याचे दिसू लागले. यातूनच मानवाला जास्तीत जास्त हक्क मिळावेत, यासाठी राजसत्तेबरोबर संघर्ष सुरू झाला. नागरिकांच्यामध्ये आपल्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण झाली. यातूनच नागरिकांच्या संघटना निर्माण होऊ लागल्या, यालाच नागरी समाजाची सुरवात असे मानता येईल. प्रबोधनाच्या काळात अज्ञानाचा अंध:कार दूर होत असताना नागरिकांना आवश्यक असणारी राज्य व्यवस्था निर्माण करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले. त्याचे पडसाद आपल्याला दमनशाहीच्या विरोधात संघर्ष करणाऱ्या २१ व्या शतकातील नागरी समाजात दिसून येतो. नागरी समाजाच्या व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. **जेफ्री अलेक्झांडर** यांच्या मते, ''नागरी समाज म्हणजे राज्याव्यतिरिक्त इतर संस्थांना एकत्र आणणारे किंवा करणारे संयुक्त, सर्वसमावेशक छत्र होय.''

२. **जॉर्ज हागिंस/हागिन्स** यांच्या मते, ''नागरी/सुसंस्कृत समाज हा संघटित समाज असून त्यावर राज्य शासन करते.''

३. **नीरज गोपाल जायल** यांच्या मते, ''नागरी समाजामध्ये सामाजिक कार्य करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्थांचा समावेश होतो व त्यावर राज्यांचे नियंत्रण नसते.''

४. **लैरी डायमंड** यांच्या मते, ''नागरी समाज एक संघटित सामाजिक जीवन दर्शवितो, ज्यात ऐच्छिकता, स्वजनहीत, समर्पित व कायदेशीर व्यवस्था व सहभागिता या मूल्यांचा प्रभाव असतो.''

नागरी समाजामध्ये विविधता असून ऐच्छिक प्रयत्न, सहनशीलता सर्वांचा आदर करून सर्वांना पटेल अशा प्रकारचा निर्णय घेतला जातो. यामध्ये वेगवेगळ्या संघटनांचा समावेश होतो. उदा. युवक संघटना, शेतकरी संघटना, कामगार संघटना, महिला संघटना, राजकीय पक्ष, सामाजिक सुधारणेसाठी प्रयत्न करणाऱ्या संस्था इ. समावेश असतो. यांच्या कार्याचा विचार करता सरकारवर दबाव आणून आपल्या मागण्या मान्य करून घेणे अशी यांची कार्यपध्दती असल्याचे आढळते. त्यांच्यासमोर लोकशाही व्यवस्था मजबूत करून सामाजिक हित साधण्याचे उद्दिष्ट असते. यामधूनच त्यांच्याकडून मानवी हक्कांचे संरक्षण केले जाते.

### ४.२.१.१ नागरी समाज – उदारमतवाद :

नागरी समाजामध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्याला महत्त्व असते. राज्यघटनेने दिलेली स्वातंत्र्य त्याचे पालन करत असताना व्यक्तीसमोर राज्यसंस्थेकडून अनेक आव्हाने निर्माण केली जातात. त्यामुळे त्या आव्हानांना तोंड देत व्यक्तीकडून आपल्या स्वातंत्र्याची जपणूक करत असते. राजेशाही, हुकूमशाही या व्यवस्थेत व्यक्तीला नागरी समाजाद्वारे संघर्ष करावा लागला, तसाच संघर्ष लोकशाही व्यवस्थेतदेखील करावा लागत आहे. वास्तविक लोकशाही व शासनव्यवस्थेच्या प्रकाराबरोबरच सामाजिक व आर्थिक

व्यवस्थेचा भाग आहे. शासन व्यवस्थेद्वारे त्याची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जातो. आधुनिक काळात उदारमतवादामध्ये व्यक्तीस्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. व्यक्ती केंद्र बिंदू मानून राज्यव्यवस्थेच्या कार्याची व्याप्ती किती असावी हे निश्चित केले जाते. म्हणजेच राज्यव्यवस्थेने कायदा व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यापुरतेच मर्यादित कार्य करावे. व्यक्तीच्या जीवनामध्ये राज्यव्यवस्थेचा हस्तक्षेप कमी असावा. नागरी समाजाच्या दृष्टिकोनातून राज्यव्यवस्थेची ही भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. कारण नागरी समाज समाजातील घटकांच्यासाठी कार्य करीत असताना राज्यव्यवस्थेच्या हस्तक्षेपाला सातत्याने सामोरे जावे लागते. व्यक्तिविकास व व्यक्तीस्वातंत्र्य यांना मारक ठरणाऱ्या गोष्टी नष्ट करण्यासाठी उदारमतवादी चळवळ निर्माण झाली. त्याचप्रमाणे नागरी समाजाचे वैशिष्ट्य देखील व्यक्तीविकास व व्यक्तीस्वातंत्र्य असल्याचे आपल्या दिसून येते.

समाजाच्या गरजेनुसार काळाप्रमाणे उदारमतवादी विचारप्रणालीमध्ये बदल होत गेले. विविध विचारवंतानी यासाठी योगदान दिले. त्यातून व्यक्तीवाद, उपयुक्ततावाद, सेंद्रीय सिद्धांत, निरंकुश अर्थव्यवस्थेचा सिद्धांत (लेसेफेअर तत्त्वज्ञान), उदारमतवादी लोकशाही सिद्धांत, फेबियन समाजवाद असे उदारमतवादाचे विविध दृष्टिकोन निर्माण झाले. ज्याप्रमाणे नागरी समाजामध्ये व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्य जपण्यासाठी जागरूकता निर्माण केली जाते. त्याप्रमाणे उदारमतवादी सिद्धांताच्या विविध दृष्टिकोनामध्ये व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीमत्त्वाचा विकास ही मध्यवर्ती संकल्पना मानून नैतिक मूल्य गृहीत धरले आहे. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही व्यवस्था व स्वातंत्र्यासाठी उदारमतवाद अशी व्यवस्था निर्माण झाली. यामधूनच आधुनिक काळात उदारमतवादी लोकशाही व्यवस्था निर्माण झाली आहे. जी नागरी समाजाच्या अस्तित्त्वासाठी आणि विकासासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

वास्तविक धर्मसुधारणेची चळवळ, पुनुरुज्जीवनाची (प्रबोधनाची) चळवळ यामधून उदारमतवादी विचारवंतानी व्यक्तीस्वातंत्र्याचा पुरस्कार केला. म्हणजेच व्यक्तीस्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा यांना विरोध करणाऱ्या व्यवस्थेच्या विरुध्द प्रतिकाराच्या भावनेतून उदारमतवादाचा उदय झाला. प्राचीन काळापासून राज्यकर्त्यांची हुकूमशाही, सरंजामशाही आणि धर्मसंस्था यामुळे व्यक्तीस्वातंत्र्य अडचणीत आले होते, त्याला विरोध करण्यासाठी उदारमतवादाची निर्मिती झाली. समाजजीवनात व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा यांचे संरक्षण करून संवर्धन करण्यासाठी उदारमतवादामध्ये प्रयत्न केले गेले.

उदारमतवादाच्या संकल्पनेत नागरी समाजाचा विचार केल्यास नागरी समाजामध्ये व्यक्तीच्या इच्छा व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी गैरसरकारी संघटना अस्तित्त्वात आलेल्या असतात. नागरी समाजामध्ये या संघटनांच्याद्वारे व्यक्तीचे वैयक्तिक जीवन, कौटुंबिक समस्या यांचे संरक्षण सरकारी संघटनापासून केले जाते. या संघटना सरकारी व्यवस्थांपासून पूर्णपणे स्वतंत्र असतात. ज्याप्रमाणे उदारमतवादी व्यवस्थेत व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची प्रतिष्ठा अबाधित राखण्यासाठी प्रयत्न केला

जातो, त्याप्रमाणे या गैरसरकारी संघटना व्यक्तीचे हक्क व स्वातंत्र्य अबाधित राखण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेविरुध्द लोकशाही मार्गाने संघर्ष करीत असतात. या संघटनांना राजकीय व्यवस्था किंवा सरकार कोणत्याही मार्गाने नियंत्रित करू शकत नाही, यावरूनच नागरी समाज व उदारमतवादी संकल्पना एकमेकांना पूरक असल्याचे दिसते, कारण दोन्ही ठिकाणी व्यक्ती केंद्रीभूत मानून व्यक्तीचे हक्क व व्यक्तीची प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न दिसून येतो.

नागरी समाजामध्ये व्यक्तीचे स्वातंत्र्य, हक्क, प्रतिष्ठा हे सर्व सुरक्षित ठेवण्यासाठी विविध संघटना कार्य करीत असतात. या संघटनांच्याद्वारे आपल्याला नागरी समाजाचे अस्तित्त्व जाणवते. त्यांच्याद्वारे सरकारच्या निरंकुशतेवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला जातो. त्या संघटना खालीलप्रमाणे गैरसरकारी संघटना (N.G.O.), ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या संघटना (N.P.O.'s), किंवा नागरी समाज संघटना (C.S.O.'s) याशिवाय खाजगी कार्य करणाऱ्या संघटना (P.V.O.'s) अशा प्रकारच्या संघटना उदारमतवादामध्ये नमूद केलेले नागरिकांचे स्वातंत्र्य व प्रतिष्ठा टिकविण्याचे कार्य करताना दिसून येतात.

◆ **नागरी समाज व उदारमतवादाची तत्त्वे :**

ज्याप्रमाणे उदारमतवादामध्ये व्यक्तीस्वातंत्र्याला प्राधान्य देऊन व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीला हक्क अधिकार प्रदान केले आहेत, त्याचप्रमाणे नागरी समाजदेखील व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणाऱ्या हक्कांच्यासाठी प्रस्थापित राज्यव्यवस्थेशी संघर्ष करताना दिसतो. उदारमतवादामध्ये राज्याला व्यक्तीच्या विकासासाठीचे साधन मानले आहे. अशा राज्याकडून व्यक्तीला केंद्रस्थानी मानून नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी नागरी समाजात अलीकडे गैर सरकारी संघटना सरकारवर दबाव आणताना दिसतात. उदारमतवाद व्यक्तीच्या विचारशीलतेवर विश्वास ठेवतो म्हणजेच व्यक्ती विचार करू शकते. व्यक्तीचे विचार स्वातंत्र्य व कृती स्वातंत्र्य उपभोगत असताना स्वत:च्या विचार करण्याच्या व्यक्तीद्वारे योग्य अयोग्यतेचा विचार करते. नागरी समाजामध्ये व्यक्तींच्या संघटना काम करत असताना एखाद्या घटनेचा समाजावर कितपत परिणाम होईल तो चांगला असेल की वाईट असेल या सर्वांचा विचार करून निर्णय घेतात. व्यक्तीच्या जीवनात राज्याचा किमान हस्तक्षेप असावा. केवळ व्यक्तीला उच्चार, विचार आणि संघटन स्वातंत्र्य दिले आहे. त्यासाठी व्यक्तीचे अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करणे हे राज्याचे कार्य असते. नागरी समाजात व्यक्तीच्या विचार, उच्चार, संघटन स्वातंत्र्याचा वापर करून गैरसंघटना स्थापन करत असतात व त्यांच्याद्वारे व्यक्तींना समाजात वावरत असताना विचार व उच्चार स्वातंत्र्याची जाणीव करून देऊन यावर कुणाचे अतिक्रमण होणार नाही, यासाठी सातत्याने दक्ष असतात. अतिक्रमण झाल्यास राज्याचे लक्ष त्याकडे वेधून घेतात.

उदारमतवादी व्यवस्थेत मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केला आहे. राज्याने व्यक्तीच्या आर्थिक क्षेत्रात हस्तक्षेप न करता व्यक्तीला खुल्यापणाने उद्योगधंदे, व्यापार करू द्यावा. नागरी समाजाने मुक्त

अर्थव्यवस्थेला विरोध केलेला नाही. मात्र अलीकडील काळात काही बहुराष्ट्रीय कंपन्याच्याकडून सर्वसामान्य नागरिकांच्या आर्थिक स्वातंत्र्यावर होणारे अतिक्रमण त्यांना मान्य नाही, त्यासाठी सातत्याने पर्यावरणाची होणारी हानी, प्रदूषण आर्थिक शोषण यासाठी संघर्षाची भूमिका नागरी समाज संघटना घेताना आपल्याला दिसून येतात. नागरी समाज व उदारमतवादी संघटना, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही तत्त्वे अंमलात आणण्यासाठी लोकशाही व्यक्तीचा पुरस्कार करतात. त्याचबरोबर व्यक्ती धर्मसंस्थापासून अलिप्त ठेवून धर्मनिरपेक्षता व मानवतावाद यांचा पुरस्कार करून व्यक्तीचे जीवन धार्मिक संस्था व संघटना यापासून अलिप्त असावे असे मानले जाते.

नागरी समाज व उदारमतवाद यांचा फार जवळचा संबंध दिसून येतो. काही विचारवंतांनी १७व्या शतकापासून व्यक्तीच्या स्वातंत्र्यासाठी व हक्कांसाठी मांडलेले विचार आजही नागरी समाजासाठी पूरक आहेत, त्यामुळे व्यक्तीस्वातंत्र्याचा इतिहास पाहणे जरूरीचे आहे. प्रस्थापित राजेशाही व्यवस्थेला विरोध करून व्यक्तीना अधिकार मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य इंग्लंडमधून सुरू झाले. इंग्लंडमधील १६८८ ची राज्यक्रांती व १६८९ मध्ये पास झालेले बिल ऑफ राईटस् यामधून व्यक्तीला केंद्रस्थानी मानून व्यक्तीचा विकास म्हणजे समाजाचा विकास व समाजाचा विकास म्हणजे राज्याचा विकास मानणारी उदारमतवादी व्यवस्था अस्तित्वात आली. जॉन लॉकच्या सामाजिक कराराच्या विचारांचा प्रभाव याच्यावर पडल्यामुळे घटनात्मक मार्गाने या व्यवस्थेत व्यक्तीस्वातंत्र्याचे संरक्षण करण्यात आले. त्यामुळेच आधुनिक काळात उदारमतवादाचा निर्माता जॉन लॉक ठरला त्याने व्यक्तीचा नैतिक विकास झाला पाहिजे, त्यासाठी राज्याचा वापर केवळ व्यक्तीविकासाचे साधन म्हणून केले पाहिजे असे स्पष्ट केले. लॉकच्या या उपयोगितावादाच्या विचारांचा प्रभाव बेन्थॅम व मिल यांच्यावर पडला. लॉकने मांडलेले व्यक्तीवाद, उपयुक्ततावाद आणि व्यक्तीचे हक्क त्यांचे रक्षण या सर्वांचा विचार करता आजच्या नागरी समाजाच्या चळवळीसाठी हे विचार आजही पूरक असल्याचे दिसते.

### ४.२.१.२ नागरी समाज – राजकीय व आर्थिक व्यवस्था :

जेरेमी बेन्थॅम यांनी राज्य म्हणजे व्यक्तीचा गट असून त्याचा उपयोग व्यक्तीचे सुख मिळविण्यासाठी केला जावा. शासनसंस्था जोपर्यंत व्यक्तीला जास्तीत जास्त सुखी ठेवण्याचा प्रयत्न करते तोपर्यंत तिच्या आज्ञा सर्वसामान्य लोकांच्याकडून पाळल्या जातात. नागरी समाजाच्या दृष्टीने बेन्थॅम यांच्या विचाराचा विचार केल्यास नागरी समाज देखील व्यक्तीच्या जीवनात राज्यव्यवस्थेचा हस्तक्षेप कमीतकमी व्हावा या दृष्टिकोनातून प्रयत्न करतो. ज्यावेळी राज्यव्यवस्था व्यक्तीच्या अधिकारांचे संरक्षण करत नाही, त्यावेळी नागरी समाज त्या राज्यव्यवस्थेशी संघर्ष करण्यासाठी सिद्ध होतो.

**जे. एस्. मिल** यांच्या मते, व्यक्ती सार्वभौम असते. ती शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्वतंत्र असते. त्यामुळेच राज्याने व्यक्तीच्या विकासासाठी व स्वत:च्या हितासाठी व्यक्तीला स्वातंत्र्य बहाल करावे. समाजाने व राज्याने त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. याचबरोबर व्यक्तीने

देखील स्वत:चा विचार न करता स्वत:चे हीत साधत असताना समाजाचे हीत देखील साधावे, याच स्वरूपाच्या विचारसरणीचा पाया नागरी समाजाच्या अस्तित्त्वामध्ये दिसतो. नागरी समाज आपल्या मागण्या सरकारकडे मांडत असताना त्यामध्ये मागण्याचे स्वरूप वैयक्तिक नसून संपूर्ण समाजाच्या हिताकडे राज्यव्यवस्थेचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत असते. नागरी समाजाच्या चळवळीने साध्य झालेल्या गोष्टींचा विचार करता मिलने मान्य केल्याप्रमाणे व्यक्तीच्या वैयक्तिक हक्काबरोबरच समाजाच्या हक्कांचा विचार नागरी समाजाच्या मागण्यामध्ये प्रामुख्याने आढळतो.

**ॲडॅम स्मिथ** यांनी व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी मुक्त व्यापार व व्यक्ती स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. यामुळे आर्थिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप कमी करून खाजगी उद्योगधंद्याना प्रोत्साहन दिले. यामुळे उत्पादनात वाढ होऊन स्पर्धा वाढत जाते व कार्यक्षमता वाढते. राज्याने केवळ विश्वासघात, फसवणूक यापासून व्यक्तीचे संरक्षण करावे. वास्तविक या विचाराप्रमाणे युरोपमध्ये व्यवस्था अस्तित्त्वात आली. मात्र त्यामुळे सामान्य व दुर्बल लोकांना याचा फटका बसला. कारण या व्यवस्थेमुळे केवळ भांडवलदारांचा फायदा झाला व ग्राहकांचे व कामगारांचे शोषण झाले म्हणजेच उदारमतवादी व्यवस्थेचे मूळ तत्त्वज्ञान व्यक्तीच्या हितामध्ये समाजाचे हित सामावलेले असावे त्याला धक्का पोहोचला कारण उद्योगपतींच्याकडून तयार झालेल्या व्यवस्थेत केवळ भांडवलदारांच्या नफ्याचा विचार केला जात असे. परिणामी, पर्यावरण, आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी, कामगारांचे शोषण, व्यक्तीचे हक्क याबाबत अनेक प्रश्न आजच्या व्यवस्थेत निर्माण झाले. नागरी समाज संघटना याच प्रश्नावर प्रामुख्याने आजच्या राजकीय व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करताना आपल्याला दिसतात. सुरवातीच्या काळात हा संघर्ष युरोपमध्ये असलेला जाणवले. ज्या ठिकाणी औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेला संघर्ष भांडवलदार व कामगार या वर्गामध्ये तर त्यानंतर हाच संघर्ष संपूर्ण जगभर निर्माण झालेला आपल्याला दिसतो.

व्यक्तीच्या हक्कांचा व स्वातंत्र्याचा विचार सातत्याने उदारमतवादी विचारसरणीत केलेला दिसतो. ज्यामुळे आजच्या लोकशाही व्यवस्थेत मानवाला लिखित स्वरूपात काही अधिकार व हक्क प्राप्त झाले आहेत. आधुनिक काळातील विचारवंताचा याबाबतीत विचार करताना खालील विचारवंतांचा आपल्याला प्रामुख्याने विचार करावा लागतो.

**टी. एच. ग्रीन** यांनी राज्याची निर्मिती मानवी इच्छेतून झाली, त्यामुळे राज्याने मानवाचा संपूर्ण नैतिक विकास साधावा असे सांगितले. यासाठी व्यक्तिस्वातंत्र्याची निर्मिती करून मानवांच्या हक्कांची जपणूक करावी, कारण यामुळेच सामुदायिक हित व कल्याण साधले जाते. यासाठीच राज्यसंस्थेची निर्मिती झाली. राज्याने व्यक्तींच्या अधिकारांचे संरक्षण करावे. ते करत असताना समाजाच्या हिताचे भान ठेवावे. राज्यशासन ज्यावेळी आपल्या सत्तेचा गैरफायदा घेऊन अन्याय करू लागते, त्यावेळी जनतेला अशा अन्यायी राजसत्तेला प्रतिकार करण्याची सवलत असावी. अर्थातच या प्रतिकारामुळे समाजातील कीती व्यक्तींचे हित साधले जाई, यावर त्या प्रतिकाराला समाजातून किती प्रतिसाद मिळेल हे ठरते.

नागरी समाजाच्या चळवळीत ग्रीन यांचे विचार आपल्याला प्रामुख्याने आढळतात. आजच्या नागरी संघटना समाजाचे व्यापक हित लक्षात घेऊन संघर्ष करीत असतात. त्यामुळेच अशा गैरराजकीय संघटनांना प्रत्येक देशाच्या राजकारण्यामध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. समाजाचे व्यापक हित डोळ्यासमोर न ठेवता केवळ विरोधासाठी म्हणून जर या संघटनांनी विरोध करण्याचे ठरविले, तर मात्र राज्यात अराजकता माजण्याचा धोका असतो.

**आर. एम. मॅकआयव्हर** यांच्या मते, समाजातील विविध प्रकारच्या संघटना समाजात कार्यरत असतात. या संघटनांच्याद्वारे समाजातील विविध प्रकारची कार्ये पार पाडली जातात. राज्य ही अशा प्रकारची एक संघटना असून समाजातील कायदा व सुव्यवस्था, दुर्बलांचे संरक्षण, समाजाचे संरक्षण व संवर्धन करणे ही कार्ये राज्य पार पाडते. म्हणजेच राज्य समाजसेवेचे कार्य पार पाडत असते. मॅकआयव्हर याचबरोबर राज्यसंस्थेबरोबरच समाजातील अनेक संस्थांचे अस्तित्त्व मान्य करतात, कारण केवळ राज्यसंस्थेद्वारे समाजाच्या सर्व गरजा भागविल्या जाऊ शकत नाहीत. कारण लोकमत, नैतिकता, धर्म, लोकरूढी यासारख्या अनेक गोष्टी समाजातील इतर संस्थांच्याकडून पार पाडल्या जातात. यावरूनच आधुनिक काळातील समाजामध्ये होणाऱ्या अन्यायाविरुध्द राज्यसंस्थेचे लक्ष वेधून घेण्यासाठी नागरी समाज संघटनासारख्या संघटना आज आपल्याला दिसतात. उदारमतवादी विचारवंताच्या मूळ विचारसरणीमध्ये नागरी समाजाच्या अस्तित्त्वाचे बीज आपल्याला जाणवते.

**ग्रामसी** यांच्या मते, राज्यसंस्थेत कार्य करणारे शासक अनेक चांगल्यावाईट मार्गांचा वापर करून स्वत:च्या हातामध्ये अधिकार टिकविण्याचा प्रयत्न करीत असतात. यातून सत्ता उपभोगणाऱ्या अल्प गटाचा जन्म होतो. त्यातून आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर भल्याबुऱ्या मार्गांचा वापर करत हे लोक सत्ता उपभोगत असतात. लोकशाही व्यवस्थेत अशा प्रकारचा गट निर्माण होणे, यामुळे सामान्य नागरिकांच्या अधिकार व हक्क यांच्यावर अतिक्रमण होऊ शकते. यामुळेच आजच्या नागरी संघटनेच्या संघर्षाकडे पाहिले असता राज्यात अस्तित्वात असलेला भांडवलशाही वर्ग व राजकर्त्यांचा वर्ग यांच्या विरोधात सर्वसामान्य नागरिकांचे हक्क व अधिकार सुरक्षित ठेवण्यासाठी सातत्याने संघर्ष करताना दिसतात. आधुनिक लोकशाहीमध्ये निर्माण झालेले दोष नष्ट करण्यासाठी सर्वसामान्य नागरिकांच्या गैरराजकीय संघटना आजच्या राज्यकर्त्यांना धोरणांचा फेरविचार करावयास लावतात.

**ग्रॅहम वालास** यांच्या मते, आजच्या लोकशाही व्यवस्थेत निर्माणझालेले दोष वालास यांनी मान्य केलेले आहेत. राज्यकर्त्यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करून मानवाच्या भावनेला देखील किंमत दिली पाहिजे. यासाठी त्यांनी आत्मनियंत्रणाचा मार्ग सुचविला आहे. म्हणजेच व्यक्तीने स्वत:वर नियंत्रण ठेवावे, त्याच्यावर इतर कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही. प्रत्येक व्यक्तीने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. देशातील प्रत्येक नागरिकाला लोकशाहीच्या तत्त्वांचे कार्य करण्याच्या पध्दतीचे ज्ञान असावे, त्यासाठी नागरिकांना मुलभूत पद्धतीचे ज्ञान द्यावे. तसेच लोकप्रतिनिधींनी लोकांच्या भावनांशी खेळू नये. वालास या विचारांच्या विरोधात आज

प्रामुख्याने तिसऱ्या जगातील देशामध्ये राजकीय व्यवस्था दिसते. पुढारलेल्या विकसित देशांमध्येदेखील राज्यकर्त्यांनी लोकांच्या भावनेशी खेळ मांडलेला आहे. परिणामी, अशा व्यवस्थेवर नियंत्रण मिळविण्यासाठीच नागरी समाज संघटना उदयाला आल्या. नागरिकांना नैतिकतेचे राजकीय शिक्षण देऊन त्यांना त्याच्या अधिकाराची व कर्तव्याची जाणीव करून देण्याचे कार्य नागरी समाज संघटनेकडून केले जाते.

### ४.२.१.३ नागरी समाज – राजकीय आर्थिकता :

राजकीय आर्थिकता हा शब्द सामान्यपणे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात वापरण्यात येऊ लागला. राष्ट्रराज्य व्यवस्थेच्या निर्मितीनंतर देशाच्या आर्थिक स्वावलंबनाला खूपच महत्त्व प्राप्त झाले. त्यामधून उत्पादन व्यापार, कायदेशीर संबंध, प्रथा, शासनव्यवस्था तसेच राष्ट्रीय उत्पन्न व संपत्ती यांचे देशातील वाटप यांचा विचार होऊ लागला, त्यामधूनच नैतिक तत्त्वज्ञानाचा पाया असलेली राजकीय आर्थिकता ही संकल्पना जन्मास आली. १८९० मध्ये आल्फ्रेड मार्शल यांनी राजकीय आर्थिकता या शब्दाचा प्रथम वापर केला. आज मात्र शिकागो स्कूल व व्हर्जीनिया स्कूलमध्ये व्यवहारात उपयोगी पडणाऱ्या आर्थिक सूचना शासनाला केल्या जातात, त्यामधून लोकहिताचे आर्थिक नियोजन ठरविताना शासनव्यवस्थेला सोईचे होते. आर्थिक नियोजन करत असताना समाजातील विविध राजकीय शक्ती त्याला प्रभावीत करत असतात. यावरूनच शासनाकडून घेतल्या जाणाऱ्या लोकप्रिय आर्थिक निर्णयामुळे मतदानाच्या प्रक्रियेवर परिणाम होतो. अशाप्रकारे राजकीय व्यवस्थेमध्ये घेतले जाणारे आर्थिक निर्णय शासन व्यवस्थेची निर्मिती किंवा शासन व्यवस्था स्थिर करण्यास मदत करते. तसेच समाजामध्ये व्यक्तीची उत्पादन क्षमता व वापर करण्याची क्षमता शासनव्यवस्थेकडून ठरविली जाते. मुख्यत: ही आर्थिक स्वरूपाची असते, त्यामुळे राजकीय अस्थिरतेचे अस्तित्व आपल्याला सातत्याने जाणवते.

नागरी समाजाचा प्रामुख्याने विचार करताना सामाजिक संबंधाचा विचार करणे गरजेचे ठरते. वस्तूंचे उत्पादन, वितरण, विनिमय आणि वापर याची समाजामध्ये कशी व्यवस्था आहे याचा अभ्यास राजकीय आर्थिकतेमध्ये केला जातो. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये प्रामुख्याने कोणतीही शासनव्यवस्था यावरच अवलंबून असते. कारण भांडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये सरकारचे आर्थिक नियोजन हाच व्यवस्थेचा खरा पाया असतो. लोकप्रतिनिधी खाजगी मालमत्ता, खाजगी कारखानदारी, त्याची उत्पादकता, खर्च व नफा यामध्ये ताळमेळ घालून आपल्या राजकीय सत्तेला सुस्थिरपणा कसा आणता येईल यासाठी प्रयत्न करत असतात. संपत्तीचा मुख्य प्रवाह म्हणजे व्यापार आणि साधनांची देवाण–घेवाण असते. शासनव्यवस्था आपल्या आर्थिक नियोजनाद्वारे त्याला संरक्षण व्यवस्था प्रदान करत असते. मध्यमवर्गीय लोक प्रतिनिधींना निवडून देऊन त्या शासनव्यवस्थेमध्ये आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करत असते. मार्क्सवादी विचारवंताच्या मते, कामगार क्रांतीद्वारे निर्माण

झालेली साम्यवादी व्यवस्था आर्थिक समतेवर आधारलेली असते, त्यामुळे हे राजकीय स्थित्यंतर राजकीय आर्थिकतेचा भाग आहे. कामगाराच्या मूल्याचा सिद्धांताला विरोध करत भांडवलशाही व्यवस्थेने कामगार, भांडवल व जमीन या तीन गोष्टींना मूल्य मानले.

भांडवलशाहीचे रूपांतर साम्राज्यवादात झाल्यानंतर अनेक प्रश्न निर्माण झाले. त्यातूनच मध्यमवर्गीयाच्या आर्थिक स्थितीमध्ये खोलवर परिणाम झाले. त्याचा जगभरातील राजकीय आर्थिकतेवर परिणाम झाला. भांडवलशाही विचारवंताच्या मते, यामुळे जगात अर्थव्यवस्थेला स्थिरता आली हे स्पष्टपणे दिसते. यामधूनच मुक्त आर्थिक स्पर्धा कमी झाली व राज्याची एकाधिकारशाही आर्थिक धोरणे ठरविण्यामध्ये सुरू झाली. या मोकळ्या स्पर्धेत उत्पादनाच्या शक्ती टिकू शकल्या नाहीत. म्हणूनच नियंत्रित भांडवलशाही सुरू झाली, याला अर्थातच राजकीय व्यवस्थेने नियंत्रित केले. हा एक नवीन प्रवाह जागतिक व्यवस्थेत निर्माण झाला.

यानंतर राजकीय आर्थिकता खूप मोठ्या संघर्षामध्ये रूपांतरित झाली. यामधून आर्थिकतेला आधार मानून जगामध्ये दोन व्यवस्था निर्माण झाल्या. त्यामध्ये समाजवादी अर्थव्यवस्था व भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाल्या. या व्यवस्था निर्माण झाल्यानंतर संपूर्ण जगातील नागरी समाज वेगवेगळ्या विभागात विभागला गेला. आर्थिक व्यवस्थेच्या निकषावर नागरी समाजाची विभागणी झाली. मात्र भारतासारख्या काही देशांनी भांडवलशाही व समाजवादी अशा दोन्ही व्यवस्थांची संकल्पना आपल्या देशात अंमलात आणली, त्यामुळे मिश्र अर्थव्यवस्था असणारी भारतात राजकीय आर्थिकता निर्माण झाली. अर्थातच ही दोन्ही प्रारुपे नागरी समाजाच्या विकासासाठी अंमलात आणली गेली. समाजवादी विचारसरणीच्या देशामधून वैज्ञानिक व तंत्रज्ञान विषयक क्रांती घडून आली. तसेच मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उभे केले. अशाच प्रकारचा विकास भांडवलशाही देशामधून झाला. परंतु यामधून काही प्रमाणात साम्राज्यवादी शोषण करणाऱ्या प्रवृत्ती निर्माण झाल्या. मात्र त्याला विरोध समाजवादी धोरणाने केल्यामुळे नागरी समाजाचे होणारे आर्थिक शोषण बंद करण्यात काही प्रमाणात यश आले. मात्र भांडवलशाही देशामधून मूलगामी राजकीय आर्थिकता निर्माण झाली. भारतासारख्या विकसनशील देशामध्ये राजकीय आर्थिकता महत्त्वाची ठरते. कारण भारतामध्ये व्यापार, गरजा, वस्तूंची उत्पादकता यामध्ये आपल्याला वैविध्य असल्याचे दिसते. त्यामुळे प्रत्येक विभागाच्या गरजा विविध आहेत. अशामधून नागरी समाज आपल्याला आवश्यक असणारे सरकार निवडणूकीच्या माध्यमातून सत्तेवर आणण्याचा प्रयत्न करते. म्हणून राजकीय शासनव्यवस्था या देशातील पायाभूत असणाऱ्या नागरिकांना मूलभूत गरजा कशा उपलब्ध करून देता येतील, याकडे प्रामुख्याने लक्ष देतो. यावरूनच भारतामधील राजकीय आर्थिकता स्पष्ट होते.

राजकीय आर्थिकता उत्पादनातील संबंध स्पष्ट करते. त्यामध्ये उत्पादनातील शक्ती, नागरी समाजातील प्रस्थापित व्यवस्था स्पष्ट करते. म्हणजेच त्या व्यवस्थेमध्ये असणारे कारखाने, खाजगी मालमत्ता यांचे वितरण कशा स्वरूपात झालेले आहे. यामध्ये जागतिक अर्थव्यवस्थेचे प्रश्न, उत्पादनामध्ये

असणारे संबंध, जागतिक कामगाराचे वितरण, जगातील देशामध्ये असणारे आर्थिक व राजकीय संबंध, दोन देशामध्ये चाललेली आर्थिक स्पर्धा, जागतिक आर्थिक सहकार्याचे संबंध, वेगवेगळ्या शासकीय व्यवस्था असणाऱ्या देशामध्ये असणारे आर्थिक संबंध, या देशामध्ये असणाऱ्या आर्थिक संबंधांचे भवितव्य, जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये असणाऱ्या आर्थिक संबंधांची व आर्थिक कायद्यांची अंमलबजावणी, विविध देशामध्ये निर्माण होणाऱ्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक तेथील राजकीय अर्थव्यवस्थेकडून कशा प्रकारे केली जाते. या सर्वांचा अभ्यास राजकीय आर्थिकतेमध्ये केला जातो.

नागरी समाजातील नागरिकांचे संबंध उत्पादनाशी जवळचे असतात. कारण त्यांच्या मागणीवरून समाजात उत्पादनाद्वारे पुरवठा केला जातो. राजकीय आर्थिकतेद्वारे समाजातील नागरिकांना श्रीमंत व गरीब यांच्यातील संघर्ष समजून येतो. त्यामुळे राजकीय आर्थिकता हे समाजातील आदर्श शास्त्र आहे.

आधुनिक जागतिक व्यवस्थेमध्ये, अनेक राष्ट्रांची निर्मिती झाली. विचार, तत्त्वज्ञान, धर्म, भाषा या तत्त्वावर आधारित जरी राष्ट्रांची निर्मिती झाली असली तरी त्या देशांमधील शासनकर्त्यांना निर्णय घेताना त्या देशातील आर्थिक स्थिती नियंत्रीत करत असते. आधुनिक काळात विविध देश एकेमकांशी मैत्री करून संबंध प्रस्थापित करत असतात. त्यामध्ये प्रामुख्याने देशासाठी आवश्यक असणाऱ्या गरजांची पूर्तता इतर देशांशी संबंध ठेवताना शासक करताना दिसतात. अनेक नैसर्गिक आपत्ती त्यातून त्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर येणारा ताण यामधून त्यांच्याकडून घेतले जाणारे निर्णय यामुळे राजकीय व्यवस्थेतील निर्णय आर्थिक परिस्थितीतून नियंत्रीत केले जातात. शासनाच्या नियंत्रीत केल्या जाणाऱ्या निर्णयामधूनच राजकीय आर्थिकता स्पष्ट होते. त्याचप्रमाणे देशाची अर्थव्यवस्था सदृढ राहण्यासाठी शासकाकडून व्यापार, उद्योगधंदे, वस्तूंवरील नियंत्रण या सर्वांसाठी काळजीपूर्वक निर्णय घेतले जातात. यामध्ये राजकीय शासनव्यवस्थेचे अनन्यसाधारण महत्त्व असते. कारण सरकारला यामधून विविध करांचे उत्पादन मिळत असते. देशातील जनतेच्या गरजा भागविल्या जातात. अनेक आर्थिक संस्थांची निर्मिती करून त्यासाठी शासनव्यवस्था सर्व प्रकारची मदत करत असते. सरकारकडून घेतले जाणाऱ्या या आर्थिक निर्णयांना किंवा सरकारच्या निर्णय प्रक्रियेला प्रभावित करणारी आर्थिक परिस्थिती यालाच राजकीय आर्थिकता असे म्हणतात.

### ४.२.२ नागरी समाज – जॉन लॉक :

आजच्या नागरी समाजाच्या भूमिकेमध्ये विचार करत असताना नागरी समाजाला मिळणारी स्वातंत्र्य, अधिकार याचा उगम आपल्याला इंग्लंडच्या लोकशाहीच्या निर्मितीच्या सुरवातीस दिसतो. प्रस्थापित अन्यायी व जुलमी राजसत्तेच्या विरोधात संघटित झालेले नागरिक व त्यांनी भूतकाळात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून भविष्यकाळात कशा स्वरूपाची राज्यव्यवस्था असावी हे स्पष्ट केले. अशा नागरिकांना दिशा दाखविण्याचे कार्य काही राज्यशास्त्रज्ञांनी केले, त्यापैकी जॉन लॉक हे महत्त्वाचे विचारवंत होते. त्यांनी १६८८ ची वैभवशाली राज्यक्रांती स्वत: अनुभवल्यामुळे लोकशाही

व्यवस्थेमध्ये झालेली स्थित्यंतरे त्यांनी बारकाईने पाहिली होती. या सर्व बाबींमधून त्यांची स्वत:ची, वैयक्तिक मते तयार झाली. सुरवातीस इंग्लंडमध्ये झालेल्या सनदशीर क्रांतीचे त्यांनी प्रभावी समर्थन केले.

लॉकने 'नागरी सत्तेचे दोन करार' या ग्रंथामध्ये नियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला. अर्थातच या राजेशाहीवर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण त्यांनी मान्य केले. राजाने राज्यकारभार करत असताना लोकमतानुसार करावा. ज्यावेळी राजा जनतेच्या अधिकारांच्या विरोधात काम करेल त्यावेळी या राजाला पदच्युत करण्याचा अधिकार जनतेला असेल, म्हणजेच त्या काळापासून आजपर्यंत अन्यायी व्यवस्थेच्या विरुध्द जनतेला संघटित होऊन विरोध करण्याचे स्वातंत्र्य बहाल करण्यात आले होते. आजच्या नागरी समाजाची भूमिका देखील प्रस्थापित राजकीय व्यवस्था योग्य प्रकारे नागरिकांच्यासाठी कायदे करत नसतील अशा चुकीच्या कायद्याविरोधात गैर राजकीय संघटना आवाज उठविताना दिसतात.

लॉकच्या मते, नवनिर्मित राज्यसंस्था समाजाच्या व्यापक हिताचा विचार करून कार्य करीत असते. यामध्ये अंतिम सत्ता कायदेमंडळाकडे असते. अशा सत्तेची अंमलबजावणी करत असताना कार्यकारी मंडळ, कायदेमंडळास जबाबदार राहून कार्य करते. त्यांनी निर्माण केलेले कायदे समाजाच्या इच्छेप्रमाणे असल्यामुळे आपोआपच समाजाकडून त्याचे पालन होते. अशा समाजाभिमुख कायदेमंडळाचा कारभार आपल्या अधिकार क्षेत्राच्या बाहेर जाईल किंवा यामध्ये लोकमताचा आदर होणार नाही अशावेळी सर्वसामान्य नागरिक अशा व्यवस्थेला विरोध करतील. कार्यकारी मंडळाने कार्य करताना गरीब-श्रीमंत यांच्यासाठी समान काम केले पाहिजे. यामध्ये कोणताही भेद न करता समाजाचे हित पाहिले पाहिजे. लोकांच्या संमत्तीशिवाय केलेल्या कायद्याचे लोकांच्याकडून पालन होत नाही. परिणामी, अशा सत्तेविरुध्द नागरी समाजाचे संघटन होते.

लॉकच्या मते, निसर्गावस्थेतून मानव नागरी समाजात प्रवेश करतो तो केवळ आपल्या संपत्तीचे संरक्षण व्हावे व तिचा उपभोग स्वत:ला व्यवस्थितपणे घेता यावा यासाठी त्यामुळे अशी शांततापूर्ण व्यवस्था समाजात सातत्याने रहावी यासाठी कायदे मंडळ व कार्यकारी मंडळाने कार्यरत रहावे. कायदे मंडळाच्या या सत्तेचे हस्तांतरण होताना नागरी समाजाच्या हक्कांचा विचार व्हावा अन्यथा अशी व्यवस्था हुकूमशाही व्यक्तीच्या हाती गेल्यास व्यक्तीच्या व नागरी समाजाच्या हक्कांवर गदा येते. अशा स्थितीत राज्यव्यवस्थेला नागरिकांच्या वैयक्तिक जीवनात ढवळाढवळ करण्याचा अधिकार नसावेत. केवळ समाजाचे कल्याण करण्याइतपत त्यांना अधिकार असावेत. नागरिकांना निर्धन करणे, गुलाम बनविणे, त्यांच्या जिवितास धोका निर्माण करणे यामुळे नागरिकांचा प्रस्थापित राज्यसंस्थेवरचा विश्वास उडतो.

नागरी समाजाची निर्मिती होत असताना नागरिकांना आपल्या मालमत्तेचे संरक्षण व्हावे ही

अपेक्षा असते. राजसत्तेने कायद्याने मालमत्ता व्यक्तीकडून काढून घ्यावी हे लॉकला मान्य नाही. राज्य चालविण्यासाठी पैसा लागतो व आपणास मिळणाऱ्या संरक्षणाच्या मोबदल्यात ते चालविण्यासाठी नागरिकांनी त्या संरक्षित मालमत्तेचा काही भाग राज्यसंस्थेकडे द्यावा हे लॉकला मान्य आहे. कारण यामुळेच राज्यसंस्थेला नागरी समाजाचे अधिकार सुरक्षित ठेवणे सोपे जाते. याचबरोबर नागरी समाजाने कायदे करण्यासाठी सत्ता कायदे मंडळाला दिलेली असून ही सत्ता इतर कोणत्याही व्यक्तीच्या हाती सुपूर्त करता येणार नाही. त्यामुळे कायदा करणारी व्यक्ती त्या सत्तेचा दुरुपयोग करून स्वत:च्या फायद्यासाठी कायदे करील व नागरी समाजाचे कल्याण होऊ शकणार नाही. थोडक्यात, लॉकच्या मते, नागरी समाज सत्तानिर्मितीचा प्रमुख स्रोत असून समाजाच्या कल्याणासाठी त्याचा वापर व्हावा असे सांगितले आहे. मात्र राजकीय सत्तेकडून नागरी समाजाच्या अधिकारावर अतिक्रमण झाल्यास नागरी समाज वा शासन व्यवस्थेच्याविरुध्द क्रांती करू शकतो व त्याद्वारे नागरी समाज दुसरी कायदे करणारी व्यवस्था निर्माण करू शकतो. त्याच्याद्वारे नागरी समाजाचे अस्तित्त्व टिकून राहते. नागरी समाज परत कधीही निसर्गावस्थेकडे जात नाही. राज्यव्यवस्था राज्य चालविण्यास अपयशी ठरली तरी त्यामुळे नागरी समाजाचे काही प्रमाणात नुकसान होते. मात्र नागरी समाज अशी कायदेमंडळाची स्थिती बदलून नवीन कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ यासारखी व्यवस्था निर्माण करू शकतात व त्यामधून अन्यायी कायदे दूर करून सुसंघटित नागरी समाजाचे स्वप्न साकार होते.

आजच्या व्यवस्थेत नागरी समाजाकडून लॉकने सांगितलेल्या व्यवस्थेप्रमाणेच कार्यरत असताना दिसते. कायदेमंडळ, कार्यकारी मंडळाकडून केले जाणारे कायदे जनतेच्या फायद्यासाठी असतील तर जनता त्याचे पालन करते, परंतु तेच कायदे मूठभर लोकांच्या फायद्यासाठी असतील व त्याचा त्रास नागरी समाजातील बहुसंख्यांकांना होत असेल तर नागरिक रस्त्यावर उतरून अशा कायद्याचा विरोध करतात, यासाठी गैर राजकीय संघटना प्रामुख्याने पुढे असतात. लोकशाही व्यवस्थेमध्ये अशा नागरिकांच्या संघटनांच्याकडून आलेल्या मागणीचा प्रामुख्याने विचार होतो, कारण त्या नागरी समाजाचे प्रतिनिधीत्व करत असतात. त्याच्या सनदशीर मार्गाने सुरू असलेला विरोध राज्यव्यवस्था लक्षात घेऊन लोकमागणीप्रमाणे कायद्यात बदल किंवा संपूर्ण कायदा बदल करतात. ज्या राज्यव्यवस्थेत मात्र लोकशाही व्यवस्था नाही त्या ठिकाणी अशा नागरी समाजाच्या संघटनांना काम करताना त्रास होतो, कारण नागरी समाजाच्या मागणीसाठी सुरू असलेला राज्यव्यवस्थेशी संघर्ष रक्तपाताचे कारण ठरतो. परिणामी, शासनव्यवस्थेकडून दमनशाही, दडपशाही याचा वापर नागरी समाजव्यवस्थेविरुध्द झाल्याचे दिसून येते.

### ४.२.३ नागरी समाज– हेगेल (१७७०–१८३४) :

इसवी सन १७७० मध्ये जर्मनीतील स्टुटगार्ड या ठिकाणी हेगेल यांचा जन्म झाला. त्यांनी सुरवातीस तत्त्वज्ञान व अभिजात साहित्याचा अभ्यास केला, त्यानंतर त्यांनी राज्यशास्त्र व अर्थशास्त्राचा

अभ्यास केला. १८१६ मध्ये त्यांनी हायडेलबर्ग व पुढे बर्लीन विद्यापीठात तत्त्वज्ञानाचा प्राध्यापक म्हणून काम केले. यावेळी त्यांनी 'कॉन्स्टिट्युशन ऑफ जर्मनी, फिलॉसॉफी ऑफ हिस्ट्री, फिलॉसॉफी ऑफ राईट, लॉजीक इन्सायक्लोपिडीया ऑफ फिलॉसॉफिकल सायन्सेस, फेनॉमेनॉलॉजी ऑफ स्पिरीट अशा स्वरूपाची ग्रंथसंपदा निर्माण केली.

हेगेल यांच्या तत्त्वज्ञानावर प्लेटो, ॲरिस्टॉटल, व्हिको, माँटेस्क्यू, कांट व फित्से या विचारवंतांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. हेगेलच्या विचारांचा गाभा म्हणजे 'विकासाची संकल्पना' होय. विकास होत असताना तो विचाराचा होत असतो. तो विरोध विकास पध्दतीने होतो. हेगेलने आपल्या विचारामध्ये राष्ट्रराज्यव्यवस्थेवर भर दिला आहे. याउलट कांटने आपल्या विचारामध्ये आंतरराष्ट्रीय चिरशांतीवर भर दिला आहे. हेगेलने राष्ट्राच्या अस्तित्त्वावर व विकासावर जास्त भर दिल्याचे आपल्याला दिसून येईल. नागरी समाजाच्या दृष्टिकोनातून विचार करत असताना आजच्या व्यवस्थेमध्ये व्यक्तीच्या स्वातंत्र्यांना व इच्छेला जास्त महत्त्व दिले आहे. मात्र हेगेल यांनी व्यक्तीच्या इच्छे पेक्षासुध्दा राष्ट्रराज्याला जास्त महत्त्व दिले आहे. त्यांनी हे विचार मांडत असताना विरोध विकासाच्या तत्त्वज्ञानाचा स्विकार केला आहे. त्याच्या मते, समाज मानवी कल्याणासाठी अस्तित्वात येतो. पण प्रत्येक परिस्थितीमध्ये समाजात काही वाईट प्रवृत्ती जन्म घेतात. ती सातत्याने वाढत असतात. ती पूर्णपणे विकसित झाले की, प्रस्थापित समाज व्यवस्था व त्या वाईट प्रवृत्ती यामध्ये संघर्ष निर्माण होतो व त्यातून नवसमाजाची निर्मिती होते व वाईट प्रवृत्ती बाजूला केल्या जातात. हा नवसमाज जुन्या समाजापेक्षा अधिक प्रगत, अधिक विकसित असतो. या सर्व प्रक्रियेला गती असते. त्या खंडातील चैतन्यामधून ती प्राप्त होते. निर्जीव वस्तू म्हणजे कार्यासाठी प्रवृत्त करणाऱ्या वस्तूमध्ये ते प्राप्त होते. त्यानंतर ते सजीवांच्या मध्ये येते. मानवाच्या विचाराला चालना यामुळेच प्राप्त होते. यामध्ये मानवी मनामध्ये स्वातंत्र्य, जाणिवा, देशाचा इतिहास, धर्म, कला, तत्त्वज्ञान, मानवी संघटना, कायदे यांचा समावेश होतो. या सर्वांमधून मानवी मनामध्ये चैतन्याचा व विचारशक्तीचा विकास होऊन त्याचे प्रत्यक्ष रूप म्हणून राज्याचा आविष्कार होतो. अशाप्रकारे हेगेल यांच्या मते, मानवी मनातून राज्याचा आविष्कार होतो.

या सर्वांचा विचार करता हेगेलने मात्र राजेशाहीचा पुरस्कार केला. त्याने व्यक्तीचे स्वतंत्र अस्तित्त्व मान्य केले नाही. वास्तविक लोकशाहीमध्ये राज्यसंस्था हे साधन मानले जाते व लोकांचे हित हे साध्य मानले जाते. मात्र हेगेलने राज्यसंस्था हे साध्य असल्याचे सांगितले. व्यक्तीने राज्य बलशाली बनवावे, कारण राज्याची सत्ता सर्वश्रेष्ठ व निरंकुश असते. मानवाने राज्य निर्माण केले असले तरी राज्य नैसर्गिक असून मानवी इतिहासामध्ये अपरिहार्य घटना आहे. यामुळेच हेगेलने व्यक्तीच्या स्वातंत्र्यापेक्षा व्यक्तीच्या जीवनावर राज्याचा पूर्ण अधिकार असल्याचे मानले. आधुनिक काळात हा विचार नकोसा वाटत असला तरी हेगेलने या विचाराचे समर्थनच केले आहे. हेगेलने

मानवाच्या विकासाचा अभ्यास 'द्वंद्वात्मक विकासाच्या' पद्धतीने केला आहे. त्याच्या मते, कोणत्याही वस्तूतील वस्तुस्थिती त्या वस्तूच्या प्रतिकूल किंवा उलट वस्तूशी तुलना करून समजते. उदा. समाजात वाईट व्यक्ती असतात म्हणून चांगल्या व्यक्तीची किंमत असते. तो सुरवातीच्या गोष्टीस वाद मानतो, तर दुसरीला प्रतिवाद मानतो. प्रगतीसाठी विरोध होत असतो. वादाला प्रतिवाद निर्माण होतो. त्यातून सुसंवाद निर्माण होतो.

मानवाच्या जीवनात कुटुंब अवस्था ही सुरवातीस येते. त्यानंतर आर्थिक जीवन ही दुसरी अवस्था व राजकीय जीवन ही तिसरी अवस्था असते. यावरून हेगेलने राज्य हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मानले. राज्याचे आदेश म्हणजे परमेश्वराचे आदेश मानून व्यक्तीने त्याचे पालन केले पाहिजे. त्यामध्ये व्यक्तीचे हित असते. व्यक्तीने त्या कायद्याचे स्वत:हून पालन केले पाहिजे. कायद्याने पालन करण्याची सक्ती करू नये. हेगेलच्या मते, राज्य ही निर्जिव वस्तू नसून त्यामध्ये आत्मा असतो. नागरिकांच्यामध्ये असणारी एकतेची जाणवी म्हणजे राज्याचा आत्मा असतो. राज्यामध्ये नागरिकांचे स्वतंत्र अस्तित्व नसते ते राज्याच्या जीवनाशी एकरूप झालेले असते. कारण व्यक्तीच्या भावना, इच्छा, आकांक्षा राज्यामध्येच असतात. त्यामुळे राज्याच्या आज्ञा म्हणजे व्यक्तीच्या इच्छा असतात. यामुळे व्यक्तीला स्वतंत्रपणे व्यक्ती स्वातंत्र्याची गरज नसते. व्यक्ती जितक्या प्रमाणात राज्याशी समरूप होईल, तितक्या प्रमाणात व्यक्तीचा विकास होईल, यामध्ये व्यक्तीच्या वैयक्तिक इच्छेपेक्षा राज्याच्या आशेला जास्त महत्त्व हेगेलने दिले आहे. त्यामुळे व्यक्तीला राज्याला विरोध करण्याचा अधिकारसुध्दा हेगेलला मान्य नाही. यामुळे हेगेलने व्यक्तीस्वातंत्र्याची संकल्पना अमान्य केली आहे.

हेगेलच्या मते, कुटुंबाच्या ऐक्यातून नागरी समाजाची निर्मिती होते. मानवी कुटुंबामध्ये नैतिकता असते. अशी अनेक कुटुंबे एकत्रित येतात. त्यामध्ये एकात्मता निर्माण होते. व्यक्तीला केवळ कुटुंबासाठी अर्थप्राप्ती करून किंवा कुटुंबाचा प्रमुख म्हणून समाधान प्राप्त होत नाही. त्यासाठी व्यक्ती समूहामध्ये राहणे पसंत करतो. समाजात अशा समूहाची संख्या वाढते व त्यातून नागरी समाजाची निर्मिती होते. अशा नागरी समाजातील नागरिकांच्या गरजा पूर्ण होण्यासाठी आर्थिक संरचना निर्माण होऊन कायद्याची निर्मिती केली जाते. अशा कायद्याची अंमलबजावणी केल्यामुळे नागरी समाजात आर्थिक स्थैर्य प्राप्त होते.

हेगेलने राज्य व नागरी समाजामध्ये फरक केलेला आहे, त्याने नागरी समाजाच्या तीन अवस्था सांगितल्या आहेत. (१) न्यायप्रशासन (२) पोलीस (३) अन्य संस्था. त्यांच्या मते, नागरी समाजाचे अस्तित्व राज्यावर अवलंबून असते, कारण राज्याशिवाय नागरी समाज टिकू शकत नाही. राज्यसंस्थेमध्ये पोलीस व न्याय या दोन गोष्टी महत्त्वाच्या असतात, कारण राज्याशिवाय न्याय, पोलीस व इतर संस्थांना अर्थ उरत नाही. नागरी समाजात व्यक्तीचा स्वतंत्र समूह असतो. व्यक्ती राज्यासाठी कार्य

करते. नागरी समाजात वावरताना इतर घटकांच्या सहाय्याने आपले ध्येय व्यक्ती साध्य करते. व्यक्तीच्या असणाऱ्या गरजांमुळे व्यक्ती समाजात एकमेकांशी जुळलेली असते. यामधूनच समाजात व्यापार व उद्योगाचे कार्य केले जाते. नागरी समाज म्हणजे समाजाला व्यक्तीचा समूह मानले जाते. ते राज्याचे स्वरूप असते. गरजेप्रमाणे प्रत्येक व्यक्ती एकमेकाला बांधलेली असते. राज्यामध्ये व्यक्तीचे व्यक्तीगत अस्तित्व लोप पावून व्यक्ती केवळ राज्यासाठी कार्य करते. यामध्ये व्यक्तीच्या स्वार्थाची भावना नसते. संपूर्ण समाजाच्या कल्याणसाठी कार्य करीत असते. यावरूनच राज्य व नागरी समाजाचा संबंध एकेमकांशी काही वेळेला विरोधाचा तर काही वेळेला परस्परावर अवलंबून असतो.

◆ **राज्य व नागरी समाज यांतील संबंध :–**

सबाईनच्या मते, 'हेगेलचे राज्य म्हणजे अशी उपयोगी संस्था नव्हे की, जी सार्वजनिक सेवा कायद्याची अंमलबजावणी, पोलीस, औद्योगिक व आर्थिक हितसंबंध यामध्ये सामंजस्य निर्माण करेल. राज्य गरजेनुसार मार्गदर्शन करून नियंत्रण करेल. नागरी समाज नैतिकता व योग्य निरीक्षणासाठी राज्यावर अवलंबून असते. तसेच नैतिकतेच्या अंमलबजावणीच्या समाधानासाठी राज्य नागरी समाजावर अवलंबून असते. राज्य व नागरी समाज अशाप्रकारे एकमेकावर अवलंबून असले तरी त्याच्यामध्ये भिन्नता आहे. राज्य हे साधन नसून साध्य आहे. हेगेलने राज्य हे साध्य मानले तरी नागरी समाजाला देखील त्याने महत्त्व दिले आहे. मात्र राज्य श्रेष्ठ असून नागरी समाज कनिष्ठ मानला आहे. सांस्कृतीक कार्यासाठी राज्य समाजावर अवलंबून असते. त्यांच्या मते, संपूर्ण समाजाला दिशा दाखविण्याचे कार्य राज्य करत असते. राज्याविना समाज दिशाहीन असतो. व्यक्तीच्यामुळे केवळ राज्याची निर्मिती होत नाही तर व्यक्ती वेगवेगळ्या संस्थांचा सदस्य असतो त्यामुळे त्याला राज्याचे नागरिकत्व प्राप्त होते.

प्रा. स्टेस यांच्या मते, नागरी समाजात व्यक्ती स्वत:चे हित पहात असते तर राज्याचे ध्येय व हित उच्च असतात. व्यक्ती त्यासाठीच कार्यरत असते. अशा प्रकारे त्यांनी राज्य व नागरी समाज यातील अंतर स्पष्ट केले. हेगेलने स्पष्ट केले आहे की, नागरी समाजाला पूर्णत्व व यश केवळ राज्यातच प्राप्त होते, कारण राज्य ब्रम्हाचे विकसीत स्वरूप आहे. नागरी समाजाने जनसंस्थेद्वारे राज्याचे प्रतिनिधीत्व न करता समाजातील महत्वाची क्षेत्रे व व्यावसायिक संघटना यांचे प्रतिनिधीत्व करावे, कारण नागरी समाज राज्यातच विलीन होतो व विधीमंडळाद्वारे नागरी समाजातील वेगवेगळ्या संस्था एकत्र येतात.

◆ **हेगेलच्या नागरी समाजाबाबतच्या विचारावर टीका :–**

**मॅकगव्हर्न** यांच्या मते, हेगेलने राज्याला साध्य मानून व्यक्तीला साधन मानले. प्रत्यक्षात मात्र व्यक्तीच्या विकासासाठी व कल्याणासाठी राज्य साधन मानून वापरले जाते.

**हॉबहाऊस** यांच्या मते, आदर्शवादी राज्याला एक महान नर प्राणी, एक आत्मा, एक

अभिव्यक्ती सत्ता मानतात. ज्यामध्ये व्यक्तीची हक्क, कर्तव्ये, सुख-दुःखे ही सर्वच पराधीत तत्त्वे बनतात.

हेगेलची राज्यविषयक कल्पना व्यक्ती स्वातंत्र्याला मारक ठरते. त्याच्या सर्वकष राज्याच्या कल्पनेतून फॅसीझम व नाझीझमसारखे तत्वज्ञान जन्माला आले. जगामध्ये प्रत्येक राज्य सर्वंकष व सर्व शक्तीमान मानले तर परस्पर सहकार्याची भावना नष्ट होऊन अशांतता पसरेल. हेगेलने राष्ट्रासंबंधीच्या इतर बाबींकडे दुर्लक्ष करून सर्वंकष राज्य संस्था व राष्ट्राची परंपरा यावर भर दिला. परिणामी राज्यामध्ये व्यक्ती स्वातंत्र्याचा अभाव निर्माण झाला.

### ४.२.४ नागरी समाज- कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) :

कार्ल मार्क्सचा जन्म ५ एप्रिल १८१८ रोजी प्रशिया (जर्मनी) मध्ये एका ज्यू कुटुंबात झाला. त्याच्या वडीलांनी १८२४ मध्ये ख्रिश्चन धर्म स्विकारला. मार्क्स वृत्तीने स्वतंत्र, आग्रही व बुद्धीनिष्ठ असून त्याच्याकडे दुर्दम्य आत्मविश्वास होता. त्यांनी बर्लीन विद्यापीठातत तत्वज्ञान, इतिहास व साहित्य याचा अभ्यास केला. यानंतर त्याचा बायबलवर टिका करणाऱ्या विद्यार्थ्यांशी, फ्रेंच समाजवाद्यांशी व जर्मनीतील गुप्त संघाशी संबंध आला. १८४४ मध्ये त्यांची ओळख एंगल्स यांच्याशी झाली. त्यांनी कुटुंबसंस्थेवर फॉयरबॉकच्या तत्वज्ञानावर व साम्यवादावर देखील टिका केली. मार्क्सने स्वित्झर्लंड,.फ्रान्स, बेल्जियम व शेवटी इंग्लंड असे देशाटन केले. आयुष्याची शेवटची ३४ वर्षे इंग्लंडमध्ये त्यांनी घालविली. १८६७ मध्ये त्यांनी 'दास कॅपीटल' या ग्रंथाचे प्रकाशन केले, त्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागाचे अनुक्रमे १८९३ व १८९४ साली प्रकाशन झाले, परंतु तत्पूर्वीच त्यांचे १८८३ साली निधन झाले.

कार्ल मार्क्सने वर्गसंघर्षाचा इतिहास मांडत असताना नागरी समाज व त्या समाजाचे शोषण करण्याची भांडवलशाही वृत्ती यांच्यामधील संघर्ष मांडला आहे. समाजात भांडवलदाराकडून शोषण होताना कामगारांचे वस्तूचे उत्पादन करताना खूप मोठा सहभाग असतो. कामगारांच्या श्रमामुळेच वस्तूला किंमत प्राप्त होते. वस्तूचे मूल्य म्हणजे समाजातील स्थिर स्वरूपाचे रूपांतर असते. याला मार्क्सचा श्रममूल्य सिद्धांत असे म्हणतात. यावरूनच मार्क्सने पुढे अतिरिक्त मूल्य सिद्धांत मांडला. वस्तू निर्माण करताना कामगाराचे श्रम खर्च होते, त्यामुळे वस्तूला किंमत प्राप्त होते. त्याच्या मते, ते मूल्य कामगाराना मिळाले पाहिजे, पण प्रत्यक्षात त्यापैकी खूपच कमी मूल्य कामगाराच्या वाट्यास येते. वस्तूची किंमत वसूल झाल्यावर त्यातील महत्त्वाचा वाटा भांडवलदाराकडे जातो. त्यामुळे कष्ट करणाऱ्या कामगाराचे हाल होते. कामगाराच्या श्रमामुळे निर्माण झालेले मूल्य व त्याला मिळणारा अत्यंत अल्प वाटा यामधील फरकास मार्क्सने 'अतिरिक्त मूल्य' असे म्हटले आहे. भांडवलदार कामगारांचे शोषण करून जास्तीत जास्त अतिरिक्त मूल्य मिळविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे

समाजामध्ये बहुसंख्य असणाऱ्या कामगारांची स्थिती दिवसेंदिवस हलाखीची बनत जाते. यामधूनच समाजामध्ये संघर्ष निर्माण होत जातो.

अतिरिक्त मूल्याच्या अतिरेकाने समाजात संघर्ष निर्माण होतो. समाजातील हे संघर्ष गटागटामध्ये निर्माण होतात. हे गट धार्मिक किंवा वांशिक नसतात तर हे गट आर्थिक उत्पन्नाच्या प्रक्रियेत निर्माण झालेले असतात. औद्योगिक क्रांतीनंतर कामगाराच्या शोषणाने कामगार वर्ग भांडवलदारांकडून भरडला जाऊ लागला. त्यामुळे भांडवलदार व कामगार वर्ग यांच्यातील दरी रुंदावतच चालली. हीच वर्णव्यवस्था पुढे समाजाच्या परिवर्तनाचे साधन बनली. औद्योगिक समाजात असलेल्या वेगवेगळ्या वर्णापैकी कामगार वर्गच जास्त संघटीत व आक्रमक होता. समाजातील मध्यमवर्ग, छोटे धंदेवाले, दुकानदार, कुशन कारागीर, शेतकरी असे वर्ग निर्माण होतात. उच्च अधिकारी, कायदेपंडित, डॉक्टर, पत्रकार, शिक्षक हे भांडवलदार वर्गात मोडतात. यापेक्षा कारकून, शिपाई, घरगुती नोकर, धंदा बसलेले कारागीर, बेकार, शिक्षित इ. कामगार वर्गात मिसळतात.

कार्ल मार्क्सच्या मते, वर्गसंघर्षाचे स्वरूप कामगार क्रांतीमध्ये रूपांतरीत होते. या क्रांतीतून प्रस्थापित असणारी राज्यव्यवस्था नष्ट केली जाते. कारण या राज्यसंस्थेआधारे कामगारांचे भांडवलदारांकडून शोषण केले जाते. कामगारांच्याकडून सशस्त्र क्रांती केली जाते. त्यामधून समाजवादी व्यवस्था निर्माण केली जाते. यावरून राज्य व नागरी समाजाचा मूळ आधार वर्गामध्ये असतो. नागरी समाजामध्ये वर्ग असतात व त्यांच्यामध्ये संघर्ष असतो. राज्य संस्थाच या वर्गाचे संरक्षण करीत असते. भांडवलदार राज्यसंस्थेच्या आधारेच कामगारांचे शोषण करीत असतात, कारण समाजातील भांडवलदार व सबल लोकांनी राज्यसंस्थेची निर्मिती केलेली असते, त्या राज्यसंस्थेचा उद्देश भांडवलदारांकडे असणाऱ्या संपत्तीचे रक्षण करणे इतका असतो. कारण भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. राज्य संस्था एकाचवेळी या दोहोंचे हितसंबंध साध्य करू शकत नाही. नागरी समाजामध्ये देखील अशा प्रकारचे परस्परविरोधी हितसंबंध असणारी व्यवस्था असते. मार्क्सच्या मते, राज्य भांडवलदारांचे प्रतिक असून राज्याचे कायदे कामगारवर्गाला कधीच न्याय देऊ शकत नाहीत.

अशा व्यवस्थेच्या विरोधात कामगार क्रांती घडून येते. कामगारांच्या संघटना निर्माण होऊन जनजागृती केली जाते व क्रांतीद्वारे समाजाचा संपूर्ण चेहरा-मोहरा बदलून टाकला जातो. या समाजव्यवस्थेमध्ये भांडवलशाही व्यवस्था नष्ट होवून कामगारांच्या आधिराज्याचा उदय होईल. नवीन समाजरचनेमध्ये भांडवलदारांच्या रूपातील शोषक नाहीसे झाल्यामुळे शोषण देखील नाहीसे होईल व नव्या प्रकारचा समाज अस्तित्वात येईल. असा समाज संपूर्ण जगासाठी असेल यामध्ये उत्पादन साधनांचा मोठ्या प्रमाणात विकास होईल. तंत्रज्ञानात खूप मोठी प्रगती झाल्यामुळे कामगारांचे कामाचे तास कमी होतील व जाचक काम असणार नाही. या नव्या साम्यवादी समाजात व्यक्ती विकासावर

भर दिला जाईल. प्रत्येक व्यक्तीला आपल्या आवडीनुसार, कुवतीनुसार, कौशल्यानुसार काम करता येईल. या समाजव्यवस्थेत स्त्री-पुरुष समानता असेल. स्वतंत्र कुटुंबसंस्था व स्वयंनिर्णयावर आधारित असेल. पुरुषी वर्चस्वाला पूर्णपणे नष्ट करून गुलामगिरीला विरोध केला जाईल. अशा वर्गरहीत समाजव्यवस्थेची निर्मिती करण्याचे समर्थन मार्क्सने केले आहे. या समाजात भांडवलदार व कामगार असे वर्ग असणार नाहीत. सर्वांना त्यांना आवडणाऱ्या कामाचे वाटप केल्यामुळे उत्पादनात प्रचंड वाढ होईल. त्यातून मिळणारा नफा समान पध्दतीने वाटला जाईल. अशा समाजात व्यक्तीकडून कायदे पालन स्वत:हून केले जाईल. राज्यसंस्थेसारखी दमण करणारी यंत्रणा वर्गरहीत समाजरचनेमुळे नष्ट होऊन जाईल. त्यांची जागा लोकांच्या संघटना किंवा प्रशासकीय संघटना घेतील.

### ४.२.५ नागरी समाज - अँटोनिओ ग्रामसी :

वास्तविक कार्ल मार्क्स व लेनिन नंतर महत्वाचा साम्यवादी तत्वज्ञ म्हणून ग्रामसी ओळखले जातात. ग्रामसी हा अत्यंत महत्त्वाचा असा 'उत्तर मार्क्सवादी' विचारवंत होता. १९७० च्या दशकात ग्रामसीच्या विचारांचा जगभर विचार होऊ लागला. याच कालावधीमध्ये 'युरोकम्युनिझम'चा उदय झाला. ग्रामसी यांचा जन्म १८९१ साली इटलीत झाला. त्यांचे लेखन इटालियन भाषेत आहे. त्याच्या विचारावर इटलीमध्ये प्रस्थापित व्यवस्थेत सर्वसामान्याचे होणारे शोषण व त्यांची हलाखीची परिस्थिती याचा प्रभाव पडला. कारण या काळात युरोपमध्ये इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, रशिया या प्रबळ महासत्ता होत्या. ग्रामसी यांच्यावर इटालियन विचारवंत मॅकियाव्हेली यांचा प्रभाव पडला. तसेच लेनिन, रोजा, लेक्झेंबर्ग, ट्रॉटस्की, बुखारीन यांच्या विचारांचा देखील प्रभाव ग्रामसी यांच्यावर पडला.

प्रस्थापित व्यवस्थेच्या विरुध्द म्हणजेच फॅसिस्ट विचारसरणीच्या विरोधात ग्रामसी यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. त्यामुळे त्यांना बराच काळ तुरुंगवास भोगावा लागला. ते स्वत: कामगारांच्या चळवळीत सहभागी असल्यामुळे त्याच्या विचारात वास्तविकता आली आहे. व्यक्तीबाबत विचार करताना ग्रामसी यांच्या मते, समाजातील सर्व व्यक्ती त्याच्या-त्याच्या क्षेत्रात काम करताना बुध्दीचा वापर करतात, त्यामुळे त्या बुद्धिजीवी असतात. अशी परिस्थिती राजकीय व सामाजिक क्षेत्रात दिसत नाही, कारण या क्षेत्रात सर्वच बुद्धीजीवी नसतात.

ग्रामसींनी या बुध्दीजीवी वर्गाची त्याच्या कामाच्या प्रकारावरून विभागणी केली. यामध्ये - **(१) पारंपारिक बुद्धीजीवी :** साहित्यिक व वैज्ञानिक असतात. **(२) जैविक बुध्दीजीवी :** यामध्ये समाजातील वैचारिक घटकांचा समावेश होता. यावरून ग्रामसींच्या मते, समाजातील भांडवलदार व कामगार यांच्या वर्ग संघर्षात मध्यस्थाचे कार्य बुध्दीजीवी वर्गाकडून केले जाते. याच्याकडूनच समाजासाठी, मार्गदर्शक, तत्वज्ञ व मित्र अशा विविध भूमिकेत कार्य सुरू असते. हे करत असताना व्यक्ती राजकीय पक्षाचा वापर करते. परंतु राजकीय पक्षातील सर्वच व्यक्ती बुध्दीजीवी नसतात. समाजातील तणाव बुध्दीजीवी वर्गामुळे कमी होतो. कारण समाजात वावरत असताना बुध्दीजीवी

अत्यंत जाणीवपूर्वक वागत असतात. थोडक्यात, समाजातील वर्ग संघर्षात मध्यस्थाचे कार्य बुध्दीजीवी वर्गाकडून पार पाडले जाते.

ग्रामसी नागरी समाजाला राजनितीक समाज असे देखील समजतात. पाश्चात्य देशातील राजसत्तेविषयी आपले मत व्यक्त करताना 'ती एक अशी खोल दरी असून त्यामध्ये टोकदार वस्तू उभ्या आहेत' असे म्हणतात. तसेच राजसत्ता ही राजनितीक समाज व नागरी समाज यांच्यात संतुलन साधते. नागरी समाज व राज्य, या एकच कल्पना आहेत. प्रत्येक समाजात त्या व्यवस्थेचा घटक आर्थिक मानव असून त्या समाजाचा तो एक भाग असतो. जसे प्राचीन भारतीय समाजातील नागरिकाच्या गरजा कमी असत. परिणामी, ते अल्पसंतुष्ट होते. त्यामुळेच त्या काळातील समाजात 'समाधानी मानव' दिसून येतो. ग्रामसी नागरी समाजातील नागरिकाचे स्थान स्पष्ट करताना नागरिक आर्थिक संरचना व बलशाली राजसत्ता याच्यामध्ये असून राजसत्ता नागरिकांना आर्थिक व्यवस्थेप्रमाणे बदलते. यामध्ये आर्थिक व्यवस्थेमधील नागरिकांनी राजसत्तेवर स्वत:चे वर्चस्व निर्माण करावे मात्र नागरी समाज राजसत्तेच्या मार्गदर्शनाने व त्यांच्या आदेशाप्रमाणे अर्थव्यवस्थेत सामील होतील. तसे न झाल्यास राजसत्ता आपल्या शक्तीचा वापर करून नागरिकांना तसे करण्यास भाग पाडतात. यामुळेच ग्रामसीच्या मते, राजसत्ता बदनाम होते. यामध्ये बदल घडवून आणावयाचा झाल्यास समाजातील बुध्दीवंतानी व श्रमिकांनी सहकार्य करून बौध्दीक व सांस्कृतिक क्षेत्रात अधिसत्ता स्थापन करावी. म्हणजेच ग्रामसींनी समाजातील बदल अभिजनांपेक्षा सर्वसामान्य व्यक्तीकडून होतात असे मानले जाते. यासाठी कारखान्याच्या व्यवस्थापकांनी कारखान्याविषयी, उत्पादनाविषयी व कामगारांच्या समाजातील स्थानाविषयी जागरूक असायला हवे. कामगारांनी वेगवेगळी कौशल्य प्राप्त केल्यानंतर नवशासन व नवसमाज निर्माण होईल, यासाठी त्यांनी हेजिमनी (Hegemony) किंवा धुरीणत्वाची संकल्पना मांडली. यामध्ये बुध्दीवंतानी सामाजिक व संख्यात्मक मूल्यांना प्राधान्य द्यावे, म्हणजेच केवळ कामगार व शेतकऱ्यांची एकजूट करून चालणार नाही तर त्यांचे हित साधले जाऊन राजकारणात तत्वज्ञान व संस्कृती यांना महत्त्व द्यावे हे धुरीणत्वाच्या संकल्पनेत मध्यवर्ती विचार होता. ग्रामसींनी समाजाचे दोन भाग केले.

१. **राजकीय :** यामध्ये सैन्य, पोलीस, नोकरशाही, कामगार संघटना यांचा समावेश होतो.
२. **नागरी :** यामध्ये शाळा, कुटुंब सांस्कृतीक मंडळे ज्याच्याकडून दडपशाही केली जात नाही यांचा समावेश होतो.

यावरून संस्कृती आदेश देत नाही. तिच्यावर संस्था, व्यक्ती यांचा सर्वसंमतीने प्रभाव पडतो. अशी संस्कृती केवळ नागरी समाजात आढळते. म्हणूनच ज्या समाजात एकाधिकारशाही असणाऱ्या राजकीय संस्थापेक्षा सर्व संमतीच्या सांस्कृतीक संस्था प्रभावी असतात, त्याठिकाणी 'सांस्कृतिक अधिसत्ता' (Hegemony) अस्तित्वात असते. यासाठीच शासक वर्गाने निर्माण केलेल्या सक्तीच्या

संस्था आणि समाजातील सर्वमान्य सांस्कृतिक संस्था यांचा समतोल निर्माण करून राज्य चालविले पाहिजे. म्हणजेच राजकीय सत्तेमध्ये वर्चस्व निती, धर्म, शिक्षण, कला यामधून समाजातील काही घटकांच्याकडून केले जाते. राजसत्ता व सांस्कृतिक व्यवस्था यामधील समतोल नष्ट झाल्यास आणिबाणीची परिस्थिती निर्माण होते. समाजातील निती, धर्म, शिक्षण, कला यामधून निर्माण झालेली समाजाच्या जीवनामध्ये मूल्य असतात. म्हणूनच सत्ता केवळ राजकीय किंवा लष्करी पातळीवरच आपले अस्तित्व टिकवू शकत नाही, तर सांस्कृतीक जीवनही त्याचा अविभाज्य भाग असतो.

समाजातील शासक वर्ग कठोरपणे गुलामगिरी लादतो व त्याच्याद्वारे आपली शासन व्यवस्था स्थिर करतो. यामध्ये वर्चस्व समाविष्ठ असते. मात्र वर्चस्व केवळ आदेश न देता किंवा नागरिकांना त्याची कठोरपणे अंमलबजावणी करावयास न लावता समाजातील सर्व घटकांच्या संमत्तीने त्यांना आदेशाचे पालन करावयास लावले जाते. यामध्ये 'धुरीणत्व' असते. आजच्या काळात शासनव्यवस्थेत अशाच प्रकारे शासनव्यवस्था समाजातील घटकांच्या मनावर शासनाचे म्हणणे बिंबवत असतात. यामुळे कधी-कधी समाजातील वरिष्ठाचे कनिष्ठ वर्ग धुरीणत्व स्विकारतो. मंदीरे, मठ, विद्यापीठे यामधून वरिष्ठ वर्ग आपले आदेश समाजासाठी देत असतो. त्यामुळे सामाजिक संस्था, पुराणे, मिथके, कला, साहित्य यामधून वरीष्ठ वर्ग सांस्कृतीक मूल्ये कनिष्ठ वर्गामध्ये रुजवित असतो. यामधूनच राजकीय समाज व नागरी समाज यांच्यात समतोल साधला जातो. म्हणजेच एखाद्या देशातील शासनव्यवस्था केवळ राज्यघटनेतील नियमाप्रमाणे चालत नसून त्यासाठी समाजातील त्या कायद्याच्यासाठी असणारी संमती देखील महत्वाची ठरते.

समाजातील वेळोवेळी होणाऱ्या स्थित्यंतरामध्ये धुरीणत्वाची संकल्पना देखील बदलत असल्याचे मत ग्रामसींनी व्यक्त केले आहे. समाजातील बदलत्या परिस्थितीप्रमाणे समाजात नवे आर्थिक, राजकीय व सामाजिक हितसंबंध निर्माण होऊन प्रस्थापित संस्कृतीच्या विरुध्द प्रतिसंस्कृती निर्माण होते. उदा. मध्ययुगीन व्यवस्थेत धर्माचा प्रभाव होता, यावेळी समाजामध्ये 'श्रध्दा' या तत्वाचा प्रभाव होता, याचे रूपांतर आजच्या भांडवलशाही व्यवस्थेत व्यक्तीवादामध्ये रूपांतरीत होते. हुकूमशाहीतील आज्ञापालन लोकशाहीमध्ये कर्तव्यपालनामध्ये रूपांतरित होते. धर्मसत्तेमध्ये असणाऱ्या अंधश्रध्दांना आव्हान दिले जाऊन वैज्ञानिक संस्कृती निर्माण केली जाते. म्हणजेच अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक व्यवस्थांना पर्यायी व्यवस्था तयार होतात, यालाच 'प्रतिधुरीणत्व' म्हणतात.

### ४.२.६ उत्तर वसाहतवाद व नागरी समाज :

वास्तविक १९४५ नंतरच्या नागरी समाजासमोर अनेक आव्हाने निर्माण झालेली आहेत. पाश्चात्य देशाच्या प्रभावाखालून रशिया व आफ्रिका खंडामधून अनेक देश स्वतंत्र झाले. स्वातंत्र्याअगोदर या देशातील नागरी समाजा समोर परकीय जोखंडातून मुक्त होणे असा उद्देश होता. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर म्हणजेच उत्तर वसाहतवादाच्या काळात त्या समाजा समोर सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्न उभे

होते. त्यांच्याबरोबर संघर्ष करताना नागरी समाजामध्ये अनेक संघटना निर्माण झाल्या. अशा समाजावर वसाहतवादाचा प्रभाव होता. यामध्ये प्रामुख्याने सांस्कृतिक प्रभाव जाणवतो, यामध्ये लॅटिन अमेरिका, कॅनडा, आशियन देश व आफ्रिकन देश यांचा समावेश होतो.

उत्तर वसाहतवादाचा काळ म्हणजे सांस्कृतिक व आर्थिक विचारांचा स्वतंत्र झालेल्या देशांमधील प्रभाव होता. दारिद्र्य व आर्थिक विकासातून निर्माण झालेला नवश्रीमंत वर्ग यांच्यामधील संघर्ष याला विरोध करण्यासाठी कामगारांच्या संघटना, उद्योगपतींच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी असलेल्या त्यांच्या संघटना, त्यातून निर्माण झालेला दबावगट व राजकीय पक्ष यांचे परस्पर संबंध यातून या देशाच्या समाजामध्ये अनेक बदल घडून आलेले दिसतात. वसाहतवादी देश निघून गेल्यानंतर देखील वसाहतवादी विचारांचा वर्ग या देशातील नागरी समाजावर राज्य करू लागला. त्यामुळे उत्तर वसाहतवादाच्या काळात समाजाचे शोषण करणारी आधुनिक यंत्रणा निर्माण झाली. यामध्ये समाविष्ट असणारे घटक याच समाजातील उद्योगपती, जमीनदार, राज्यकर्ते असले तरी त्यांची वृत्ती वसाहतवादाच्या काळातील शोषण करणारी व हुकूमत गाजवणारी अशा प्रकारची होती, यामुळेच ज्या महान उद्देशाने वसाहतवादापासून व शोषणयुक्त व्यवस्थेपासून मुक्तता मिळविण्यासाठी समाजातील लोकांनी स्वातंत्र्य लढा उभारून स्वातंत्र्य मिळविले होते. त्यांचे अंतिम ध्येय उत्तर वसाहतवादाच्या काळात पूर्ण करता आले नाही.

आशिया व आफ्रिका तसेच लॅटिन अमेरिकेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात एक पक्षीय हुकूमशाही तसेच लष्करी व धार्मिक हुकूमशहांची निर्मिती झाली. त्यामुळे युरोपीय देशांच्या गुलामगिरीतून मुक्तता झालेल्या देशामध्ये उत्तर वसाहतवादाच्या काळात स्वकीयांच्या गुलामगिरीत अडकण्याची वेळ आली. नागरिकांना अनंत अडचणींना तोंड द्यावे लागते. सरकारची ध्येय धोरणे सर्वसामान्यांच्या विरोधात गेल्यामुळे उत्तर वसाहतवादाच्या काळात नागरिकांना व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करावा लागतो. बहुराष्ट्रीय कंपन्या व त्यांचे हितसंबंधी सरकारच्या व्यवस्थेमध्ये असल्यामुळे धोरण निर्धारणाच्या प्रक्रियेवर नफा मिळविणाऱ्या कंपन्यांचा प्रभाव पडतो. त्यातून सर्वसामान्य नागरी समाजातील घटकांचे शोषण सुरू होते. आधुनिक काळातील या व्यवस्थेमुळे उत्तर वसाहतवादाच्या प्रभावाचा परिणाम नागरी समाजावर स्पष्ट दिसतो. यातील बऱ्याच देशात नागरी समाज संकल्पना वेगळ्या अर्थाने निर्माण झाल्या. कारण या देशाच्यामध्ये निर्माण झालेल्या हुकूमशाही व्यवस्थांमुळे राजकीय व सामाजिक वर्चस्व निर्माण करून सर्वसामान्य लोकांना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवले. त्यांनी केलेल्या राजकीय व सामाजिक शोषणामुळे सामान्य जनतेत असंतोष निर्माण झाला. त्यातून आपल्या हक्कासाठी नागरी संघटना निर्माण होऊन हुकूमशाही व्यवस्थेविरुध्द संघर्ष करू लागल्या. याचा परिणाम तिथल्या लोकशाही निर्मितीच्या प्रक्रियेवर होऊन अस्थिरता निर्माण झाली. त्यामुळेच आर्थिक अव्यवस्था निर्माण झाली व आर्थिक विकासाला खिळ बसली. परिणामी, लोकशाही मूल्ये व व्यवस्था अडचणीत आली.

आजच्या जगाचा विचार करता बिगर राजकीय संघटना समाजातील अनेक प्रश्न सोडविण्यासाठी समर्थपणे पुढे आलेल्या दिसतात. समाजातील अल्पसंख्यांकाचे प्रश्न, शिक्षण, आरोग्य, भ्रष्टाचार, पर्यावरण, मानवाधिकार, दहशतवाद, स्त्री-पुरुष भेद यांसारख्या अनेक समस्या सोडविण्यासाठी या संघटना प्रयत्न करतात. यासाठी वेगवेगळ्या राजकीय पक्षांची मदत घेऊन सरकारवर दबाव आणणे, न्यायालयीन मार्गाचा वापर करणे, प्रसारमाध्यमाद्वारे प्रश्नांना वाचा फोडणे यासारखे कार्य या संघटनांकडून केले जाते. नव-आर्थिक धोरणांचा स्विकार केल्यानंतर जागतिक व्यापारी संघटना, जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांचे समर्थन प्राप्त करून नागरी संघटना समाजात जागरूकता निर्माण करताना दिसतात. अशा संघटनांनी एकत्रित येऊन 'वर्ल्ड सोशल फोरम' यासारखी जागतिक संघटना निर्माण केली आहे.

◆ **स्वयं-अध्ययन प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडा.**

१. ................ शतकामध्ये नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला.
*(अ) १७ व्या (ब) १८ व्या (क) १९ व्या (ड) २० व्या.*

२. नागरी समाजामध्ये व्यक्तीचे ................ जपण्यासाठी जागरूकता निर्माण केली जाते.
*(अ) महत्त्व (ब) स्वातंत्र्य (क) जाणिवा (ड) प्रतिष्ठा.*

३. आधुनिक काळात सरकारच्या निरंकुशतेवर अंकुश ठेवण्याचे कार्य ................ द्वारे ठेवले जाते.
*(अ) पोलीस (क) नागरी संघटना*
*(ब) सैन्य (ड) सांस्कृतिक संघटना.*

४. राज्यांची निर्मिती मानवी इच्छेतून झाले असे ................ यांनी मान्य केले.
*(अ) बेन्थॅम (क) जे. एस्. मिल*
*(ब) अॅडॅम स्मिथ (ड) टि. एच. ग्रीन.*

५. 'नागरी सत्तेचे दोन करार' हा ग्रंथ ................ यांनी लिहिला.
*(अ) जॉन लॉक (ब) हेगेल (क) प्लेटो (ड) ॲरिस्टॉटल.*

## ४.३ सारांश :

थोडक्यात, नागरी समाज ही संकल्पना विचार करता सुरवातीला नागरी समाजातील घटक केवळ लोकसमुदाय म्हणून वावरत होते. परंतु राज्याच्या निर्मितीनंतर नागरिकांच्याकडून नियमांचे व नैतिकतेचे पालन केले जाऊ लागले. नागरिकांना कायद्याद्वारे नियंत्रित केले जाऊ लागले व

नागरिकांचा समाज हा राजकीय समाज बनला. सुरवातीस यांच्या नागरी संघटना निर्माण झाल्या व साम्यवादी सरकारला विरोध करू लागल्या. अशाप्रकारे अठराव्या शतकाच्या सुरवातीस नागरी समाजाच्या संकल्पनेचा उदय झाला. उदारमतवादाच्या संकल्पनेचा विचार करता नागरी समाजात व्यक्तीच्या इच्छा व हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी गैर सरकारी संघटना निर्माण झाल्या. या संघटना व्यक्तीचे हक्क सुरक्षित ठेवण्यासाठी लोकशाही मार्गाने लढत असत. याबाबत जेरेमी बेथॅम, जे. एस्. मीन, ॲडम स्मिथ, टि.एच.ग्रीन, मॅकआयव्हर, ग्रामसी व ग्रॅहम वालास यांनी आपले मत व्यक्त केले आहे.

हेगेल यांनी राज्य व नागरी समाजामध्ये भेद करून नागरी सामाजाच्या तीन अवस्था सांगितल्या आहेत. त्यांच्या मते, न्याय, पोलीस यांना राज्याशिवाय अर्थ प्राप्त होत नाही. कार्ल मार्क्स यांच्या मते, राज्य व नागरी समाजाच्या मूळ आधार वर्गामध्ये असतो. नागरी समाजामध्ये वर्ग असतात व त्यांच्यात संघर्ष असतो. राज्यसंस्था कामगारांचे शोषण भांडवलदारांच्यामार्फत करत असते. कारण भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंध वेगवेगळे असतात. अशा परिस्थितीत नागरी समाजाचे प्रतिक म्हणून कामगार क्रांती घडवून आणतात. ग्रामसी यांच्या मते, नागरी समाजाला राजनितीक समाज असे म्हणतात. राजसत्ता ही राजनितीक समाज व नागरी समाज यांच्यात संतुलन साधत असते. नागरी समाज व राज्य या एकच कल्पना आहेत. प्रत्येक समाजात त्या व्यवस्थेचा 'आर्थिक मानव' असून त्या समाजाचा तो एक भाग असतो, असे प्राचीन भारतीय समाजातील नागरिकांच्या गरजा कमी असत. परिणामी, ते अल्पसंतुष्ट होते. त्यामुळेच त्या काळातील समाजात 'समाधानी मानव' दिसून येतो. ग्रामसीने धुरीणत्वाची संकल्पना मांडून नागर समाजाचे महत्त्व सांगितले.

वसाहतवादाच्या काळानंतर उत्तर वसाहतवादाच्या काळात राज्यसंस्था शोषणाचे साधन बनल्या. लॅटिन अमेरिकेमधील देशांमध्ये हुकूमशाही व्यवस्था निर्माण झाल्या त्याविरोधात समाजात नागरी संघटना निर्माण झाल्या, त्या संघटना बिगर राजकीय देखील असू शकतात. त्या व्यवस्थेमध्ये या संघटना मानवी हक्क भ्रष्टाचार, अल्पसंख्याकांचे प्रश्न, शिक्षण या प्रश्नावर संघर्ष निर्माण केला जातो. अशा संघटनांचे स्वरूप जागतिक असल्याचे दिसते.

## ४.४ पारिभाषिक शब्द :

- **नागरी समाज :** बिगर शासकीस संघटना आणि संस्था यांचे एकत्रीकरण.
- **Koinonia Politine :** नागरी समाजासाठी ॲरिस्टॉटलने ही संज्ञा वापरली.
- **तत्त्वज्ञानी राजा :** प्लेटोने आदर्श राजाला दिलेली उपमा.
- **लेसेज फेअर तत्त्वज्ञान :** मुक्त व्यापार धोरण
- **N.G.O. :** गैरसरकारी संघटना.

- **N. P. O. :** ना नफा ना तोटा तत्त्वावर चालविल्या जाणाऱ्या संघटना.
- **P. V. O. :** खाजगी संघटना.
- **लॅटिन अमेरिका :** दक्षिण अमेरिकेमध्ये असलेल्या विविध देशांचा समूह.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१. १८ व्या.
२. स्वातंत्र्य.
३. नागरी संघटना.
४. टि. एच. ग्रीन.
५. जॉन लॉक.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

**थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. नागरी समाजाचा अर्थ सांगून विकास स्पष्ट करा.
२. जॉन लॉक व ग्रामसी यांचे नागरी समाजाबाबत विचार स्पष्ट करा.
३. उदारमतवादाची तत्त्वे व स्वरूप स्पष्ट करा.
४. कार्ल मार्क्स यांचे नागरी समाजाबाबतचे विचार स्पष्ट करा.

**टिपा लिहा.**

१. उत्तर वसाहतवाद व नागरी समाज.
२. हेगेलचे नागरी समाजविषयी विचार.
३. नागरी समाजाचा विकास.

## ४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. **बाचल वि. मा. :** *'राजकीय सिद्धांत'.*
२. **भोळे भा. ल. :** *'राजकीय सिद्धांत विश्लेषण'.*
३. **डोळे ना. य. :** *'राजकीय विचारांचा इतिहास'.*
४. **नवलगुंदकर श. ना. :** *'पाश्चात्त्य राजकीय विचारवंत'.*
५. **Bhandari D. R.** *"History of European Political Philosophy".*
६. **Jean Cohen,** *"Civil Society and Political Theory", MIT Press, 1994.*
७. **Almond & Verba,** *"The Civic Culture". Sage, 1989.*


OOO